शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग ३ : मराठी

सत्र ५ (Major Mandatory)

भाषा आणि भाषाविज्ञान

सत्र ६ (Major Mandatory)

मराठी भाषेचा अभ्यास

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०२६

बी. ए. भाग ३ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : २००

■

प्रकाशक

डॉ. व्ही. एन. शिंदे

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

मुद्रक

श्री. बी. पी. पाटील

अधीक्षक,

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-47370-45-8

- दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
  शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (महाराष्ट्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सल्लागार समिती

प्रा. (डॉ.) आर. के. कामत
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) ज्योती जाधव
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) प्रकाश पवार
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

डॉ. राजेंद्र कांकरिया
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

प्रा. (डॉ.) सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं.२,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर-४१६००१

डॉ. संजय रत्नपारखी
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

प्रा. (डॉ.) कविता ओझा
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) चेतन आवटी
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) व्ही. व्ही. मैंदरगी
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख
प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) ए. बी. साळी
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. ए. एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्रीमती सुहासिनी सरदार पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. एस. पाटणकर (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **प्रा. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. नंदकुमार मोरे**
  मराठी विभाग
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. शीतल गोरडे-पाटील**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली
- **प्रा. अरुण शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **प्रा. गोमटेश्वर पाटील**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. संदीप दळवी**
  श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. सागर पाटील**
  कन्या महाविद्यालय, मिरज, जि. सांगली
- **डॉ. एकनाथ पाटील**
  श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स
  ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले
- **प्रा. प्रकाश दुकळे**
  देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स ॲण्ड
  सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली
- **डॉ. सर्जेराव जाधव**
  यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,
  जि. कोल्हापूर
- **प्राचार्य, गोविंद काजरेकर**
  गोगटे-वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी,
  जि. सिंधुदुर्ग
- **प्रा. रमेश साळुंखे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अशोक तवर**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स
  ॲण्ड कॉमर्स सातारा.
- **प्रा. तातोबा बदामे**
  पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
  तासगांव, जि. सांगली

संपादकीय...

विद्यार्थी मित्रहो,

बी. ए. भाग तीन या वर्गासाठी मराठी विषयासाठी सत्र पाच करिता, 'भाषा आणि भाषाविज्ञान' आणि सत्र सहा करिता 'मराठी भाषेची उत्पत्ती' या दोन अभ्यासपत्रिका प्रत्येकी चार क्रेडिटसाठी नियुक्त करण्यात आलेल्या आहेत. वाङ्मयाचा इतिहास, साहित्याची वाटचाल याबरोबरच भाषा आणि संस्कृती यांच्या अभ्यासाला आता महत्त आलेले आहे. भाषेचे स्वरूप व कार्य, भाषेचा पारंपरिक व आधुनिक अभ्यास, भाषेत होणारे परिवर्तन आणि भाषेचा इतर अभ्यास क्षेत्राशी असणारा संबंध या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. भाषा परिवर्तनशील असल्याने भाषेवर विविध इतर भाषांचा परिणाम होतो. भारत हा बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक देश असल्याने विविध भाषेतील शब्द, उच्चार मराठीत येतात. याचाही अभ्यास या पत्रिकेत केलेला आहे. मराठीच्या विविध रूपामध्ये कोल्हापुरी, खानदेशी (अहिराणी) आणि चंदगडी बोलींचा परिचय करून दिलेला आहे. महाराष्ट्रात आजमितीला साठ सत्तर बोली बोलल्या जातात. त्यातील महत्त्वाच्या तीन बेलींचा परिचय येथे दिलेला आहे. आपण प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी दिलेले क्षेत्रीय कार्यसुद्धा करावे. त्यामुळे 'भाषाविज्ञान' ही अभ्यासपत्रिका आपणास अधिक सुलभ होईल, आवडीची होईल..! याकरिता तुम्हाला मनःपूर्वक शुभेच्छा!

– संपादक

✻ संपादक ✻

डॉ अनिल गवळी
१३ ए वॉर्ड, राधाकृष्ण कॉलनी,
साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर
जि. कोल्हापर

डॉ. प्रकाश दुकळे
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस
अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, यशवंतनगर, चिखली
ता. शिराळा जि. सांगली

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	**सत्र ५ भाषा आणि भाषाविज्ञान** **सत्र ६ मराठी भाषेचा अभ्यास** **बी. ए. भाग–३**

अभ्यास घटकांचे लेखक

लेखक	**घटक क्रमांक**	
	सत्र ५	**सत्र ६**
डॉ. प्रकाश दुकळे, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज, यशवंतनगर, चिखली ता. शिराळा जि. सांगली	१	४
डॉ. चंद्रकांत कदम, गिरीस्थान आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, महाबळेश्वर, ता. महाबळेश्वर, जि. सातारा	२	३
डॉ. विठ्ठल रोटे, मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव ता. वाळवा, जि. सांगली	३	–
श्रीमती प्रांजली क्षीरसागर मराठी अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	४	१
डॉ. युवराज देवाळे, कर्मवीर हिरे आर्टस, कॉमर्स, सायन्स ॲन्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी ता भुदरगड जि. कोल्हापूर	–	२

✻ संपादक ✻

डॉ अनिल गवळी
१३ ए वॉर्ड, राधाकृष्ण कॉलनी,
साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर
जि. कोल्हापर

डॉ. प्रकाश दुकळे
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस
ॲन्ड सायन्स कॉलेज, यशवंतनगर, चिखली
ता. शिराळा जि. सांगली

बी. ए. भाग–३ मराठी

अनुक्रमणिका

घटक क्रमांक	घटकाचे शीर्षक	पान क्रमांक
	सत्र ५ : भाषा आणि भाषाविज्ञान	
१.	भाषेचे स्वरूप आणि कार्य	१
२.	भाषाभ्यास : पारंपरिक आणि आधुनिक	२१
३.	आधुनिक भाषाभ्यास : वर्णनात्मक भाषाविज्ञान	३३
४.	भाषाविज्ञान आणि इतर अभ्यासक्षेत्रे	५५
	सत्र ६ : मराठी भाषेचा अभ्यास	
१.	मराठी भाषेची उत्पत्ती	६७
२.	भाषिक परिवर्तन प्रक्रिया	८१
३.	मराठीवरील प्रभाव	१०४
४.	मराठीची विविध रूपे.	११८

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२६-२७ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

भाषेचे स्वरूप आणि कार्य

१.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे वाचन केल्यानंतर तुम्हाला,

- भाषेचे स्वरूप लक्षात येईल.
- भाषेचे विशेष समजतील.
- भाषेच्या कार्याची माहिती होईल.
- भाषेबाबतचे दृष्टिकोन समजतील.

१.१ प्रास्ताविक

भाषा हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माणूस कोणती ना कोणती भाषा वापरत असतो. जेव्हा माणूस प्रत्यक्ष बोलत नसतो, तेव्हा सुद्धा तो मनातल्या मनात विचार करत असतो. कल्पना करीत असतो. विचार व कल्पना यासाठी तो भाषेचाच वापर करीत असतो. अगदी स्वप्नात सुद्धा माणूस भाषाच वापरत असतो. अशा प्रकारे माणसाच्या प्रत्येक भावनेशी, विचारांशी आणि कृतीशी भाषा ही गोष्ट निगडित आहे. ज्याला भाषा अवगत नाही, असा मानव समाज या पृथ्वीवर उपलब्ध नाही. प्राणीमात्रांच्या तुलनेत मानवाने स्वतःची जी प्रगती करून घेतली आहे, तिच्या मुळाशी त्याची ही भाषाच आहे. भाषेच्या माध्यमातून तो भोवतालची सृष्टी किंवा अवकाश समजून घेऊन ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. मानवाला सामाजिक जीवनासाठी एकमेकांशी संपर्क साधणे, एकमेकांमध्ये विनिमय साधणे, संदेशांची देवाणघेवाण करणे आवश्यक असते. अशा तऱ्हेचा संपर्क, विनिमय आणि संदेश भाषेमुळे सहज शक्य होतो. म्हणजेच भाषा मानवी जीवनाला वेढून टाकणारी गोष्ट आहे. तरीही भाषेबद्दल आपणास फार थोडीच माहिती असते. भाषेचे स्वरूप व कार्य आपणास नीट माहीत नसते. तसेच भाषेबद्दल काही गैरसमजुती असतात. भाषेचे स्वरूप व कार्य या संबंधाने माहिती करून घेण्यापूर्वी काही गैरसमजुती मनातून घालवणे आवश्यक आहे.

१.२ विषयविवेचन

भाषा ही मानवी भावनांच्या आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम आहे. भाषा ही मानवाची मूलभूत गरज आहे. मानवी संस्कृतीचा इतिहास पाहता भाषा म्हणजे काय? तिचा जन्म कसा झाला? असे भाषेसंबंधी प्रश्न मानवाला वेळोवेळी पडलेले दिसतात. कल्पनाशक्ती, तर्क, अनुमान यांच्या आधाराने आणि शेवटी अभ्यास, संशोधनाने या प्रश्नाचे उत्तर मानवाने शोधून काढले आहे. परंतु भाषा कशी निर्माण झाली, तिचा निर्मिती काळ कोणता, तिचे पहिले रूप कसे होते; असे काही प्रश्न अनुत्तरितच राहतात. भाषा ही

मानवाच्या संप्रेषण व्यवहारासाठी अस्तित्वात आलेली व्यवस्था आहे. संदेश आणि हेच भाषेचे मुख्य कार्य आहे. भाषेव्यतिरिक्त काही माध्यमांचा संदेशनासाठी मानव वापर करतो; परंतु भाषेशिवाय प्रभावी संदेशन अशक्य आहे. याचे कारण भाषेमध्ये अनेक वैशिष्ट्ये अंतर्भूत आहेत. भाषा ही मानवी ध्वनीने बनलेली संरचना आहे. ध्वनीमध्यें अंतर्भूत असलेल्या गुणांमुळे भाषा सामर्थ्यशाली बनली आहे. मानवी ध्वनींचे निर्मितिस्थान मानवाचे शरीर आहे. त्यामुळे हे ध्वनी सतत मानवासोबत असतात. या ध्वनींची निर्मिती आणि वहनासाठी मानवाला विशिष्ट कष्ट करावे लागत नाहीत. मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाचे अस्तित्व भाषेमुळेच शक्य आहे. भाषेचे स्वरूप जाणीवपूर्वक समजावून घेतल्यानंतर तिचे सामर्थ्य आपल्या लक्षात येईल. सर्वच मानवी समूहांचा स्वतःच्या भाषेशी घनिष्ठ व अतूट संबंध दिसतो. भाषा ही प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचा एक भाग असते. त्यामुळे भाषेला समाजाचे संचित म्हटले जाते. म्हणूनच भाषेशिवाय मानवी जीवनाचा विचार करता येत नाही. भाषा ही मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे.

१.२.१ भाषा म्हणजे काय?

भाषा या शब्दातील मूळ धातू 'भाष्' हा आहे. या धातूचा अर्थ बोलणे, आवाज उत्पन्न करणे असा आहे. भाषेत शब्द असतात, शब्दात ध्वनी असतात. 'सार्थ आणि अन्वित अशा धनींचा समूह म्हणजेच भाषा होय.' विशिष्ट अर्थाचे हे ध्वनी विशिष्ट नियमांनी एकमेकांना जोडलेले असतात. या ध्वनींचा उपयोग मानवी व्यवहार सुलभ करण्यासाठी केलेला असतो.

इंग्रजी कोशात भाषा या शब्दासाठी Language, Speech, Tongue असे पर्याय सुचविले आहेत. Language या शब्दाचे मूळ Lingua या लॅटिन शब्दात आहे. Lingua म्हणजे Speech. कोशवाङ्मयात भाषा म्हणजे 'मानवी मुखातून निघालेली सार्थ ध्वनिसंहिता' असा अर्थ दिलेला आहे.

भाषा हा शब्द व्यवहारात अनेक अर्थाने वापरला जातो. नाटकी भाषा, मुक्यांची भाषा, कवींची भाषा, विद्वानांची भाषा, ग्रामीण भाषा, लेखकांची भाषा, चित्रकारांची भाषा, शिल्पकारांची भाषा, मूक भाषा, हावभावांची भाषा, संगणकाची भाषा, लाल हिरव्या दिव्यांची भाषा असे निरनिराळे वाक्यप्रयोग आपण करतो. मात्र भाषाविज्ञानाच्या दृष्टीने भाषा या शब्दाचा उपयोग इतक्या व्यापक प्रमाणात न होता, केवळ मानवी मुखेंद्रियातून निर्माण होणाऱ्या व ध्वनींच्या सहाय्याने बनलेल्या भाषेचाच विचार केला जातो. मानवी भाव-भावना, आचारविचार व्यक्त करण्यासाठी हावभावाच्या भाषेचा आधार घेतला जातो. शिट्टी वाजवणे, हात दाखविणे, जांभई देणे, पाय आपटणे, टाळी वाजवणे, हसणे इत्यादी मानवी हावभावांची भाषा असते. तर मुखावाटे ध्वनी निर्मितीच्या माध्यमातून बोलली जाणारी भाषा ध्वनीच्या अर्थपूर्ण संरचनेची भाषा असते. या स्वरूपाच्या भाषेचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

भाषेच्या व्याख्या

भाषा म्हणजे काय हा प्रश्न सर्वसामान्य लोकांना सहसा कधी पडत नाही. अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होण्यापूर्वी भाषा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेली असते. आपण जन्मल्यानंतर भाषा शिकण्याच्या

नैसर्गिक क्षमतेच्या आधाराने आपण आपल्या परिसरातील भाषा शिकलेली असतो. ती नकळत आत्मसात झालेली असते. मानवी संस्कृतीचा इतिहास पाहता भाषा म्हणजे काय, तिचा जन्म कसा झाला, असे प्रश्न भाषेसंबंधी वेळोवेळी पडलेले दिसतात. भाषा आणि भाषिक व्यवहार याबाबतचा अभ्यास भाषाभ्यासकांच्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय आहे. भाषा निर्मितीबाबत मानवाला सातत्याने प्रश्न पडलेले आहेत. आपल्या विचारातून, चिंतनातून, निरीक्षणातून आणि अनुभवातून भाषाविषयक विचार मांडण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आहे. या व्याख्या भाषा, भाषिक व्यवहार आणि संप्रेषण समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

१. कृ. पां. कुलकर्णी हे महत्त्वाचे भाषाभ्यासक आहेत. 'मराठी भाषेचा उद्गम आणि विकास' हा ग्रंथ लिहून त्यांनी महत्त्वाचे संशोधन मांडलेले आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी पुढील व्याख्या नोंदविलेली आहे. भाषा हा शब्द भाष् (आवाज उत्पन्न करणे) या धातूपासून आला आहे. भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनीचा समूह. व्यवहार साधन व व्यवहारपूर्तीचे मुख्य उद्दिष्ट भाषेच्या माध्यमातून पूर्ण होते. आत्मप्रकटीकरण (self-expression) व आत्मनिवेदन (self-communication) या प्रमुख बाबी भाषेच्या केंद्रस्थानी असतात. (मराठी भाषेचा उद्गम आणि विकास, पृष्ठ क्र. १-२)

२. भाषा व मराठी संस्कृतीचे विचारवंत व अभ्यासक ना. गो. कालेलकर यांनी आपल्या 'भाषा व संस्कृती' या ग्रंथामध्ये भाषा आणि तिचे स्वरूप वैशिष्ट्ये याबाबत मौलिक विवेचन केलेले आहे. त्यांनी भाषेची व्याख्या करताना म्हटले आहे, भाषा म्हणजे मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनविलेली समाजव्यवहाराला साह्यभूत अशी एक पद्धती आहे. (भाषा आणि संस्कृती, १९६९, पृष्ठ क्र. ८) अशा स्वरूपात भाषेच्या व्याख्येचे महत्त्वपूर्ण विवेचन केलेले आहे.

३. श्री. न. गजेंद्रगडकर यांनी आपल्या 'भाषा आणि भाषाशास्त्र' या भाषाविषयक ग्रंथामध्ये व्याख्या करताना म्हटले आहे, यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा. (भाषा आणि भाषाशास्त्र, १९९१, पृष्ठ क्र. १०८)

४. भाषा ही एक सहजक्रिया आहे. तिचा आपणास इतका परिचय असतो की, भाषा स्वतंत्र विचार करण्याचा व अभ्यास करण्याचा विषय आहे, याची जाणीव नसते. त्याचबरोबर भाषा ही अर्जित वस्तू आहे. काही ध्वनी निर्माण करता येणे ही गोष्ट सहज असली तरी आशय प्रकट करणारे विधान करता येणे म्हणजे बोलता येणे ही माणसाने मिळविलेली गोष्ट आहे. (अभिनव भाषाविज्ञान : गं. ना. जोगळेकर, पृ. क्र. २-३)

५. भाषा बोलली जात नसून ती एक संभाव्य अवस्था असते. जेव्हा भाषेचे ध्वनीत रूपांतर होते तेव्हा ती भाषा राहत नाही, तर भाषण होते. भाषण ही व्यक्तिगत क्रिया असते. याउलट भाषा ही व्यक्तिनिरपेक्ष गोष्ट आहे. ती व्यक्तीनिरपेक्ष असली तरी संपूर्ण समाजाची मालमत्ता या अर्थी एक समाजसापेक्ष अशी सामाजिक संस्था असते. (भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, डॉ.अनिल गवळी, पृष्ठ क्र. १६-१७)

भाषेच्या या व्याख्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर भाषेच्या स्वरूप, संकल्पना आणि वैशिष्ट्यांवर वरील सर्व अभ्यासक भाष्य करताना दिसतात. त्याचबरोबर समाजव्यवहार पार पाडण्यासाठी हे ध्वनिसंकेत आशय धारण करतात; हे त्यांनी निसंदिग्धपणे नोंदविलेले आहे. हाच आशय अधिक स्पष्ट करणाऱ्या पुढील पाश्चिमात्य भाषाभ्यासकांच्या व्याख्यांचा विचार करूया. त्या अशा,

१. कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे, मानवी साधन म्हणजे भाषा. : एडवर्ड सपीर

२. ध्वनी व अर्थ यात सांगड घालण्याच्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय.: फेर्दिनां-द-स्योस्यूर

भाषा ही संकेतांनी बद्ध असणाऱ्या चिन्हांची व्यवस्था आहे. भाषेतील चिन्हांना स्वतःचा अर्थ नसतो. हा अर्थ त्यांना समाज देत असतो. मानव ज्या वास्तूत राहतो त्या वास्तूला 'घर' म्हणतात. तर इंग्रजीमध्ये त्यास 'हाऊस' म्हटले जाते. एकाच वस्तूसाठी भिन्न भाषेत भिन्न शब्द आढळतात. याचाच अर्थ प्रत्येक भाषा समूहाने आपल्या व्यवहारासाठी वस्तूंना आपापल्या परीने नावे दिलेली आहेत. काही वेळा एकाच भाषेत एकाच वस्तूला भिन्न-भिन्न नावे असतात. मराठी बोलींचा अभ्यास केल्यानंतर ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. उदाहरणार्थ, कोल्हापूर परिसरात पावसाळ्यात डोक्यावर घेतात त्यास 'इरलं' म्हणतात तर चंदगड परिसरात त्यास 'गोराब' म्हणतात. याचा अर्थ त्या-त्या परिसरातील समूहाने आपल्या व्यवहारासाठी स्वतःचे अर्थसंकेत दिलेले आहेत. त्यामुळे भाषा ही संकेताने बद्ध असलेल्या चिन्हांची व्यवस्था किंवा पद्धती आहे, असे म्हणता येते.

१.२.२ भाषिक संदेशनाचे स्वरूप

मानवी जीवनात भाषेद्वारा चालणाऱ्या संप्रेषणाला/संदेशनला आपण भाषिक संप्रेषण म्हणतो. संप्रेषणास संवाद, संदेशन, संज्ञापन, दळणवळण, देवघेव अशा अनेक पर्यायी संज्ञा वापरल्या गेल्या आहेत. भाषेच्या माध्यमातून होणाऱ्या वैचारिक व भावनिक देवाणघेवाणीस 'संप्रेषण' असे म्हणतात. भाषा ही चिन्हांची व्यवस्था आहे, असा विचार फेर्दिनां-द-सोस्यूर या भाषाभ्यासकाने प्रथम मांडला. भाषेमध्ये असणाऱ्या या चिन्हव्यवस्थेद्वारे आपले संप्रेषणाचे कार्य सुरू असते. कोणतेही संदेश देणे अथवा घेणे यासाठीच संप्रेषणव्यवस्था असते. संप्रेषणात वक्ता आणि श्रोता म्हणजेच बोलणारा आणि ऐकणारा दोघेही एकभाषिक असणे आवश्यक असते. एकभाषिकतेशिवाय संप्रेषण पूर्ण होत नाही. संप्रेषणव्यवस्थेत तीन प्रकारच्या यंत्रणा असतात. त्या पुढीलप्रमाणे;

१. मौखिक संदेशनाला पर्याय म्हणून वापरली जाणारी संप्रेषण व्यवस्था. उदाहरणार्थ; लिहिणे, टाईप करणे, बोलणे पकडून ठेवणे.

२. भाषेतून इतर परिभाषा तयार करणे. उदाहरणार्थ; बीजगणिताची भाषाः अक + बक = अबक म्हणजेच अ, ब ही अक्षरे मुळात लिखित बोली भाषेची संप्रेषण शस्त्रे आहेत. ती आपण बीजगणितासाठी वापरू शकतो.

३. भाषेशी निगडित, परंतु अप्रत्यक्ष जोडल्या गेलेल्या संप्रेषण यंत्रणा. उदाहरणार्थ वक्ता बोलत असताना तो करीत असलेले हावभाव, छटा. (भाषासंवाद, डॉ. अनिल गवळी, डॉ. नंदकुमार मोरे, पृष्ठ क्र. १४०)

या भाषिक संप्रेषणाच्या व्यवस्थेमध्ये आणि प्रणालीमध्ये दोन प्रकारचे संप्रेषण चालते. मानवी संप्रेषण, मानवेतर संप्रेषण असे हे दोन प्रकार होय. त्याची आता आपण माहिती घेऊया.

१.२.३ मानवी संदेशन / संप्रेषण

मानवी जीवनात प्रत्येक क्षेत्रात भाषा आहे. विचार आणि भावनांच्या अभिव्यक्ती बरोबरच मानव भाषेच्याद्वारे कृतीही करतो. भाषेद्वारे आपण आपल्या राग, लोभ, प्रेम, चीड, आसक्ती, विरक्ती अशा भावना व्यक्त करतो. माणूस खोटे बोलू शकतो. तसे कथा, कविता लिहू शकतो. काही वेळा शिव्या देऊन रागावण्यापेक्षा आपण डोळे वटारू शकतो. भाषा हे माध्यम सर्वस्पर्शी आहे. भाषेद्वारे आपण एकमेकांशी संपर्क साधू शकतो. माहिती, ज्ञान, विचार, भावना, अनुभव यांची आपण भाषेद्वारे देवाण-घेवाण करू शकतो. शारीरिक हावभाव, चेहऱ्यावरील छटा, रंग, रेषा, कपडे यांचा वापर आणि चित्राकृती, इलेक्ट्रॉनिक्स माध्यम, यंत्रनिर्मित ध्वनी यांचाही समावेश मानवी संदेशनात करता येईल. यामुळे समाजव्यवहार सुलभ होतो. भाषेतील देवाणघेवाणीच्या या प्रक्रियेला संदेशन, संप्रेषण (Communication) म्हणता येते. त्यामुळे सामाजिक संप्रेषण हे भाषेचे मूलभूत कार्य ठरते.

भाषेला लिखित रूप प्राप्त झाल्याने ती आपणास वाचता येते. दूरवरच्या व्यक्तीशी भ्रमणध्वनीच्या माध्यमातून बोलता येते. दूरसंचार, दूरदर्शन, आकाशवाणी यांनी भाषेला सर्वदूर पोहोचण्यास मोठी मदत केली. आज सोशल मीडियाच्या माध्यमातून ती लिखित आणि मौखिक रूपाने दूरवर गेली. एखादे दैनिक जगात कोठेही वाचू शकतो. या प्रगतीत भाषेचा मोठा वाटा आहे. भाषेशिवाय ही माध्यमे कोणता संदेश देऊ शकली असती? त्यामुळे मानवी संदेशनाच्या प्रगतीत भाषिक संप्रेषण महत्त्वाचे ठरते.

भाषा हा शब्दप्रयोग आपण अनेक अर्थाने वापरतो. हावभावांची भाषा, प्राण्यांची भाषा, स्काऊट मधील ध्वजांची भाषा, रस्त्यावरील वाहतुकीचे नियंत्रण करणाऱ्या लाल-नारंगी- हिरव्या दिव्यांची भाषा, आपण पाठवलेले संदेश शत्रूला कळू नयेत म्हणून सैन्य दलाकडून युद्धकाळात वापरली जाणारी गुप्त भाषा, संगणक भाषा असे शब्दप्रयोग आपण ऐकत आहोत. त्यामुळे भाषा हा शब्द नेहमीच्या अर्थाने न वापरता 'संकेताची पद्धत' किंवा 'संकेत प्रणाली' या अर्थानेही वापरलेला आहे. (मराठीचा भाषिक अभ्यास : ऐतिहासिक आणि वर्णनात्मक, डॉ. मु. श्री. कानडे, (पृष्ठ क्र. ६३) आजही प्रत्येक क्षणी माणूस नवेजुने संकेत वापरत आहेत. संकेतव्यवस्थेसाठी रंग, चित्र, शरीर, कपडे, वस्तू, आवाज अशी विविध माध्यमे वापरून माणूस आशयांची आणि संदेशांची देवाणघेवाण करीत असतो.

भाषेशिवाय संप्रेषणाची एक वर्गवारी पुढील प्रमाणे करता येईल.

अ) विशिष्ट रंगाने तयार होणारे अर्थसंकेत : उदा. सिग्नलचे लाल, नारंगी, हिरवे दिवे विशिष्ट सूचना देतात.

आ) चिन्हे - समांतर रेषा, वक्ररेषा अशी वाहतुकीची विशिष्ट चिन्हे आहेत.

इ) आवाज संकेत - गाड्यांचे हॉर्न, दरवाज्यावरील बेल, कारखान्याचे भोंगे, रेल्वेचा हॉर्न, कुकरची शिटी, जाहिरातीतील विशिष्ट संगीत/ आवाज आपणास संदेश देतात.

१.२.४ मानवेतर संदेशन । संप्रेषण

मानवाबरोबरच सृष्टीमध्ये मानवेतर प्राण्यांचे सहजीवन सुरू असते. त्यांचे जीवन अनुभवणे माणसाचा आस्था विषय आहे. काही प्राणी तर मानवी जीवनाशी एकरूप झालेले आहेत. प्राण्यांची भाषा एकेरी आणि अत्यंत मर्यादित असते. प्राणी विनिमयासाठी जे ध्वनी उच्चारतात ते उस्फूर्त असतात आणि दुसरे म्हणजे विशिष्ट परिस्थितीत आशयाच्या संदेशासाठी विशिष्ट ध्वनी निर्माण करणे ही त्यांची नैसर्गिक, शारीर गरजही असते. उदा. भीती वाटत असता विशिष्ट रीतीने चित्कारणे, दुःखतखूपत असता विशिष्ट स्वरात विव्हळणे किंवा आनंद दर्शवण्यासाठी विशेष पद्धतीचे आवाज काढणे या गोष्टी प्राण्यांच्या बाबतीत उत्स्फूर्त असतात. प्राणीभाषा ही सहज प्रेरणेवर अवलंबून असते त्यामुळे त्या त्या जातीच्या प्राण्याला जन्मजात अवगत असते. माणसाला मात्र भाषा जन्मजात अवगत नसते. प्राण्यांना भाषा मुद्दाम शिकावी लागत नाही. माणसाचे तसे नसते तर त्याला मातृभाषा सुद्धा प्रयत्नपूर्वक ग्रहण करावी लागते. प्राण्यांच्या मेंदूमध्ये माणसाच्या मेंदूसारखी भाषा ग्रहणशक्ती नसते. माकड माणसाच्या सहवासात राहिले तरी त्याला काही माणसाची भाषा येत नाही. प्राण्यांच्या भाषेत ध्वनी घटक सुटेसुटेपणाने व एकेरी पद्धतीने वापरले जातात. भूक, तहान, संरक्षण, काम या प्राण्यांच्या मूलभूत प्रेरणा असतात. काही प्राण्यांचे अस्तित्व संप्रेषण झाले नाही तर संपून जाईल. आपण मानवेतर संप्रेषणाची काही उदाहरणे पाहू.

कुत्रा अकरा ध्वनी वापरून आपली भाषा बोलत असतो. मालक आल्यास विशिष्ट आवाज काढणे, परके कुत्रे आल्यास विशिष्ट आवाज काढणे; असे हे ध्वनी असतात. मधमाश्या नृत्याच्या साहाय्याने मधाची दिशा, अंतर आणि दर्जा आपल्या सहकाऱ्यांना सांगतात. साधारण वीस फूट अंतरावर मध असेल, तर मधमाश्या पोळ्याभोवती वर्तुळाकार पदन्यास करतात. मध चाळीस फूट अंतरावर, साठ फूट अंतरावर असेल, तर हे नृत्य अधिक किचकट होत जाते. हे संप्रेषण केवळ मध मिळविण्यापुरतेच असते. हे नृत्य क्षितिजसमांतर दिशा दर्शविते. हेरिंग गल्स पक्षी जन्मजात आपल्या आई-बापाच्या चोचीवर चोच मारून अन्न मागतात. आई पिल्लांना भरविते.

उत्तर थायलंडमधील गिबन्स सोबत्यांना नऊ पद्धतीने हाका मारतात.

जपानमधील डुकरे तेवीस प्रकारचे ध्वनी काढतात.

वेर्वेट जातीची माकडे ३६ ध्वनिसंदेश निर्माण करतात, तर ६३ हावभाव करतात.

मोर लांडोरीला आकर्षित करून घेण्यासाठी नृत्य करतो.

धान्याचा साठा कोठे आहे हे दुसऱ्या मुंगीला सांगताना मुंग्या गंध सोडतात.

मोर-लांडोर नृत्य, बेडकाचे डरॉंव, कोंबड्याचे आरवणे, गायीचे हंबरणे हे संप्रेषणाचे प्रकार आहेत. मानवेतर संप्रेषण हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अनुवंशिकतेनेच पोहचलेले असते. संकटावर मात

करणे, स्थलांतर करणे हा प्राण्यांच्या जीवनातील समायोजन व संप्रेषणाचा व्यवहार असतो. (भाषासंवाद, डॉ. अनिल गवळी, डॉ. नंदकुमार मोरे, पृष्ठ क्र. १४२ व १४३)

१.२.५. भाषेची वैशिष्ट्ये

मानव इतर प्राण्यांच्या तुलनेने वेगळा ठरतो. याची अनेक कारणे आहेत. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे मानवाच्या हाती भाषा हे साधन आहे. त्यामुळे भाषा वापरणारा प्राणी अशी एक मानवाची व्याख्या केली जाते. भाषा पुढारलेली अथवा मागासलेली असू शकत नाही. भाषाविज्ञानात सर्व भाषा समान पातळीवर येतात. भाषा ही एक स्वतंत्र व स्वायत्त वस्तू आहे. ती लिखित स्वरूपात मूर्त, गोचर आणि नियमबद्धही असू शकते. मौखिक स्वरूपातली अगोचर असते. लोकप्रयोग हाच तिचा मानदंड असतो. त्यामुळे ती एक सामाजिक संस्था ठरते. भाषेची विविध लक्षणे तिचे स्वरूप व कार्य ठरवत असतात. भाषेची काही महत्त्वाची लक्षणे आहेत. यातील सात वैशिष्ट्ये सी.एफ. हॉकेट यांनी सांगितली आहेत.

सी.एफ. हॉकेट यांनी सांगितलेली सात वैशिष्ट्ये

१. द्विस्तरीय रचना (Duality of Patterning)

मानवी मुखावाटे असंख्य ध्वनी उच्चारले जातात. पण त्यातील काही मर्यादित ध्वनी भाषेमध्ये मूलध्वनी म्हणून वापरले जातात. भाषांतील मूलध्वनीची संख्या कमीत कमी ३० आणि जास्तीत जास्त ७० च्या आसपास असते. मूलध्वनींना स्वतःचे अर्थ नसतात. परंतु त्यांची हवी तशी सानुक्रम रचना तयार करता येते. त्यामुळे अत्यल्प अशा मूलध्वनींच्या सहाय्याने पाहिजे तेवढे आशययुक्त संकेत निर्माण करता येतात.

मराठीतील 'आ', 'क', आणि 'न' हे तीन मूलध्वनी घेऊन अनुक्रमे क + आ + न = कान, न + आ + क = नाक, न+आ + क +आ= नाका , क + आ + न + आ = काना अशा चार वेगवेगळ्या सार्थ रचना तयार करता येतात. १) मूलधनींचा मर्यादित साठा हा भाषेचा एक स्तर २) आणि मूलध्वनींच्या वेगवेगळ्या रचना करून निर्माण केलेले अर्थ हा भाषेचा दुसरा स्तर. प्राण्यांच्या भाषेची रचना अशी दुहेरी नसते. त्यांच्या भाषेत संकेतांसाठी एकच मूलध्वनी असतो. माणूस कोट्यावधी वेगवेगळे ध्वनी वापरू शकतो. द्विस्तरीय रचनेमुळे थोड्या सामग्रीच्या आधारे अगणित शब्द तयार करता येत असल्याने भाषेत काटकसरीचे तत्त्व पाळले जाते.

२. निर्मितिशीलता (Productivity)

पूर्वी कधीही ऐकले नाही किंवा उच्चारले नाही असे नवे वाक्य, नवी रचना किंवा नवा भाषिक प्रयोग आपण करू शकतो. याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यात भाषेची एक नियमव्यवस्था सिद्ध झालेली असते. ही नियमव्यवस्था निर्मितीशील असते. मानवी भाषेतील संदेशन हे केवळ सुट्ट्या शब्दांनी होत नाही. शब्दांच्या विशिष्ट रचनेतून आपणास अगणित संदेश निर्माण करता येतात. त्यामुळे निर्मितिशीलता हा भाषेचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म आहे, असे नोम चॉम्स्की हा भाषावैज्ञानिक मानतो.

ही नियमव्यवस्था निर्मितिक्षम आहे. त्यामुळेच एक वाक्य समजले की भाषेच्या साह्याने अनंत प्रकारची वाक्यं आपण तयार करतो. एकाच विषयावर दिले जाणारे व्याख्यान किंवा लिहिले जाणारे पुस्तक आपण भाषेच्या निर्मितीक्षमतेचे उत्तम उदाहरण म्हणून पाहता येईल. त्याचबरोबर एका वाक्याच्या धर्तीवर लहान मूल वेगवेगळी वाक्यं बनवायला सुरुवात करते. ही भाषेची निर्मितीक्षमताच आहे. यासंदर्भात आणखीन एक उदाहरण पाहता येईल. एखादे पर्यटन स्थळ अनेक पर्यटकांनी पाहिलेले असते. त्या स्थळाचे चित्रण ते सर्व पर्यटक स्वतःच्या पद्धतीने सांगतील. आशय एकच असेल; परंतु प्रत्येक पर्यटक आपापल्या भाषेमध्ये रचना करून व्यक्त होईल. भाषेमध्ये अशा अनेक रचना निर्माण करण्याची क्षमता असते. ही भाषेची निर्मितीक्षमताच आहे. या निर्मितीक्षमतेमुळे भाषेची संदेशवहनाची क्षमता अमर्याद झालेली आहे.

३. **यादृच्छिकता** (Arbitrariness)

यादृच्छिकतेचे तत्त्व सर्व भाषांमध्ये असते. त्यामुळे भाषेत होणारी अर्थपरिवर्तने भाषिकांच्या आकलन क्षमतेच्या आवाक्यात राहतात. भाषेमध्ये होणारे अर्थ परिवर्तन हे यादृच्छिकतेमुळे शक्य होते. ध्वनी तेच राहतात; परंतु शब्दांचे अर्थ बदलतात. काही वेळेला ध्वनीमध्ये परिवर्तन घडून येते. पण अर्थ किंवा सूचित आशय कायम राहतात. त्यामुळे यादृच्छिकता हे मानवी भाषेचे सार्वत्रिक लक्षण ठरते. मानवेतर प्राण्यांच्या भाषेला या स्वरूपाची यादृच्छिकता प्राप्त झालेली नसते. उदा. मधमाश्या आपल्या हालचालीतून वा नृत्यातून विशिष्ट संदेशवहन करतात. या हालचालींना विशिष्ट एकमेव अर्थ असतो. मानवाच्या भाषेला मात्र ही मर्यादा नसते. त्यांची भाषा एकाच वस्तूसाठी वेगवेगळ्या भाषेत भिन्न भिन्न शब्द आढळतात. नादानुकारी शब्द सारखेच असते तर कावकाव आणि क्रो यात साम्य आढळले नसते. यादृच्छिकतेच्या तत्त्वामुळेच जगभरातील भाषा एकमेकीपासून भिन्न राहिलेल्या आहेत. भाषा शिकताना 'ग' गवतातला, 'म' मक्यातला, 'अ' अननसाचा ही केवळ शिकण्याची पद्धत आहे. परंतु हे भाषा शिकण्याच्या प्राथमिक पातळीसाठीच असते. अर्थाअर्थी 'ग' 'म' 'अ' यांचा काही संबंध नसतो. प्रत्येक भाषा ही पूर्णतः स्वतंत्र विकसित झालेली दिसते. त्यामुळे ती स्वतंत्र असते. आकलनासाठी ती स्वतंत्रपणे शिकावी लागते. शब्दाने सूचित होणारा आशय आणि तो शब्द यांच्यामध्ये कोणताही कार्यकारण संबंध नसतो. तो केवळ योगायोग असतो.

४. **अदलाबदल** (Inter Changeability)

एकमेकांच्या भाषिक रचना एकमेकांना समजणे आणि एकमेकांनी त्या पुन्हा वापरणे मानवी भाषेत शक्य होते. काही प्राण्यांच्या भाषेत विनिमय पद्धतीत असे आदानप्रदान होऊ शकत नाही. उदा. नर कोकीळ आणि मादी कोकिळा यांच्या आवाजात फरक असतो. मानवी भाषेत मात्र तसे नसते. समाजातील प्रत्येक व्यक्ती वक्ता आणि श्रोता या दोन्ही भूमिकांमध्ये असते. दोन व्यक्ती एकमेकांशी गप्पा मारताना वक्ताश्रोता अशी भूमिका असते. गप्पा मारताना दोघेजण क्रमाने बोलतात, क्रमाने ऐकतात. मानवी भाषेत कोणाचाही संदेश कोणालाही वापरता येतो. नाटकांमधून पुरुष स्त्रीपात्र किंवा स्त्री

पुरुषपात्र झाले असेल तर भाषा वापरताना लिंग, क्रियापद वापरामध्ये मोठा फेरफार करावा लागतो. स्वतःची भाषा स्वतःला ऐकू येत असल्यामुळे बोलताना होणाऱ्या चुका आपण बोलता बोलता सुधारू शकतो. भाषा शिकण्याची, समजून घेण्याची प्रक्रिया भाषेतील अदलाबदल या वैशिष्ट्यामुळे सुलभ होते. मानवी भाषेच्या लक्षणाचे दोन फायदे झालेले आहेत. १) मानवाला अनुकरणाने कोणतीही भाषा शिकणे शक्य होते आणि २) मानवी भाषेतील नवनिर्मित रचना इतरांच्या सहज पचनी पडतात व त्यांचा सार्वत्रिक वापर सुरू होतो. भाषेच्या या वैशिष्ट्यामुळे मानवी भाषा समृद्ध होताना दिसतात. या वैशिष्ट्यामुळे भाषेच्या विकासाला गतिमानता येते.

५. **विशिष्टता** (Specialization)

भाषेतील संदेशवाहक प्रणालीची विशिष्टता ही संदेशसूचनांची प्रक्रिया आणि सूचित केलेला संदेश यामधील संबंधाच्या स्वरूपावर अवलंबून असते. मानवी संप्रेषण व्यवहारांमध्ये शारीरिक पातळीवरील हालचालींचा उपयोग करून दिला जाणारा संदेश आणि ध्वनिसंकेतांचा वापर करून दिला जाणारा संदेश यामध्ये फरक करता येतो. उदा. गृहिणीची पानांची मांडामांड करण्याची कृती व त्यातून मिळणारा संदेश यात प्रत्यक्ष कार्यकारण संबंधाचे नाते आहे. परंतु 'जेवण तयार आहे हं!' असे गृहिणीने म्हटल्यावर कुटुंबातील मंडळी प्रत्यक्ष जेवण तयार आहे की नाही, ताटवाट्यांची मांडामांड केली आहे की नाही हे प्रत्यक्ष न पाहता जेवायला बसायच्या तयारीला लागतात. याचाच अर्थ असा की प्रत्यक्ष कृती ऐवजी ती सूचित करणाऱ्या चिन्हव्यवस्थेचा उपयोग करून आपण इष्ट कार्य साधू शकतो. वाहतूक पोलिसांनी हाताने 'चला' म्हणणे आणि आपण गाडी सुरू करून निघण्याची तयारी करणे या संदेशनामध्ये प्रत्यक्ष कार्यकारणसंबंधाचे नाते आहे. लहान मुलांना 'बाहेर वाघ आहे जाऊ नकोस !' असे सांगताच मूल थांबते. कारण वाघ न पाहता वाघ म्हणजे काहीतरी वाईट आहे, हे त्याला प्रत्यक्ष न पाहता सूचित होते. हा एक भाषेचा विशेष गुण आहे. या विशिष्टतेच्या गुणामुळे माणसाच्या कार्यशक्तीची बचत होते.

६. **स्थलकालातीतता** (Displacement)

स्थळ, काळाची बंधने ओलांडून आशयाचे वहन करण्याचे सामर्थ्य प्रत्येक भाषेमध्ये असते. स्वतःच्या प्रदेशाचा इतिहास, घराण्याची परंपरा, राजकीय स्थित्यंतरे, वर्तमान स्थिती, भविष्यकाळासंदर्भातील भाकिते, मनोदय किंवा पुढचे नियोजन याबाबतीत आपण बोलू शकतो. एखाद्या घटनेशी प्रत्यक्ष संबंध नसताना, तेथे आपण उपस्थित नसताना त्या घटनेविषयी बोलतो, त्या घटनेविषयी ऐकतो, त्यापासून योग्य तो अर्थबोध घेतो. काश्मीर, हिमालय ही स्थळे न पाहताही आपण त्यांची वर्णने वाचून आनंद घेतो. बालकवींच्या 'फुलराणी' कवितेतील 'फूल' आपण प्रत्यक्ष पाहिलेले नसते, तरी त्या फुलावरची कविता आपल्याला कळते. भुताखेतांच्या काल्पनिक गोष्टीवरही आपण बोलू शकतो. न पाहिलेला प्रदेश, माणसे याबाबत आपण गप्पा मारतो. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आज हयात नाहीत; परंतु त्यांच्या शौर्याच्या कथा आपण आजही श्रद्धेने

ऐकतो, सांगतो, वाचतो; त्या घटनांची कल्पनेने अनुभूती घेतो. तसेच स्थलकालातीत लक्षणांमुळे माणूस आपली अभिव्यक्ती भविष्यासाठी राखून ठेवू शकतो. उद्या. एखादे चांगले पुस्तक वाचून झालेला आनंद लगेच अभिव्यक्त न करता योग्य व्यक्ती भेटेपर्यंत आपण थांबू शकतो. प्राण्यांच्या संदेशपद्धतीत अशी स्थलकालातीतता नसते. याचाच अर्थ आपण स्थळ, काळाची बंधने झुगारून भाषेच्या मदतीनेच या गोष्टी करतो. ही भाषेची स्थलकालातीतता भाषेचे सामर्थ्य आहे.

७. **सांस्कृतिक संक्रमण** (Cultural Transmission)

भाषेचा वारसा, भाषेची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द केली जाते. मात्र भाषेची परंपरा अशी दुसऱ्या पिढीकडे देताना चालू पिढीने तिच्यात काही भर घातलेली असते. एक पिढी दुसऱ्या पिढीकडून भाषा शिकत असते तेव्हा अनुभवच शिकत असते. त्यामुळे मानवाचा शब्दसंग्रह वाढत राहतो. मानवाचे भौतिक आणि तात्त्विक जगाबद्दलचे ज्ञान वाढत जाते. हे ज्ञान मिळवण्यासाठी माणसाला अगदी प्रारंभापासून सुरुवात करावी लागत नाही. त्याच्या अगोदरच्या पिढीने काही ज्ञानसंचय, शब्दसंग्रह जतन करून ठेवलेला असतो. हा ज्ञानसंचय भाषेच्या माध्यमातून माणूस मिळवतो आणि त्यात भर घालीत असतो. ही सांस्कृतिक वाढ भाषेमुळे शक्य होते. संस्कृतीचे संवर्धन करणे आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृती संक्रमित करणे या भाषेच्या खास क्षमता आहेत. या क्षमता प्राण्यांच्या भाषेत नसतात.

सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेल्या वरील प्रमुख सात वैशिष्ट्याव्यतिरिक्त अजूनही तीन वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे पाहता येतील.

८. **आनुवंशिकता व सामाजिकता**

मानवेतर प्राण्यांची संदेशन पद्धती ही आनुवंशिक असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ती उपजतच जात राहते. प्राण्यांमध्ये संरक्षण व संवर्धन या दोन सहज प्रेरणा आढळून येतात. या दोन प्रेरणांभोवती त्यांचे संदेशनात्मक वर्तन सुरू असते. मानवी मेंदूमध्ये मानवी भाषा शिकण्याची क्षमता उपजत असते. त्यामुळे भाषेचे हे संक्रमण आनुवंशिक स्वरूपाचे असते, असा विचार आधुनिक भाषाविज्ञानात रूढ होत आहे. अर्थात सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीवरही मानवाची भाषा शिकण्याची प्रक्रिया अवलंबून असते. मूल साधारण १८ महिन्याचे असल्यापासून ते साधारण ४८ महिन्यापर्यंत भाषा शिकण्याच्या तयारीत असते. त्यामुळे मानवी भाषेला असणारे जैविक आनुवंशिक अधिष्ठान मान्य करावे लागते. तरीही विशिष्ट भाषा अवगत होण्यासाठी सामाजिक संपर्क अपरिहार्य असतोच. आनुवंशिकतेने भाषा आपणास प्राप्त होत असली तरी मानवी भाषा ही सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तुळात समृद्ध होत असते.

९. रैखिकता

भाषेमध्ये ध्वनी एकामागोमाग एक असे उच्चारले जातात. त्याच क्रमाने आपण ते ऐकत असतो. उच्चारण व श्रवण दोन्ही कालिक (Temporal) आहेत. चित्रलिपीत कालिक स्वरूप असणार नाही. तेथे ऐकण्यापेक्षा बघणे असते. भाषेत स्वनिम व पदिम पाठोपाठ उच्चारले जातात. त्यांचा अर्थ क्रमावर अवलंबून असतो. टपाल, पालट या दोन्ही शब्दातील स्वनिमाचा क्रम निराळा असल्याने अर्थ निराळा झाला. 'जेवण तयार आहे' या पदिमाचा क्रम 'तयार आहे जेवण' असा बदलला तरी अर्थ बदलत नाही. त्यामुळे पदिमाच्या बाबतीतले स्वातंत्र्य स्वनिमाना असत नाही. यादृष्टीने भाषेचे स्वरूप रैखिक आहे. भाषेचे हे लक्षण संचरनात्मक आहे.

१०. सामाजिक संस्था

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. समाज टिकून राहणे, समाजाला स्थैर्य लाभणे, समाजामध्ये शिस्त येऊन एक व्यवस्था निर्माण होण्यासाठी काही सामाजिक संस्था कार्यरत असतात. कुटुंब, धर्म, विवाह याप्रमाणेच भाषा ही सुद्धा एक सामाजिक संस्था आहे. प्रत्येक समाजातील सामाजिक संस्थांचे स्वरूप भिन्न असते. त्याप्रमाणेच भाषेचे स्वरूप देखील प्रत्येक समाजानुसार बदलताना दिसते.

भाषा समाज व्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. भाषेमध्ये शब्दांना, वाक्यांना अर्थ हे समाजाकडून दिले जातात. त्यामुळे भाषा व्यक्ती वापरत असली, तरी ती समाजाची असते. समाजाची सुसंवादत्वाची आंतरक्रिया सतत सुरू असते. हे सुसंवादित्व भाषेमुळे शक्य होते. त्यामुळे भाषा आणि समाजाचा अत्यंत कनिष्ठ संबंध आहे. कोणताही समाज एकसंध नसतो. एका भाषिक समाजामध्येही विविध भेद पाहायला मिळतात. धर्म, जाती, वर्ग, व्यवसाय इत्यादी कारणांनी समाजामध्ये भेद अस्तित्वात येतात. या विविध भेदानुसार भाषेचे स्वरूप बदलते. समाजाच्या जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका पार पाडते. सामाजिक संबंध राखणे, वाढविणे, तोडणे या गोष्टी भाषेतून होत असतात. त्याचबरोबर सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये ही भाषेतून व्यक्त होतात. सामाजिक स्वास्थ्य भाषेमुळे टिकते. या बाबींचा सखोल विचार केल्यानंतर भाषा ही एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे, हे सिद्ध होते.

१.२.६ भाषेचे कार्य

भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास हा एका अर्थाने भाषेच्या कार्याचा अभ्यास असतो. भाषा सामाजिक संस्था असल्यामुळे संदेशवहन, विनिमय आणि संप्रेषण हे भाषेचे कार्य आहे. मानव समाजशील असल्यामुळे तो समूहाने राहतो. परस्परसंबंध, परस्पर सहकार्य, आंतरक्रिया घडणे महत्त्वाचे असते. त्यामुळे जगभरातील सर्व मानवी समूहामध्ये विचार विनिमयाचे, संपर्काचे सर्वश्रेष्ठ साधन म्हणून भाषा कार्य करते. समाजाचे अस्तित्वच भाषेवर अवलंबून आहे. त्यामुळे भाषेचे संपर्काचे स्थान इतर कोणतेही माध्यम घेऊ शकले नाही.

समाजामध्ये भाषा वेगवेगळ्या पद्धतीने कार्य करत असते. भाषेच्या या कार्याचे विभाजन रोमान याकोबसन (१८९६ ते १९८२) या रशियन भाषावैज्ञानिकांनी भाषेच्या संरचनेच्या अंगाने केलेले आहे.

त्यांच्या भाषेच्या कार्याच्या विभाजनामागे एक विचार आहे; तो म्हणजे भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये किंवा चिन्हवापरामध्ये सहा मूलघटक असतात. त्यांना मिळणाऱ्या महत्त्वानुसार भाषिक चिन्हे सहा मूलभूत स्वरूपाची कार्य करतात. रोमान याकोबसन यांनी केलेल्या भाषेच्या कार्याचे विभाजन आपण पाहू.

परिसर/संदर्भ (context)

संदेश (message)

प्रेषक (sender)..ग्रहणकर्ता (receiver)

संपर्क (contact)

माध्यम (code)

या आकृतीमध्ये चिन्हव्यापारातील सहा मूलघटक दर्शविलेले आहेत. संदेशनाच्या प्रत्येक क्रियेमध्ये हे घटक असतातच. या घटकांपैकी ज्या घटकाला प्रत्यक्ष संदेशनामध्ये प्राधान्य मिळेल, त्यानुसार विशिष्ट प्रकारचे संदेशनात्मक कार्य घडून येईल.

भाषेच्या कार्याचे सहा प्रकार पुढीलप्रमाणे दाखविता येतील :

१) संदर्भनिष्ठ / निर्देशात्म (referential)

२) काव्यात्म/सौंदर्यात्म (poetic / aesthetic)

३) आविष्कारात्म (expressive)

४) परिणामनिष्ठ (affective)

५) संपर्कनिष्ठ (phatic)

६) भाषाविषयक /चिन्हव्यवस्थाविषयक (metalingual)

१. संदर्भनिष्ठ किंवा निर्देशनात्मक कार्य

संदेशन करणारी व्यक्ती कोणत्या संदर्भाने बोलते हे येथे महत्त्वाचे आहे. दोन व्यक्ती संभाषण करतात तेव्हा त्या दोघांपुरते त्यांचे बोलणे मर्यादित नसते. त्यांच्या बोलण्याचा संदर्भ कशाचा आहे हे महत्त्वाचे. दोन विद्यार्थी संभाषण करत असताना त्यांच्या बोलण्यात अभ्यासक्रम, तास, कॉलेज, परीक्षा, नोट्स यांचा संदर्भ असेल. दोन शिक्षक बोलत असताना प्रवेश, अभ्यासक्रम, शाळेची स्थिती, शैक्षणिक धोरणे, मीटिंग अशा विषयावर बोलतील. प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती आपापल्या क्षेत्राशी संबंधित विषयावर बोलताना दिसतील. शेती, उद्योग, व्यापार, विविध व्यावसायिक इत्यादींचे बोलणे आपण लक्षपूर्वक ऐकले, तर ही बाब ध्यानात येईल.

२. काव्यात्म व सौंदर्यात्मक कार्य

या कार्यामध्ये संदेश हा घटक केंद्रस्थानी असतो. हा घटक येथे एकमेव संदेशनाचे उद्दिष्ट बनतो. त्याला इतर कोणतीही उद्दिष्टे नसतात. इतर कोणत्याही प्रकारे तोच संदेश या कार्यामध्ये पाठवता येत नाही. भाषेच्या या कार्यात आशयाला व संदेशाला वेगळे, सुटे असे महत्व नसते. जो आशय तोच संदेश असतो. उदा. सुखी रहा. God bless you, Be happy! ही विधाने /संदेश/ आशय त्या त्या सामाजिकतेचा उल्लेख करू शकतात.

३ आविष्कारात्मक कार्य

आविष्कारात्मक वा अभिव्यक्तिनिष्ठ कार्यामध्ये प्रेषकाला प्रामुख्याने आत्माविष्कार करायचा असतो. आविष्कार म्हणजे व्यक्त होणे होय. काव्यात्म वा सौंदर्यात्मक कार्य व आत्माविष्कार यांचा संबंध याकबसनने जोडलेला नाही, हे ध्यानात घ्यायला हवे. माणूस हा बोलणारा प्राणी आहे. तो आपल्या मनातील विचार, गुपिते इतरांना सांगतो. आत्मप्रकटीकरणासाठी भाषा हे एक महत्त्वाचे साधन मानवाने शोधून काढले आहे. व्यक्त होणे हे भाषेचे प्राथमिक कार्य आहे. प्रत्येक माणूस अभिव्यक्तीला महत्त्व देत असतो.

४. परिणामनिष्ठ कार्य

परिणामनिष्ठ कार्याचा भर ग्रहणकर्त्यावर विशिष्ट परिणाम घडवून आणण्यावर असतो. उदा. जाहिरातीमधील संदेशन. ग्रहणकर्त्याला आकर्षित करण्यासाठी, त्याच्यावर योग्य तो परिणाम करण्यासाठी भाषा कौशल्यपूर्ण रीतीने वापरली जाते. एखादे प्रभावी व्याख्यान श्रोत्यांवर योग्य तो परिणाम घडवू शकते. भाषा स्थळ, काळाच्या सीमा ओलांडते. पुस्तके, चित्रपट, नाटके यामधून होणारे भाषेचे कार्य हे परिणामनिष्ठ कार्य असते. ते वाचक, श्रोत्यांवर परिणाम घडवून आणते. वेगवेगळ्या प्रकारच्या जाहिराती, नोटीस, आवाहने, निवेदने, लिलाव यामधून वापरलेल्या भाषेतून परिणाम साधला जातो. भाषेचे हे कार्य परिणामनिष्ठ कार्य म्हणून पाहता येईल.

५. संपर्कनिष्ठ कार्य

भाषेच्या संपर्कनिष्ठ कार्यामध्ये प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यातील संपर्क वाढविणे किंवा कमी करणे ही प्रक्रिया घडते. उदा. 'वाजले किती हो?' या वाक्यातून वेळ विचारण्याऐवजी अनोळखी माणसाशी ओळख करून घेण्याचे कार्य साध्य होऊ शकते. प्रवासात आपणास अनेक अनोळखी व्यक्ती भेटतात. शेजारी बसलेल्या व्यक्तीशी आपण कुठे जाणार? असा प्रश्न करू शकतो. ती व्यक्ती उत्तर देईल व आपण कुठे जाणार? असे जर तिने विचारले तर हे संभाषण लांबण्याची शक्यता असते. पुढे हे संभाषण विविध विषयावर होऊ शकेल. पत्रकार, डॉक्टर, वकील हे व्यवसायाचा भाग म्हणून बऱ्याचदा अनोळखी व्यक्तींशी संपर्क साधतात. त्यातून त्यांची ओळख होते. हे भाषेचे संपर्कनिष्ठ कार्य होय. अर्थात या उलट न बोलता कमी बोलून संपर्क कमी करता येतो. त्यामुळे संपर्क वाढवणे आणि कमी करणे यासाठी भाषाच कार्य करते.

६. भाषाविषयक वा अतिभाषात्म कार्य

माणूस भाषेच्या माध्यमातून ज्ञान मिळवणे, देणे, वाढवणे, जतन करून ठेवणे ही कार्ये करतो. भाषेमुळे शिकण्याची प्रक्रिया घडते. कोणतेही ज्ञान भाषेच्या माध्यमातून जतन केले जाते. एवढेच नव्हे तर भाषेसंदर्भातील विचार, अभ्यास देखील भाषेतूनच करावा लागतो. भाषा म्हणजे काय, याचे उत्तर आपण भाषेतूनच देतो. भाषेच्या या कार्यामध्ये भाषेसंदर्भातील विचार करण्यासाठी भाषेचे होणारे सहाय्य गृहीत धरले जात आहे. भाषेची संरचना, भाषिक व्यवहार, भाषिक संदेशन वा प्रयोग, व्याकरण अशा घटकांची चर्चा भाषेच्या साह्यानेच करावी लागते. म्हणून या कार्यास अतिभाषात्म असे म्हटले आहे.

भाषेच्या या कार्याचे विभाजन रोमान याकोबसन यांनी भाषेच्या संरचनेच्या अंगाने केलेले आहे. समाजामध्ये भाषा वेगवेगळ्या पद्धतीने कशी कार्य करत असते, हे आपण सहा मुद्यांच्या आधारे पहिले. आता भाषेकडे पाहण्याचे समाजाचे विविध दृष्टिकोन आपण पाहूया.

१.२.७ भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन

प्रत्येक समाजात भाषेचे अस्तित्व असल्याने तेथे काही भाषाविषयक समजुती असणे स्वाभाविक आहे. अभिमान, अस्मिता, आत्मसंरक्षण यासारखे भावनात्मक दृष्टिकोन समाजामध्ये प्रत्येक बाबतीत आढळतात. असे दृष्टिकोन अवैज्ञानिक ठरत असतात. काही गैरसमजुती असतात. भाषाविज्ञानात त्यांना स्थान नाही. असे काही दृष्टिकोन आपल्याला पुढील प्रमाणे सांगता येतील. या दृष्टिकोनांची सविस्तर मांडणी 'भाषासंवाद' या ग्रंथात उत्तमपणे केली आहे.

१. भाषाभेदात्मक मूल्यमापन

मूल्यमापन करणे ही माणसाची एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. मनुष्य भाषेच्या संदर्भातही मूल्यमापन करताना दिसतो. माझी भाषा श्रेष्ठ आहे. इतरांची भाषा कनिष्ठ आहे. हा दृष्टिकोन मूल्यमापनात्मक आहे. हा दृष्टिकोन पूर्णतः अवैज्ञानिक आहे. भाषेचे कार्य संदेशन करणे हे आहे. हे कार्य भाषेतून पूर्ण होत असले तरी श्रेष्ठत्वाची भावना भाषेसाठी योग्य नाही. ही मूल्यात्मक दृष्टी भाषेसंदर्भातील चुकीची समजूत आहे. भारत हा बहुभाषिक देश आहे. त्यामुळे सर्व भाषांकडे समतोल दृष्टिकोनातून पाहणे राष्ट्रहितासाठी महत्त्वाची आहे. तरी या मूल्यमापनात्मक दृष्टिकोनामुळे अंतर्गत कलह वाढतात.

२. श्रेष्ठ–कनिष्ठत्वाची भावना

भाषेविषयीची श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना समाजामध्ये खोलवर रुजलेली आहे. प्रत्येक समाजाला आपली भाषा श्रेष्ठ वाटते. त्यामुळेच ती समाजाची अस्मिता ठरते. यामागे समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक वर्चस्व कारणीभूत ठरते. पुढारीलेला वर्ग आपली भाषा श्रेष्ठ मानतो. इतरांची कनिष्ठ ठरवतो. भाषेसंदर्भातील श्रेष्ठ–कनिष्ठत्त्वाची भावना व तिच्या शुद्धतेसंदर्भातील समजूती समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. सर्वसामान्य मराठी भाषिक आज इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व देताना दिसतात. ती जगातील आजची सर्वश्रेष्ठ ज्ञानभाषा आहे. इंग्रजी भाषेसंदर्भातील सदर

मतांमध्ये तथ्य असले तरी ती भाषा सर्वश्रेष्ठ म्हणता येणार नाही. इंग्रजी भाषेला आपण जे अवास्तव महत्त्व दिले आहे; त्या पाठीमागे ही श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचीच भावना आहे

३. शुद्धाशुद्धतेची कल्पना

भाषाविज्ञानाच्या दृष्टीने सर्व भाषा समान पातळीवर आहेत. तरीही काही लोकांकडून अवैज्ञानिक स्वरूपाची शुद्धाशुद्धतेची कल्पना वापरली जाते. कोणतीही भाषा शुद्ध किंवा अशुद्ध नसते. सर्वसामान्यपणे प्रमाणभाषा शुद्ध तर बोलीभाषा अशुद्ध असा समज आहे. प्रतिष्ठितांची, सुशिक्षितांची भाषा शुद्ध नि सुसंस्कृत आणि इतरांची भाषा अशुद्ध नि गावंढळ; ही समजूत अशास्त्रीय आहे. मराठी समाजातील एक गट 'होय' ऐवजी 'व्हय' असे क्रियापद वापरत असतो; हा प्रयोग शिष्टमान्य नसला तरीही 'व्हय' ऐवजी 'होय' असाच भाषिक प्रयोग करा, असा आग्रह प्रतिष्ठितांनी धरणे म्हणजे भाषा कशी आहे हे न पाहता 'भाषा कशी असावी' याबाबतचा आपला आग्रह धरण्यासारखा आहे. पण या प्रयोगाने भाषिक संप्रेषणात कोणताही अडथळा किंवा उणीव निर्माण होत नसेल तर हा प्रयोग अशुद्ध किंवा चुकीचा आहे, असे म्हणता येणार नाही. त्यामुळेच 'आनी', 'पानी' म्हणणाऱ्या लोकांना गावंढळ ठरवले जाते. त्यांचीही भाषा 'गावंढळ भाषा' म्हणून हेटाळण्याचा विषय होते. सामाजिक, सांस्कृतिक वर्चस्वाच्या भावनेतून हा दृष्टिकोन तयार होतो.असा दृष्टिकोन विकसित होणे आपल्या संकुचित सामाजिक मनोरचनेचे द्योतक आहे.

४. संस्कृत व इतर भाषा

संस्कृत ही अभिजनांची भाषा आणि बहुजनांच्या इतर भाषा असा एक दृष्टिकोन समाजामध्ये दिसतो. ब्राह्मण वर्गाचे प्राबल्य, सांस्कृतिक वर्चस्व यामुळे संस्कृत भाषेला विदग्ध, विशुद्ध भाषा म्हणून दर्जा प्राप्त झाला. ही प्रमाणभाषा म्हणून समाजामध्ये मान्य केले आहे. लेखन, अध्ययनाचे माध्यम यासारखे महत्त्वाचे कार्य ती बजावते; म्हणून इतर प्राकृत भाषा अशुद्ध मानल्या गेल्या. प्राकृत हा शब्दही त्या भाषेचा कनिष्ठ दर्जाचा अर्थबोध देतो.

५. व्याकरण परंपरा

पारंपरिक व्याकरणाचे दृष्टिकोन हे आदेशात्मक आणि आदर्शात्मक आहेत. भाषा कशी वापरली जावी हे पारंपरिक व्याकरण सुचवते. परंतु आधुनिक भाषाअभ्यासाच्या दृष्टिकोनातून अशा व्याकरण परंपरेला विरोध केला जातो. कोणत्याही भाषेची व्याकरण परंपरा तोकडी असू शकते. त्यामुळे भाषा कशी वापरली जाते हे सांगणे म्हणजे त्या भाषेचे व्याकरण सांगणे होय. आधुनिक भाषाविज्ञानामध्ये भाषा व बोली स्वतंत्र विचारात घेतल्या जातात. त्यामुळे भाषेचे व्याकरण बोलींना लावून चालणार नाही. म्हणूनच भाषा कशी असावी हे सांगणाऱ्या व्याकरण परंपरेला भाषाअभ्यासक नाकारतात.

६. शब्दार्थ

भाषा ही सामाजिक संस्था असून ती परिवर्तनशील आहे. भाषेमध्ये सातत्याने परिवर्तन घडून येत असते. त्यामुळे शब्दांचे अर्थ बदलत्या समाजजीवनानुसार बदलू शकतात. भाषाही ध्वनी आणि अर्थ यांच्यातील कार्यकारणसंबंधावर आधारलेली व्यवस्था नाही. ध्वनी आणि अर्थ यांच्यामध्ये असणारा संबंध हा पूर्णतः यादृच्छिक म्हणजेच योगायोगाने निर्माण झालेला असतो. शब्दार्थासाठी भाषाविज्ञान आग्रही नाही. त्यामुळेच कोणत्याही शब्दांना समानार्थी शब्द नसतो. कोशातील समानार्थी शब्द हा त्या शब्दाच्या जवळचा शब्द असतो, असा एक विचार आहे. व्यवहारातील भाषेचे निरीक्षण केल्यानंतर शब्दकोशात अनेक शब्दांचे अर्थ बदलताना दिसतात.

७. व्यक्तिनिष्ठता

भाषा ही समाजाची मालकी असली तरी ती व्यक्तीकडून वापरली जाते. ग्रामीण-नागर, शुद्ध - अशुद्ध असे भेद बोलीभाषेवरून करणे चुकीची समजूत आहे. सुलभता हा नैसर्गिक धर्म मानवामध्ये आढळतो. बोलणारी व्यक्ती आपल्या पद्धतीने बोलते. त्यातून समाजामध्ये काही समज रुजतात. भाषा सोपी, कठीण, मधुर, गोड, कर्कश अशी काही असत नाही. भाषेचा सोपेपणा अथवा कठीणपणा हा व्यक्तिनिष्ठ गुण आहे. एखादा ध्वनी मधुर वा गोड व दुसरा ध्वनी कर्कश असे भाषाविज्ञान मानत नाही.

८. भाषेतील जुनी – नवी रूपे

भाषेतील जुनी रूपे प्रमाण मानली जातात. जुनी रुपे शुद्ध व योग्य असतात ही भूमिका अवैज्ञानिक आहे. भाषेतील ज्या जुन्या रूपांना आपण जुनी रूपे म्हणून ओळखतो; त्यांची परंपरेनुसार अगोदरची जुनी व मूळ रूपे असतात. प्राकृत भाषेपूर्वी संस्कृत भाषा बोलली जात होती; परंतु संस्कृत भाषेपूर्वीही वैदिक काळात संस्कृतपूर्व बोलीभाषा बोलल्या जात होत्या. त्यामुळे कोणत्या भाषेतील रूपांना जुने नवे ठरवावे हे प्रश्न वादातीत आहे. भाषा समाजाबरोबर परिवर्तनशील राहते. त्यामुळे असा दृष्टिकोन ठरवणे अवैज्ञानिक आहे.

९. छापील भाषा

भाषा म्हणताच आपल्या डोळ्यासमोर पुस्तकात छापलेला किंवा हाताने लिहिलेला मजकूर येतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास करायचा म्हणजे तिच्या लिखित रूपाचा अभ्यास करायचा. अशी एक गैरसमजूत आपल्या मनात ठाण मांडून बसलेली आहे. अर्थात आपली अशी गैरसमजुत होण्याचे कारण म्हणजे भाषेचा तिच्या लेखनाशी असलेल्या संबंध अगदी लहानपणापासून आपल्या मनावर ठसलेला असतो. शाळेतला भाषा शिक्षणाचा सगळा भर वाचन व लेखन यावरच असतो. वास्तविक शाळेत जाण्याअगोदर पासून लहान मुल भाषेचा वापर करीत असते. त्याचप्रमाणे जे लोक साक्षर नसतात ते ही भाषा वापरत असतातच. सुशिक्षित लोक जेवढी भाषा बोलतात, त्याच्या एकशतांशनेही ती लिहिण्यासाठी वापरत नाही. आजच्या प्रगत युगातही काही समाज फक्त भाषा बोलण्यासाठीच वापरतो.

त्यामध्ये लेखन होत नाही. उदा. आदिवासी जमातींच्या भाषा. त्यामुळे भाषा अभ्यासासाठी अभ्यासक आपले लक्ष मौखिक भाषाव्यवहारावर केंद्रित करतात. भाषा जशी वापरली जाते; तशी ती गृहीत धरून तिचा अभ्यास झाला पाहिजे, असे भाषाविज्ञान सांगते.

भाषेसंदर्भात चर्चा केलेले वरील सर्व दृष्टिकोन सामाजिक दृष्टिकोन आहेत. या दृष्टिकोनांचा भाषेच्या आकलनावर विपरीत परिणाम होतो, असा दृष्टिकोन स्वीकारून भाषेचा अभ्यास करता येणार नाही. भाषेच्या अभ्यासासाठी या सर्व समजुती बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक भूमिकेतून भाषेचा अभ्यास करावा लागेल.

१.३ समारोप

भाषा ही मानवाने मिळवलेली सर्वश्रेष्ठ देणगी आहे. समाज आणि भाषा परस्परावलंबी असतात. त्यामुळे भाषाप्रगती आणि समाजप्रगती या दोन गोष्टी संमातर ठरू शकतात. भाषा हे विचार विनिमयाचे साधन आहे. मानवाच्या प्रगतीमध्ये भाषेचा मोठा वाटा आहे. भाषा ही मानवी समाज आणि संस्कृतीला व्यापून राहिलेली पायाभूत गोष्ट आहे. सर्व क्षेत्रातील ज्ञानभांडाराचे संचित भाषेमुळेच मानव प्राप्त करू शकला. हे ज्ञान भांडाराचे संचित भाषेमुळे जतन करून पुढील पिढीकडे संक्रमित केले जाते. मानवी जीवनामध्ये चाकाच्या शोधापेक्षाही भाषेचा शोध महत्त्वाचा मानावा लागेल. संदेशन हेच भाषेचे मुख्य कार्य आहे. भाषेव्यतिरिक्त काही माध्यमांचा संदेशनासाठी मानव वापर करतो. परंतु भाषेशिवाय प्रभावी संदेशेन होऊ शकत नाही. भाषा ही मानवी ध्वनींनी बनलेली संरचना आहे. मानवी ध्वनींचे निर्मितीस्थान मानवाचे शरीर आहे. त्यामुळे मानव आणि ध्वनी हे दोन्ही सतत मानवासोबत असतात. या दोन्हींची निर्मिती आणि वहनासाठी मानवाला विशेष कष्ट करावे लागत नाहीत.

या घटकात आपण भाषेचे स्वरूप आणि कार्य समजून घेतले आहे. भाषेच्या व्याख्यांच्या माध्यमातून भाषेचा सूक्ष्म अभ्यास कसा केला जातो हे पाहिले आहे. भाषा आणि भाषिक व्यवहार याबाबतचा अभ्यास भाषाभ्यासकांच्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय आहे. भाषा निर्मितीबाबत मानवाला सातत्याने प्रश्न पडलेले आहेत. या विचारांचा चिकित्सक अभ्यास भाषावैज्ञानिकांनी केला आहे. भाषा ही संकेतांनी बद्ध असणाऱ्या चिन्हांची व्यवस्था आहे. भाषेमध्ये असणाऱ्या चिन्हव्यवस्थेद्वारे आपले संप्रेषणाचे कार्य सुरू असते. हे संप्रेषण मानवी संदेशन आणि मानवेतर संदेशन या प्रकाराचे आहे. भाषेची विविध लक्षणे तिचे स्वरूप व कार्य ठरवत असतात. सी. एफ. हॉकेट या भाषावैज्ञानिकांनी भाषेची सात वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्याबरोबरच अनुवंशिकता व सामाजिकता, रैखिकता आणि भाषा: एक सामाजिक संस्था ही वैशिष्ट्येही आपण पाहिली. वैशिष्ट्यातून मानवाची भाषा इतर प्राण्यांपेक्षा कशी वेगळी आहे आणि त्या भाषेमुळेच मानवाचे वेगळेपण कसे सिद्ध होते; हे या वैशिष्ट्येतून लक्षात येते. समाजामध्ये भाषा वेगवेगळ्या पद्धतीने कार्य करीत असते. भाषेच्या या कार्याचे विभाजन रोमान याकोबसन या रशियन भाषावैज्ञानिकांनी भाषेच्या संरचनेच्या अंगाने केलेले आहे. त्यांच्यामते भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये किंवा चिन्हवापरामध्ये सहा मूलघटक असतात. त्यानुसार भाषिकचिन्हे सहा मूलभूत स्वरूपाची कार्ये करतात. भाषेबद्दल समाजात

वेगवेगळ्या समजुती आहेत. अर्थातच भाषेचा अभ्यास हा शास्त्रीय व वैज्ञानिक दृष्टीनेच करावयास हवा. भाषेच्या अभ्यासासाठी सर्व गैरसमजूती बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक भूमिकेतून भाषेचा अभ्यास करावा लागतो. हा भाषावैज्ञानिक विचार आपण समजून घेतला.

१.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

संप्रेषण (Communication) : म्हणजे माहिती, विचार, भावना किंवा संदेश एका व्यक्तीकडून किंवा गटाकडून दुसऱ्या व्यक्तीकडे योग्य माध्यमाद्वारे पोहोचवण्याची आणि समजून घेण्याची द्विमार्गी प्रक्रिया होय. संदेशवहन ही संकल्पना लॅटिन शब्द 'communicare' वरून आली आहे, ज्याचा अर्थ ‘सामायिक करणे’ (sharing) असा होतो.

संकेत: ज्याच्या मदतीने आशय व्यक्त होतो ती वस्तू अथवा भाषा.

इंद्रिय गोचर : नाक, कान, डोळे आदी इंद्रियांना समजणारे.

ध्वनिसंकेत: आवाजाच्या माध्यमातून दिला जाणारा संदेश.

दृश्यसंकेत: हावभाव, हालचालीतून व्यक्त होणारा संदेश.

मानवेतर जीवसृष्टी: माणूस सोडून पशू, पक्षी, कीटक, इत्यादी जीव.

सी.एफ. हॉकेट : (अमेरिका) Course in Modern Linguistic हा ग्रंथ १९५८ मध्ये त्यांनी लिहिला.

रोमान याकोबसन: (रशिया) १८९६ ते १९८२ हा कालखंड

मूलध्वनी: भाषेत वापरले जाणारे ध्वनी. मानवी मुखावाटे निघणारे एखाद्या भाषेचे मूलध्वनी त्या भाषेची वर्णमाला म्हणून ओळखले जातात.

अगोचर : न दिसणारी

१.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

अ) योग्य पर्याय निवडा.

१. मानवी भावनांच्या आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम काय आहे ?

अ) भाषा ब) अन्न

क) निवारा ड) वस्त्र

२. वेर्वेट जातीची माकडे किती ध्वनिसंदेश निर्माण करतात ?

अ) अठरा ब) छतीस

क) बावन्न ड) बाहत्तर

३. जपान मधील डुकरे किती प्रकारचे धनी काढतात ?

अ) अकरा ब) बावीस

क) तेवीस ड) सव्वीस

४. सी.एफ. हॉकेट यांनी भाषेची प्रमुख किती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?

अ) पाच ब) बारा

क) नऊ ड) सात

५. भाषेची सहा कार्ये कोणत्या भाषावैज्ञानिकाने सांगितली आहेत ?

अ) हॉकेट ब) रोमान याकबसन

क) सोस्यूर क) नोम चॉम्स्की

६. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात व्यवहार कसा करावा लागतो ?

अ) भाषेद्वारे ब) टपालाद्वारे

क) संगणकाद्वारे ड) कृत्रिमपणे

७ भाषेच्या संस्थेचे स्वरूप कसे आहे ?

अ) राजकीय ब) सामाजिक

क) औद्योगिक ड) पुस्तकी

८ भाषा हे संदेशवहनाचे काय आहे ?

अ) शस्त्र ब) अस्त्र

क) संस्कार ड) माध्यम

९ मानवी स्वरयंत्रातून भाषेसाठी आवश्यक ठरणारे कमीत-कमी किती अर्थपूर्ण ध्वनी निघू शकतात?

अ) वीस ब) छतीस

क) बावन्न ड) सत्तर

१० मानवी भाषेतून कोणते संक्रमण होते?

अ) वस्तूंचे ब) धातूंचे

क) संस्कृतीचे ड) ध्वनींचे

उत्तरे : १. अ) भाषा २. ब) छतीस ३. क) तेवीस ४. ड) सात ५. ब) रोमान याकबसन ६. अ) भाषेद्वारे ७. ब) सामाजिक ८. ड) माध्यम ९. अ) वीस १०. क) संस्कृतीचे

१.६ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. भाषा म्हणजे काय ते सांगून भाषेची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

२. भाषेच्या विविध व्याख्या सांगून भाषेची वैशिष्ट्ये लिहा.

३. भाषेची कार्ये सांगून भाषाविषयक दृष्टिकोन लिहा.

४. मानवी भाषा मानवेतर प्राण्यांपेक्षा वेगळी का ठरते ते लिहा.

आ) लघुत्तरी प्रश्न

१. भाषिक संदेशानाचे स्वरूप सांगून भाषेचे मानवी संप्रेषण कसे होते ते लिहा.

२. भाषेचे मानवेतर संप्रेषण कसे होते ते लिहा.

३. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे, हे उदाहरणासह स्पष्ट करा.

४. सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची कोणतीही चार वैशिष्ट्ये लिहा.

१.७ क्षेत्रीय कार्य

१. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीतील धनगरांच्याविषयीचे शब्द एकत्रित करा.

२. पशुपक्ष्यांची बोली आणि माणसाची भाषा यांतील फरक नोंदवा.

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. कालेलकर ना. गो. (१९६४), भाषा : इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन, मुंबई

२. कानडे मु. श्री. (१९९४) मराठीचा भाषिक अभ्यास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

३. गवळी अनिल, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा (२०१८), मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर

५. गवळी अनिल व मोरे नंदकुमार (२०१३) भाषासंवाद, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे

❑❑❑

घटक २

भाषाभ्यास : पारंपरिक आणि आधुनिक

२.० उद्दिष्टे

या घटकात आपण भाषाभ्यासाचा पारंपरिक व आधुनिक पद्धतींचा विचार करणार आहोत. त्यामुळे या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला खालील बाबी समजून घेता येतील.

- भाषाभ्यासाचे स्वरूप समजून घेता येईल.
- भाषा अभ्यासाच्या पारंपरिक अभ्यास पद्धतींचा परिचय करून घेता येईल.
- आधुनिक मराठी भाषाभ्यास म्हणजे काय ते सांगता येईल.

२.१ प्रास्ताविक

जेव्हा पृथ्वीवर मानवी अथवा सजीव सृष्टीचे अस्तित्व निर्माण झाले, तेव्हापासून सजीवाला एकमेकांशी संवाद साधण्याची गरज निर्माण झाली. पक्षी, प्राणी आणि मानव या सर्वांमध्ये काही गोष्टी समान आहेत. कळप करून राहणे, प्रजोत्पादन करणे, अन्न मिळविणे, रक्षण करणे, पिल्लांना वाढवणे या गोष्टी समान असतात. या सर्व गरजांसाठी काही संदेश द्यावे व घ्यावे लागतात. संदेश देणे व दुसऱ्याने दिलेला संदेश समजून घेणे अपेक्षित असते. असे व्यवहार ओठ, हावभावांनी तर कधी चाटून, चावून, बोचकारून, शरीराचा रंग बदलून पूर्ण करता येतात. मात्र पक्षी व प्राण्यांपेक्षा मानवाच्या शरीररचनेत व बुद्धिमत्तेत क्रांतिकारक बदल झाले. मनुष्य प्राण्याने दोन पाय, दोन हात यांचा वेगवेगळा वापर केला आहे. तो केवळ ओरडत नाही तर बोलू शकतो. शारीरिक हावभावांनी आपल्या भावना व्यक्त करू शकतो. मुखावाटे उत्पन्न होणारे वेगवेगळे आवाज हे सर्वांत प्रभावी माध्यम त्याला सापडले. या आवाजांना ध्वनी म्हटले जाते.

ध्वनींची निरनिराळ्या पद्धतीने जुळवाजुळव करून आपल्या मनातील आशय दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था म्हणजे भाषा त्याने आत्मसात केली. साहजिकच इतर प्राण्यांपेक्षा मानवाच्या गरजा वाढत गेल्या. या गरजा वाढत गेल्या तशा त्याच्या भाषेचा म्हणजेच संज्ञापन व्यवहाराचा आवाका वाढत गेला. मानवाच्या वेगवेगळ्या समूहांत वेगवेगळ्या भाषा निर्माण झाल्या. त्यामुळे इतिहास, संस्कृती, रूढी, परंपरा यांची एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे भाषेद्वारे देवाण-घेवाण होऊ लागली. भाषे बरोबरच रंग, रेषा, चित्रे, वाद्ये यांचाही वापर संज्ञापनासाठी होऊ लागला. भाषेच्या आधी बहुतांशी याद्वारेच संज्ञापन केले जात होते.

२.२ विषय विवेचन

गरजा वाढल्या की भाषेतील ध्वनिसंकेताची वाढ होते. संदेशाची संख्या वाढत जाते. राष्ट्र, राज्य, कुटुंब, जाती, विवाह, शासन, न्याय, शिक्षण, वैज्ञानिक व आर्थिक विकास अशा विविध क्षेत्रांची आणि

संस्थांची संख्या वाढत गेली. त्यामुळे या सर्वांचा व्यवहार सांभाळणारे सर्वांत प्रभावी माध्यम म्हणजे भाषा होय. पहिल्या प्रकरणात आपण भाषा म्हणजे काय, भाषेचे स्वरूप, भाषेची वैशिष्ट्ये आणि कार्ये यांची सविस्तर माहिती घेतली. आता आपण भाषेचा पारंपरिक व आधुनिक अभ्यास कसा केला गेला आहे, ते पाहू.

२.२.१ भाषाभ्यासाचे स्वरूप

भाषेचा अभ्यास करणे, ती भाषा शिकणे अथवा आत्मसात करणे हा भाषाभ्यासाचा एक अर्थ आहे. भाषा या सामाजिक संस्थेची वैज्ञानिक पद्धतीने माहिती करून घेणे हा भाषाभ्यासाचा दुसरा अर्थ आहे.

भाषाविज्ञान म्हणजे 'भाषा' या विषयाचा केलेला वैज्ञानिक पद्धतीचा अभ्यास होय. अभ्यासाच्या वैज्ञानिक पद्धतीत निरीक्षक, प्रयोग, उपलब्ध माहितीचे संकलन व पृथक्करण या सर्वांधारे काढलेले निष्कर्ष, पडताळणी यांचा अंतर्भाव असतो. खरे तर यथायोग्य निष्कर्ष प्राप्त होण्यासाठी निरीक्षण व प्रयोग महत्त्वाचे ठरतात. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र ही नैसर्गिक शास्त्रे आहेत. तेथे प्रयोग करण्यास वाव आहे, मात्र भाषा ही सामाजिक संस्थाआहे, ते सामाजिकशास्त्र आहे. त्यामुळे भाषेत प्रयोगापेक्षा निरीक्षणास अधिक वाव आहे. भाषेत निरीक्षण, अनुभव व उदाहरणे ही मोठी सामग्री असते.

भाषाभ्यासाचे चार घटक आहेत. ध्वनी, शब्द, शब्दसंग्रह, वाक्य, अर्थ हे ते घटक होत. शब्द व वाक्य या दोन घटकांचा 'व्याकरण' या संकल्पनेत समावेश करता येईल. शब्दांचा व वाक्यांचा अर्थ कसा, कोणता व काय असतो? याचा पद्धतशीर अभ्यास करणारे शास्त्र म्हणून 'अर्थविज्ञान' उदयास आलेले आहे. एकंदरीत भाषाभ्यासातील ध्वनी, शब्द, वाक्य, शब्दसंग्रह आणि अर्थ या पाच घटकांचा परिचय करून घेऊ या.

ध्वनींच्या रचनेला अर्थ असावा लागतो. याचा अर्थ असा की, भाषाही एक संचित चिन्हव्यवस्था आहे. या व्यवस्थेत ध्वनींच्या रचनेचे निश्चित असे नियम असतात. आता आपण भाषाभ्यासातील घटकांचा परिचय करून घेऊ.

१) **ध्वनी :** भाषाभ्यास करावयाचा म्हणजे भाषिक रूपांचा, भाषिक रचनांचा अभ्यास करावा लागतो. या रचनेचे सर्वांत महत्त्वाचे आणि मूलभूत घटक म्हणजे भाषेतील ध्वनी होय. 'आपण आपल्या गावाचा नि घराचा विचार करू' ही भाषिक रचना अभ्यासासाठी घेऊ या. या रचनेत अनेक ध्वनींचा वापर केलेला आहे. विचार या शब्दातील इ आणि ययाती शब्दातील ई यांच्या बाबतीत प्रश्न निर्माण होईल. त्याच प्रमाणे घराचा, गावाचा, विचार या तीन शब्दांतील च या व्यंजनाचा उच्चार एकमेकांपासून भिन्न आहेत हे आपणास जाणवेल. या मौखिक ध्वनींना भाषाविज्ञानात स्वन म्हणतात. ण् आणि न् यात कोणता भेद आहे? ष्, श, स यात कोणता उच्चारभेद आहे याचाही विचार केला जातो. मन, मण, गणित, पाणी, बाण, विष, षटकोन, सण, शहामृग यातील वर उल्लेखिलेल्या व्यंजनांचे वेगळेपण स्पष्ट करावे लागते.

२) **शब्द :** भाषेत ध्वनी अथवा स्वन यांच्याबरोबर अर्थातच शब्द असतात. अ, आ, इ उच्चारले अथवा अ इ उ ऊ म्हटले म्हणजे भाषा येत नाही . ध्वनींच्या विशिष्ट क्रमाने रचना असतात. या रचना विशिष्ट क्रमाने

ऐकल्या तर आपल्या मनात अर्थ प्राप्त होतो. उदाहरणार्थ, दशरथ या रचनेतील प्रत्येक ध्वनी त्याच क्रमाने यावा लागतो. लहान मूल याच पद्धतीने भाषा शिकते. प्रथमतः ते छोटे ध्वनिगट म्हणू लागते. दादा, काका, मामा, भूड्डर, दुड्डदू या ध्वनींच्या रचनांचा अर्थही त्याला समजतो. अर्थातच अर्थपूर्ण ध्वनिमालिका म्हणजे शब्द होय. भाषा शब्दांची बनते, म्हणजेच शब्द हे भाषेचे घटक आहेत. राम, सोनाली, सोनू, जानू, आई, राम, रहीम, राणी, तिला, महागाई असे अनेक शब्द मराठी भाषेत आहेत. मात्र या शब्दांचा विचार केवळ त्यांच्या ध्वनींच्या क्रमापुरताच करून चालत नाही. गाव, गावाचा, गावात, गावास, गावातील, गावाला, गावाने या शब्दांत नेमका कोणता फरक आहे? घरात, गावात, बागेत, खोलीत या सर्वांमध्ये असणारा त एकसारखा आहे का? याचप्रमाणे गावाला मधील 'ला' आणि गावाने मधील 'ने' वेगळे काढता येतील. असे अनेक शब्द आपणांस सापडतील. शब्दाचे मूळ रूप कसे ठरवायचे? शब्दाची रूपे बदलतात का? पळ, पळतो, पळणार, पळत आहे, पळाला, पळेल असे शब्द क्रिया दाखवितात का? मग या विविध शब्दांचे वर्गीकरण करावे लागेल.

३) **वाक्य :** ध्वनी, शब्द हे भाषेचे घटक आहेत. नुसते ध्वनी व शब्द माहीत झाले की भाषा येत नाही. केवळ शब्दकोश पाठ करून भाषा येत नाही. एकामागोमाग अनेक शब्द उच्चारले तरीही ती भाषिक रचना होणार नाही. शब्दांनी अर्थपूर्ण रचना करावी लागते. उदाहरणार्थ रेशनसाठी लागलेली रांग, राणीचा बाग, झाडाची हिरवी पाने, अशा काही रचना लक्षात घ्या. 'विधान परिषदेच्या निवडणुकीत अनेक पक्षांचे उमेदवार उभे राहिल्याने साराच गोंधळ झाला.' येथे पहिल्या गटात दोन-तीन शब्दांची वाक्ये आहेत, मात्र ती वाचल्यावर पुढे काय? हा प्रश्न मनात उरतो, म्हणजे 'राणीचा बाग' कळले पण त्याचे पुढे काय करायचे हा प्रश्न आहेच ना! अशा रचनांना शब्दबंध अथवा पदबंध म्हणतात. त्या अर्थपूर्ण आहेत मात्र त्याकरिता परिस्थिती, काळ, व्यक्ती, संदर्भ, यांची ही मदत घ्यावी लागते. दुसऱ्या गटातील रचना पूर्ण वाक्य आहे.

४) **शब्दसंग्रह :** सुटा ध्वनी म्हणजे शब्द नव्हे. ध्वनींच्या एकत्रित रचनेने आपण शब्द तयार करतो. शब्द हा घटक भाषा व्यवहारात महत्त्वाची भूमिका बजावत असतो. शब्द हळूवार, सावकाश, घाईने, निसटता, जोर देऊन कसाही उच्चारता येतो. असे करण्याने त्या त्या शब्दाचा यथायोग्य अर्थ समोरच्या ऐकणाऱ्या व्यक्तीला होत असतो. एका शब्दाला दुसरा शब्द जोडता येतो. एक शब्द विभागता येतो. शब्दक्रमही महत्त्वाचा असतो. 'मी कादंबरी वाचतो' हा मराठी भाषकांनी स्वीकारलेला क्रम आहे. अर्थात 'कादंबरी वाचतो मी' या क्रमाने कोणतीही अर्थहानी होत नाही. प्रत्येक व्यक्ती बोलताना असंख्य शब्द वापरते. विविध ठिकाणच्या व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यांच्या बोलण्यात विविध प्रदेशांतील शब्द असू शकतात. भारतासारख्या बहुभाषिक देशात तर हा अनुभव खूप येतो. भाषेतील शब्दसंग्रह जेवढा अधिक तेवढी ती भाषा अधिक समृद्ध असते. सामाजिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक अशा अनेक क्षेत्रांतील शब्दांची प्रत्यही भर पडत असते. धर्म, व्यवसाय, प्रशासन, व्यापार, शेती अशी ही विविध क्षेत्रे आहेत. जितकी क्षेत्रे जास्त व समृद्ध तितकी भाषा ही समृद्ध होत जाते. आपण मातृभाषेपासून इतरही भाषेतील शब्द वापरत असतो. लहान मुलाला स्व-भाषेची ओळख शब्दापासूनच होते तर मोठ्या व्यक्ती इतर भाषा शिकताना शब्दांनाच सामोऱ्या जातात. अर्थात, शब्दसंग्रह हे भाषाभ्यासाचे एक महत्त्वाचे अंग आहे.

५) अर्थ : शब्द आणि वाक्य यांना प्राप्त होणारा अर्थही महत्त्वाचा असतो. भाषा जितकी शारीरिक तितकीच ती मानसिक व बौद्धिक क्रिया आहे. विचार करून बोलणे व ऐकल्यावर विचार करणे यामधील पायरी म्हणजे त्या त्या शब्दवाक्याचा अर्थ होय. मन ही अतिशय गूढ, गहन, तरल व तितकीच गुंतागुंतीची गोष्ट आहे. त्यामुळे आपण उच्चारलेल्या शब्दाला अथवा ध्वनिसंकेताला नेमका कोणता अर्थ आहे हे प्रथम आपल्या मनात ठरत असते. अर्थात, मनाला मेंदूकडून तसे संदेश प्राप्त होतात. शब्दांना संकेतांनी अर्थ प्राप्त होत असतो. लगीनघाई म्हणजे लग्नातील घाई, पण त्याचा अर्थ खूपच घाई, गडबड, गोंधळ, असा ही होतो. त्यामुळे गणपतीच्या मिरवणुकीतील घाईलाही आपण लगीनघाई म्हणूश कतो. 'पी हळद हो गोरी', 'अगं अगं म्हशी मला कुठं नेशी', 'आपलेच दात आपलेच ओठ' या म्हणींतील शब्दांना वेगवेगळे अर्थ प्राप्त होतात. सर्प म्हणजे कोणताही सरपटणारा प्राणी होय. आता केवळ तो अर्थ 'साप' प्राण्यापुरताच उरला आहे. मुहूर्त म्हणजे कोणतीही वेळ पण आज मुहूर्त म्हणजे शुभ वेळ; ठरली आहे. अर्थ म्हणजे काय? शब्दांना अर्थ कसे प्राप्त होतात? एका शब्दाचे अनेक अर्थ होतात का? त्याच्यात परिवर्तन का होते? अर्थ परिवर्तनाची कारणे कोणती आहेत? वाक्याचा अर्थ कसा ठरतो? या साऱ्यांचा विचार अर्थविज्ञानात होतो. (संदर्भ : वर्णनात्मक भाषाविज्ञान : डॉ. अनिल गवळी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ऑगस्ट २०२४)

२.२.२ भारतीय भाषाभ्यासाचे स्वरूप

अष्टाध्यायी या संस्कृत भाषेच्या व्याकरणपर ग्रंथात पाणिनीने चार हजार सूत्रांच्याद्वारे संस्कृत भाषेचे वर्णन करून आधुनिक भाषा वैज्ञानिकांही आश्चर्यचकित केले आहे. वाक्यातील शब्दांचा परस्परसंबंध, समास, संधी, स्वर, व्यंजने, शब्दसिद्धी, क्रियापदाची सिद्धी या विषयांचे शास्त्रशुद्ध विवेचन पाणिनीने केलेले आहे.

पाणिनीच्या व्याकरणात 'लोप' ही एक संकल्पना वापरलेली आहे. 'अदर्शनं लोपः।' असे ते सूत्र आहे. विशेष म्हणजे पाणिनीची सर्व सूत्रे अल्पाक्षरी आहेत. लोप म्हणजे अदृश्य झालेला घटक होय. म्हणजेच अमूर्त पातळीवर एखादा घटक आहे असे मानणे व विशिष्ट ठिकाणी त्याचा लोप होऊन तो शून्य प्रत्यय म्हणून वापरणे असे या सूत्राचे स्वरूप आहे. जेथे प्रत्यय लोप होतो तेथे प्रत्यय असल्याप्रमाणेच प्रक्रिया घडतात. अमेरिकन भाषावैज्ञानिकांनी यास शून्य पदांतर असे म्हटले आहे. पद म्हणजे स्थूल अर्थाने शब्द होय. उदाहरणार्थ, हत्ती, कवी या शब्दांचे अनेकवचन कवी, हत्ती असेच राहते.

पुढे वररुची (इ. स. ५ वे शतक) या व्याकरणाने आपल्या प्राकृतप्रकाश या ग्रंथात महाराष्ट्री या प्राकृत भाषेला जणू प्रमुख प्राकृत भाषा मानून तिचे वर्णन पहिल्या आठ प्रकरणांत केले आहे. हेमचंद्र (इ. स. १२ वे शतक) यांचे देखील प्राकृत भाषेचे व्याकरण संस्कृत भाषेत लिहिले आहे. त्याने 'प्राकृतचंद्रिका' आणि 'देशीनाममाला' असे दोन महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. हेमचंद्राने महाराष्ट्री या भाषेचे वर्णन काव्य भाषा असे केले आहे. देशीनाममाला या ग्रंथांत त्याने वेदपूर्व देशी शब्द एकत्रित केले आहेत. त्याने पाली भाषेला प्रथम प्राकृत भाषा असे संबोधले आहे. वररुचीने महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची अशा चार प्राकृत भाषांचा उल्लेख आपल्या 'प्राकृतप्रकाश' या ग्रंथात केलेला आहे.

२.२.३ भाषाभ्यासाच्या पारंपरिक पद्धती

आपण येथे ऐतिहासिक भाषाविज्ञान आणि तुलनात्मक भाषाविज्ञान या दोन अभ्यास पद्धतीची माहिती घेऊ या.

- **ऐतिहासिक भाषाभ्यास**

ऐतिहासिक भाषाविज्ञान ही भाषेची एक महत्त्वाची अभ्यास पद्धती आहे. जगातील प्रत्येक गोष्ट परिवर्तनशील असते, मग तो प्राणी असो अथवा वस्तू! या प्रमाणेच भाषा ही सुद्धा परिवर्तनशील आहे. भाषेतील परिवर्तन किंवा बदल चटकन जाणवत नाही तर त्यासाठी काही काही वर्षांचा कालावधी लागतो. उच्चार, शब्दरूप, वाक्य व लेखन पद्धती अशाप्रकारे भाषा बदलते. उच्चारामध्ये शब्दातील वर्णाची जागा बदलू शकते व शब्दाला नवे रूप प्राप्त होऊ शकते. हे सारे बदल कसे घडतात याचे निरीक्षण ऐतिहासिक भाषाविज्ञान करीत असते. असे बदल लक्षात येण्यासाठी काही काळ जावा लागतो. त्यामुळे ऐतिहासिक भाषाभ्यास कालखंड जितका जुना असेल तितके त्या-त्या काळातील भाषेच्या स्वरूपाचे, बदलाचे स्पष्टीकरण यथायोग्य करता येते. मात्र कालखंड जितका जुना तितकी त्या-त्या काळाची साधन सामग्री मिळणेही कठीण असते. अर्थात, या सर्व गोष्टी लक्षात घेऊन ही ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे महत्त्व अबाधित राहते. काही वेळा अनुमान करावे लागते. त्यामुळे ऐतिहासिक भाषाविज्ञान पूर्णतः वैज्ञानिक पद्धती आहे असे मानता येत नाही.

२ फेब्रुवारी १७८६ मध्ये सर विल्यम जोन्स यांनी कलकत्ता येथील रॉयल एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात ग्रीक, लॅटिन, संस्कृत आदी भाषांच्या साम्यावरून त्या एकाच पूर्वज भाषेपासून निर्माण झालेल्या असाव्यात असा अंदाज व्यक्त केला. विल्यम जोन्सच्या या उद्गाराने ऐतिहासिक भाषाभ्यासकांना एक दिशा मिळाली असली तरी ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया घालण्याचे श्रेय फ्रान्स बॉप (१७९१-१८६३) यांनाच दिले पाहिजे. त्यांनी इंडो-युरोपियन भाषासंबंधी १८१६ मध्ये एक ग्रंथ लिहिला. या ग्रंथात संस्कृत, ग्रीक, लॅटिन, फार्शी, जर्मनिक या भाषांचा तौलनिक विचार केला आहे. १८३३ मध्ये त्याने इंडो-युरोपियन भाषांचे तौलनिक व्याकरण प्रसिद्ध केले. ऐतिहासिक भाषाविज्ञानाची ही पायाभरणी होती.

भाषेत ध्वनी, शब्द, प्रत्यय, शब्दार्थ, वाक्य रचना या गोष्टी सतत बदलत राहतात. उदाहरणार्थ प्राचीन काळी आर्यांची एक भाषा होती. ते मध्य युरोपातील त्यांच्या मूळ वसतिस्थानात ती भाषा बोलत असत. तिच्यात बदल झाले. आर्य ही स्वतःच्या वसतिस्थानापासून वेगवेगळ्या टोळ्यांनी इतरत्र गेले. ते भारतातही आले. त्यामुळे भारतात कालांतराने वैदिक संस्कृत व युरोपात ग्रीक, लॅटिन, बाल्टिक, स्लाव्ह अशा भाषा तयार झाल्या. ग्रीक-लॅटिन पासून युरोपातील फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश भाषा निर्माण झाल्या. भारतात संस्कृत पासून पाली, पैशाची, मागधी, अर्धमागधी, शौरसेनी, महाराष्ट्री या सहा प्राकृत व त्यापासून सहा अपभ्रंश भाषा निर्माण झाल्या. नंतर यादवकालीन मराठी, शिवकालीन, पेशवेकालीन, इंग्रजकालीन असे टप्पे निर्माण झाले. अर्थात, ऐतिहासिक भाषाविज्ञानामुळे झालेली संशोधने फलदायक झाली आहेत. इंडो आर्यन भाषांच्या बाबतीत ही पद्धत अवलंबिली गेल्यामुळे त्या भाषांचा एक वंश वृक्ष (भाषाकुल) आहे असे संशोधन पुढे

झाले. या एकाच भाषावंशात भिन्न भिन्न भाषा बोलणारे ग्रीक, रोमन, जर्मन, फ्रेंच, इंग्रज, पारशी, हिंदू आदी भिन्न समाज आर्य वंशाचे आहेत हेही सिद्ध झाले. 'हिब्रू ही मानवाची आद्य भाषा व तिच्यापासून जगातील इतर सर्व भाषा निर्माण झाल्या' हा बरीच वर्षे रूढ असलेला समज यापद्धतीने खोटा ठरविला. थोडक्यात, ऐतिहासिक भाषाविज्ञानात पुढील टप्पे येतील.

(१) भाषेच्या इतिहासात होत जाणाऱ्या परिवर्तनाची नोंद घेता येते.

(२) या भाषिक परिवर्तनाचे नियम शोधता येतात.

(३) भाषांचा तौलनिक अभ्यास करून परस्पर संबंध शोधता येतात.

(४) निरनिराळ्या काळातील एकाच भाषेचे कालिक भेद शोधता येतात.

(५) निरनिराळ्या प्रांतांतील एकाच भाषेच्या बोलीआधारे प्रांतिक भेद शोधता येतात.

(६) विविध भाषांच्या तुलना करून भाषाकुलांची स्थापना करता येते.

(७) भाषाकुलांचे वंशवृक्ष बनविता येतात.

(८) पुराव्या आधारे अनुपलब्ध अशा पूर्वभाषेची निर्मिती करता येते.

एकोणिसावे शतक व त्या शतकाचा उत्तरार्ध हे या अभ्यास पद्धतीचे सुवर्णयुग होते. 'भाषावैज्ञानिक अभ्यास म्हणजे भाषेचा ऐतिहासिक अभ्यासच होय' असे उद्‌गार हर्मन पॉल याने काढले होते. यावरून या अभ्यास पद्धतीची लोकप्रियता लक्षात येते. खरे तर एकोणिसाव्या शतकाच्या सर्वच ज्ञानशाखांवर ऐतिहासिक अभ्यास पद्धतीचा प्रभाव होता असे दिसते. जीव विज्ञानाच्या क्षेत्रात चार्ल्स डार्विनने उत्क्रांतिवाद मांडला. डार्विनच्या ग्रंथाने प्रभावित होऊन श्लाइशरने आपले 'भाषाविज्ञान आणि जीवविज्ञान' हे पुस्तक लिहिले. त्याने भाषेतील परिवर्तनाचे काही नियम या ग्रंथात सांगितले. हे परिवर्तन कठीणतेकडून सुलभतेकडे असते. काळाच्या ओघात दुर्बल भाषा नष्ट होतात. ध्वनिपरिवर्तनाचे नियम निरपवाद व सार्वत्रिक असतात अशी मते त्याने मांडली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मात्र ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा सुवर्णकाळ संपला. या अभ्यासातील गृहीते ठिसूळ आहेत हे जाणवू लागले. अनेक विरुद्ध उदाहरणे पुढे आली आणि ध्वनि परिवर्तनाच्या नियमांचे निरपवादित्व नष्ट होऊ लागले. १९६६ मध्ये पॅरिस येथील भाषाशास्त्रज्ञांच्या परिषदेत (La Societe de Linguistique) भाषेच्या उत्पत्तीवर निबंध वाचण्यास बंदी आली होती. भाषेतील परिवर्तन अनेकदा व्यक्तिगत तसेच आदान प्रक्रियेतही घडत असते. साहजिकच हळूहळू ऐतिहासिक भाषाविज्ञानातील अभ्यासाचा फोलेपणा विसाव्या शतकात अधिकच उघड होऊ लागला.

एकोणिसाव्या शतकात डार्विनचा सिद्धांत व विल्यम जोन्सचे मत यांनी ऐतिहासिक भाषाविज्ञानाला चालना मिळाली. संस्कृत, ग्रीक, लॅटिन या भाषांमागे इ.स. पूर्व ३००० वर्षे किंवा त्याही पूर्वीची 'आदि-इंडो-युरोपियन' जनकभाषा असावी असे मत मांडले गेले. ध्वनिसाम्ये शोधली गेली. एक उदाहरण देता येईल.

संस्कृत	ग्रीक	लॅटिन	इंग्लिश	पोर्तुगीज	मराठी
एकम्	हीस	उनुस	वन	उम	एक
द्व	डुओ	डुओ	टू	डोइस	दोन
त्रय	ट्रेस	ट्रेस	थ्री	ट्रेस	तीन

- **तौलनिक भाषाभ्यास**

भाषा-भाषांमधील पारंपरिक किंवा आनुवंशिक संबंध प्रमाणांसह स्पष्ट करणे, हे तुलनात्मक भाषाभ्यास पद्धतीचे कार्य आहे. १८२० ते १८७० या ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या प्रभावी कालखंडातच ही अभ्यास पद्धती रूढ झाली आणि विकसित होत गेली. ही अभ्यास पद्धती ऐतिहासिक पद्धतीशी संबंधित असल्याने 'भाषापरिवर्तन' ही बाब याही पद्धतीत केंद्रस्थानीच राहते. भाषेत होणारे परिवर्तन हे सार्वत्रिक मूलतत्त्वांच्या चौकटीतच होत असल्याने भाषांचा तुलनात्मक अभ्यास शक्य असतो. परिवर्तनाची बरीचशी तत्त्वे स्वनिमिक आहेत. स्वनिमिक परिवर्तन हे सूत्रबद्ध आणि नियमित स्वरूपाचे असते. यामुळे दोन किंवा अनेक भाषांमध्ये होणारे परिवर्तन विशिष्ट नियमांनी आणि सूत्रबद्धतेने होत असल्याने अनेक भाषांचा तुलनात्मक अभ्यास शक्य असतो.

दोन किंवा जास्त भाषांचा तुलनात्मक अभ्यास या अभ्यास पद्धतीत केला जातो. तुलनेसाठी घेतलेल्या भाषा एकाच भाषा-परिवारातील असाव्यात असे बंधन नसते. बंगाली, हिंदी, गुजराती, मराठी या भाषांचा तुलनात्मक अभ्यास होतो. कारण त्या एकाच परिवारातील आहेत. त्याचबरोबर मराठी, इंग्रजी, फ्रेंच या सर्वस्वी भिन्न भाषापरिवारातील भाषांचाही अभ्यास शक्य असतो. कारण तुलनात्मक भाषाभ्यास पद्धती वर्णनात्मक पद्धतीशी संबंधित आहे. वर्णनात्मक पद्धतीत भाषेचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करून निष्कर्ष मांडले जातात. याच पद्धतीने वरील भाषांचा वर्णनात्मक अभ्यास करून त्या तीन भाषांमध्ये काय साम्य आहेत आणि काय भेद आहेत हे अभ्यासता येते. प्रस्तुत भाषांची तुलना करत असताना ती श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या पातळीवरची नसते, हे येथे स्पष्ट करणे आवश्यक आहे. तुलना म्हणजे दोन किंवा अनेक भाषांमधील साम्य-भेद अधोरेखित करणे. यामुळे तुलनेच्या स्तरावर अमुक भाषा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असे निष्कर्ष संभवत नाहीत.

एकाच किंवा भिन्न भाषा परिवारांमधील भाषांचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. त्याचप्रमाणे कालक्रमिक (ऐतिहासिक) पद्धतीनेही भाषांचा अभ्यास शक्य असतो. समजा मराठी आणि हिंदी या भाषांचा आपणास अभ्यास करावयाचा आहे. त्यासाठी प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन असे कालखंड ठरवून या तीन कालखंडांमध्ये मराठी आणि हिंदी भाषांमध्ये काय काय बदल झाले, ते पाहून त्यांचे वर्गीकरण केले जाते. वर्गीकरणावरून दोन भाषांमधील साम्य-भेद स्पष्ट करता येतात. तसेच एकाच भाषेच्या अनेक बोलींचाही तुलनात्मक अभ्यास शक्य असतो. उदाहरणार्थ, कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी या मराठीच्या भिन्न बोलींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो.

ज्या भाषांमध्ये भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रांमध्ये भेदापेक्षा साम्य अधिक आढळते त्या भाषांना भाषाभगिनी असे म्हणतात. अशा भाषाभगिनी एकाच परिवारातील आहेत, हे सिद्ध करता येते. भारतीय भाषांचे १) आर्य भारतीय भाषाकुल आणि २) द्राविडी भाषाकुल या दोन कुलांमध्ये वर्गीकरण करणे शक्य झाले आहे, ते यामुळेच. कन्नड, तेलगू, तमीळ, मल्याळम या द्राविडी भाषा आहेत तर मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती या आर्य भाषाकुलातील भाषाभगिनी आहेत. कारण यांच्यामध्ये भेदापेक्षा साम्य अधिक आहे.

तुलनात्मक पद्धतीने भाषेचा अभ्यास केल्यास केवळ भाषेसंबंधीच निष्कर्ष मिळतात असे नाही ; तर जागतिक संस्कृतीवरही काही प्रकाश पडतो. इंडो-युरोपियन भाषाकुल असे म्हणत असताना भाषांमध्ये केवळ रूपात्मक साम्य नसते; तर सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, साहित्यिक साम्यही असते. लोक कथांमध्ये जे वेगवेगळे कल्पनाबंध असतात ते अनेकदा जगभरातल्या अनेक कथांमध्ये सारख्याच पद्धतीने आढळून येतात. याचे कारण जागतिक संस्कृतीतील एकता हेच आहे. भाषेच्या तुलनात्मक अभ्यासामधून या एकतेवरही काही प्रकाश पडतो. या पद्धतीने अभ्यास केल्यास सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक जीवनावरही प्रकाश पडतो. भाषकांच्या भाषा वापरावरून त्यांच्या प्रदेशाचाही शोध घेणे शक्य असते.

२.२.४ आधुनिक भाषाभ्यास

आधुनिक मराठी भाषाशास्त्राच्या आणि व्याकरणाच्या अभ्यासात कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि पायाभूत मानले जाते. त्यांनी मराठी भाषेचा इतिहास, व्युत्पत्ती आणि व्याकरण या क्षेत्रांत शास्त्रीय दृष्टिकोनातून मोठे संशोधन केले.

कृ. पां. कुलकर्णी यांनी लिहिलेला 'मराठी भाषा: उद्गम व विकास' हा ग्रंथ मराठी भाषाशास्त्रातील मैलाचा दगड मानला जातो. या ग्रंथात त्यांनी मराठी भाषेची निर्मिती कशी झाली, तिचे संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश भाषांशी काय संबंध आहेत, याचे सप्रमाण आणि ऐतिहासिक विवेचन केले. मराठी भाषा ही अचानक निर्माण झालेली नसून ती एका प्रदीर्घ उत्क्रांतीचा परिणाम आहे, हे त्यांनी भाषाशास्त्रीय नियमांच्या आधारे सिद्ध केले.

मराठी भाषेला स्वतःचा शब्दसिद्धीचा इतिहास देण्याचे अत्यंत कठीण काम त्यांनी 'मराठी व्युत्पत्तिकोश' निर्माण करून केले. मराठीतील शब्दांचे मूळ शोधून ते शब्द संस्कृत, प्राकृत, देश्य किंवा परकीय (फारसी, अरबी, पोर्तुगीज इ.) भाषांतून कसे आले, याचे शास्त्रोक्त स्पष्टीकरण या कोशात दिले आहे. मराठीमध्ये अशा प्रकारचा शास्त्रीय व्युत्पत्तिकोश तयार करणारे ते पहिलेच भाषाभ्यासक होते. यामुळे मराठी शब्दांच्या अभ्यासाला एक नवी दिशा मिळाली. कृ. पां. कुलकर्णी यांनी मराठी व्याकरणाकडे केवळ नियमांची जंत्री म्हणून पाहिले नाही, तर ती एक जिवंत आणि प्रवाही संकल्पना आहे हे मांडले. त्यांनी मराठी भाषेचे उच्चारशास्त्र (Phonetics) आणि रूपशास्त्र (Morphology) यांचा सखोल अभ्यास केला. प्रादेशिक बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकून बोलीभाषांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी केवळ आधुनिक मराठीचाच विचार केला नाही, तर यादवकालीन मराठी (ज्ञानेश्वरीची भाषा) आणि

शिवकालीन मराठी (बखरींची भाषा) यांचाही सखोल अभ्यास केला. जुन्या महानुभाव आणि वारकरी साहित्यातील भाषेचे विश्लेषण करून त्यांनी मराठीच्या ऐतिहासिक प्रवासाचे टप्पे स्पष्ट केले. डॉ. ना. गो. कालेलकर यांच्या पूर्वी मराठी भाषेला आधुनिक आणि शास्त्रीय भाषाशास्त्राची (Linguistics) जोड देण्याचे ऐतिहासिक कार्य कृ. पां. कुलकर्णी यांनी केले. त्यांनी केवळ सिद्धांतावर भर न देता 'कोश' आणि 'ग्रंथ' रूपाने प्रत्यक्ष पुरावे समाजासमोर ठेवले, ज्यामुळे आजच्या मराठी भाषाअभ्यासाचा पाया भक्कम झाला.

आधुनिक मराठी भाषाविज्ञानाच्या पाया भरणीत आणि विकासात पायाभूत कार्य करणारे दुसरे नाव म्हणजे प्रा. नारायण गोविंद कालेलकर (ना. गो. कालेलकर) होय. यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि क्रांतिकारी मानले जाते. त्यांनी मराठी भाषाअभ्यासाला केवळ कौतुक किंवा अभिमानाचा विषय न ठेवता, त्याला एक शास्त्रीय आणि आधुनिक भाषावैज्ञानिक दृष्टिकोन मिळवून दिला. त्यांच्या योगदानाचे प्रमुख पैलू सांगता येतील आधुनिक भाषाविज्ञानाची ओळख आणि पायाभरणी कालेलकर यांनी करून ऐतिहासिक आणि वर्णनात्मक भाषाविज्ञानाची आधुनिक तत्त्वे मराठी भाषेला लागू केली. त्यांच्यामुळे मराठीत 'भाषाशास्त्र' या विषयाला स्वतंत्र विद्यापीठीय शिस्त (Discipline) प्राप्त झाली. मराठी भाषेचे स्वरूप आणि तिची रचना शास्त्रीयदृष्ट्या समजावून सांगणारे अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले 'ध्वनिविचार' (१९५५) मराठीतील ध्वनींची निर्मिती, त्यांचे प्रकार आणि उच्चारप्रक्रिया यावर प्रकाश टाकणारा हा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. 'भाषा आणि संस्कृती' (१९६२) भाषा आणि मानवी संस्कृती यांचा परस्परांशी काय संबंध असतो, भाषा संस्कृतीला कशी घडवते आणि संस्कृती भाषेवर कसा प्रभाव पाडते, याचे अप्रतिम विश्लेषण त्यांनी यात केले आहे. 'भाषा : इतिहास आणि भूगोल' (१९६४) भाषेचा काळानुरूप होणारा बदल (इतिहास) आणि प्रदेशानुरूप बदलणारे तिचे रूप (भूगोल/बोलीभाषा) यांचा अभ्यास कसा करावा, याचे मार्गदर्शन या ग्रंथात मिळते .

कालेलकर यांच्यापूर्वी मराठीत प्रामुख्याने ऐतिहासिक किंवा व्याकरणात्मक दृष्टीनेच भाषेचा अभ्यास केला जात असे. परंतु, कालेलकर यांनी वर्णनात्मक भाषाविज्ञानाचा (Descriptive Linguistics) पुरस्कार केला. भाषा जशी बोलली जाते, तिच्या सद्यस्थितीचे पूर्वग्रहदूषित न होता वस्तुनिष्ठ वर्णन करणे म्हणजे भाषाविज्ञान, हा विचार त्यांनी दृढ केला. मराठी म्हणजे केवळ 'प्रमाण मराठी' (Standard Marathi) नव्हे, तर तिच्या विविध बोलीभाषा हा मराठीचाच समृद्ध वारसा आहे, हे त्यांनी अधोरेखित केले. अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी, कोकणी यांसारख्या बोलीभाषांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्याची प्रेरणा त्यांच्या लेखनातून आणि मार्गदर्शनातून मिळाली. मराठी भाषेतील शुद्ध-अशुद्धतेच्या जुन्या, कर्मठ कल्पना बाजूला सारून त्यांनी भाषेच्या प्रवाहीपणाचे समर्थन केले. नव्या संकल्पनांसाठी मराठीत योग्य पारिभाषिक संज्ञा कशा तयार कराव्यात, याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण दिशादर्शन केले. थोडक्यात सांगायचे तर, ना. गो. कालेलकर यांनी मराठी भाषाअभ्यासाला 'भाबड्या कौतुकाकडून', 'वैज्ञानिक वस्तुनिष्ठतेकडे' नेण्याचे ऐतिहासिक कार्य केले. आज मराठी भाषाविज्ञानाचा जो काही आधुनिक डोलारा उभा आहे, त्याचा पाया रचणाऱ्या प्रमुख शिल्पकारांमध्ये ना. गो. कालेलकर यांचे नाव अग्रस्थानी घेतले जाते.

आधुनिक मराठी भाषावैज्ञानिक पाया घालणारे तिसरे नाव म्हणजे अशोक रामचंद्र केळकर (१९२९-२०१४) हे होत. केळकर हे आधुनिक मराठी भाषाशास्त्र आणि भाषाभ्यासातील एक अत्यंत देदीप्यमान नक्षत्र होते. त्यांनी मराठी भाषाशास्त्राला निव्वळ व्याकरणाच्या आणि परंपरेच्या चौकटीतून बाहेर काढून त्याला आधुनिक, वैज्ञानिक आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोन दिला.

भाषेकडे 'शुद्ध-अशुद्ध' किंवा 'पवित्र-अपवित्र' अशा नैतिक चौकटीतून न बघता, 'भाषाही एक सामाजिक संस्था आणि संकेत प्रणाली आहे' हा आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांनी रुजवला. मराठीच्या उच्चारप्रक्रियेचा (Phonetics and Phonology) त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. मराठीतील 'अ' कारान्त उच्चार, 'ऐ' आणि 'औ' चे उच्चार, तसेच 'ळ' सारख्या विशिष्ट वर्णांचे मराठी भाषेतील स्थान यावर त्यांनी मूलभूत लेखन केले. व्याकरण अभ्यासात त्यांनी केवळ जुन्या नियमांची उजळणी न करता, मराठीची वाक्यरचना (Syntax) आणि अर्थाची संरचना (Semantics) कशी बदलते, याचे नव्याने विश्लेषण केले. त्यांचे 'मराठी भाषा: पद्धती आणि परंपरा' हे पुस्तक मराठी भाषाशास्त्राच्या अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या ग्रंथात त्यांनी मराठी भाषेच्या ऐतिहासिक विकासाचा आढावा घेतला. भाषेचा अभ्यास करण्याच्या पद्धती कशा असाव्यात, याचे वस्तुनिष्ठ विवेचन केले. प्रादेशिक आणि सामाजिक बोलीभाषांचे महत्त्व अधोरेखित केले. अशोक केळकर यांनी 'प्रमाणभाषा' (Standard Language) श्रेष्ठ आणि 'बोलीभाषा' (Dialects) कनिष्ठ हा भेद मोडून काढण्यास मदत केली. कोणत्याही भाषेची समृद्धी तिच्या बोलीभाषांवर अवलंबून असते, हा विचार त्यांनी मांडला. मराठीच्या विविध बोलींमधील व्याकरणिक आणि उच्चारविषयक वैशिष्ट्यांचा त्यांनी आदरपूर्वक व वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला. केळकर हे केवळ भाषावैज्ञानिक नव्हते, तर ते एक कसलेले समीक्षकही होते. 'साहित्य आणि भाषा' यांच्यातील संबंधांवर त्यांनी विपुल लेखन केले.

'शैलीविज्ञान' (Stylistics) हा दृष्टिकोन वापरून साहित्याचा अभ्यास कसा करावा, याचे उत्तम मार्गदर्शन त्यांनी आपल्या लेखांमधून केले. कवी बा. भ. बोरकर यांच्या कवितांचे त्यांनी केलेले भाषिक विश्लेषण याचे उत्तम उदाहरण आहे. थोडक्यात सांगायचे तर, डॉ. अशोक केळकर यांनी मराठी भाषा अभ्यासाला 'वर्णनात्मक' आणि 'ऐतिहासिक' अशा दोन्ही पातळ्यांवर समृद्ध केले. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ते संस्कृतीचे आणि मानवी मनाचे प्रकटीकरण आहे, हे त्यांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केले. आजचा आधुनिक मराठी भाषाभ्यास केळकरांनी घालून दिलेल्या पायावरच उभा आहे.

२.३ **समारोप**

समाजामध्ये, मानव प्राण्यामध्ये होणारे सर्व व्यवहार भाषेशिवाय शक्य नाहीत. एकमेकांशी संपर्क साधण्याची पद्धती म्हणजे भाषा होय. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर भाषा प्राप्त केली आहे. त्यामुळे भाषा अर्जित आहे. निरीक्षणाने लहान मूल भाषा शिकते. लहानपणापासून आपण बोलतो ती आपली मातृभाषा असते, स्वभाषा असते. भाषेमुळे आपले संदेशन पूर्ण होते. भाषेमुळे आपले विचार, मत, भावना

आपण दुसऱ्यापर्यंत पोहोचवतो. आपल्या परंपरा, संस्कृती, इतिहास याचे वहन अथवा संक्रमण भाषेद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असते.

एखादी भाषा आत्मसात करणे हा भाषेच्या अभ्यासाचा एक प्रकार आहे. तर भाषेविषयीचा अभ्यास करणे आणि भाषा या सामाजिक संस्थेबद्दल जाणून घेणे हा भाषेच्या अभ्यासाचा दुसरा प्रकार आहे. भाषेविषयीच्या अभ्यासामध्ये ध्वनी, शब्द, वाक्य, शब्दसंग्रह या चार पातळ्यांवरील अभ्यास अपेक्षित असून, वाक्याला असणारा अर्थही महत्त्वाचा ठरतो

भाषा जितकी जुनी असेल तितके त्या भाषेचे अभ्यासक्षेत्र व्यापक असल्याचे दिसून येते. पूर्वी भाषेच्या अभ्यासाला धार्मिकतेचे स्वरूप होते. हा दृष्टिकोण जसजसा बदलत गेला तसे भाषेच्या अभ्यासाचे क्षेत्र अनेक अंगांनी विस्तारलेले दिसते. भाषेबद्दलचे दृष्टिकोण चिरंतन स्वरूपाचे नसतात. म्हणून भाषेच्या अभ्यासाच्या अनेक शाखा उदयाला आलेल्या दिसून येतात. यात ऐतिहासिक आणि तुलनात्मक या पद्धती महत्त्वाच्या आहेत

१८व्या शतकात पाश्चात्त्य भाषाभ्यासाला एक नवी दिशा प्राप्त झाली ती विलियम जोन्स यांनी केलेल्या भाषेच्या अभ्यासामुळेच होय. संस्कृत, ग्रीक व लॅटीन या भाषात जे साम्य आढळते ते इतके खोलवर रुजलेले आहे की या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्भवल्या असल्या पाहिजेत असे मानावे लागते. या त्यांच्या विधानातूनच ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा पाया घालण्याचे काम केल्याचे दिसून येते. यात दोन कालखंडातील किंवा त्यापेक्षा जास्त कालखंडातील भाषेच्या स्वरूपात काय बदल झाले याचा अभ्यास होतो. यात स्वन, शब्द, अर्थ व व्याकरणिक रूपे यांच्यातील बदलांचा अभ्यास केला जातो. भाषेच्या भूतकालीन अवस्थेवर प्रकाश टाकण्याचे काम तौलनिक भाषाभ्यास करतो. यातील सादृश्य योगायोगावर आधारलेले नसते. एकाच भाषेच्या निरनिराळ्या कालखंडातील स्वरूपे व भिन्न भाषांची स्वरूपे ह्यांची तुलना या भाषाभ्यासात केली जाते. भाषाभ्यासाच्या ह्या पद्धती एकमेकांना परस्पर पूरक आहेत. भाषाविज्ञान हे समाजशास्त्रीय अभ्यासाचे एक क्षेत्र आहे. समाजशास्त्रात प्रयोग करता येतात पण त्यात शंभर टक्के वस्तुनिष्ठता असत नाही. म्हणजेच भाषेत सार्वकालिक नियम व्यवस्था नाही. त्यामुळे भाषाभ्यासाला पुष्कळ मर्यादा पडतात म्हणूनच या अभ्यासात सर्व पद्धतींची मदत घ्यावी लागते.

२.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

योग्य पर्याय निवडा.

१. भारतात संस्कृत भाषेला कोणत्या नावाने ओळखले जाते?

अ) देवभाषा   ब) मूळभाषा

क) वैदिकभाषा   ड) आर्यभाषा

२. भाषाभ्यासाची सुरूवात कोठे झाली?

अ) अमेरिका ब) ग्रीक

क) रशिया ड) जर्मनी

३. ऐतिहासिक भाषाभ्यासाचा पाया घालण्याचे काम कोणी केले?

अ) सोस्यूर ब) सर विलियम जोन्स

क) जॉर्ज ग्रिअर्सन ड) अशोक केळकर

४. भाषेचे वेगवेगळे कालखंड कल्पून भाषिक स्वरूपाचा अभ्यास कोणत्या पद्धतीत केला जातो ?

अ) वर्णनात्मक ब) तुलनात्मक

क) संख्याशास्त्रीय ड) ऐतिहासिक

उत्तर : १. देवभाषा २. ग्रीक ३. सर विलियम जोन्स ४. ऐतिहासिक

२.५ सरावासाठी प्रश्न

अ) लघुत्तरी प्रश्न

१. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप व मर्यादा स्पष्ट करा.

२. भाषाभ्यासातील ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ हे टप्पे स्पष्ट करा.

३. तौलनिक भाषाभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

आ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. भाषाविज्ञान म्हणजे काय ते सांगून भाषाभ्यासाच्या तौलनिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप व विशेष सविस्तर स्पष्ट करा.

२. भाषाभ्यास म्हणजे काय ते सांगून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे विशेष लिहा.

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी, मेहता प्रकाशन, कोल्हापूर

२. भाषाविज्ञान: वर्णनात्मक आणि ऐतिहासिक : संपा. स. ग. मालशे, अंजली सोमण

३. सुलभ भाषाविज्ञान : द. दि. पुंडे

❑❑❑

घटक ३

आधुनिक भाषाभ्यास : वर्णनात्मक भाषाविज्ञान

३.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकात आपण 'आधुनिक भाषाभ्यासात: वर्णनात्मक भाषाविज्ञान' या विषयाचा अभ्यास करणार आहोत, या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला,

१. आधुनिक भाषाविज्ञानाला प्रारंभ कधी झाला हे लक्षात येईल.

२. पारंपरिक व आधुनिक भाषाविज्ञानातील फरक समजून अभ्यासता येईल.

३. वर्णनात्मक भाषाभ्यासातील विविध भाषाभ्यासकांनी मांडलेले विचार समजून घेता येतील.

४. संरचनावादी भाषाभ्यासाच्या परिप्रेक्ष्याची ओळख करून घेता येईल.

५. स्वन विचाराचे स्वरूप अभ्यासता येईल.

३.१ प्रास्ताविक

'भाषाविज्ञान' या अभ्यासक्षेत्राने २० व्या शतकात प्रगत बौद्धिक जगाचे लक्ष वेधून घेतलेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे भाषेच्या स्वरूपाविषयीचा आणि उपयोजनाविषयीचा विचार हा या शतकातील बौद्धिक वातावरणाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. समाजविज्ञान, मानसविज्ञान, मानववंशविज्ञान या क्षेत्रातील अभ्यासकांनी आपल्या क्षेत्रात भाषाविज्ञानातील संशोधन व सिद्धांताचा अधिकाधिक वापर करावा, यात नवल नाही. परंतु शिक्षण क्षेत्रातील विशेषतः भाषाशिक्षण क्षेत्रातील विचारांवर भाषाविज्ञानाचा प्रभाव आहे.

भाषाविज्ञानाचे आकर्षण इतर अभ्यासकांना वाटण्याचे दुसरे एक कारण म्हणजे या क्षेत्रातील संशोधन आणि सिद्धांतांमध्ये प्रचंड विविधता आहे. असे असले तरी भाषाविज्ञान हे क्षेत्र एकात्म स्वरूपाचे आहे की नाही? त्यातील विविधतेमागे काही समान भूमिका, संकल्पनाव्यूह व विश्लेषण पद्धती आहेत की नाहीत? हे लाक्षणिक प्रश्न उपस्थित होतात. आधुनिक भाषाविज्ञानाचे स्वरूप तपासताना या प्रश्नांचे भान राखणे आवश्यक आहे. हे भान राखूनच आपण विज्ञान, भाषा, वर्ण, व्याकरण यांसारख्या मूलभूत संकल्पनांची तपासणी करणार आहोत.

मानवी जीवनात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तसेच भाषा ही एक संदेशन पद्धती असून ती मौखिक ध्वनींची बनलेली असते. ध्वनींच्या क्रमशः विविध रचना असतात, या रचनांना अर्थ असतो. हा अर्थ संकेतांनी प्राप्त होतो. हे संकेत समाजाला मान्य असतात. आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात भाषेला किती महत्त्वाचे स्थान आहे हे आपण यापूर्वी अभ्यासले आहे. प्रत्येक संस्कृतीचा पाया व आधार हा भाषा आहे, याच भाषेचे स्वरूप आपणास समजून घ्यावयाचे आहे. व्याकरणापासून ते

भाषाविज्ञानापर्यंत भाषाभ्यासाची परंपरा काय आहे; भाषाभ्यासाची सुरुवात कुठून व कुठे सुरू झाली? या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. भाषेच्या विविध रूपांचा अभ्यास आधुनिक भाषाविज्ञान करीत आहे, परंतु पारंपरिक भाषाशास्त्रात भाषेचा अभ्यास कोणत्या अंगाने झाला हेही अभ्यासावे लागेल.

३.२ विषय विवेचन

भाषाविज्ञान हे अभ्यासक्षेत्र २० व्या शतकामध्ये उदयाला आले असले तरी २० व्या शतकापूर्वी सर्वत्र भाषाविषयक गैरसमजुती पसरलेल्या होत्या. त्यामुळे भाषेचा व्यवस्थित अभ्यास होऊ शकला नाही असे मानणे चुकीचे ठरेल. भारतामध्ये पाणिनीय परंपरा वैदिक संस्कृतच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून व तिचे 'विशुद्ध स्वरूप' रक्षण करण्याच्या हेतूमुळे निर्माण झाली, हे खरे असले तरी तिच्यामधील वर्णनात्मक पद्धतीचा बारकावा व प्रक्रियेची सूत्रबद्धता व लघुत्व पाहून आजचे भाषावैज्ञानिकही स्तिमित होऊन जातात, ही वस्तुस्थिती आहे. ग्रीकांपासून पुढे विविध रूपात विकसित होत गेलेल्या पाश्चात्त्य परंपरेतही भाषिक अभ्यास करून झाला आहे. भारतीय परंपरेत संस्कृतला जे स्थान होते, त्यासारखे स्थान पाश्चात्त्य परंपरेत लॅटिनला असल्याने लॅटिन भाषेचा तपशीलवार अभ्यास त्या परंपरेत होणे स्वाभाविक होते. पण परंपरागत अभ्यास त्या त्या काळात प्रचलित असणाऱ्या 'शास्त्रीय' पद्धतीनुसार होत होता, असेही म्हणता येईल. हा अभ्यास महत्त्वाचा असला तरी आधुनिक भाषावैज्ञानिकांनी तो पूर्णतः स्वीकार्य मानलेला नाही. या ठिकाणी संस्कृतच्या प्राचीन व्याकरण परंपरेचा विचार काही वेळ बाजूला ठेवू, कारण या परंपरेचे पुरेसे मूल्यमापन आधुनिक भाषाविज्ञानात झाले आहे असे वाटत नाही. लॅटिन भाषेला केंद्रवर्ती धरून व्याकरणाच्या अभ्यासाची जी परंपरा युरोपात प्रगत झाली, ती आणि १९ व्या शतकामध्ये विकसित झालेल्या भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाची पद्धती या दोन्ही पारंपरिक पद्धतींवर आधुनिक भाषाज्ञानिकांनी काही मूलभूत स्वरूपाचे आक्षेप घेतलेले आहेत.

३.२.१ पारंपरिक भाषाशास्त्र

भाषेचा पारंपरिक अभ्यास हा फार मोठ्या प्रमाणावर साधनात्मक होता, असे म्हणता येईल. तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, साहित्याभ्यास, धर्मशास्त्र, इतिहास यासारख्या क्षेत्रांमध्ये उपस्थित झालेल्या समस्या सोडविताना अभ्यासक काही वेळ भाषिक प्रश्नांशी येऊन ठेपत व त्यातून भाषेचा अभ्यास सुरू होई. त्या मूळ समस्येपुरताच तो मर्यादित राही. भाषेचा हा अभ्यास भाषेला मध्यवर्ती स्थान देऊन होत नसे. खास भाषिक अभ्यास अशा प्रश्नांना या अभ्यासात अग्रस्थान नव्हते. बाह्य हेतूंसाठी भाषेचा अभ्यास राबविला जाई. त्यामुळे स्वतंत्र भाषिक अभ्यासाचे स्वतंत्र क्षेत्र म्हणून निश्चित होऊ शकले नाही. या तऱ्हेच्या साधनात्मक दृष्टिकोनाचा अप्रत्यक्ष प्रभाव व्याकरण लेखनावरही झाला व त्यामुळे पारंपरिक व्याकरणामध्ये अनेक त्रुटी निर्माण झाल्या, हेही येथे नोंदवून ठेवायला हवे. भाषेला इतर समस्यांपासून वेगळे काढून तिच्या अंतर्गत स्वरूपाचा, अंतर्गत संरचनेचा अभ्यास करता येतो, त्याविषयी सिद्धांत मांडता येतात व त्यातून 'भाषेच्या अभ्यासाचे स्वतंत्र, स्वायत्त क्षेत्र निश्चित करता येते, ही आधुनिक भाषाविज्ञानामागील महत्त्वाची जाणीव आहे.

परंपरागत भाषिक अभ्यासामध्ये मोठ्या प्रमाणावर कुतूहल चाळवणारी समस्या म्हणून भाषा कशी जन्मास आली? किंवा 'भाषेचे मूळ काय?' या समस्येचा उल्लेख करता येईल. याच्याशी निगडीत असणारा प्रश्न म्हणजे जगातील मूळ भाषा वा आदिभाषा कोणती? पशुपक्ष्यांच्या आवाजांच्या अनुकरणातून मानवी भाषा निर्माण झाली असावी किंवा शारीरिक श्रम करताना निघणारे आवाज हे भाषेच्या मुळाशी असावेत, या प्रकारचे अनेक तर्क या संदर्भामध्ये केले गेले आहेत. मानवी मुलाला कोणत्याही प्रचलित भाषेचा अनुभव घेऊ न देता नैसर्गिकपणे जी भाषा ते बोलू लागेल, ती मानवाची 'आदिभाषा' ठरेल, असे गृहीत धरून इजिप्तमधील एका राजाने (इ.स. पूर्व ७ व्या शतकात) 'एक प्रयोग' ही करून पाहिला होता! 'आदिभाषा' अगदी मागासलेली असली पाहिजे येथपासून ते 'आदिभाषा' ही सर्वांत प्रगत भाषा असून आधुनिक भाषा ही तिची भ्रष्ट रूपे होत, येथपर्यंत अनेक परस्परविरोधी तर्कवितर्क लढवले गेले आहेत. परंतु या प्रश्नांची उत्तरे सापडणे शक्य आहे का? याचाही विचार काहीशा तटस्थपणे व्हायला हवा. वरील तर्कांपैकी कोणताही एक तर्क तपासायला घेतला तरी त्याची सत्यासत्यता पारखणे ही गोष्ट अशक्य आहे हे सहज लक्षात येईल. या संदर्भामध्ये कोणताही 'प्रयोग' करता येणे शक्य नाही. मानवाकडे भाषा शिकण्याची जी जैविक क्षमता असते, परंतु तो कोणती भाषा शिकणार हे सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीवर अपरिहार्यपणे अवलंबून असते. तेव्हा आदिभाषा शोधण्याचा इजिप्तमधील प्रयोग हा 'भ्रामक समजुतीवर' आधारित होता हे उघड आहे. एखादी विशिष्ट भाषा दुसऱ्या भाषेपेक्षा कमी वा अधिक 'प्रगत' आहे, याचा सुद्धा कोणताही पुरावा ग्राह्य मानला येत नाही. खरे म्हणजे हे प्रश्नच वैज्ञानिक अभ्यासाच्या कक्षेबाहेरचे आहेत, असे आधुनिक अभ्यासक मानतात.

भाषेच्या पारंपरिक अभ्यासामध्ये स्वीकारला गेलेला भाषेच्या 'साधनात्मक अभ्यासाचा दृष्टिकोन' व 'भाषेचे मूळ' याविषयीचे तर्क, याविषयी आधुनिक भाषाविज्ञानाची भूमिका आपण पाहिली. या पारंपरिक विचारप्रवाहांपेक्षा अधिक मूलभूत स्वरूपाच्या दोन परंपरांचा आपणास अभ्यास करावा लागेल.

ऐतिहासिक भाषाविज्ञान

मध्ययुगीन युरोपीय समाजामध्ये 'बायबल'च्या धार्मिक व सांस्कृतिक प्रभावामुळे भाषाविषयक कल्पना सुद्धा या ग्रंथातील मिथ्यकथांवर आधारलेल्या असणे स्वाभाविक होते. हिब्रू ही 'ओल्ड टेस्टामेंट'ची भाषा म्हणून सर्व भाषांची जननी, ग्रीक व लॅटिन या सांस्कृतिक उत्कर्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भाषा, इंग्रजी सारख्या आधुनिक भाषा ही प्राचीन भाषांची भ्रष्ट रूपे इ. अनेक समजुती त्या वेळी प्रचलित होत्या. परंतु १५ व्या व १६ व्या शतकात घडलेल्या विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे या समजुतींना धक्का बसला. धार्मिक दृष्टिकोनाचे प्राबल्य ओसरून धर्मग्रंथ, प्राचीन महाकाव्य, जुनी हस्तलिखिते इ. संहितेची चिकित्सा अधिक साक्षेपतेने होऊ लागली, या संहिता चिकित्सेला 'फिलॉलॉजी' (Philology) असे नाव युरोपीय विशेषतः जर्मन परंपरेत मिळाले.

दुसरे म्हणजे पुनरुज्जीवनाकाळापासून पुढे युरोपीय लोक नव्या भूमीचा शोध घेत गेले. त्यांनी अनेक ठिकाणी वसाहती व राज्ये केली. त्यामुळे जगातील विविध समाजांशी व त्यांच्या भाषांशी संपर्क त्यांना झाला. प्राचीन परंपरा असणाऱ्या भारतासारख्या संस्कृतीशी संपर्क येताच त्यांनी स्वतःच्या भाषिक

समजुतींमध्ये व दृष्टिकोनात मूलभूत बदल करणे आवश्यक ठरले. संस्कृत भाषेचा युरोपीय अभ्यासकांना झालेला परिचय हा भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात विशेष क्रांतिकारी ठरला. १७८६ मध्ये सर विल्यम जोन्सने संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधील साम्यस्थळे यादृच्छिक नसून या भाषांमागे एकच जनकभाषा असावी, असा तर्क मांडला. या सूत्राचा तपशीलवार शोध घेण्यासाठी अर्थातच भाषांचे ऐतिहासिक संशोधन होणे क्रमप्राप्त ठरले आणि भाषांची तुलना करणाऱ्या अभ्यासाची जोड त्याला देणे आवश्यक ठरले.

विभिन्न भाषांतील समानार्थी शब्दांमागील ध्वनिसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास करून ध्वनि परिवर्तनाचे नियम तयार करता येतात. तसेच आदिभाषेच्या स्वरूपाविषयीचे तर्क करता येतात. संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमागे ख्रि. पू. सुमारे ३००० वा त्याहीपूर्वी 'आदि-इंडो-युरोपिअन' ही जनक-भाषा असावी हा निष्कर्ष भाषावैज्ञानिकानी स्वीकारलेला आहे.

ऐतिहासिक भाषाभ्यासामध्ये 'भाषिक परिवर्तन' ही संकल्पना केंद्रवर्ती आहे. परंतु ही संकल्पना संपूर्ण भाषेच्या वा बोलीच्या संदर्भात जशी वापरता येते तशीच व्यक्तीच्या संदर्भात वापरता येईल. म्हणजे असे की विशिष्ट व्यक्ती भाषा शिकत असताना ज्या प्रक्रिया घडत असतात त्याही काही अंशी परिवर्तनाच्या स्वरूपाच्या असतात. भाषिक परिवर्तनाची 'व्यक्तिलक्षी' व 'जातिलक्षी' अशी दोन्ही अंगे असतात, असा याचा अर्थ आहे. ऐतिहासिक भाषाभ्यासात फक्त 'जातिलक्षी' परिवर्तनाचा शोध घेतला जाई. परंतु आधुनिक भाषाविज्ञानात विशेषतः मानसशास्त्र व भाषाविज्ञान यांच्या जोड-अभ्यासात लहान मुलांचा भाषिक विकास कसा होतो, हा प्रश्न महत्त्वाचा असल्याने 'व्यक्तिलक्षी' परिवर्तनाचा अभ्यास होतो, असे म्हणायला हरकत नाही. या अभ्यासात कदाचित ऐतिहासिक भाषाभ्यासातील काही पद्धती उपयोगी पडू शकतील, असा दृष्टिकोन भाषाविज्ञानात अलिकडे मूळ धरू लागला आहे.

१९ व्या शतकामध्ये विकसित झालेल्या ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या मर्यादाही ध्यानात घ्यायला हव्यात. एक म्हणजे या अभ्यासात जी भाषिक सामग्री विश्लेषणासाठी घेतली जाई ती बऱ्याचदा मृत भाषांतील लिखित सामग्री असे. परंतु त्यावरून अनुमाने केली जात ती ध्वनीच्या विषयी. भाषेच्या लिखित व मौखिक वा बोली स्वरूपात नेमका संबंध काय याचा शोध घेतल्याखेरीज या तऱ्हेच्या अभ्यासातून योग्य ते परिवर्तनाचे नियम हाती लागू शकणार नाहीत. दुसरे म्हणजे 'जननी' ही कल्पना भाषेच्या बाबतीत बरीच रूपकात्मक अर्थाने वापरावी लागते. तिसरे म्हणजे आदि-भाषेची पुनर्रचना करताना ती भाषा एकजिनसी स्वरूपाची मानावी लागते. परंतु खरेतर भाषा ही अनेक बोलींची बनलेली म्हणजेच बहुविध स्वरूपाची असते. शिवाय परिवर्तनाचे नियम भाषातिहासाच्या काही टप्प्यांत अधिक लागू पडतात तर काही टप्प्यांत तितकेसे लागू होत नाहीत, असे आढळते. परंतु हे असे का, याचे स्पष्टीकरण मात्र ऐतिहासिक भाषाभ्यासात मिळत नाही.

ऐतिहासिक भाषाभ्यासाला भाषाविज्ञानाची शाखा मानायचे की नाही, या प्रश्नाला एवढेच उत्तर देता येईल की, या भाषाभ्यासातील 'परिवर्तन' व त्याच्याशी संबंधित संकल्पना भाषाविज्ञानात स्वीकारल्या जातात. परंतु जनन, कुल, उत्क्रांती यांसारख्या कल्पनेला अजून तरी भाषेच्या संदर्भात 'वैज्ञानिक' मान्यता प्राप्त झालेली नाही.

पारंपरिक व्याकरण

प्रामुख्याने लॅटिन भाषेभोवती रचली गेलेली व्याकरण लेखनाची परंपरा ही बहुविध स्वरूपाची होती. प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या तत्त्वज्ञानात्मक व तार्किक कल्पनांचा प्रभाव या परंपरेवर होता. स्टोइक तत्त्वज्ञांची शब्दजातींची कल्पनाही या परंपरेने स्वीकारली होती. मध्ययुगीन युरोपात शिक्षणासाठी व पंडिती व्यवहारासाठी लॅटिन हे माध्यम होते. त्यामुळे लॅटिन भाषेच्या व्याकरणाची एक प्रदीर्घ परंपरा निर्माण झाली. व्याकरण शिकण्या-शिकविण्याचे मुख्य ध्येय म्हणजे लॅटिन भाषेतील अभिजात वाङ्मय वाचता येणे व ती भाषा लिहिता येणे असा दृष्टिकोन प्रचलित होऊन, त्यातूनच व्याकरणाचे कार्य चांगले बोलीव-लिहावे कसे हे शिकविणे असा आदेशात्मक वा नियामक दृष्टिकोन तयार झाला. व्याकरणाबरोबर होणाऱ्या वाङ्मयाच्या अभ्यासामुळे 'चांगली' भाषा म्हणजे उत्तमोत्तम लेखकांनी प्रामुख्याने प्राचीन अभिजात लेखकांनी वापरलेली भाषा- असा दृष्टिकोन निर्माण झाला व त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारातील जिवंत भाषेचा, खरे म्हणजे बोलीचा व्याकरणाशी संबंध राहीनासा झाला. व्याकरण फक्त लेखी भाषेपुरते मर्यादित राहू लागले. प्रबोधनाबरोबर हळूहळू लॅटिनचे महत्त्व कमी होऊन स्थानिक युरोपीय भाषांचा प्रभाव वाढत गेला. परंतु या भाषांची व्याकरणे व शब्दकोश यांची निर्मिती बराच काळ लॅटिनच्या प्रभावाखाली राहिली.

आधुनिक भाषावैज्ञानिकांचा पारंपरिक व्याकरणावरील प्रमुख आक्षेप त्याच्या आदेशात्मक वा नियामक भूमिकेविरुद्ध आहे. 'चांगले बोलावे - लिहावे कसे' हे शिकविणारे ते खरे व्याकरण, ही भूमिका आधुनिक अभ्यासकांना मान्य नाही. दुसरा आक्षेप म्हणजे लॅटिनसारखी 'अभिजात' भाषा प्रमाण मानून इतर भाषांवर तिचे नियम लादण्याची प्रवृत्ती या व्याकरणात आहे. लॅटिन, संस्कृत यांसारख्या सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा पावलेल्या भाषांच्या व्याकरणाचे नियम आधुनिक भाषांनाही लागू पडतात, किंवा पडायला हवेत, अशी अनेक व्याकरणकारांची धारणा असलेली आढळते. दामल्यांपूर्वीचे बहुतेक व्याकरणकार मराठीमधील संकरप्रयोगांना 'अशुद्ध' मानतात. उदाहरणार्थ,

१) तू का रे पुस्तक वाचलेस. (कर्तृकर्मसंकर)

२) त्याने मुलाला शाळेत घातला. (कर्मभावसंकर)

संस्कृत ही मराठी भाषेची जननी तेव्हा संस्कृतमध्ये असे संकरप्रयोग नसतील तर मराठीमध्ये ते अशुद्धच मानले पाहिजेत, असा आग्रह या संदर्भात असे. भाषेच्या बोली स्वरूपाला अशुद्ध वा निदान गौण मानून लेखी स्वरूप प्रमाण मानणे, हा पारंपरिक व्याकरणाचा आणखी एक ठळक दोष. भाषेतील ध्वनी (स्वर) आणि लिपीमधील अक्षरे यात होणाऱ्या गोंधळाला काही अंशी हाच सदोष दृष्टिकोन जबाबदार आहे. इंग्रजीमध्ये 'A', 'E', 'I', 'O' व 'U' असे पाच 'स्वर' आहेत, अशी समजूत या गोंधळातून उद्भवलेली आहे. खरे म्हणजे इंग्रजीच्या लेखनासाठी जी रोमन अक्षरमाला वापरली जाते तिच्यात साधारणतः स्वरोच्चार दर्शविण्यास येणारी ही अक्षरे आहेत, याव्यतिरिक्त राहिलेली एकवीस अक्षरे साधारणतः व्यंजनोच्चार दर्शवितात. परंतु प्रत्येक उच्चारांचा विचार केला तर ही अक्षरमाला फार अपुरी आहे, हे सहज लक्षात येईल.

मराठीच्या उच्चारणाचा विचार केला तर 'कर', 'बस', 'बदक' यांसारखे शब्द व्यंजनान्त आहेत. परंतु लेखी स्वरूपात पाय मोडण्याची सोय असूनही तसे न केल्यामुळे त्यांना स्वरान्त मानण्याची चूक अनेक व्याकरणकारांनी केली आहे.

पारंपरिक व्याकरणात वाक्यविश्लेषणाला महत्त्वाचे स्थान होते व त्यात शब्दजातीची कल्पना मूलभूत होती. शब्दजातींची एकूण संख्या किती, याबाबत पारंपरिक व्याकरणकारात एकमत नाही. परंतु त्याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शब्दजातींच्या व्याख्या वेगवेगळ्या निकषांनुसार तयार झालेल्या आढळतात, म्हणजेच शब्दांच्या वर्गीकरणामागे एकच असे निश्चित सूत्र पारंपरिक व्याकरणात नाही. उदाहरणार्थ, दादोबा तर्खडकरांनी केलेल्या व्याख्या.

अ) नाम : नाम म्हणजे पदार्थमात्राचे नाव.

ब) सर्वनाम : सर्वनाम म्हणजे नामाचा वारंवार उच्चार न व्हावा, म्हणून समयविशेषी त्यांच्या स्थानी जे शब्द येतात ते प्रत्येक.

यातील नामाची व्याख्या शब्दार्थावर आधारित आहे तर सर्वनामाची शब्दाच्या कार्यावर आधारित आहे. त्यामुळे व्याकरणिक प्रवर्गाच्या व्याख्यांवर आधुनिक भाषावैज्ञानिकांचा आक्षेप आहे.

३.२.२ आधुनिक भाषाविज्ञान

२० व्या शतकात पारंपरिक भाषाअभ्यासाविरुद्ध जे आक्षेप घेतले गेले त्यांच्यामागे प्रामुख्याने फेर्दिनांद द सोस्यूर या अभ्यासकाने केलेल्या 'एककालिक' व 'कालक्रमिक' भाषाभ्यास या भेदाची प्रेरणा आहे. सोस्यूर स्वतः ऐतिहासिक भाषाशास्त्राचा गाढा अभ्यासक होता. परंतु भाषेच्या 'विकास' 'उत्क्रांती' इत्यादीविषयीच्या तत्कालीन कल्पनेपेक्षा काही वेगळी तत्त्वे त्याने मांडली. भाषा परिवर्तनशील असते असे मान्य केले तरी कोणत्याही एखाद्या कालखंडात ती अचल, स्थिर मानून तिचे विश्लेषण करता येते, हे सोस्यूरच्या सिद्धांतातील मूलभूत तत्त्व क्रांतिकारी होते. भाषिक परिवर्तन म्हणजे एका स्थिर अवस्थेपासून वा स्थितीपासून दुसऱ्या स्थिर अवस्थेकडे वा स्थितीकडे सरकणे, या सोस्यूरच्या विवेचनामुळे एककालिक भाषिक स्थितीचे विश्लेषण आधुनिक भाषाविज्ञानामध्ये महत्त्वाचे ठरले आहे.

या संदर्भामध्ये सोस्यूरने भाषा व बुद्धिबळाचा खेळ यांची केलेली तुलना उद्बोधक आहे. दोन्हींमध्ये घटकांची एक संरचना अभिप्रेत असते आणि त्यातील प्रत्येक घटकाचे मूल्य संरचनेतील इतर घटकांशी त्या घटकाचे जे संबंध असतात त्यावर अवलंबून असते. ही संरचना परिवर्तनशील असते. यात शंकाच नाही. परंतु कोणत्याही एखाद्या क्षणी ती ज्या स्थितीमध्ये आहे तिचे विश्लेषण शक्य असते. इतकेच नव्हे तर हे एककालिक विश्लेषण फार मौलिक असते. किंबहुना परिवर्तन म्हणजे घटकांच्या संरचनेच्या एका स्थितीपासून दुसऱ्या स्थितीमध्ये जाणे कारण वरवर पाहता एकाच घटकात परिवर्तन होत असले तरी वस्तुतः या परिवर्तनामुळे संपूर्ण संरचनेत बदल होत असतो, म्हणजेच नवी स्थिती वा अवस्था निर्माण होत असते.

तेव्हा भाषेचा कालक्रमिक अभ्यास हा एककालिक अभ्यासावर अवलंबून असतो, हा सोस्यूरच्या विवेचनाचा मथितार्थ म्हणायला हरकत नाही.

भाषेच्या एककालिक विश्लेषणाला अग्रक्रम देण्याचे श्रेय सोस्यूरकडे जाते. परंतु केवळ या विश्लेषणाला अग्रक्रम मिळवून देण्यापुरते सोस्यूरचे कार्य मर्यादित नव्हते, तर या एककालिक भाषिक विश्लेषणामध्ये पायाभूत ठरणाऱ्या काही संकल्पनाही प्रथम सोस्यूरनेच मांडल्या. यापैकी सर्वांत महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'व्यवस्था' किंवा 'संरचना' होय. भाषा ही एक चिन्हव्यवस्था किंवा चिन्हांची संरचना असते. आपण प्रत्यक्षात बोलण्याची वा ऐकण्याची जी क्रिया करतो ती व्यक्तीव्यक्तीनुसार थोडीफार भिन्न असते. प्रत्येक व्यक्तीच्या काही खास लकबी, सवयी असतात इतकेच नव्हे तर एकच व्यक्ती वेगवेगळ्या क्षणी भिन्न स्वरूपाच्या भाषिक क्रिया करू शकते.

उदाहरणार्थ, 'मला' हा शब्द उच्चारताना एखाद्या वेळी 'म' मधील 'अ'कार अगदी ऱ्हस्व असेल किंवा एखाद्या वेळी बराच दीर्घ असेल, किंवा एखाद्या वेळी घाईत शब्द उच्चारताना तो उच्चारायचा राहून जाऊ शकेल. परंतु तरीसुद्धा व्यक्तीव्यक्तीनुसार किंवा क्षणाक्षणी बदलणाऱ्या या वर्तनातून संदेशन होते. याचा अर्थ असा की, या चल वाटणाऱ्या वर्तनामागे, व्यवहारामागे एक व्यक्तिनिरपेक्ष, खूपशी अचल आणि एकजिनसी स्वरूपाची भाषिक व्यवस्था असते, भाषावैज्ञानिकाच्या दृष्टीने ही भाषिक व्यवस्था महत्त्वाची ठरते. सोस्यूरने केलेला भाषिक वर्तन (Parole) व व्यवस्था (Langue) हा भेद, किंवा दुसऱ्या शब्दात 'भाषण' व 'भाषा' हा भेद, आधुनिक भाषाविज्ञानात एक मौलिक भेद म्हणून ओळखला गेला आहे.

नोम चॉम्स्की या अलीकडील अभ्यासकाने केलेला भाषिक प्रयोग व क्षमता वा प्रभुत्व हा भेद सोस्यूरच्या भेदाशी तंतोतंत जुळत नसला तरी त्याच्याशी नाते सांगणारा आहे. आपण प्रत्यक्षात जे उद्गार काढतो, उच्चारण करतो ती बहुधा अपूर्ण, अडखळती, मध्ये असंख्य विघ्ने येणारी, अशी प्रक्रिया असते. अगदी बिनचूक, अस्खलित, संपूर्ण वाक्ये नेहमीच्या व्यवहारात उच्चारणाऱ्या माणसांचे बोलणे बहुधा 'पुस्तकी', पंडिती म्हणून ओळखले जाईल. परंतु भाषेच्या प्रत्यक्ष प्रयोगात अशी अपूर्ण, अर्धवट सोडलेली, नीट न घडलेली उच्चारणे सतत येत असली तरी त्यातून संदेशन व्यवस्थित होते याचे कारण ऐकणारा व बोलणारा या दोघांनीही भाषेची नियमव्यवस्था आत्मसात केलेली असते. भाषिक नियमव्यवस्थेचे ज्ञान म्हणजेच 'भाषिक क्षमता' होय. आधुनिक भाषाविज्ञानात मानवी मनाच्या या क्षमतेचा म्हणजेच अपूर्ण, मूर्त वर्तनातून पूर्णकारी, अमूर्त नियम शोधण्याच्या सामर्थ्याचा शोध हा महत्त्वाचा ठरलेला आहे.

भाषाविज्ञानाने भाषेचा विचार एक 'चिन्हव्यवस्था' म्हणून करायचा म्हणजे भाषिक चिन्हांचे त्यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधाचे विश्लेषण करायचे. येथे पुन्हा सोस्यूरचा उल्लेख करायला हवा. भाषा म्हणजे 'कल्पना' (विचार/संकल्पना/अर्थ) आणि ध्वनी यांच्यात दुवा निर्माण करणारी व्यवस्था होय, हे आधुनिक भाषाविज्ञानातील सर्वांत महत्त्वाचे प्रमेय त्याने मांडले. हे पुढील आकृतीच्या सहाय्याने मांडता येईल.

भाषा

कल्पना ⟶ चिन्हव्यवस्था ⟵ ध्वनी

द्रव्य आकार द्रव्य

मानवाचा अनुभव ही एक अत्यंत अस्पष्ट, धूसर, आकारहीन गोष्ट असते. या अनुभवाला किंवा कल्पनेला, विचारांना आकार भाषेमुळे मिळतो; तेव्हा हा अनुभव किंवा कल्पना म्हणजे भाषेचे द्रव्य होत. नुसते ध्वनी हेसुद्धा भाषेचे द्रव्यच असतात. त्यांना स्वतःचा आपोआप, स्वभावतः अनुभव व्यक्त करता येत नाही व या अर्थाने त्यांना आकार नसतो. कल्पनात्मक / अनुभवात्मक आणि ध्वन्यात्मक द्रव्याला आकार देण्याचे, म्हणजेच निश्चित नियमांच्या आधारे त्यांच्यात नाते निर्माण करण्याचे कार्य भाषा बजावते. तेव्हा आधुनिक भाषाविज्ञानानुसार 'भाषा' म्हणजे एक आकारित, संरचित चिन्हव्यवस्था होय. अनुभवात्मक द्रव्याचे रूपांतर भाषा अर्थात्मक आकारात करते तर ध्वन्यात्मक द्रव्याचे रूपांतर स्वनात्मक आकारात करते आणि या आकारितातून 'चिन्ह' निर्माण होते, किंबहुना चिन्हव्यवस्था निर्माण होते; कारण कोणतेही चिन्ह हे इतर चिन्हांशी असलेल्या त्याच्या संबंधातूनच सिद्ध होते. सोस्यूरने 'द्रव्य' आणि 'आकार' वा 'संरचना' यात केलेल्या भेदावर आधुनिक भाषाविज्ञान उभारलेले आहे.

३.२.३ वर्णनात्मक किंवा संरचनावादी भाषाभ्यास

संप्रेषण हाच कोणत्याही भाषेचा प्रधान हेतू असतो. संप्रेषणाच्या पातळीवर सर्व भाषांचे कार्य एकच असल्याने कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना भाषेच्या 'शुद्धाशुद्धते' विषयीच्या पारंपरिक कल्पना नाकाराव्या लागतात. वर्णनात्मक पद्धतीने भाषेच्या अभ्यासात व्यवहारभाषेचा विचार गृहीत धरलेला असतो. अर्थात लेखनासाठी वापरली जाणारी प्रमाणभाषा वर्ज्य असते असे नाही. वॅटसन, सोस्यूर, ब्लूमफील्ड, नोम चॉम्स्की, पिगेट, सपीर, व्होर्फ, मॅलिनोव्हस्की, लबव आदी पाश्चात्त्य अभ्यासकांनी वाट विचारत या अभ्यासक्षेत्रात प्रवेश करावा लागतो.

अ) फेर्दिना – द – सोस्यूर

भाषा ही एक 'चिन्ह' (Sign) व्यवस्था आहे असे सांगून, सोस्यूरने चिन्हव्यवस्थेच्या अनुषंगाने भाषेचे विश्लेषण केले आहे. त्याच्यामते प्रत्यक्ष ध्वनी (ध्वनिरूप चिन्ह – Signifier) आणि त्यांना प्राप्त होणारा अर्थ (अर्थरूप चिन्हित – Signified) यांची सांगड घालणारी 'चिन्ह' (Sign) व्यवस्था म्हणजे भाषा होय. भाषा ही यांत्रिक स्वरूपाची नसून ती अतिशय गुंतागुंतीची आणि व्यामिश्र आहे. मर्यादित स्वनिमांचा (ध्वनी) वापर करून असंख्य अर्थपूर्ण आणि संदेशवाहक रूपे तयार केली जातात. भाषिक रूपांमधूनच व्यामिश्र वाक्यरचना तयार केल्या जातात. अशा वाक्यांमध्ये कर्ता, कर्म, क्रियापद असे अनेक भाषिक घटक कार्य करीत असतात. या घटकांचे अनेकविध गट भाषेत असतात, यापैकीच विशिष्ट रूपे निवडून भाषक आपला भाषिक व्यवहार साध्य करीत असतो.

भाषिक घटकांचे सोस्यूरने दोन गटात वर्गीकरण केले आहे

१. अन्वयनिष्ठ घटक (Syntagmatic)

२. गणनिष्ठ घटक (Paradigmatic)

उदाहरण : १. शाम पत्र लिहितो.

२. राम आंबा खातो.

३. सीता गाय बघते.

वरील तिन्ही वाक्यांत कर्ता, कर्म आणि क्रियापद आहेत, म्हणजेच आपण कर्त्याचा एक गट (राम, सीता, शाम इ.), कर्माचा एक गट (पत्र, आंबा, गाय इ.) आणि क्रियापदांचा एक गट (लिहितो, खातो, बघते इ.) असे वर्गीकरण करू शकतो. या वर्गीकरणालाच सोस्यूर 'गणनिष्ठ घटक' म्हणतो. असे असंख्य गणनिष्ठ घटक भाषेमध्ये असतात. गणनिष्ठ घटकांचा अन्वयात्मक वापर करून भाषक आपला व्यवहार करीत असतो. म्हणजेच गणनिष्ठ घटकाचा संरचनात्मक अन्वय लावून वाक्यरचना तयार करीत असतो.

उदाहरणार्थ, राम ⟶ ⟶ आंबा खातो.

शाम ⟶ ⟶ पत्र लिहितो.

'राम'चा आंब्याशी आणि आंब्याचा खाण्याशी म्हणजेच रामचा अन्वय खाण्याशी किंवा उलट्या पद्धतीने खाण्याचा अन्वय रामशी साधून अर्थव्यापार होत असतो. हा अन्वय त्या त्या भाषेनुसार बदलत असतो.

उदाहरणार्थ, Ram eats a mango

इंग्रजीमध्ये कर्त्याला लागून क्रियापद येते व नंतर कर्म येते. पण अन्वय साधूनच अर्थव्यापार होत असतो. यालाच सोस्यूर 'अन्वयनिष्ठ घटक' असे म्हणतो.

१. भाषेचे ध्वनिरूप (चिन्हक) आणि तिचे अर्थरूप (चिन्हित) यांच्यातील संबंध यादृच्छिक असतात, ते सामाजिक परंपरेने योगायोगाने प्राप्त झालेले असतात. अशा ध्वनी व अर्थाच्या संबंध प्रस्थापित करणाऱ्या 'चिन्ह' व्यवस्थेस भाषा असे म्हणतात. हे संबंध सामाजिक संकेतांनी साधलेले असतात, हे संकेत नेहमी यादृच्छिक असल्याने, संकेतांच्या गणितात अर्थाचा विचार करणे अशक्य आहे, कारण स्वनिम आणि अर्थ यांच्यात जो संबंध असतो त्याचे कोणतेही आणि कोणत्याही अर्थाने स्पष्टीकरण करता येत नाही.

२. भाषा समकालीन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ती ऐतिहासिक किंवा कालक्रमिक विकासाची प्रक्रिया नाही, यातूनच त्याने एककालिक भाषाभ्यास पद्धती विकसित केली.

३. भाषेचा अभ्यास म्हणजे प्रत्यक्ष बोलण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे, लिखित साधनांचा नव्हे.

४. भाषा (Langue) आणि भाषण (Parole) यांच्यातील भेद सर्वप्रथम सोस्यूरने स्पष्ट करून भाषाभ्यास म्हणजे भाषणाचा (Parole) अभ्यास नव्हे, तर तो भाषेचा (Langue) अभ्यास असतो हे स्पष्ट केले.

५. भाषेचा अभ्यास म्हणजे केवळ तिच्या व्याकरणाचा किंवा सुट्या स्वनिमित गुणाधर्माचा अभ्यास नसून तो अंतर्गत संरचनेचा अभ्यास असला पाहिजे.

सोस्यूरची ही विधाने भाषेकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनाला मूलभूत विरोध दर्शविणारी आणि भाषेविषयी वेगळी मांडणी करणारी आहेत.

ब) लिओनार्ड ब्लूमफील्ड

भाषाविज्ञानाच्या दृष्टीने ब्लूमफील्डचा 'भाषा' (Language 1933) हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या मते मूल जन्मता भाषा घेऊन येत नाही. त्यामुळे भाषा ही जैविक क्रिया नसून ती आत्मसात करावी लागणारी क्रिया आहे. ब्लूमफील्ड पुढे म्हणतो, मानवी मन हे कोरी पाटी असते. मानवी मूल जन्मल्यानंतर हळूहळू सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाला 'चेतक प्रतिसाद' देऊ लागते. यातूनच ते हळूहळू भाषा शिकू लागते. 'भाषिक वर्तन' ही संकल्पना त्याने स्पष्ट केली आहे. भाषेच्या माध्यमातून एकाने सांगितलेली गोष्ट किंवा केलेले कथन दुसरा माणूस तीच गोष्ट क्रियेच्या रूपाने करू शकतो. 'शाम' नावाच्या एखाद्या व्यक्तीला शेतात चरत असलेली शेजाऱ्याची गाय दिसली, तर गायीने पिकाचे नुकसान करू नये म्हणून त्याने रामला 'राम गाय बांध' असे सांगितले. शामने केलेले कथन समजून घेऊन राम गाय बांधण्याची प्रत्यक्ष क्रिया करतो. येथे महत्त्वाचे हे आहे की, भाषाच नसती तर शाम गाय बांधण्यास रामला सांगू शकला नसता, त्यामुळे ती क्रिया स्वतः शामलाच करावी लागली असती. म्हणजेच ब्लूमफील्डच्या मते, मूक प्राण्यांच्या क्रियात्मक वर्तनापेक्षा मानव भाषेच्या द्वारे 'वाचिक वर्तन' करू शकतो, ही वर्तनाची प्रक्रिया भाषेची प्रभावी उपयोगिता आहे. शामने उच्चारलेले हे ध्वनी राम तेव्हाच आत्मसात करू शकतो की, जेव्हा त्या वाक्यामागील राम आणि शामचे सामाजिक संकेत एकच असतात. हे संकेत म्हणजे रामने उच्चारलेल्या ध्वनीचा अर्थ होय. या अर्थाद्वारे शामने सांगितलेली क्रिया राम आपल्या वर्तनातून नियंत्रित करू शकतो. अशा तऱ्हेने भाषेचा द्विस्तरीय (ध्वनी, अर्थ) पातळीवर वापर होत असतो.

भाषा ही जैविक नसून यांत्रिक क्रिया आहे या भूमिकेतून ब्लूमफील्ड मानसशास्त्राला विरोध करतो. तो भौतिकवाद / यांत्रिकवाद ग्राह्य मानून भाषेचे विश्लेषण करतो. त्याच्या मते बोलणे हे पर्यावरणातील समोरच्या घटनेवर अवलंबून असते. आपण पर्यावरणातील गोष्टी लक्षात घेऊन त्यानुसार वृत्ती बनवतो व भाषा आत्मसात करीत असतो. यानुसारच भाषेचा वापरही करीत असतो, म्हणून तो भाषिक संरचनेला आणि तिच्या कार्यप्रणालीला 'ट्रिगर मशीन' असे संबोधतो. भाषा ही मज्जासंस्था व्यवस्थेद्वारे चालणारी व्यवस्था असून ती बटन दाबताच चालू होणाऱ्या ट्रिगर मशीनसारखी असते. म्हणूनच तो आपल्या अभ्यासात सर्वप्रथम स्थान 'ध्वनिविचाराला' म्हणजेच 'स्वनिम विचाराला' देतो.

आपण केवळ ध्वनीचा म्हणजेच स्वनिमांचा भाषेत वापर करीत नसतो, मर्यादित स्वनांच्या अथवा ध्वनींच्या आधारे असंख्य अर्थपूर्ण संरचना तयार करीत असतो. अशा अर्थपूर्ण संरचनेतून भाषिक संप्रेषण केले जाते. अर्थपूर्ण संरचनेतील अर्थदृष्ट्या लघुत्तम घटक म्हणजेच 'रुपिम' होय. रुपिमांच्या अभ्यासाला रुपिम विचार / रुपिम विन्यास असे म्हणतात. ही भाषेच्या अभ्यासाची दुसरी पायरी आहे. 'शाळा, शाळेत, शाळेतील, शाळेमधल्या' हे सगळे शब्द अर्थाने आपण शब्द मानतो. परंतु हे सर्व शब्द नसून त्यात काही रुपिम आहेत. शाळा हा मुक्त रुपिम आहे, 'शाळेत' या पदात (शाळा + ए + त), 'शाळेतील' या पदात शाळा + ए + त + ईल ही रुपिमे मिळतात.

वेगवेगळ्या रुपिमांच्या, शब्दांच्या भाषिक पदांच्या सहाय्याने आपण आपला भाषाव्यवहार करीत असतो. या रूपांच्या अर्थपूर्ण संरचनेला किंवा साखळीच्या संबंधास 'वाक्य' असे म्हणतात. वाक्याचा वर्णनात्मक पद्धतीने विचार करण्याच्या पद्धतीस 'वाक्य विचार/वाक्यविन्यास' असे म्हणतात.

क) नोम चॉम्स्की

भाषाविज्ञानात वाक्यविचाराबरोबरच अर्थविचाराला महत्त्व द्यावे लागते. अर्थविचाराला प्रधान मानून भाषा ही 'मानसशास्त्राची' एक शाखा आहे, असे सांगून मनोवैज्ञानिक पद्धतीने भाषेचा अभ्यास केला गेला. नोम चॉम्स्की हा या परंपरेतील महत्त्वाचा भाषावैज्ञानिक आहे. मानसशास्त्रवाद्यांनी संरचनावादाच्या काही गोष्टींवर आक्षेप घेतलेले आहेत. संरचनावाद्यांच्या मते भाषा आत्मसात करावी लागणारी क्रिया आहे, ती आनुवंशिक नाही यावर चॉम्स्कीने आक्षेप घेतलेला आहे.

चॉम्स्कीच्या मते, भाषा ही जैविक क्रिया आहे. आनुवंशिकतेने जन्मतः मानवाच्या स्मरणपुटात भाषिक क्षमता असतात. मूल भाषा शिकते म्हणजे भाषेचे नियम आत्मसात करीत असते. भाषा आत्मसात करण्याची 'क्षमता' त्याला जन्मतः प्राप्त झालेली असते. त्यामुळे भाषा ही बहुतांशी जैविक क्रिया आहे. प्रत्येक भाषेची संरचना 'अनन्यसाधारण' असते, या विधानावर चॉम्स्कीने आक्षेप घेतला आहे. त्याच्या मते भाषांमध्ये भेदांपेक्षा साम्ये अधिक असतात. जगातील सर्व भाषा काही मूलभूत तत्त्वांनी सीमित झालेल्या असतात. भाषाभाषांमधील साम्याला त्याने 'भाषिक सार्वत्रिकता' असे संबोधून 'सार्वत्रिक व्याकरणा'ची मांडणी केली आहे. कोणत्याही भाषेत उद्गारवाचक, प्रश्नार्थक, विधानार्थी वाक्ये एका समान तत्त्वांनीच निर्माण होत असतात. त्यामुळे भाषेतील 'अनन्यसाधारणता' गैरलागू ठरते. त्याचबरोबर संरचनावाद्यांनी जी पद्धती विकसित केली आहे, ती अतिशय काटेकोर असल्याने त्याने लक्षात आणून दिले की, या पद्धतीनुसार फक्त आकारनिष्ठ, निरीक्षणसुलभ वाक्यांचेच विश्लेषण करता येते; संदिग्ध अर्थ असलेल्या वाक्यांचे विश्लेषण या पद्धतीने करता येत नाही हे दाखवून देण्यासाठी 'रचनांतरण पद्धती' कशी महत्त्वाची आहे, हे चॉम्स्कीने स्पष्ट केले.

चॉम्स्कीच्या मते स्वनिम-रुपिम-वाक्य या पद्धतीने भाषेचा समग्र अभ्यास करता येत नाही. तसेच भाषा भिन्न असल्या तरी त्यांचा अभ्यास संरचनावाद्यांच्या मताप्रमाणे एकाच पद्धतीने करता येऊ शकतो; अशी पद्धत अद्याप सापडलेली नाही. त्याच्या मते भाषाभ्यासकांनी 'भाषिक क्षमते'चा शोध घेतला पाहिजे. या

क्षमतेमध्ये सर्व व्याकरणिक व्यवस्था जन्मतः अस्तित्वात असतात. ज्या व्यवस्थेचा अभ्यास करणे हे भाषाभ्यासकाचे कार्य आहे, अशी त्याची भूमिका आहे. भाषेचा व्याकरणिक अभ्यास करणे म्हणजेच भाषेतील मूलभूत नियमांचा शोध घेणे असते. भाषेचे हे अंगभूत नियम वाक्यांच्या अनुषंगाने व्यक्त होत असल्याने 'वाक्यविन्यास' केंद्रिभूत मानून वाक्यांच्या अर्थाच्या अंगाने शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

चॉम्स्कीच्या सिद्धांताला 'Standard Theory Grammar' या नावाने ओळखले जाते. हा सिद्धांत रचनांतरणावर आधारित आहे. भाषेचे 'अंगभूत नियम' किंवा वाक्यांच्या आणि एकूणच भाषेच्या 'विकासाची सूत्रे' अंतःस्तरीय संरचनेमध्ये असतात. रचनांतरणाच्या नियमांमधून अंतःस्तरीय संरचनेचे (अर्थाची रचना) पृष्ठस्तरीय संरचनेच्या (ध्वनीची रचना) स्तरावर परिवर्तन होत असते.

उदाहरणार्थ, राम आला तसा निघून गेला. (संदिग्धताः कोण निघून गेला?)

पृष्ठस्तरीय रचना



अंतःस्तरीय रचना



वरील रेखाकृतीवरून रचनांतरणाचे महत्त्व आणि विश्लेषण लक्षात येईल.

अर्थातच अर्थविन्यास (Semantics) हा नोम चॉम्स्कीच्या सिद्धांताचा पाया आहे.

३.२.४ संरचनावादी भाषाभ्यासाच्या परंपरेची ओळख

अ. सोस्यूर

फेर्दिनान्द द सोस्यूर या भाषावैज्ञानिकाचा जन्म २६ नोव्हेंबर १८५७ मध्ये जिनेव्हा (स्वित्झर्लंड) येथे झाला. २२ फेब्रुवारी, १९१३ रोजी वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी त्याचे निधन झाले. स्विस भाषाशास्त्रज्ञ म्हणून तो जगभर ओळखला जातो. भाषेचा संरचनावाद, चिन्हविज्ञान या शाखेत (School) त्याने विशेष अभ्यास केला. खरे तर २० व्या शतकातील चिन्हविज्ञान व संरचनावादाचा पाया त्याने घातला असे म्हणावे लागेल. वयाच्या सोळा ते एकोणिसाव्या वर्षाच्या दरम्यान सोस्यूरने लॅटिन, ग्रीक आणि संस्कृत या तीन भाषांचा अभ्यास केला. एकविसाव्या वर्षीच त्याने 'Dissertation on the Primitive Vowel System in Indo-European Languages' हे पुस्तक प्रकाशित केले. फेब्रुवारी १८८० मध्ये त्याने Leipzig University ची डॉक्टरेट ही पदवी प्राप्त केली. जिनेव्हा विद्यापीठात त्याने संस्कृत आणि इंडो-युरोपियन भाषांवर १९०७ ते १९११ या काळात व्याख्याने दिली. १९१६ मध्ये त्याच्या या व्याख्यानांच्या टिपणावर आधारित त्याचे विद्यार्थी Charles Bally व Albert Sechehaye यांनी 'Course in General Linguistics' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. मूळ फ्रेंच भाषेत असणाऱ्या या ग्रंथाचे पुढे १९६० मध्ये इंग्रजीत भाषांतर झाले.

ब. ब्लूमफील्ड

लेनर्ड ब्लूमफील्ड या भाषावैज्ञानिकाचा जन्म ०१ एप्रिल १८८७ मध्ये शिकागो (अमेरिका) येथे झाला. १८ एप्रिल १९४९ रोजी वयाच्या बासष्टाव्या वर्षी त्याचे निधन झाले. या अमेरिकन भाषावैज्ञानिकाने एकोणिसाव्या शतकातील ऐतिहासिक भाषाविज्ञानाची जोड संरचनावादी भाषाविज्ञानाशी जोडली. पाणिनीचा आदर्श समोर ठेवून भाषाविज्ञानाच्या सिद्धांतांची सूत्रमय मांडणी ब्लूमफील्डने केली. १९३३ मध्ये 'Language' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. भाषाविज्ञानातील अमेरिकन संरचनावाद ब्लूमफील्डपासून सुरू होतो. त्याचा 'Language' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून १९६० पर्यंत अमेरिकन भाषाविज्ञान त्याच्या प्रभावाखाली होते. हा प्रभाव म्हणजेच अमेरिकन संरचनावाद. उत्तर अमेरिकेतील ज्या रेड इंडियन भाषा होत्या, त्यांचा अभ्यास करण्याची प्रामुख्याने या पद्धतीने निर्मिती झाली.

क. नोआम चॉम्स्की

नोआम चॉम्स्की हा अमेरिकन भाषावैज्ञानिक, संज्ञानात्मक (Cognitive) शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, राजकीय भाष्यकार होते. 'Father of Modern Linguistics' म्हणून नेहमीच त्यांचा उल्लेख केला जातो. भाषाविज्ञान, भाषेची संरचना, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र हे त्यांच्या आवडीचे विषय होते. पेनसिल्व्हेनिया विद्यापीठात १९४९ ला बी.ए., १९५१ ला एम.ए. आणि १९५५ ला पीएच.डी. पूर्ण केली.

Massachusetts Institute of Technology (MIT) येथे त्यांनी आपली कारकीर्द घडविली. विविध क्षेत्रांतील व विषयांवरील जवळजवळ शंभराहून अधिक पुस्तके त्यांनी लिहिली. World's Top Public Intellectual म्हणून जनमत चाचणीच्या आधारे त्यांची २००५ मध्ये निवड झाली होती. भाषा व व्याकरणाची संरचना याविषयीचे त्यांचे संशोधन मोलाचे आहे. भाषिक वर्तनवादाविषयीही त्यांचे लेखन व संशोधन मोलाचे आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात संज्ञानात्मक विज्ञान, संगणकशास्त्र, तर्कशास्त्र, गणित, संगीत, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, Programming language Theory यावर पडलेला आहे. अलीकडील काळात नवउदारमतवाद, प्रसिद्धी माध्यमे आणि परराष्ट्र धोरणाचा उत्तम टीकाकार म्हणून चॉम्स्कीला अमेरिका ओळखते. Syntactic Structures (१९५७) आणि Logical Structure of Linguistic Theory (१९७५) या त्यांच्या दोन पुस्तकांनी अमेरिकन संरचनावादाला नवी कलाटणी मिळाली. भाषेची संरचना, परिवर्तनीय व्याकरण आणि वाक्यरचना याबाबत नवे संशोधन होऊ लागले.

ड. रोमान याकोबसन

याकोबसन प्राग प्रणालीचा एक आद्य प्रवर्तक म्हणून परिचित आहे. ११ ऑक्टोबर १८९६ रोजी त्याचा जन्म रशिया साम्राज्यातील मॉस्को येथे झाला. १८ जुलै १९८२ मध्ये त्याचे निधन झाले. रशियन आणि अमेरिकन भाषावैज्ञानिक म्हणून तो प्रसिद्ध होता. 'As a pioneer of the structural analysis of language, which became the dominant trend in linguistics during the first half of the 20th century' अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. ध्वनी, पदिम आणि वाक्य यांच्या संरचनेबद्दल त्यांचा विशेष अभ्यास होता. अर्थात अर्थविचाराला पुढे नेण्याचे कार्यही त्यांनी केले. रशियन भाषेतील लिंगव्यवस्था आणि क्रियापद याविषयीचे त्यांचे विश्लेषण महत्त्वाचे आहे. मॉस्को आणि पेरूग्वे भाषावैज्ञानिक वर्तुळाचा तो क्रियाशील सदस्य होता. रोमान याकोबसनकृत भाषेची कार्ये याबद्दलचा त्याचा सिद्धांत नोंद घेण्याजोगा आहे. मॉस्को विद्यापीठाचा तो नामांकित विद्यार्थी होता. १९१८ मध्ये त्याने तेथे Ph.D. पूर्ण केली.

१९६० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'Style in Language' या थॉमस सिबिक (Thomas Sebeok) यांच्या ग्रंथात 'Closing Statement: Linguistics and Poetics' या शीर्षकाखाली रोमान याकोबसनचा लेख आहे. या लेखात त्याने भाषेच्या कार्यविचाराचा आपला सिद्धांत मांडला आहे. याशिवाय 'Child Language' (१९४१) आणि 'On Linguistic Aspects of Translation' (१९५९) ही त्याची पुस्तके महत्त्वाची आहेत. (संदर्भ : वर्णनात्मक भाषाविज्ञान : डॉ. अनिल गवळी, YCMOU संदर्भग्रंथ)

इ. विल्यम लबव

विल्यम लबव हे भाषाशास्त्राच्या (Linguistics) क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रगत नाव आहे. समाजभाषाशास्त्राचे (Sociolinguistics) जनक मानले जातात. त्यांनी भाषेचा अभ्यास केवळ एक बंदिस्त व्यवस्था म्हणून न करता ती समाजात कशी वापरली जाते या दृष्टीने केला.

त्यांचा जन्म ४ डिसेंबर १९२७ रोजी अमेरिकेत झाला. त्यांनी सुरुवातीला रसायनशास्त्रात पदवी घेतली आणि काही वर्षे औद्योगिक रसायनशास्त्रामध्ये काम केले. त्यानंतर ते भाषाशास्त्राकडे वळले. कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी आपली पीएचडी पूर्ण केली. लबव यांनी 'भाषेतील बदल किंवा तिच्यात आढळणारी विविधता यादृच्छिक नसून तिला सामाजिक आधार असतो' हे स्पष्ट केले. 'The Social Stratification of English in New York City' (1966) या संशोधनात त्यांनी न्यूयॉर्कमधील विविध सामाजिक स्तरांतील (उच्च, मध्यम आणि कनिष्ठ वर्ग) लोकांच्या उच्चाराचा अभ्यास केला. 'r' या अक्षराचा उच्चार लोक कसा करतात, याचा संबंध त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्तराशी कसा जोडलेला आहे हे त्यांनी दाखवून दिले. 'AAVE - African American Vernacular English' या संशोधनात त्यांनी आफ्रिकन अमेरिकन लोकांची इंग्रजी ही केवळ 'चुकीची' किंवा 'अशुद्ध' इंग्रजी नसून ती स्वतःचे निश्चित व्याकरण आणि नियम असलेली एक स्वतंत्र आणि समृद्ध बोलीभाषा असल्याचे सिद्ध केले.

भाषा सतत बदलत असते. हा बदल कसा होतो, कोणत्या सामाजिक गटांकडून त्याची सुरुवात होते आणि तो बदल समाजात कसा पसरतो याचे विश्लेषण त्यांनी केले. त्यांनी भाषाशास्त्राच्या अभ्यासात प्रायोगिक आणि सांख्यिकीय पद्धतीचा वापर सुरू केला.

३.२.५ स्वनिमविचार

आपल्या मुखाद्वारे आपण हवे तितके आणि हवे तसे ध्वनी निर्माण करू शकतो. विविध आणि असंख्य अशा ध्वनींची निर्मिती करण्याची आपल्या वागिंद्रियांची क्षमता अथांग आहे. तथापि वागिंद्रियाद्वारे माणूस जेवढे ध्वनी निर्माण करतो किंवा करू शकतो तेवढे सगळेच्या सगळे ध्वनी भाषेत वापरले जात नाहीत. कोणत्याही भाषेत काही निवडक ध्वनींचाच वापर केलेला असतो. सर्व भाषांमध्ये समान ध्वनींचा, त्याच निवडक ध्वनिसमुदायाचा वापर केला जातो, असे दिसत नाही. प्रत्येक भाषेने आपल्या वापरासाठी निवडलेले ध्वनी वेगवेगळे असतात. एका भाषेतील एक विशिष्ट ध्वनी दुसऱ्या भाषेत असेलच असे नाही. याउलट एखादा ध्वनी अनेक भाषांत आढळणे शक्य आहे. म्हणजेच प्रत्येक भाषेत वापरले जाणारे ध्वनी 'स्वतंत्र' असतात. अशा केवळ ३० ते ४० निवडक ध्वनींच्या सहाय्याने भाषिक व्यवहार साधले जातात. कोणत्याही दोन भाषांमधील ध्वनी व ध्वनि संख्या सर्वस्वी समान नसते.

उदा. ऋ, लृ, ष हे ध्वनी संस्कृत भाषेने निवडले, पण आजच्या मराठीत ते ध्वनी उच्चारामध्ये नाहीत. तसेच एकच भाषा कालपरत्वे गरजेनुसार किंवा दुसऱ्या भाषेच्या संपर्काने नवीन ध्वनींचा स्वीकार करते. उदाहरणार्थ, इंग्रजीच्या सहवासाने ॲ, ऑ, हे दोन ध्वनी मराठीने स्वीकारले आहेत.

भाषिक व्यवहारामध्ये ज्या ध्वनींचा उपयोग केला जातो, त्यांना स्वन असे म्हणतात. या ध्वनींची उच्चारस्थाने कोणती, त्यासाठी कोणत्या उच्चारण अवयवांचा आधार घेतला जातो व अशा उच्चारण अवयवांकडून कशा प्रकारचा प्रयत्न केला जातो, या सगळ्या गोष्टींचा विचार स्वनविज्ञानामध्ये केला जातो.

(१) स्वन

ज्या ध्वनींचा उपयोग भाषा करते त्यांना 'स्वन' असे म्हणतात. भाषेमध्ये ध्वनीकडून काही कार्य अपेक्षित असते. त्यामुळे भाषेकरिता उपयुक्त असे कार्य करू शकणारा कोणताही ध्वनी म्हणजे 'स्वन' म्हणता येईल. ज्या ध्वनीकडे भाषास्वन होण्याची क्षमता नसेल ते ध्वनी अर्थातच स्वन ठरणार नाहीत. स्वनाचा विचार करताना ध्वनीच्या अंगी भाषाध्वनी बनण्याची क्षमता आहे की नाही एवढेच पहावे लागेल.

उदा. क, प, अ, ई हे स्वन आहेत; कारण त्यांच्या अंगी भाषेकडून अपेक्षित असलेले कार्य करण्याची क्षमता आहे. याउलट ओरडणे, हसणे, किंचाळणे, केकाटणे, छे-छे, उं-उं यासारखा ध्वनी, तोंडाने केलेला निरर्थक आवाज इ. ध्वनींमध्ये भाषाध्वनी म्हणून कार्य करण्याची क्षमता नाही.

'स्वन हा भाषेत वापरता येणारा, भाषेच्या सानुक्रम रचनेत बसू शकणारा ध्वनी आहे.' वागिंद्रियाद्वारे उच्चारल्या जाणाऱ्या सर्व ध्वनींचा विचार आपण करतो, पण स्वनाचा विचार करताना अशा काही ध्वनींचा, फक्त भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींचाच विचार केला जातो. कोणत्याही भाषेत वापरला जाऊ शकणारा ध्वनी 'स्वन' ठरतो. स्वनाचा विचार अशारीतीने भाषानिरपेक्ष असतो. संदेशवहनासाठी भाषा, भाषणाद्वारे 'स्वन' निवडत असते.

स्वनाचे विशेष

व्यक्तिविशिष्टता : हा स्वनाचा एक महत्त्वाचा विशेष होय. त्या व्यक्तीचे वास्तव्य, प्रदेश, तिचे वय, स्त्री-पुरुष भेद इत्यादी बाबींची जाणीव या स्वनावरून होऊ शकते.

विभेदकता : हा स्वनाचा आणखी एक विशेष सांगता येईल. विभेदकता म्हणजे एका स्वनाचे दुसऱ्या स्वनापेक्षा उच्चारदृष्ट्या असलेले वेगळेपण. प्रत्येक स्वनाचा उच्चार वेगळा असतो. 'त्', 'म्' या दोन ध्वनींचे उच्चारण एकमेकांपेक्षा वेगळे आहे.

लवचिकता : एका पाठोपाठ उच्चारलेल्या स्वनमालिकेत आपण मध्येच थांबत असतो, त्यांपैकी कोणत्या तरी उच्चारणावर आघात देत असतो, कुठे तरी अस्पष्ट उच्चारण करीत असतो. यालाच लवचिकता असे म्हणतात. उदाहरणार्थ, 'करून ये' आणि 'करून घे' यामधील उच्चार भेद स्वनांच्या लवचिकतेमुळे स्पष्ट करता येतो.

(२) स्वनिम

एखादा स्वन जेव्हा प्रत्यक्ष एखाद्या भाषेत वापरला जातो, तेव्हा तो स्वन न राहता 'स्वनिम' बनतो. याचे कारण एखादा स्वन भाषेत उपयोजिला जात असताना मूळ स्वनाच्या उच्चारात अनेक बदल होतात. म्हणून भाषेत म्हणजेच भाषाव्यवहारात वापरला जातो, तेव्हा तो स्वनिम बनतो. म्हणजेच 'एखाद्या विशिष्ट भाषेत वापरल्या जाणाऱ्या स्वनास स्वनिम म्हणतात.'

भाषेत प्रत्यक्ष स्वनिम वापरले जात नाहीत तर प्रत्यक्षात त्या स्वनिमाची स्वनांतरे वापरली जातात. स्वनिम ही कल्पना आहे, स्वनिम काल्पनिक असतो, आणि स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके

असतात. भाषेत स्वनिम वापरला जात नाही तर स्वनांतरेच वापरली जातात. उच्चारणदृष्ट्या साधर्म्य असणाऱ्या स्वनांतराचा गट म्हणजेच स्वनिम होय. एखादा भाषानिरपेक्ष स्वन एखाद्या विशिष्ट भाषेत वापरला जातो, तेव्हा तो भाषासापेक्ष बनलेला असतो. म्हणजेच तो विशिष्ट भाषेपुरता मर्यादित बनतो, अशा भाषासापेक्ष स्वनालाच 'स्वनिम' असे म्हणतात.

स्वनिमांचे विशेष

१. स्वनिमाच्या अंगी अर्थनिर्णायक क्षमता असते.

२. दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न ठरवणे हे स्वनिमाचे भाषेमधील कार्य असते.

३. अर्थनिर्णायक असे दोन स्वनिम एकाच स्वनपरिसरात येऊ शकतात.

४. कधी कधी हे दोन स्वनिम उच्चारदृष्ट्या एकमेकांच्या अगदी जवळ असतात.

५. स्वनिम हे शब्दनिर्मितीचे घटक होत. प्रत्यक्ष उच्चारणात स्वनिम नसतात तर स्वनांतरेच असतात.

६. स्वनिमाचा अभ्यास म्हणजेच शब्दाच्या अर्थपूर्ण घटकाचा अभ्यास होय.

(३) स्वनांतरे

एखादा स्वन जेव्हा भाषेत वापरला जातो तेव्हा तो स्वनिम न राहता 'स्वनांतर' बनलेला असतो. व्यक्ती, स्थळ, काळपरत्वे स्वनांच्या उच्चारात फरक पडतो.



वरील उदाहरणात 'ग' हा स्वनिम असून बाग, जागी, गुलाम, नागपूर, गती या उच्चारणात आलेला 'ग' ही त्याची स्वनांतरे आहेत. स्वनिम दोन तिरप्या रेषेत तर स्वनांतरे चौकटीत लिहिली जातात.

/ग/ स्वनिम

[ग], [गी], [गु], [ग] स्वनांतरे

(३) स्वनिम निश्चितीची तत्वे

१. व्यवच्छेदक विनियोग : भाषेतील स्वनाचा उपयोग अर्थनिर्णायक असेल तर तो स्वनिम ठरतो आणि अर्थनिर्णायक नसेल तर तो स्वन स्वनांतर ठरतो. त्या स्वनाजवळ अर्थनिर्णायकता आहे किंवा नाही त्याचा उपयोग म्हणजेच त्याचा विनियोग कसा होतो यावर अवलंबून असतो. स्वनांचा उपयोग एकाच स्वनिम परिसरात होत असेल तर तो अर्थनिर्णायक ठरू शकतो. एकाच स्वनिम परिसरात म्हणजे 'कान' व 'रान' या दोन शब्दांत 'क' आणि 'र' हे प्रारंभी आलेले आहेत, 'आन' हा समान आहे. मात्र दोघांचे अर्थ एक नाहीत, म्हणजेच 'क' व 'र' एकाच स्वनिक परिसरात आहेत, यालाच व्यवच्छेदक विनियोग असे म्हटले जाते.

२. पूरक विनियोग : स्वनांचा विनियोग एकाच परिसरात होत नसेल तर तो परस्परपूरक असण्याची शक्यता असते. उदा. गणेश, गंगा, डाग, गर्क, गंमत या शब्दांतील 'ग' हे एकमेकांच्या जागी येऊ शकत नाहीत.

३. ध्वनिसाम्यतेचे तत्त्व : एकाच स्वनिमाच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या स्वनांतरातील साम्यतेचा विचार करणारे तत्त्व. भाषेतील ध्वनी हा लवचिक असतो. विविध परिस्थितीमुळे आणि आजूबाजूच्या ध्वनींमुळे ध्वनींच्या उच्चारणात किंचित बदल होऊ शकतो. ध्वनींच्या उच्चारणात असे फरक होत असले तरी प्रत्येक ध्वनींच्या उच्चारणाचे एक निश्चित क्षेत्र असते.

४. काटकसरीचे तत्त्व : आपल्या वागिंद्रियाजवळ असंख्य ध्वनी निर्माण करण्याची क्षमता आहे. पण कोणत्याही भाषेत ३० ते ४० पेक्षा अधिक स्वनिम आढळत नाहीत. कमीत कमी ध्वनीच्या सहाय्याने भाषा आपले भाषिक व्यवहार साध्य करीत असते. मर्यादित स्वनिमांच्या आधारे त्यांची विविध प्रकारची जुळणी करून भाषा अनेक शब्द तयार करीत असते. उदाहरणार्थ, न, क, व, अ, आ अशा मोजक्या स्वनिमांच्या आधारे भाषा नाक, कान, नाव, वन, वाक, वानवा, काना, नवा असे अनेक शब्द तयार करू शकते. कमीत कमी स्वनिमांच्या सहाय्याने असंख्य शब्द तयार करण्याच्या तत्त्वाला काटकसरीचे तत्त्व म्हणतात.

(४) स्वनिमांचे प्रकार

अ) अवधी : स्वरांचा उच्चार किंचित काळ लांबवून त्यांना दीर्घत्व हा गुणधर्म आपण देऊ शकतो. स्वरांचे उच्चारण लांबवता येते, मात्र या नैसर्गिक गुणधर्माचा वापर दोन शब्दांचे अर्थ वेगळे ठेवण्यासाठी भाषा करतेच असे नाही. इंग्रजी, हिंदी, संस्कृत या भाषांमध्ये अवधी हा गुणधर्म स्वनिमिक आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

उदाहरणार्थ. 'सुना' (ऐकले)

'सूना' (रिकामा)

'स+उ' व 'स+ऊ' या उच्चारणात अवधीमध्ये स्पष्ट फरक आहे. 'उ' पेक्षा 'ऊ' चा अवधी लांबलेला आहे.

ब) नासिक्यरंजन : नासिक्यरंजन हा स्वरावर अधिष्ठित होणारा, स्वरसहोच्चारी असा गुणधर्म आहे. एखाद्या स्वराचे उच्चारण होत असताना मृदू तालू किंचित खाली येते व काही स्वरांचे उच्चार नाकात होतात. उदाहरणार्थ, ऐशी-ऐंशी, हौस-होंस

क) सुरावली : सुरावली म्हणजे आरोह-अवरोह अथवा चढउतार. हा गुणधर्म मराठीत पूर्ण वाक्याला अथवा उद्गाराला व्यापून असतो. एखादे विधान चढत्या सुरात उच्चारले असता ते प्रश्नार्थी होते. सामान्य विधान आश्चर्य, प्रश्न इ. आशयाचे उच्चारण सुरावलीद्वारे होऊ शकते.

ड) बलाघात : शब्दातील एखाद्या अवयवावर जोर देण्याच्या गुणधर्माला बलाघात म्हणतात. पंजाबी, इंग्रजी या भाषांमध्ये बलाघात हा स्वनिम ठरतो. एखाद्या शब्दातील विशिष्ट स्वर बलाघाताने उच्चारल्याने, निराघात उच्चारणापेक्षा त्याचा अर्थ वेगळा ठरतो. उदाहरणार्थ, 'तडका' या पंजाबी शब्दात पहिल्या स्वरावर आघात दिल्यास त्याचा अर्थ 'ऊन' व दुसऱ्या स्वरावर आघात दिल्यास त्याचा अर्थ 'फोडणी' असा होतो.

३.३ समारोप

आधुनिक भाषाविज्ञानातील काही प्रमुख संकल्पनांची आपण येथे चर्चा केलेली आहे. सोस्यूरने घातलेला संकल्पनात्मक पाया, ब्लूमफील्डवादी अभ्यासकांनी शोधलेला विश्लेषणात्मक तपशील आणि चॉम्स्कीवाद्यांनी उभारलेला सिद्धांताचा व्यूह, हे आधुनिक भाषाविज्ञानाचे सर्वांत महत्त्वाचे टप्पे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

तसेच कोणतीही भाषा ध्वनियुक्त असते. भाषेत उपयोजिलेल्या ध्वनीला स्वनिम स्थान प्राप्त होते. स्वनविचार भाषानिरपेक्ष असतो पण स्वनिम विचार मात्र कोणत्या तरी भाषेच्या संदर्भातच करता येतो, म्हणजेच तो भाषासापेक्ष असतो. त्या विशिष्ट भाषेतील अर्थव्यक्तीशी स्वनिम संकल्पना संबंधित असते. स्वनिम हा भाषेच्या संदर्भातील घटक असला तरी भाषेच्या रचनेच्या दृष्टीने तो फारसा महत्त्वाचा नसतो. भाषा या स्वनिमाच्या सहाय्याने सिद्ध झालेला नाद होय. भाषाविज्ञानाच्या कक्षेत स्वनिमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

३.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

संस्कृत : प्राचीन भारतात बोलली जाणारी एक महत्त्वाची भाषा, वेद, उपनिषदे, रामायण, महाभारतातील ग्रंथांची भाषा.

स्वन : मानवी मुखावाटे उच्चारलेले व भाषेत वापरले जाणारे ध्वनी.

संरचना : निश्चित नियमांनी युक्त अशी रचना.

भाषाव्यवस्था : नियमबद्ध भाषिक रचना.

स्वनिम : स्वनपातळीवरील लघुत्तम घटक होय.

पदबंध : वाक्यातील शब्दांची व्याकरणाच्या नियमांनुसार असलेली अंतर्गत रचना, शब्दांचे वेगवेगळे बंध.

एककालिक : येथे एकाच काळाचा विचार होतो.

कालक्रमिक : येथे क्रमाने एकापेक्षा अधिक काळांचा विचार होतो.

३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

अ. योग्य पर्याय निवडा.

१. कोणत्या भाषेला 'ओल्ड टेस्टामेंट'ची भाषा म्हणून ओळखले जाते?

अ) हिब्रू ब) इंग्रजी

क) लॅटिन ड) मराठी

२. कोणत्या अभ्यासकाने 'संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधील साम्यस्थळे यादृच्छिक नसून त्यांची एकच जनकभाषा असावी' असा तर्क मांडला?

अ) सोस्यूर ब) विल्यम जोन्स

क) याकोबसन ड) ब्लूमफील्ड

३. कोणत्या भाषाभ्यास पद्धतीत 'भाषिक परिवर्तन' ही संकल्पना केंद्रवर्ती आहे?

अ) वर्णनात्मक ब) ऐतिहासिक

क) प्रयोगात्मक ड) यापैकी नाही

४. भाषेच्या एककालिक विश्लेषणाला अग्रक्रम देण्याचे श्रेय कोणत्या अभ्यासकाकडे जाते?

अ) ब्लूमफील्ड ब) याकोबसन

क) सोस्यूर ड) चॉम्स्की

५. 'भाषा ही एक चिन्हव्यवस्था आहे' असे मत कोणत्या अभ्यासकाने मांडले आहे?

अ) चॉम्स्की ब) ब्लूमफील्ड

क) याकोबसन ड) सोस्यूर

६. भाषाविज्ञानाच्या दृष्टीने 'Language' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) ब्लूमफील्ड ब) सोस्यूर

क) चॉम्स्की ड) मॅक्समुलर

७. चॉम्स्कीने मांडलेल्या भाषेविषयक सिद्धांताचा पाया काय आहे?

अ) अर्थविन्यास ब) अर्थक्षेत्र

क) चिन्हव्यवस्था ड) स्वन

८. ज्या ध्वनींचा उपयोग भाषा करते त्यांना काय म्हणतात?

अ) पदीम ब) पदांतर

क) स्वन ड) वाक्य

स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. हिब्रू २. विल्यम जोन्स

३. ऐतिहासिक ४. सोस्यूर

५. सोस्यूर ६. ब्लूमफील्ड

७. अर्थविन्यास ८. स्वन

३.६ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. पारंपरिक भाषाअभ्यासाचे स्वरूप विशद करा.

२. सोस्यूरचा भाषाविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

३. 'स्वन' व 'स्वनिम' संकल्पना स्पष्ट करा.

आ) लघुत्तरी प्रश्न

१. आधुनिक भाषाविज्ञान संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

२. ब्लूमफील्ड यांचा भाषेविषयक दृष्टिकोन थोडक्यात लिहा.

३. नोआम चॉम्स्की यांचे भाषेविषयक कार्य स्पष्ट करा.

४. स्वनिमांचे प्रकार थोडक्यात स्पष्ट करा.

३.७ क्षेत्रीय कार्य

१. तुम्ही ज्या परिसरात राहता येथील लोकांच्या बोलण्यातील विविध शब्दांच्या उच्चारांतील भेद नोंदवा.

२. कर्ता + कर्म + क्रियापद अशा पदबंधाची वाक्ये शोधा व लिहा.

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. कदम, महेंद्र (२००३) मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

२. संपा. इमानदार, मालशे, सोमण (२००५) भाषाविज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासिक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

३. संपा. कानडे, मु. श्री. (२०००) मराठीचा भाषिक अभ्यास ऐतिहासिक आणि वर्णनात्मक, स्नेहवर्धन व पब्लिशिंग हाऊस, पुणे

❑❑❑

घटक ४

भाषाविज्ञान आणि इतर अभ्यासक्षेत्रे

४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, प्रस्तुत घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला,

- भाषाविज्ञान व इतर अभ्यासक्षेत्रांचा सहसंबंध समजून घेता येईल.
- कोशविज्ञानाचे स्वरूप समजेल.
- मानववंशविज्ञानाच्या साह्याने भाषेचा शास्त्रशुद्ध अभ्यास करता येतो हे लक्षात येईल.
- भाषाविज्ञान आणि समाजविज्ञान यांचा परस्पर संबंध समजून घेता येईल.
- भाषाविज्ञान व मनोविज्ञान यांच्या साह्याने भाषेचे आत्मसातीकरण कसे होते हे समजेल.

४.१ प्रास्ताविक

भाषेचा अभ्यास फार प्राचीन काळापासून केला जात आहे. भारतात पाणिनीय व्याकरण परंपरा प्रचलित असल्याचे आपल्याला ज्ञात आहेच. पारंपरिक पद्धतीमध्ये ऐतिहासिक, तुलनात्मक आणि व्याकरणिक भाषाभ्यास समाविष्ट होतो तर आधुनिक पद्धतीमध्ये वर्णनात्मक, संरचनावादी व रचनांतरणवादी या प्रमुख भाषाभ्यास पद्धतींचा समावेश होतो. भाषा अभ्यासाच्या या पारंपरिक आणि आधुनिक पद्धतींचा सविस्तर परिचय आपण मागील प्रकरणात करून घेतला आहेच. मनुष्य भाषेविषयी सतत चिंतन करत आला आहे याची उदाहरणे आपल्याला पुढील प्रमाणे देता येतील. भाषा म्हणजे दैवी देणगी असा भाषा उत्पत्तीचा सिद्धांत. तसेच प्राणिमात्रांना नाव देणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्यावर ताबा मिळवणे असा भाषेविषयीचा गूढवादी दृष्टिकोन. मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक व्यवहाराचे एक महत्त्वाचे गमक म्हणजे भाषा होय; हे यावरून सहज लक्षात येते. भाषा ही मानवी संदेशाचे मुख्य माध्यम तर आहेच, परंतु त्याबरोबरच रूढी, श्रद्धा, विधी, धार्मिक कल्पना, भावनात्मक दृष्टिकोन, वैचारिक परंपरा या सर्व व्यवहारांचे धागे भाषेत गुंतलेले असतात. त्यामुळे भाषेचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

भाषेच्या अंतर्गत रचनेचे विश्लेषण करणारे संरचनावादी भाषाविज्ञान विसाव्या शतकात बरेच प्रगत झाले व त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे या शतकात सर्व मानवी शाखांना एकत्र आणणारे चिन्हविज्ञान किंवा चिन्हमीमांसा हे अभ्यास क्षेत्रही विकसित होत आहे. चिन्हे व प्रतीके यांना ज्ञानप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे. या अभ्यास पद्धतीमध्ये प्रामुख्याने विज्ञानाकडून मूलगामी स्वरूपाच्या संकल्पना घेऊन मानवी जीवनातील विविध व्यवहारांची घडण, त्यातील अर्थनिर्मितीची प्रक्रिया यांचे स्पष्टीकरण देण्याचे प्रयत्न केले आहेत. मानवी जीवनातील प्रत्येक व्यवहार ही एक 'भाषा'च असते. कारण मानवाचा प्रत्येक व्यवहार हा नियमित अशा व्यवस्थेवर आधारलेला असतो हे प्रमेय आधुनिक चिन्ह विचाराचे अधिष्ठान आहे. घराचे चित्र

ही घराची प्रतिकृती असते. धूर आणि आग यांच्यातील संबंध दर्शक स्वरूपाचा असतो. 'पक्षी' यासारख्या शब्दाचा भाषेतील वापर यादृच्छिक असल्याने भाषेत त्याचा वापर प्रतीकासारखा होतो. सोस्यूर या भाषाशास्त्रज्ञानेही भाषेतील चिन्हव्यवस्थेचा अभ्यास केला आहे. सोस्यूरने यासाठी बुद्धिबळाचे उदाहरण दिले आहे. प्यादी, घोडा, उंट यांना बुद्धिबळाच्या पटाबाहेर काही अर्थ नसतो पण त्या खेळात त्यासाठी एक नियम वा संकेतव्यवस्था असते ज्याला या नियमाचे ज्ञान होते, त्याला त्या त्या चिन्हांचा अर्थ कळतो, अर्थात घोडा हे चिन्ह अडीच घरे चालते, हे समजते. रोमान याकबसन (१८९६-१९८२) याने भाषिक चिन्हे सहा मूलभूत कार्ये करीत असतात असे मत मांडले. आत्माविष्काराने साधलेले सौंदर्यात्मक कार्य, त्याचा ग्रहणकर्त्यावर परिणाम, चिन्हाने होणारा निर्देश वा संदर्भ, प्रेषक व ग्राहक यातील संपर्काचा परिणाम, मुख्य संदेश आणि भाषिक व्यवस्था अशी ती महत्त्वाची सहा कार्ये चिन्हे साधत असतात. चिन्हांच्या या कार्याला याकबसन भाषेची कार्यलक्ष्यीमीमांसा मानतो. भाषेतील संदेशनात्मक कार्यांचे विश्लेषण करणारी ही मीमांसा आधुनिक भाषाविज्ञानात उदयास आली आहे. बोलणारा व ऐकणारा या दोहोंचे हेतू, त्यांचे एकमेकांशी असणारे संबंध, गृहीत असणाऱ्या बाबी अथवा तर्क, भोवतालची स्थिती अशा भाषाबाह्य बाबी येथे उपयुक्त ठरू शकतात. वक्त्याच्या वाचिक कृती अनेक संदर्भ व्यक्त करू शकतात. भाषेच्या कार्यलक्ष्यी मीमांसेचा पुढील टप्पा म्हणजे संदर्भलक्ष्यी मीमांसा होय. एखादे दीर्घ विधान, मोठे परिच्छेद, दीर्घ संभाषण यातील शब्दाधिष्ठित विविध संगतीचे विश्लेषण संदर्भलक्ष्यी मीमांसेत करता येते. अशा तऱ्हेने आधुनिक भाषाविज्ञानात भाषेच्या अभ्यासाची विविध क्षेत्रे वाढत आहेत. त्यामुळे अशा काही क्षेत्राचा परिचय आपण या घटकात करून घेऊ.

४.२ विषय विवेचन

भाषा हा मानवी जीवनातील एक अपरिहार्य घटक आहे. भाषेने मनुष्याचे जीवन व्यापून टाकले आहे. त्यामुळे तिच्या अभ्यासाचे क्षेत्र सर्वस्पर्शी झाले आहे. अलीकडे तर मानवी जीवन खूपच गतिमान झालेले आहे. भौतिक सोयी-सुविधा, दळणवळणाच्या साधनांची वाढ, प्रसिद्धी माध्यमांची लोकप्रियता, भ्रमणध्वनी, इंटरनेट व सध्या लोकप्रिय असलेले एआय तंत्रज्ञान या साऱ्या क्षेत्रातून भाषेचा वापर होत आहे. माणसाच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे भाषिक व्यवहार देखील बदलताना दिसतात. अशा भाषांचा विविधांगी अभ्यास जगभर सुरू आहे. आजच्याप्रमाणे जुन्या काळातील भाषिक विचार वैज्ञानिक व सुनियोजित नव्हता. फेर्दिनाद सोस्यूर व नोम चॉम्स्की यांच्या अगोदर ॲरिस्टॉटल, पाणिनी यांचा कालखंड पाहिला तर तो पारंपरिक व्याकरण व शब्दरूपे यांच्या पातळीवरील होता असे लक्षात येते. प्रत्येक काळात एक नवे वैचारिक वर्तुळ तयार होत असते. त्या वर्तुळाप्रमाणे भाषेच्या अभ्यासाची नव्याने मांडणी होत असते.

४.२.१ भाषाविज्ञान आणि कोशविज्ञान

भाषाविज्ञान आणि व्याकरण ही दोन्ही शास्त्रे भाषेच्या स्वरूपाचे विवेचन करतात. त्यामुळे भाषा अभ्यासात व्याकरणशास्त्राचे स्वतंत्र महत्त्व आहे. भाषाविज्ञानात भाषेच्या मूलभूत सैद्धांतिक चर्चेला प्राधान्य असते व त्याचा उद्देश भाषिक क्षमता वाढवणे हा असतो, तर व्याकरणामध्ये भाषेच्या शब्दघटनेचे, भाषिक

प्रयोगाचे व त्यातील बदलाचे ज्ञान समाविष्ट केलेले असते. भाषेचा पारंपारिक अभ्यास ढोबळमानाने तीन स्तरावर केला जात असे.

१) भाषेच्या व्याकरणाचे सामान्य नियम सांगणे.

२) भाषेतील शब्दांचे अर्थ सांगणारे शब्दकोश (अकारविल्ह्यानुसार) तयार करणे. उदाहरणार्थ अमरकोश, परिभाषाकोश, ज्ञानकोश इत्यादी

३) म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह इत्यादी. वरील दोन गटांमध्ये न बसणारी शब्दयोजनविषयक माहिती देणे.

यापैकी व्याकरणाचे सामान्य नियम व शब्दांचे अर्थ हे दोन्ही स्तर शब्दकोशात एकत्र करण्याचे प्रयत्न कोशकारांनी केले. म्हणजेच शब्दांचा केवळ अर्थ सांगणे हे शब्दकोशाचे काम असे मात्र त्यापेक्षा अधिक माहितीची अपेक्षा भाषिकाने का बाळगू नये? या प्रश्नाचा विचार कोशविज्ञानामध्ये केला जातो. त्यामुळे आधुनिक भाषा अभ्यासकांच्या कल्पना पारंपरिक कल्पनांपेक्षा वेगळ्या आहेत हे आपल्या लक्षात येते. एक म्हणजे अकारविल्हे किंवा वर्णक्रमाने झालेली ही रचना मूलतः व्यावहारिक सोयीसाठी असते. तिला सैद्धांतिक आधार नसतो. कारण निजभाषकांचे शब्दज्ञान वर्णक्रमानुसार नसते. वर्णक्रम ही भाषाविज्ञानाच्या दृष्टीने एक क्षुल्लक बाब आहे.

भाषेच्या शब्दनिधीची व्यवस्था लावण्यासाठी भाषेचा शब्दकोश तयार केला जातो. मात्र शब्दकोश व शब्दनिधी या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. प्रत्येक भाषेत शब्दसंग्रह असतोच आणि त्या भाषेच्या निजभाषकाला त्याचे ज्ञान झालेले असते, परंतु शब्दकोश निर्मितीची प्रक्रिया मात्र बहुदा फक्त साक्षर समाजांत व लिपीबद्ध भाषांच्या बाबतीतच घडते. अर्थात निजभाषकाचे शब्दज्ञान व भाषेच्या शब्दकोशांची रचना यात निश्चित संबंध असत नाही. शब्दकोशाच्या पारंपरिक विचारात शब्दार्थ सांगणे हे कोशाचे प्रमुख कार्य मानले गेले आहे. परंतु अर्थाबरोबरच शब्दकोशापासून इतर काही माहिती मिळण्याची अपेक्षा आपल्याला धरता येत नाही. त्यामुळे भाषाविज्ञानाच्या दृष्टीने शब्दांमधील अर्थसंबंध, समानार्थता, विरुद्धार्थता इत्यादी फार महत्त्वाचे असतात. हे अर्थसंबंध नेमके टिपण्याच्या दृष्टीने नेहमीच्या शब्दकोशांचा फारसा उपयोग होत नसल्यामुळे शब्दनिधी हा वेगवेगळ्या अर्थसंबंधांनी बांधला गेलेला असतो हे तत्त्व मूलभूत मानून रचलेला शब्दकोश पारंपरिक शब्दकोशापेक्षा वेगळा असेल ही मुख्य कोशविज्ञानाची भूमिका आहे.

शब्दकोशाचे कार्य आदेशात्मक व नियमक असते हे पारंपरिक तत्त्वही आधुनिक अभ्यासकांनी मान्य केलेले नाही. यासंदर्भात मिलिंद मालशे यांनी केलेले विवेचन अभ्यासल्यानंतर आपल्या लक्षात येईल. १९६१ मध्ये अमेरिकेत Third New International Dictionary हा मेरियन वेब्स्टर यांचा कोश प्रसिद्ध झाला, तेव्हा बौद्धिक जगतात मोठेच वादळ उठले, कारण अप्रतिष्ठित मानल्या गेलेल्या अनेक शब्दांचा व प्रयोगांचा अंतर्भाव या कोशात झालेला होता. उदा. aint हे संक्षिप्त रूप (am/is/are/has/have + not) शब्दकोशात आल्याने इंग्रजी भाषेचे स्वरूपच 'भ्रष्ट' होईल अशी भीती काहींनी व्यक्त केली; परंतु आधुनिक भाषावैज्ञानिक तत्त्वांचा विचार केला तर भाषा 'भ्रष्ट' वगैरे होत नसते. सर्वसामान्य भाषिक व्यवहाराचे वर्णन

देणे हे भाषेच्या अभ्यासकाचे खरे कार्य होय; 'चांगली', 'उच्च दर्जा' ची, 'विशुद्ध' भाषा लोकांना शिकवणे, हे नव्हे. कोशातही भाषिक वापराचे प्रतिबिंब दिसले पाहिजे; त्यातून भाषा कशी वापरावी, याचे नियमन होणे आवश्यक नाही. उदाहरणार्थ, 'साला' हा शब्द 'अप्रमाण' वा 'अप्रतिष्ठित' मानून मराठी शब्दकोशात अंतर्भूत न करणे, ही वर्णनात्मक दृष्टीने चूकच ठरेल.

शब्दकोशांच्या संदर्भात वादग्रस्त ठरलेली आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे शब्दांच्या व्युत्पत्तीविषयक माहिती शब्दकोशात दिली जात असे. शब्दांची व्युत्पत्ती शोधणे हे ऐतिहासिक भाषा अभ्यासामध्ये महत्त्वाचे असते. परंतु आधुनिक भाषाविज्ञानाने सोस्यूरने मांडलेली एककालिक भाषाभ्यास पद्धती (घटक तीनमध्ये अभ्यासल्याप्रमाणे) स्वीकारली असल्यामुळे भाषेच्या व्युत्पत्तीविषयक माहिती अनावश्यक ठरते. तसेच निजभाषकांच्या भाषिक ज्ञानाचा विचार करता तेथेही व्युत्पत्तीला स्थान नाही असे आढळते. प्रत्यक्ष एखादा शब्द वापरत असताना त्या शब्दाचे मूळ कोठे आहे किंवा तो शब्द कोणत्या धातूपासून आला आहे ही माहिती निजभाषकाला आवश्यक नसते. तसेच शब्दकोशामधील पदिमांचा शब्दलक्षी अर्थही आधुनिक भाषाविज्ञानाला मान्य नाही.

त्यामुळे प्रचलित शब्दकोशापेक्षा भाषावैज्ञानिकाला अभिप्रेत असलेला शब्दकोश हा संरचनावादाप्रमाणे रचनालक्षी असावा असे वाटते. कोशविज्ञानामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा विचार होणे अपेक्षित आहे. १) भाषेची स्वनव्यवस्था म्हणजे उपपदे, सर्वनामे, अव्यय आणि शब्दजाती २) भाषेची पदव्यवस्था म्हणजे कर्ता, कर्म या प्रकारची व्याकरणिक कार्य करणाऱ्यांचा संच ३) वाक्य व्यवस्था म्हणजेच काळ, लिंग, वचनाच्या व्याकरणिक संकल्पनांचा विचार करून तयार केलेले वाक्य ४) व अर्थव्यवस्था म्हणजे विधानार्थक, नकारार्थी, प्रश्नार्थक वाक्यरचना या सर्वांचा नियम स्पष्ट करून या नियमांना अनुकूल असे प्रत्यक्ष शब्दाचे वर्णन; या चारही पातळ्यांवर देणे हे भाषाविज्ञानाला अभिप्रेत असणाऱ्या कोशाचे उद्दिष्ट असते. त्यामुळे कोश विचारांमध्ये भाषावैज्ञानिक तत्त्वावर आधारलेला शब्दकोश व व्यवहारोपयोगी शब्दकोश असा भेद करायला हवा.

४.२.२ भाषाविज्ञान आणि मानववंशविज्ञान

युरोप खंडात भाषाभ्यास हा पारंपरिक व्याकरण व ऐतिहासिक भाषाशास्त्र या दोन अंगाने झाला. अमेरिकेत मात्र भाषाविज्ञानाचा प्रारंभ मुख्यत: मानववंशवैज्ञानिकांच्या प्रेरणेमधून झाला. मानववंशविज्ञान व भाषाभ्यास यांच्या जोडअभ्यासातून संस्कृतीचा अभ्यास करण्याचा पहिला प्रयत्न फ्रॉटझ् बोस (१८५८ १९४२) या भाषावैज्ञानिकाने केला. भाषावैज्ञानिकाला आदिम समाजभाषेचा अभ्यास जसा करावा लागतो त्याचप्रमाणे मानववंशवैज्ञानिकालाही आदिम समाजाचा अभ्यास करावा लागतो. अशावेळी त्या समाजाची भाषा शिकणे गरजेचे असते. उत्तर अमेरिकेतील आदिम समाज तसेच बफिन लँड येथे वस्ती करून राहणारे एस्किमो लोक यांच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी त्यांची भाषा व त्या भाषेची नियमव्यवस्था मानववंशविज्ञानात महत्त्वाची ठरते. आदिम समाजांना त्यांच्याच भाषेतून साक्षर करण्याची कल्पना धर्मप्रसारक

मिशनऱ्यांनीही राबवली आहे. त्यामुळे त्या भाषेची स्वनव्यवस्था समजावून घेऊन तशी लिपी त्यांना करावी लागली व या प्रक्रियेसाठी त्या भाषांच्या स्वनिमव्यवस्थेचे ज्ञान करून घेणे आवश्यक ठरले.

मानववंश वैज्ञानिकाच्या दृष्टीने भाषेचा अभ्यास महत्त्वाचा आहे. आदिम समाजांच्या भाषा भिन्न असतात शिवाय हे समाज व त्यांच्याबरोबर त्यांच्या भाषा नष्ट होण्याचाही संभव असतो. भाषाभ्यासक गणेश देवी यांनी भारतीय भाषांच्या (आदिवासी समाजाच्या) अभ्यासातून कितीतरी भाषा मृत झाल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. मराठीची एक प्रमुख बोली चित्पावनी बोली नष्ट झाली आहे. सांस्कृतिक अभ्यास करताना प्रत्यक्ष त्या संस्कृतीशी संपर्क साधता येणे हिताचे ठरते. त्यामुळे मानववंशवैज्ञानिकाला त्या समाजाची भाषा अवगत असेल तर त्या समाजाच्या परंपरा, देव, धर्म याविषयीच्या जाणिवा, जीवनपद्धती या गोष्टीची सूक्ष्म माहिती मिळेल. कारण प्रत्येक भाषेमध्ये त्या त्या संस्कृतीचा अनुभव चिन्हांकित झालेला असतो आणि त्याचे नक्कीच साच्याच्या साह्याने म्हणजेच त्यातील संकल्पनात्मक प्रतिमांच्या साह्याने त्या संस्कृतीमधील व्यक्ती आपला अनुभव घेत असतात. त्यामुळे अभ्यासकाला ती भाषा अवगत असणे गरजेचे असते. त्या भाषेचे ज्ञान नसेल तर दुभाषाची मदत घेता येते, परंतु दुभाषी काही वेळा चुकीची माहिती किंवा स्वतःचे दृष्टिकोन देऊ शकतो. परिणामी त्यातून दिशाभूल करणारे निष्कर्ष निघू शकतात.

मानवी संस्कृतीच्या अभ्यासातून लक्षात येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवी ज्ञान, श्रद्धा, वर्तन यांची एक घडण असते. भाषेची आंतरिक घडण जशी व्याकरणात पकडता येते, तशी सांस्कृतिक वर्तनाच्या विविध पैलूंमधून जाणवणारी आंतरिक घडण नेमकेपणे पकडणे हे मानववंशविज्ञानाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असते. ''संस्कृतीच्या घडणीचा मागोवा घेण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्या संस्कृतीच्या भाषेच्या घडणीचा संदर्भ शोधणे होय. संस्कृती म्हणजे एका व्यापक अर्थाने ज्ञान होय. याकरिता भाषाघडणीचा अभ्यास आवश्यक ठरतो. कारण संकल्पना विचारही भाषेतून व्यक्त होतात. कुटुंब, नातेसंबंध, शिक्षण, धर्म, आचार या गोष्टी भाषेच्या संदर्भात तपासता येतात. इंग्रजीच्या तुलनेने मराठीत नातेवाचक शब्द विपुल आहेत. वनस्पती, रंग, प्राणी यासारख्या गोष्टींचे वर्गीकरण प्रत्येक संस्कृतीत भिन्न असते. नारळ, आंबा यासारखी झाडे एखाद्या संस्कृतीचे चिन्ह असू शकते. कुलप्रतीकेही वृक्ष, प्राणी अशी निसर्गदत्त असतात. काळा रंग काही जमातीत शुभ मानतील तर काही ठिकाणी अशुभ मानतील. मांसाहारी जमातीत काही प्राणी भक्ष्य ठरतील तर काही अभक्ष्य व वंदनीय असतील. हिंदूंना गाय वंदनीय आहे तर युरोपियन लोक गायीचे मांस खातात. अशा सर्व गोष्टी भाषिक आधाराने आणि कार्यकारणभावाने पक्क्या करता येतात.

भाषा व संकल्पना यांच्या संबंधाविषयी सपीर व वोर्फ या अभ्यासकांनी एक विचार मांडला आहे. मानवी विचार, संकल्पना, अनुभव या गोष्टी मूलतः भाषासापेक्ष असतात. आपल्या अनुभवातील वर्गीकरणे ही आपल्या भाषेने पुरवलेली वर्गीकरणेच असतात. भाषा म्हणजे अनुभव ग्रंथीत करण्याचे साधन नव्हे, कारण आधी अनुभव घेणे व माग तो भाषेत ग्रंथीत करणे हा क्रमच फसवा आहे. भाषानिरपेक्ष असा अनुभवच संभवत नाही. त्यामुळे आधी विचार व नंतर भाषा असा क्रम लावावा लागतो. पण भाषा नव्हती तेव्हाही मनुष्य विचार करीत होता, अनुभव घेत होता. सहाजिकच अनुभव आधी की भाषा हा प्रश्न विवाद्य राहतो. विचार काही वेळा भाषानिरपेक्ष असू शकतो. उदाहरणार्थ, ॲरिझोना प्रांतातील रानटी लोकांच्या 'होपी'

भाषेत वीज, लाट, ज्वाला यासारखे क्षणिक प्रक्रिया व्यक्त करणारे शब्द क्रियापदांच्या रूपात येतात. तसेच संस्कृत भाषेत एकवचन, द्विवचन व बहुवचन अशी तीन वचने आहेत. मराठीत द्विवचन नाही. संस्कृतमधील द्विवचन नृत्य-नाट्यविषयक ग्रंथातील आंगिक अभिनयाच्या चर्चेतील नेत्र, हस्त, पाद इत्यादी अवयवांच्या वर्णानुसार उपयुक्त आहे. मात्र मराठीत द्विवचनाशिवाय अशा गोष्टींचे वर्णन करता येते. त्यामुळे भाषिक सापेक्षतावादाचा विचार अपुरा वाटतो. नोम चॉम्स्कीच्या मते, भाषा ही उपजत शक्ती आहे. मात्र या उपजत शक्तीमुळे विविध भाषेत एकसंगती वा सारखेपणा यावयास हवा होता तसा येत नाही. त्यामुळे चॉम्स्कीची ही भूमिकाही परिपूर्ण नाही. संरचनेच्या दृष्टीने विविध भाषेत बरेचसे साम्य असले, तरी सर्व भाषा मानववंशविज्ञानाच्या दृष्टीने भिन्न मानाव्या लागतील.'' (संदर्भः भाषाविज्ञान आणि मराठी भाषाः डॉ. अनिल गवळी, पृष्ठ १५२-१५३)

४.२.३ भाषाविज्ञान आणि समाजविज्ञान

मानववंशविज्ञानात संस्कृतीचा विशेषत: आदिम संस्कृतीचा अभ्यास होतो, तर समाजविज्ञानात आधुनिक समाज रचनांचा विचार होतो, म्हणजेच समाज व संस्कृती यामध्ये आपल्याला भेद करता येईल. भाषा व संस्कृती यांच्या परस्परसंबंधांची चर्चा आपण मानववंशविज्ञानमध्ये केलेली आहे. याचाच अंतर्भाव भाषेच्या सामाजिक अभ्यासात काही प्रमाणात होतो. कुटुंबव्यवस्था व नातेसंबंधवाचक शब्द यांच्यातील परस्परसंबंधांच्या अभ्यासाचा या संदर्भात उल्लेख करता येईल.

भाषेच्या सांस्कृतिक अभ्यासाहून थोडीशी वेगळी परंपरा भाषेच्या सामाजिक अभ्यासाला लाभलेली आहे. एकोणिसाव्या शतकात 'बोली भूगोला'ची परंपरा विकसित झाली. यालाच सामाजिक भाषाविज्ञानाची पूर्वपरंपरा म्हणता येईल. भाषिक परिवर्तन ही संकल्पना एकोणिसाव्या शतकातील भाषा अभ्यासात केंद्रस्थानी होती. परंतु भाषा ही इतिहासाच्या व काल परिणामाच्या अंगाने जशी बदलते तशी ती भूगोलाच्या व स्थल परिणामाच्या अंगानेही बदलते. भाषेत निर्माण होणाऱ्या भेदांचा विचार स्थल परिणामांच्या अंगाने एककालिक स्वरूपात करणे हे बोली भूगोलाचे ध्येय होते.

बोलीमधील भेद हा केवळ प्रदेशानुसार किंवा भौगोलिक स्थानांवरून ठरवता येत नाही तर सामाजिक रचनेमधील फरकाच्या आधाराने हा भाषा भाषांमधील वेगळेपणाचा शोध घ्यावा लागतो. आर्थिक वर्ग, धार्मिक भेद, जातीजमाती व उपजाती, वय किंवा पिढी, लिंग हे सर्व भेद सामाजिक रचनेच्या दृष्टीने जसे महत्त्वाचे आहेत, तसेच भाषिक भेदांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहेत. भाषा फक्त बारा कोसांवरच बदलते असे नाही तर आर्थिक अथवा धार्मिक गटानुसारही ती बदलते. इतकेच नव्हे तर संदेशनाचा जो संदर्भ असेल त्याच्या स्वरूपानुसारही ती बदलते. उदाहरणार्थ अनौपचारिक संदर्भात एकमेकांना 'अरे - तुरे' करणाऱ्या व्यक्ती सभा संमेलनासारख्या औपचारिक संदर्भात 'आहो-जाहो' करू लागतात; हे आपल्या नेहमीच्या परिचयाचे आहे. भाषेचा 'मर्दानीपणा' व 'बायकीपणा' हा केवळ शारीरिक लिंगभेदापेक्षा स्त्री व पुरुष यांच्याकडून समाजाच्या अपेक्षा काय आहेत यावर अवलंबून असतो. भाषेचे 'प्रौढत्व' व 'बालिशपणा' यांचा संबंधही केवळ वयाशी नसतो तर 'वय' या गोष्टीकडे पाहण्याच्या सामाजिक दृष्टिकोनाशी असलेला

आढळतो. सामाजिक व नैतिक अधिकार या कल्पनेशी याचा संबंध जोडला जातो. मानवाच्या जाणिवा, भावना, आचारविचार, दृष्टिकोन, रूढीपरंपरा यावर भाषेचा खोलवर परिणाम झालेला असतो. भाषेनुसार मानवी अनुभव वा वास्तव बदलते. हा सपीरचा भाषिक सापेक्षवादाचा विचार होता. जे. ए. फिशमन (१९७०) व विल्यम लबव (१९७२) यांनी सामाजिक भाषाविज्ञानाची संकल्पना मांडली. सोस्यूर व चॉम्स्की यांच्या संरचनावाद व रचनांतरण वादाविषयी या दोहोंनी काही मतभेद व्यक्त केले. भाषा वापर आणि मानवी वर्तनाची सामाजिक घडण या दोहोंतील परस्पर प्रक्रियांचा अभ्यास सामाजिक भाषाविज्ञानात येतो. कोण, कुणाशी, कोणत्या वेळी, कोणत्या कारणासाठी, कोणती भाषा बोलतो. याचा विचार म्हणजे भाषिक वापराची सामाजिक प्रमाणके या अभ्यासक्षेत्रात तपासली जातात. दुसरी बाब म्हणजे एकच भाषिक समाज वेगवेगळ्या संदर्भात व परिस्थितीत वेगवेगळा भाषाभेद उपयोगात आणून भाषेला गतिशीलता देत असतो या कारणांचा विचारही येथे केला जातो. भाषेचा विचार करताना हे सारे सामाजिक संदर्भ विचारात घ्यायला हवेत. याप्रमाणेच औपचारिक व अनौपचारिक संदर्भाने समाजाच्या धार्मिक, आर्थिक, राजकीय, शासकीय, कायदेविषयक, तांत्रिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात भाषेचा वापर तेथिल सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात होतो असा विचार ब्रिटिश भाषाभ्यासक मॅलिनोव्स्की व फर्थ यांनी मांडला.

याबरोबरच 'संदेशवहनात्मक क्षमता' म्हणून भाषा वापराविषयीचे विवेचन डेल हाईम्स यांनी मांडले आहे, संदेशवहनात्मक क्षमता म्हणजे कोणता भाषाभेद, कोणाशी बोलताना, कोठे, कसा, कोणत्या वेळी, का वापरायचा याचे ज्ञान असणे. भाषिक आणि भाषेतर व्यवस्थांचे ज्ञान या ज्ञानामध्ये अंतर्भूत असतेच, शिवाय वेगवेगळ्या व्यक्तींनी परस्परांशी उचित असा संपर्क कसा साधावा. एकूण देवाणघेवाणीची रचना काय असावी. विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी संपर्क प्रक्रियेला वळण कसे द्यावे, धारणा व मूल्य कशी व्यक्त करावी, या साऱ्यांचे ज्ञान संदेशवहनात्मक क्षमतेमध्ये अभिप्रेत असते.

मिखाईल बाख्तिन यांनी मांडलेली 'संवादाची रुपे' या संकल्पनेच्या जवळ जाणारी एक संकल्पना म्हणजे 'संदेशश्रेष्ठ सामाजिक गटांची संपर्क प्रक्रिया' होय. प्रत्यक्ष संपर्क प्रक्रियेमध्ये प्रत्येक व्यक्ती अनेक सामाजिक गटांमध्ये सहभागी होत असते. भाषेच्या दृष्टीने कार्यनिष्ठ गट हे एकसंध नसतात, एकाच भाषेचे अनेक भेद तसेच काही वेळा अनेक वेगळ्या भाषा यामध्ये वापरल्या जातात. उदाहरणार्थ; मुंबईसारख्या शहरात एखाद्या विशिष्ट संपर्क प्रक्रियेमध्ये रेल्वे आरक्षण करणे किंवा भाजी विकत घेणे किंवा एखाद्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणे इत्यादी. या प्रत्येक ठिकाणी भाषेचा वेगवेगळा वापर होत असतो. तसेच समाज हा अनेक वर्गांचा, जातींचा मिळून बनलेला असतो. वेगवेगळ्या समाजामध्ये, वर्गामध्ये भाषेचा वापर भिन्न - भिन्न प्रकारे होत असतो. त्यामुळे भाषेची सामाजिकता समजून घेणे हे सामाजिक भाषाविज्ञानामध्ये महत्त्वाचे आहे.

४.२.४ भाषाविज्ञान आणि मनोविज्ञान

भाषाविज्ञानाचा संबंध ज्ञानात्मकतावादी मनोविज्ञानाशी जोडून चॉम्स्की यांनी मनोवैज्ञानिक संशोधनाला एक नवी दिशा दिली आहे. त्यामुळे येथे आपण चोमस्की यांची 'मानसिक प्रतिरूपे' ही संकल्पना समजून

घेणार आहोत. तत्पूर्वी त्यांनी काही अभ्यासकांच्या मतांवर उपस्थित केलेल्या प्रश्नांवर नजर टाकूया. मनोविज्ञान म्हणजे वर्तनविज्ञान अशी भूमिका लेनर्ड ब्लूमफील्डने घेतली. स्किनर या वर्तनवादी मनोवैज्ञानिकाने या भूमिकेचा पाठपुरावा केला. वर्तनवादी भूमिकेची मुख्य मर्यादा म्हणजे मन या संकल्पनेला वर्तन या संकल्पनेत रूपांतरीत करून केवळ बाह्य परिस्थितीच्या आधारे विशेषतः चेतक-प्रतिसाद या जोडीच्या आधारे भाषिक प्रक्रियांचे वर्णन देणे; असा अर्थ घेतला गेला आहे. याचे खंडन करताना चॉम्स्की म्हणतात, भाषा ही मानवाच्या मानसिक शक्तीचा वा कुवतीचाच एक भाग असते, त्यामुळे व्याकरणिक सिद्धांत हे मानवी मनाच्या प्रक्रियांशी पडताळून पाहता येतात. उदाहरणार्थ; भाषासंपादनाच्या प्रक्रियेत लहान मुले केवळ दुसऱ्याचे ऐकून भाषा शिकत नाहीत. अनेक वाक्ये ऐकून त्या आधारे नवीन वाक्ये ती निर्माण करतात. 'तो पुस्तक वाचतो' या आधाराने 'तो अभ्यास करतो' हे वाक्य निर्माण करता येईल. मर्यादित शब्दनिधीच्या साहाय्याने मनुष्य नवीन वाक्ये, नवीन शब्द निर्माण करतो. नियमव्यवस्थेचे हे सहजज्ञान करून घेण्याचे 'ज्ञानात्मक सामर्थ्य' माणसाजवळ असते. हे ज्ञानात्मक सामर्थ्य म्हणजे मनाची घडण होय. लेनर्ड ब्लूमफील्ड भाषेला एक भौतिक घटना मानून भाषोपार्जन ही सरावाने व सवयीने साध्य होणारी क्रिया आहे असे मानतो. मात्र नोम चॉम्स्कीला हे मत मान्य नाही. त्याच्यामते भाषा सरावाने व सवयीने बोलता आली तर मुलाच्या कानावर जेवढी वाक्ये पडतील तेवढीच ते बोलेल पण पूर्वी कधीही न ऐकलेली वाक्ये मूल बोलू शकते. याचा अर्थ मुलाच्या मनातच भाषाशक्तीचे स्वतंत्र अस्तित्व असले पाहिजे. यामुळे मूल स्वतःच्या भाषेचे नियम पक्के करून नवनवीन वाक्यांची निर्मिती करीत राहते.

भाषावैज्ञानिक व तर्कशास्त्रीय अशा दोन विचारधारा एकवटून त्यातून निर्देशित व्याकरणाच्या अभ्यासाची परंपरा कशी निर्माण झाली याविषयी चॉम्स्की यांनी केलेल्या विवेचनावर मानसिक प्रतिरूपे ही संकल्पना उभी आहे. भाषा हा ज्ञानाचाच एक प्रकार असून ती प्रतिरूपणाची वा चिन्हांकनाची प्रक्रिया मनामध्ये घडत असताना विशिष्ट संकल्पना व तत्वे वापरली जातात; या संकल्पना व तत्वे यांची मिळून बनलेली व्यवस्था म्हणजे 'निर्देशनात्मक व्याकरण' होय. याचाच अर्थ भाषा ही मानसिक प्रतिरूपांच्या स्वरूपात असते.

वरील संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण आपल्याला पुढीलप्रमाणे करता येईल. प्रत्येक मानवाच्या बाबतीत निजभाषा अवगत होण्याची प्रक्रिया आयुष्याच्या सुमारे ४८ महिन्यात म्हणजे चार वर्षात जवळजवळ पूर्ण होते. तेव्हा औपचारिक शिक्षण सुरू होण्याआधीच निजभाषेची पायाभूत संरचना मानवी मूल नकळत आत्मसात करते. मानवी मनाचेही सामर्थ्य अत्यंत आश्चर्यकारक आहे कारण भाषिक संरचनेचे व नियम व्यवस्थेचे नेमके सुव्यक्त वर्णन भाषावैज्ञानिकांना अजूनही समाधानकारकपणे देता आलेले नाही. भाषेची संरचना व्यामिश्र व गुंतागुंतीची आहे. परंतु हीच गुंतागुंत आयुष्याच्या प्रारंभीच्या ४८ महिन्यात नकळत अबोध पातळीवर भाषा आत्मसात करण्याची क्षमता मानवी मनामध्ये असते. असंख्य वाक्ये निर्माण करण्याची भाषेची क्षमता ही मानवी मनाचीच निर्मिती क्षमता असते. या दृष्टिकोनातूनच मनोभाषा विज्ञानामध्ये बालभाषेच्या स्वरूपाचा शोध तिच्या विविध टप्प्यात होणाऱ्या, प्रक्रियांची सार्वत्रिकता इत्यादी बाबींचे संशोधन महत्त्वाचे ठरते. बोबडेपणात ही संगती किंवा नियमबद्धता असते याची जाणीव आपल्याला अनेकदा होते. 'काका'चा उच्चार 'ताता' असा होत असला तर 'नाक'चा उच्चार 'नात' आणि 'कान'चा 'तान' होणार

असे भाकीत सहज करता येतो. वाक्यप्रक्रियांमध्ये सुद्धा नकारात्मक रचनांचा विचार केला तर एका विशिष्ट टप्प्यात कोणत्याही शब्दापुढे 'नको' या बोबड्या उच्चारात 'नतो' असा शब्द टाकून नियमितपणे नकारात्मक रचना मुले साधतात. उदाहरणार्थ; दुदू नतो, जायचं नतो. बालभाषेत अशी वाक्ये निर्माण होतात तेव्हा त्यांच्या मागे नियमित स्वरूपाच्या प्रक्रिया घडत असतात. नामे व क्रियापदे यातला भेद येथे अस्पष्ट आहे, नको व नाही या प्रौढांच्या भाषेतील भेद येथे अजून स्पष्ट झालेला नाही. 'नसणे'ची वेगवेगळी रुपे ही अजून आत्मसात झालेली नाहीत आत्मसात झालेल्या रूपांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याची ही क्लृप्ती बालभाषेच्या अभ्यासकांना एक सार्वत्रिक तत्त्व म्हणून आढळली आहे.

चॉम्स्की यांच्या मते भाषिक शक्तींची इतर दोन शक्तींशी परस्पर प्रक्रिया होत असते. एक ध्वनी उच्चारणे व ऐकणे, दुसरी संकल्पनात्मक व वैचारिक शक्ती यांच्याशी परस्पर प्रक्रिया घडवून अर्थ घटकांनी भाषा बनते, भाषेला तीन पातळ्यांवर अस्तित्व असते, एक म्हणजे मानवी शक्ती म्हणून असणारे प्रजाती विशिष्ट जैविक पातळीवरचे अस्तित्व. दुसरे म्हणजे सामाजिक गटाच्या पातळीवर भाषेचे बाह्य अस्तित्व आणि तिसरे म्हणजे व्यक्तीने आत्मसात केलेली व्यवस्था म्हणून भाषेचे अंतर्गत मानसिक पातळीवरचे अस्तित्व. चाम्स्की यांनी पहिल्या आणि तिसऱ्या पातळीवर आपले लक्ष केंद्रित करून सिद्धांत मांडलेले आहेत.

४.३ समारोप

भाषा ही सातत्याने बदलणारी गोष्ट असल्यामुळे भाषेच्या अभ्यासाची अनेक क्षेत्रे उदयास आलेली दिसतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ही सर्व क्षेत्रे उदयास आलेली आहेत, याचे कारण म्हणजे आधुनिक सामाजिक, सांस्कृतिक परिघांनुसार भाषेचा बदललेला वापर हे होय. त्यामुळे भाषाअभ्यासाशी निगडित असणाऱ्या सर्व विषयांचा समावेश या अभ्यास क्षेत्रांमध्ये केला जातो त्यातील मानववंशविज्ञान भाषेचा वार्षिक आणि सांस्कृतिक अंगाने विचार करीत असते तर मनोविज्ञान भाषेचा संबंध माणसाच्या मनाशी असल्याचे सांगते, एकसंध असणाऱ्या मनाला भाषेचे ज्ञान होऊन एक निर्मितीशीलता घडते याचे विवेचन मनोविज्ञान करते. भाषाविज्ञानाचे एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र म्हणून उदयास आलेले आणि विकसित झालेले समाजभाषाविज्ञान हे क्षेत्र भाषाअभ्यासामध्ये अतिशय महत्त्वाचे आहे. याची थोडक्यात ओळख आपण समाजविज्ञान व भाषाविज्ञान या घटकांमध्ये करून घेतली आहे. तसेच उपयोजित भाषाविज्ञानामध्ये समाविष्ट असणाऱ्या कोशविज्ञानाचाही सविस्तर अभ्यास आपण या प्रकरणांमध्ये केला आहे.

४.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

शब्दनिधी : एखाद्या भाषेत अस्तित्वात असलेल्या सर्व शब्दांच्या समूहाला त्या भाषेचा 'शब्द निधी' किंवा 'शब्दसंग्रह' (Vocabulary/Lexicon)

मानववंशविज्ञान : सांस्कृतिक अभ्यास हे मानववंशाचे काम असले तरी तेथे भाषिक अभ्यासही केला जातो. आपल्या कोकणातील चित्पावनी बोलीचे भाषक आता अत्यल्प उरलेले आहेत. तेथील

संस्कृतीचा अभ्यास करायचा तर ती भाषा शिकावयास हवी. दुभाषी व्यक्ती फारशी उपयुक्त ठरत नाही. संस्कृती म्हणजे एका अर्थी व्यापक ज्ञानभाषा असते.

भाषिक सापेक्षतावाद (Linguistic Relativity) : हा भाषाशास्त्र आणि मानसशास्त्रातील एक प्रसिद्ध सिद्धांत आहे. याला सॅपिर-वोर्फ गृहीतक (Sapir-Whorf hypothesis) म्हणूनही ओळखले जाते. सोप्या भाषेत सांगायचे तर, हा सिद्धांत असे मानतो की आपण कोणती भाषा बोलतो, यावर आपल्या विचार करण्याची पद्धत आणि जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन अवलंबून असतो. आपण ज्या भाषेत विचार करतो किंवा ज्या भाषेत आपल्या भावना व्यक्त करतो, ती भाषा आपल्या आकलनशक्तीला आकार देते.

बोली भूगोल : एखाद्या भाषेच्या भौगोलिक विस्तारानुसार त्यात होणाऱ्या बदलांचा आणि प्रादेशिक बोलीभाषांचा शास्त्रीय अभ्यास होय.

ज्ञानात्मकतावादी मनोविज्ञान (Cognitive Psychology) : ही मानसशास्त्राची एक प्रमुख शाखा आहे, जी मानवी मन कसे विचार करते, शिकते आणि माहितीवर प्रक्रिया करते, याचा वैज्ञानिक अभ्यास करते.

मानसिक प्रतिरूपे (Mental Models) : एखाद्या व्यक्तीच्या मनात अस्तित्वात असलेल्या, बाह्य जगातील वास्तव, घटना आणि यंत्रणा कशा कार्य करतात याबद्दलच्या विचारांच्या किंवा विश्वासांच्या प्रतिमा (Cognitive frameworks) होय. आपण दररोजच्या जीवनात नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी या प्रतिरूपांचा वापर करतो.

४.५ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

योग्य पर्याय निवडा.

१. एकोणिसाव्या शतकात भाषेच्या कोणत्या प्रकाराच्या अभ्यासास महत्त्व होते?

अ) वर्णनात्मक ब) ऐतिहासिक

क) उपयोजित ड) सार्वत्रिक

२. भाषेतील चिन्हव्यवस्थेसाठी बुद्धिबळाच्या खेळाचे उदाहरण कोणी दिले आहे?

अ) चॉम्स्की ब) सोस्यूर

क) ब्लूमफिल्ड ड) देरिदा

३. शब्दकोशातील शब्दांची रचना कोणत्या प्रकारे असते?

अ) अर्थानुसार | ब) अकारविल्ह्यानुसार

क) व्युत्पत्तीनुसार | ड) शब्दानुसार

४. भाषाविज्ञानाला शब्दकोशाचे कोणते स्वरूप अपेक्षित आहे?

अ) रचनालक्षी | ब) अर्थलक्षी

क) पदलक्षी | ड) शब्दलक्षी

५. मानववंशविज्ञानातून भाषाभ्यासास सुरुवात करणारा देश कोणता?

अ) रशिया | ब) अमेरिका

क) फ्रान्स | ड) जर्मनी

६. मानसिक प्रतिरूपे ही संकल्पना कोणी मांडली?

अ) बी.एफ. स्किनर | ब) नोम चॉम्स्की

क) रोमान याकबसन | ड) ब्लूमफील्ड

७. जे. ए. फिशमन आणि विल्यम लबव यांनी कोणती संकल्पना मांडली?

अ) सामाजिक भाषाविज्ञान | ब) उपयोजित भाषाविज्ञान

क) तुलनात्मक भाषाविज्ञान | ड) कोशविज्ञान

८ . मानववंशविज्ञानात प्रामुख्याने कशाचा अभ्यास होतो?

अ) उत्क्रांतीचा | ब) आदिम संस्कृतीचा

क) भाषिक परिवर्तनाचा | ड) समाजाचा

उत्तरे : १. ऐतिहासिक २. सोस्यूर ३. अकारविल्ह्यानुसार ४. रचनालक्षी
५. अमेरिका ६. नोम चॉम्स्की ७. सामाजिक भाषाविज्ञान ८. आदिम संस्कृतीचा

४.६ सरावासाठी प्रश्न

अ) लघुत्तरी प्रश्न

१. मानववंशविज्ञानामध्ये कोणकोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो?

२. भाषाविज्ञानाच्या मनोविज्ञान या अभ्यासक्षेत्राचा परिचय करून द्या.

३. चॉम्स्की यांनी मांडलेली ‘मानसिक प्रतिरूपे’ ही संकल्पना तुमच्या शब्दात लिहा.

४. भाषिक सापेक्षतावाद म्हणजे काय? स्पष्ट करा.

आ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. भाषाविज्ञानाची व्याप्ती सांगून इतर अभ्यासक्षेत्रांचा थोडक्यात परिचय करून द्या.

२. उपयोजित भाषाविज्ञानाची महत्त्वाची शाखा म्हणून कोशविज्ञानाविषयी सविस्तर चर्चा करा.

३. भाषाविज्ञानाचे एक प्रमुख अभ्यासक्षेत्र म्हणून समाजभाषाविज्ञानाचा सविस्तर आढावा घ्या.

४.७ क्षेत्रीय कार्य

- भारतीय समाज जीवनातील विविध वृक्षवेलीचे संदर्भ भाषिकदृष्ट्या एकत्रित करा.
- दोन ते सहा वर्षाच्या लहान मुलांच्या बोलण्यातील मराठी आणि इंग्रजी शब्द त्यांच्या बोबड्या उच्चारासह लिहा.

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. गवळी, अनिल (२०१८): भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
२. मालशे, मिलिंद (२०२४) : आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन,लोकवाङ्मय गृह, मुंबई.
३. मालशे, मिलिंद (भाषांतर) (२०२५) : सोस्यूर ते चॉम्स्की, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
४. व्हटकर अशोक (२०२१): संस्कृत प्राकृत (मराठी) भाषाविज्ञान, खंड पहिला, मधुराज पब्लिकेशन प्रा. लि. पुणे.

❑❑❑

घटक १
मराठी भाषेची उत्पत्ती

१.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, प्रस्तुत घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला,

- मराठी भाषेची पूर्वपीठिका समजेल.
- मराठी भाषेचा भूगोल लक्षात येईल.
- मराठी भाषेच्या उत्पत्ती संदर्भातील विविध मते समजून घेता येतील.
- मराठीची अभिजात परंपरा व संस्कृतीचा परिचय होईल.

१.१ प्रास्ताविक

भाषेचावैज्ञानिक अभ्यास वेगवेगळ्या पद्धतीने करता येतो. एकोणिसाव्या शतकात भाषेचा ऐतिहासिक आणि तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करण्यावर विशेष भर होता. त्यानंतरच्या कालखंडात वर्णनात्मक, संरचनावादी व रचनांतरणवादी अशा विविध अंगाने भाषेचा अभ्यास होऊ लागला. त्यामुळे एखाद्या विशिष्ट कालखंडातील भाषेचे अचूक वर्णन करणाऱ्या वर्णनात्मक भाषाविज्ञानाला सर्वमान्यता मिळू लागली. भाषेला जसे वर्तमान असते तसा भूतकाळही असतो, त्यामुळे भाषेच्या या दोन्ही रूपांचा अभ्यास होण्याची आवश्यकता असते. म्हणून भाषेची पूर्वावस्था व तिचे उत्तरकालीन स्वरूप यातील परिवर्तनांचा अभ्यास करून या परिवर्तनामागील नियम शोधून काढणे अथवा परिवर्तन विषयक उपपत्ती मांडणे, हे ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे उद्दिष्ट असते. वेगवेगळ्या कालखंडात भाषा कशी बदलत गेली याचा विचार ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो. (भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक, संपा. डॉ. स. ग. मालशे व इतर, पृष्ठ; १७१) सन १७८६ मध्ये सर विल्यम जोन्स यांनी संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधील साम्यस्थळे यादृच्छिक नसून या भाषांमध्ये एकच एक जनकभाषा असावी, असा तर्क मांडला. या सूत्राला घेऊनच ऐतिहासिक भाषाभ्यासाला तुलनात्मक भाषाभ्यासाची जोड देऊन प्रचलित असलेल्या भाषांच्या जनक भाषांचा शोध सुरू झाला. त्यातून 'भाषाकुल संकल्पना' उदयाला आली. जगातील सर्व भाषा एकूण अठरा भाषाकुलामध्ये विभागल्या गेल्या. भारतात प्रामुख्याने चार भाषाकुलातील भाषा बोलल्या जातात. त्यापैकी इंडोयुरोपियन भाषाकुलात मराठी, गुजराती, हिंदी, बंगाली इ. भाषा येतात. तर द्राविडी भाषाकुलात तेलगु, तामिळ, मल्याळम, कानडी या प्रमुख भाषा येतात. इंडोयुरोपियन या भाषाकुलाची इंडो-आर्यन म्हणजेच आर्य भारतीय अशी एक उपशाखा आहे. या शाखेमध्ये संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश या भाषा येतात, या अपभ्रंश भाषांपासून निर्माण झालेल्या मराठी, गुजराती, हिंदी, बंगाली, राजस्थानी, पंजाबी, आसामी, ओडिया या आज बोलल्या जाणाऱ्या भाषा आहेत.

१.२ विषय विवेचन

आपल्याला मराठी भाषेच्या उत्पत्तीचा आणि उगमकाळाचा शोध घ्यायचा आहे, या शोधामध्ये ती भाषा जेथे बोलली जाते त्या परिसराचा, समाजाचा, इतिहासाचा असा सर्वांगाने विचार करणे क्रमप्राप्त ठरते. मराठी भाषा प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये बोलली जाते. परंतु मराठीची उत्पत्ती शोधताना आपल्याला प्राचीन महाराष्ट्राची वसाहत, महाराष्ट्राची भौगोलिक रचना, मराठी समाजाची जडणघडण म्हणजेच मराठी लोकांची संस्कृती या सर्व गोष्टींचा थोडक्यात आढावा घ्यावा लागेल. हे सर्व विषय जसे एकमेकात गुंतलेले आहेत तसेच मराठी भाषेच्या उगमाची ही गोष्ट आहे. मराठी भाषा कोणत्या भाषेपासून निर्माण झाली? केव्हा निर्माण झाली? तिच्या निर्मितीमागची कारणे कोणती? या सर्व प्रश्नांची उत्तरे मतभेदांना वाव देणारी आहेत. 'मराठी भाषेचा जन्म संस्कृत भाषेपासून झाला' ते 'मराठी ही संस्कृती इतकीच प्राचीन भाषा असून ती संस्कृतच्या बरोबरीने वाढत आणि विकसित होत आलेली आहे', अशी परस्परविरोधी मते मांडलेली दिसतात. मराठी भाषेची उत्क्रांती संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, मराठी याप्रमाणे झाली असावी अशी मांडणी करणारी एक परंपरा आहे. तर मराठी भाषा ही कन्नड, तमिळ व तेलगू या द्राविड भाषांमधून उत्पन्न झाली अशी मांडणी करणारी अभ्यासकांची दुसरी परंपरा आहे. शिवाय या प्रचलित मांडणीला आव्हान देणारी काही मते 'अभिजात मराठी भाषेच्या अहवाला'मध्ये रंगनाथ पठारे यांच्या समितीने मांडलेली दिसून येतात. त्यामुळे या मतमतांतरांची काही प्रमुख गटात विभागणी करून आपण त्याचा परिचय करून घेऊया. तत्पूर्वी मराठी भाषा जिथे बोलली जाते त्या परिसराचा थोडक्यात आढावा घेऊया.

१.२.१ मराठी भाषेचा भूगोल

एखाद्या भाषेचा अभ्यास करताना भाषेचा इतिहास जसा महत्त्वाचा असतो तसेच ती भाषा ज्या प्रदेशांमध्ये बोलली जाते त्या प्रदेशाचा भूगोल देखील तितकाच महत्त्वाचा असतो. मराठी भाषा प्रामुख्याने महाराष्ट्रात बोलली जाते. भारताच्या भौगोलिक नकाशात महाराष्ट्राचे स्थान उत्तर आणि दक्षिण भारत यांच्या मध्यभागी आहे. पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला मध्य प्रदेश, दक्षिणेला आंध्र प्रदेश आणि कर्नाटक व उत्तरेला गुजरात आणि मध्य प्रदेश यांनी महाराष्ट्राच्या सीमा निश्चित केलेल्या आहेत. महाराष्ट्राचे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा असे स्थूलमानाने विभाग पडतात. प्राचीन काळात तत्कालीन भारत दोन प्रमुख भागांमध्ये विभागला होता. महाराष्ट्र व मध्यप्रदेशातून वाहणाऱ्या नर्मदा नदीच्या उत्तरेस आर्यवर्त आणि दक्षिणेस दक्षिणापथ किंवा दंडकारण्य असे म्हणत. याच भागांना आपण उत्तर भारत व दक्षिण भारत असे संबोधतो. भारतात आर्य आल्यानंतर प्रथमतः पंजाबच्या सुपीक प्रदेशात स्थायिक झाले. पुढे त्यांच्या टोळ्या उत्तर भारतात विंध्य पर्वताच्या पलीकडे पसरत गेल्या. आर्यांनी वस्ती केलेल्या भागाला आर्यावर्त म्हणत असत. ते स्वतःची भाषा बोलत. या आर्यांच्या भाषेतूनच पुढे संस्कृत भाषा निर्माण झाली. दक्षिण भारतात द्रविड वंशाचे लोक वस्ती करून राहत होते, त्यांच्या भाषेला द्राविडी भाषा असे म्हणत. ही भाषा बोलणारे द्रविड लोक महार, मांग, भिल्ल, कातकरी, वारली, कोळी या समूहांचे होते. मात्र दक्षिणापथ, दंडकारण्य, महाराष्ट्र अशा नावाने ओळखला जाणारा देश प्राचीन काळी एकच असावा असे अनेक ग्रंथांमधून नमूद केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे प्रदेशवाचक नाव इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून आढळते. इ. स. ३६५

मधील एरण गावाच्या (जि. सागर, मध्यप्रदेश) स्तंभलेखात, श्रीधरवर्मा नावाच्या राजाचा सेनापती सत्यनाग याने स्वतःस 'माहाराष्ट्र' असे म्हणवून घेतल्याचा उल्लेख आढळतो. मराठी शब्द ज्या मरहट्ट वा महारट्ट या शब्दावरून आला, त्या मरहट्ट लोकांचे वर्णन आठव्या शतकातील कवी उद्योतनसूरि याने आपल्या 'कुवलयमाला' या ग्रंथात (इ.स. ७७८) पुढीलप्रमाणे केले आहे, 'दढमडह सामलंगे सहिरे अहिमाणे कलहसीले ये। दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे' मराठे लोक बळकट, ठेंगणे, सावळ्या रंगाचे, अभिमानी, भांडखोर तसेच दिले-घेतले अशी भाषा वापरणारे आहेत. यादवकालात मराठी भाषेचा उल्लेख मऱ्हाटी या नावाने येतो. 'ते मऱ्हाटी तरि अनावर बोलत असतिः' (लीळाचरित्र, उत्तरार्ध, ११३) तसेच 'इये मऱ्हाटियेचां नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी।' (ज्ञानेश्वरी, १२.१६) तसेच ज्ञानेश्वरी व महानुभावीय ग्रंथात मराठीचा उल्लेख 'देशी' भाषा असाही येतो. अशाप्रकारे मराठी भाषेचे व महाराष्ट्राचे उल्लेख प्राचीन ग्रंथात आढळतात. (संदर्भः भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी, पृष्ठ क्रमांक ८८)

तसेच 'महाराष्ट्र' या नावाविषयी थोडक्यात विवेचन पुढील प्रमाणे करता येईल. 'महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र' असे मोल्सवर्थकृत कोशाच्या प्रस्तावनेत डॉ. जॉन विल्सन यांनी म्हटलेले आहे. महार हेच महाराष्ट्राचे मूळचे रहिवासी होते; हे मत श्री.व्य.केतकारांनाही मान्य आहे. 'महार आणि रठ्ठ या दोन राष्ट्र जातींच्या नामांचा संयोग होऊन 'महाराठ्ठ' असे रूप तयार झाले आणि त्याचे पुढे महाराष्ट्र कालांतराने महाराष्ट्रिक असे संस्कृतीकरण झाले.' तसेच रा. गो. भांडारकर, वि. का. राजवाडे, शं. गो. तुळपुळे यांनीही महाराष्ट्र शब्दाच्या उत्पत्तीविषयी आपली मते मांडलेली आहेत. मर या कानडी शब्दाचा अर्थ झाड आणि हट्ट या शब्दाचा अर्थ मंडळ व प्रदेश. मरहट्ट म्हणजे झाडीमंडळ. दंडकारण्यातील झाडीमंडळाचे स्वरूप म्हणजे मरहट्ट हा शब्द होय. अशी महाराष्ट्राची उत्पत्ती डॉ. शं. बा. जोशी सांगतात. अशा विविध प्रकारे 'महाराष्ट्र' नावाची उत्पत्ती पाहायला मिळते.

१.२.२ मराठी भाषेच्या उत्पत्तीबाबतची मते

भाषेचा जन्म नेमका कधी झाला हे सांगणे कठीण आहे. कारण भाषेच्या जन्माची प्रक्रिया प्रदीर्घ काळ चालू असते. एखादी भाषा लोप पावून दुसरी भाषा जन्माला येण्याच्या संक्रमणावस्थेमध्ये दोन्ही भाषांच्या खुणा दिसत असतात. आज प्रचलित असलेल्या भाषेला अनेक शतकांचा इतिहास असतो. भाषा परिवर्तनशील असल्यामुळे काळाच्या ओघात तिच्या स्वरूपामध्ये बदल होत असतात. असाच प्रवास मराठी भाषेचाही आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी अभ्यासकांनी मांडलेल्या मतांचा थोडक्यात आढावा घेऊया.

अंतर्वर्तूळ – बहिर्वर्तूळ सिद्धांत

रुडॉल्फ होर्न्ले (१८४१-१९१८) यांनी आर्यांच्या आगमनासंबंधी हा सिद्धांत मांडला. या सिद्धांताप्रमाणे आर्य भारतात दोनदा आले. प्रथम आलेल्या आर्यांनी गंगेच्या पश्चिमेकडील दुवाबात वस्ती केली. नंतर आलेल्या दुसऱ्या टोळीतील आर्यांनी या पहिल्या टोळीतील आर्यांना हुसकावून लावले. अशाप्रकारे ही हाकलून दिलेली टोळी गंगेच्या सुपीक प्रदेशातून पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर अशी चहुकडे पसरली.

सहाजिकच हे बाह्य वर्तुळ तयार झाले. या बाह्य वर्तुळातून मागधी व तिच्यापासून लाहन्दा, सिंधी, मराठी, ओरिया, बिहारी, बंगाली, आसामी अशा भाषा निर्माण झाल्या. आंतरभागातील वर्तुळात शौरसेनी व तिच्यापासून पश्चिमी हिंदी आणि पूर्वेकडे मागधी अशी विभागणी झाली. तर बहिर्वर्तुळापासून मराठी निर्माण झाली अशी या सिद्धांतात मांडणी केलेली आहे.

होर्न्ले यांचा हा सिद्धांत तत्वतः मान्य करण्यासारखा असला तरी आर्य लोक भारतात दोन टोळ्यांनी आले; याबाबत मतभेद आहेत. जॉर्ज ग्रिअर्सन यांना द्विरागमन सिद्धांत मान्य नाही. सुनितीकुमार चतर्जी यांच्या मते, आर्य भारतात दोन पेक्षा अधिक टोळ्यांनी आले असावेत. तसेच ते एकाच कुलातील पण परस्परांपासून काही प्रमाणात भिन्न असणाऱ्या भाषा बोलत असावेत. आर्यांच्या आगमना अगोदर येथे नाग, द्रविड या वंशाचे लोक रहात होते. या द्राविडी भाषांचा अथवा बोलींचा आर्यांच्या भाषेवर कितपत परिणाम झाला असेल हे सांगता येत नाही. मात्र आर्य लोकांनी येथील मूळ द्रविड, नाग, आदिवासी लोकांचा पराभव केला आणि आपले साम्राज्य स्थापन केले, जेत्यांची भाषा म्हणून संस्कृत भाषेचा वापर सुरू केला व काही ग्रंथांची निर्मिती केली. यासंबंधाने आपणास त्या काळातील भाषेचे स्वरूप समजावून घेण्यासाठी वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे यांच्या भाषेकडे वळावे लागते. हा कालखंड साधारणतः तीन भागांमध्ये विभागला जातो.

पूर्व वैदिक भाषा, वैदिक संस्कृत पाणिनीय अथवा लौकिक संस्कृत (इ. स. पूर्व १००० ते इ. स. पूर्व २००). मराठीने संस्कृत भाषेपासून खूप ऋण घेतलेले आहेत. उच्चारदृष्ट्या व, ओ, औ इत्यादी स्वर ङ्, ञ, ष इत्यादी व्यंजने यांचे उच्चार मराठीने संस्कृतवरून घेतले आहेत. संस्कृतप्रमाणेच मराठीतील स्वरांचे ऱ्हस्व, दीर्घ, अतिदीर्घ किंवा अतिऱ्हस्व असे सर्व प्रकारचे उच्चार होतात. मराठी संस्कृतप्रमाणे धातूप्रधान भाषा आहे. मुख्य म्हणजे मराठीत पन्नासटक्के किंवा त्याहून अधिक 'तत्सम' शब्द आहेत. पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी अशी संस्कृतप्रमाणे मराठीची लिंगव्यवस्था आहे. संस्कृतमधील विभक्तीप्रत्यय थोड्या फरकाने मराठीमध्येही वापरले जातात.

इतिहास संशोधक वि.का. राजवाडे यांनी संस्कृत ही मराठी भाषेची जननी आहे असे मत मांडले. राजवाडे मराठीचा उगम पाचव्या शतकात झाला असे मानतात, परंतु त्याला निश्चित असे साधार पुरावे नाहीत. मराठीत जवळजवळ ७०% शब्दसंग्रह संस्कृत भाषेतून आला आहे, म्हणून मराठी भाषा संस्कृतोद्भव आहे असे मानता येणार नाही. उच्चारण, प्रत्यय व शब्द या तीनही बाबतीत संस्कृतपेक्षा मराठी वेगळी असून काळानुसार तिच्यात सतत बदल होत गेला आहे. काळाच्या ओघात तिचा देशी व विदेशी अशा अनेक भाषांशी संपर्क आला असल्यामुळे तिचे एकच एक रूप राहिलेले नाही. संस्कृतमध्ये नसलेला 'ळ' हा ध्वनी मराठीत आहे. मराठीत विभक्ती प्रत्यय येण्याऐवजी शब्दयोगी अव्यये मोठ्या प्रमाणावर येतात. संस्कृतमधील पुष्कळ शब्दांचे लिंग मराठीत वेगळे आहे. मराठीत तत्सम शब्दांप्रमाणे तद्भव शब्दांचे प्राबल्य दिसून येते. तेव्हा संस्कृतचे काही समान विशेष आढळले एवढ्यावरून संस्कृत मराठीची साक्षात जननी ठरत नाही. मात्र संस्कृतचा मोठा प्रभाव मराठीवर आहे, असे दिसून येते.

संस्कृतप्रमाणेच प्राकृत भाषांनासुद्धा फार जुनी परंपरा आहे. संस्कृत ही संस्कार करून तयार केलेली भाषा तर प्राकृत ही विविध ठिकाणी बोलली जाणारी बोलीभाषा असे या दोन भाषांचे वर्णन करता येईल. त्यामुळे अतिप्राचीन काळात आर्य लोकांच्या बोलीभाषा प्राकृत भाषा होत्या. प्राकृत भाषा म्हणजे कोणती तरी एक भाषा नसून अनेक भाषांचा समूह आहे. त्यातीलच पाली या प्राकृत भाषेमध्ये गौतम बुद्ध यांनी बौद्ध तत्त्वज्ञान रचले तर अर्धमागधी या प्राकृत भाषेमधून भगवान महावीरांनी जैन धर्माचा संदेश दिला. तसेच प्रवरसेन, हाल, राजशेखर यांचे प्राकृत ग्रंथ संस्कृत भाषेमध्ये भाषांतरित केले गेले. मध्ययुगीन प्राकृतांपैकी पाली भाषेतील वर्ण प्रक्रियेमुळे झालेली रूपांतरे मराठीमध्ये आलेली आहेत. उदाहरणार्थ तिण (तृण), पाऊस (प्रावृष्), पिळणे (पीडन), छकडा (शकट), गूळ (गुड), रूख (वृक्ष) इत्यादी पाली भाषेच्या स्पष्ट छापाचे शब्द मराठीत रूढ झालेले आहेत. तसेच मागधी या प्राकृत भाषेतील काही चिन्हे मराठीत आपल्याला दिसून येते येतात. उदाहरणार्थ; ओशाळणे (अपसर), मिसळ (मिश्र), घोळतो (घूर्णते), जोशी (जोइसी), केशर (केसर), पेलणे (प्रेरणम्) इत्यादी. क्वचित ठिकाणी हा प्रकार काही फरकाने होतो. उदाहरणार्थ; बोरव-वोळव; भरभर-भळभळ; खर-खळ; सरभेसळ-सळभेसळ. असा मागधी आणि मराठीचा संबंध दिसून येतो. अर्धमागधी भाषेलाच याकोबी यांनी जैन महाराष्ट्री असे नाव दिले आहे. दीर्घ स्वर ऱ्हस्व करण्याची लकब अर्धमागधीमध्ये दिसून येते, ती मराठीने उचलली आहे. मृदू व्यंजने कठोर करण्याचा जो अर्धमागधीचा स्वभाव तो कोकणी मराठीत काही ठिकाणी दिसून येतो. रा. भि. जोशी यांनी 'मराठी भाषेची घटना' या आपल्या पुस्तकात मराठी भाषा पाली या प्राकृत भाषेपासून निर्माण झाल्याचे सांगितले आहे. मात्र मराठी भाषेने प्रत्येक प्राकृत भाषेपासून थोडे थोडे ऋण घेतलेले आहेत.

यानंतर प्राकृत भाषांच्या अपभ्रंशाचा कालखंड येतो व या अपभ्रंश भाषातून मराठी उत्पन्न झाली आहे. असे मत मांडणारे वि. भि. कोलते म्हणतात, 'केवळ अपभ्रंशापासून मराठी निघाली.' नाही तर 'मराठी ही महाराष्ट्री अपभ्रंशाचा अपभ्रंश नसून संस्कृतिकरणाचा संस्कार झालेला उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश आहे.' असे मत डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी मांडले आहे. यादव काळातील मराठी भाषेत देखील संस्कृतचे संस्कार दिसून येतात. त्यामुळे तुळपुळे यांच्या मताचा विचार करताना मराठी भाषा ही महाराष्ट्री प्राकृतातून निष्पन्न होण्यापूर्वी यादवांच्या काळात संस्कृत भाषेतून झालेले ग्रंथलेखन मराठीवर संस्कृतचे संस्कार करण्यासाठी कारणीभूत ठरले असावे असे मानता येईल.

कृ. पां. कुलकर्णी यांनी 'मराठी भाषा: उद्गम व विकास' या ग्रंथात 'मराठी अमुक एका भाषेपासून उत्पन्न झाली नसून सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्यापरीने व प्रामुख्याने माहाराष्ट्रीय व अपभ्रंश ह्यांनी मराठी जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो.' (कुलकर्णी कृ. पां., मराठी भाषा उद्‌गम व विकास, पृष्ठ; १८४) असे मत मांडलेले आहे. याबरोबरच महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानामुळे आणि द्राविड भाषांच्या निकटच्या संपर्कामुळे कन्नड, तमिळ व तेलगू भाषांचाही प्रभाव तिच्यावर स्पष्टपणे जाणवतो. त्यामुळे काही भाषा अभ्यासकांनी मराठीपेक्षा प्राचीन असणाऱ्या कन्नड आणि तमिळ भाषेकडे मराठीचे जननीत्व दिले आहे. श्री शं. बा. जोशी यांनी मराठीचे मूळ कन्नडमध्ये शोधले. तसेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी कन्नड-मराठी संबंधाचा सविस्तर उहापोह करून कानडीचा शब्दसंग्रह

तसेच व्याकरण यांचा मराठीवर मोठा प्रभाव पडला आहे हे दाखवून दिले आहे. तर विश्वनाथ खैरे यांनी 'संमत' सिद्धांतद्वारे संस्कृत, मराठी व तमिळ या भाषांचा संबंध दाखवून दिला आहे. केवळ शब्दांच्या देवाणघेवाणीतून भाषा उत्पन्न होत नाही म्हणून या सिद्धांतांना वैज्ञानिक स्वरूप प्राप्त झाले नाही.

भारतीय भाषाभ्यासकाप्रमाणेच पाश्चिमात्य अभ्यासकांनीही मराठी भाषेचा अभ्यास केला आहे. जॉर्ज ग्रिअर्सन, ज्यूल ब्लोक, स्टेन कौनो, साउथवर्थ यांनी मराठीच्या उगमाविषयी व प्रवासाविषयी आपली मते मांडली आहेत. मराठीच्या विकासात पिजिन आणि क्रिऑल प्रक्रिया घडली असावी असा विचार भाषाशास्त्रज्ञ साउथवर्थ यांनी मांडला आहे. द्रविड भाषा बोलणाऱ्या समाजाचा महाराष्ट्री प्राकृत बोलणाऱ्या आर्यांशी संबंध आला. त्यातून पिजिन प्राकृत निर्माण झाली. याच प्राकृतचा स्वीकार द्रविडांनी केला असावा. आणि भाषेला एक स्थिर रूप प्राप्त झाले असावे. अर्थात आर्यांनी का स्वीकार केला नाही? याचे कारण म्हणजे आर्य द्रविडांपेक्षा सांस्कृतिकदृष्ट्या प्रभावशाली होते. मराठी ही अशी पिजिन प्राकृतचे विकसित रूप तयार होऊन निर्माण झालेली 'क्रिओलाइज्ड् प्राकृत' असावी, असे मत साउथवर्थ यांनी १९६० च्या दरम्यान मांडले आहे. अशाप्रकारे सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक वेगवेगळी मते आपणाला पहावयास मिळतात.

''अर्थात मराठी भाषेवर संस्कृत, प्राकृत अपभ्रंश आणि इतर द्राविडी भाषांचा संस्कार झालेला आहे. त्यामुळे कोणत्या तरी एकाच भाषेला मराठी भाषेची जननी समजणे चुकीचे ठरते. मराठी भाषेने इतर भाषांचे कितीही ऋण घेतले असले तरी तिने प्रामुख्याने महाराष्ट्री प्राकृत आणि महाराष्ट्री अपभ्रंशातून अनेक गोष्टी स्वीकारलेल्या आहेत, कोणत्याही भाषेचा इतिहास पाहताना एखादी भाषा प्रत्यक्ष कोणत्या भाषेपासून जन्मास आली? याचा शोध घेतला पाहिजेच, पण त्याचबरोबर त्या भाषेचा शब्दसंग्रह ध्वनी व व्याकरण यांची संगती लावावयास हवी. मराठी भाषेची स्वनव्यवस्था (Phonology) आणि रुपिम अथवा पदिमव्यवस्था (Morphology) यांच्यात संस्कृत, पाली, पैशाची, मागधी, माहाराष्ट्री प्राकृत, माहाराष्ट्री अपभ्रंश या सर्व पूर्वभाषांचे विशेष व संस्कार आढळतात आणि म्हणूनच डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. पा. दा. गुणे आणि कृ.पां. कुलकर्णी यांनी मराठी भाषेच्या निर्मितीबाबत मांडलेली मते समन्वयवादी व वास्तवदर्शी आहेत.'' (भाषाविज्ञान आणि मराठी भाषा: डॉ. अनिल गवळी, पृष्ठ क्रमांक ११५)

१.२.३ मराठी भाषेच्या उगम काळाबाबतची मते

कोणत्याही भाषेचा उगमकाळ काटेकोरपणे सांगणे कठीण असते. ग्रंथ, लोकसाहित्य, ताम्रपट, शिलालेख या साधनांच्या आधारे आपणास एखाद्या भाषेचा उगमकाळ साधारणपणे निश्चित करता येतो. कोणतीही भाषा जन्मतः प्रगत अवस्थेत असू शकत नाही. तिच्या जडणघडणीच्या प्रारंभीच्या काळात ती केवळ व्यवहाराच्याच पातळीवर वापरली जाते. समाजमान्यता मिळून व्यवहारातील तिचे स्थान सिद्ध झाल्यावर त्या भाषेत हळूहळू ग्रंथनिर्मिती होऊ लागते. यादवकाळाच्या उत्तरार्धात मराठीमध्ये प्रौढ स्वरूपाची ग्रंथरचना झाली आहे. शके १२१२ म्हणजे इ. स. १२९० मध्ये 'ज्ञानेश्वरी'सारखा अलौकिक असा भाष्यग्रंथ निर्माण झाला. त्याआधी निदान पाच ते सहा वर्ष म्हणजे इ. स. १२८३ च्या सुमारास महानुभावांचा

'लीळाचरित्र' हा श्रेष्ठ असा गद्य चरित्रग्रंथ लिहिला गेला. लीळाचरित्र निर्मितीच्या सुमारास महादंबेचे धवळे निर्माण झाले. अर्थात इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या शेवटी श्रेष्ठ प्रकारचे काव्यग्रंथ व गद्यग्रंथ निर्माण करण्याची क्षमता मराठीला प्राप्त झाली होती; म्हणजेच मराठीला ही वैभवाची स्थिती प्राप्त होण्याआधी काही शतकांचा काळ तिच्या प्रारंभावस्थेचा म्हणून मानावा लागतो. मराठीच्या उगमकाळाविषयी जी मते मांडली गेली आहेत त्याचा थोडक्यात विचार आपण येथे करूया.

वैद्य – गुणे वाद

मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी मराठीमध्ये वैद्य आणि गुणे वाद चांगलाच गाजला. मराठी भाषेचा जन्म संस्कृत भाषेपासून झाला असे मत मांडणारे चि. वि. वैद्य म्हणतात, 'इसवी सनाच्या सातव्या शतकात वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन आणि बौद्ध धर्माचा पाडाव झाल्यामुळे प्राकृत भाषा लोप पावल्या आणि शंकराचार्यांच्या विचाराने संस्कृतचा प्रभाव पडला. इसवी सन सातव्या शतकात झालेल्या या वैचारिक व धार्मिक क्रांतीमुळे अर्वाचीन देशी भाषा आणि मराठी भाषा यांचा जन्म झाला.' या मताचा प्रतिवाद करणारा लेख डॉ. पां. दा. गुणे यांनी विविधज्ञानविस्तार या प्रसिद्ध नियतकालिकामध्ये लिहिला. त्यामध्ये त्यांनी असे मत मांडले, शंकराचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करून व अद्वैत सिद्धांत मांडून धार्मिक व वैचारिक क्रांती केली, परंतु अशी क्रांती करणारे शंकराचार्य हे काही एकटेच नव्हेत, बौद्ध, जैन इत्यादी धर्म भारतात शंकराचार्यांच्या आधीच निर्माण झाले व प्रसार पावले पण त्यामुळे नवभाषा निर्मिती झाली असे दिसत नाही. उलट धार्मिक क्रांती करणाऱ्या सर्वांनी लोकभाषेतूनच आपला धर्म रुजवला. बौद्धांनी पाली, जैनांनी प्राकृत, अपभ्रंश, बसवेश्वरांनी कन्नड इत्यादी. त्यामुळे धार्मिक क्रांतीमधून नवभाषा निर्मिती होते याला गुणे यांनी कडाडून विरोध केला व मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी आपले पुढील मत मांडले, 'अकराव्या शतकात अरबादी संस्कृतीच्या आक्रमणातून येथील आर्य व क्षत्रिय लोक चहूकडे पांगले गेले आणि त्यांच्या प्रयत्नातून आधुनिक आर्यभाषा व मराठीचाही जन्म झाला.' डॉ. गुणे यांच्या मतानुसार भारतामध्ये प्राचीन काळापासून संस्कृतचे वर्चस्व होतेच. विशेषतः लोकव्यवहाराची भाषा प्राकृत असे. तेव्हा धार्मिक क्रांती, धर्म, तत्त्वज्ञान या बाबी संस्कृत पंडितांच्याच ताब्यात असत. त्यामुळे भारतात पूर्वीपासूनच वायव्य दिशेकडून शक, हूण, कुशाण अशा विविध वंशांच्या टोळ्या येत राहिल्या. त्यांच्या भिन्न वंशांची सरमिसळ झाली. या भिन्न वंशीय लोकांचा इथल्या लोकांशी व्यवहार होणे अटळ होते. त्यामुळे वांशिक संकरातून नवीन भाषा निर्माण झाल्या.

मराठी भाषेच्या उगमकाळाविषयी डॉ. पां. दा. गुणे यांनी मांडलेले मत मात्र स्वीकारणीय वाटत नाही. या वादाच्या सुरुवातीस दहाव्या शतकात मराठीचा उदय झाला, असे मत त्यांनी मांडले आहे. परंतु इ.स. ११८८ मध्ये लिहिला गेलेला मुकुंदराजाचा 'विवेकसिंधू'सारखा मराठी ग्रंथ व त्यातील मराठी भाषावापर पाहता, ग्रांथिक भाषा सुरू होण्याआधी किमान ५ ते ७ शतके अगोदर मराठी ही लोकभाषा असली पाहिजे हे स्पष्ट होते. म्हणून डॉ. पां. दा. गुणे यांचे मत आपण मान्य करू शकत नाही. मात्र मराठी भाषा अपभ्रंशोत्पन्न आहे, हे डॉ. पां. दा. गुणे यांचे मत डॉ. शं. गो. तुळपुळे व डॉ. वि. भि. कोलते यांनी अधिक सविस्तर, साधार व शास्त्रीय पद्धतीने विवेचन करून सिद्ध केले आहे. भाषेच्या जन्मकाळाचा अंदाज बांधण्याचा भक्कम पुरावा म्हणजे त्या भाषेतील शिलालेख होय.

शिलालेख

शिलालेख म्हणजेच दगडावर (शिलेवर) कोरलेले लेखन होय. प्राचीन काळी दगडांवर किंवा मोठमोठ्या शिलाखंडावर कोरून काही (माहिती) लेखन करण्याची प्रथा होती. असे शिलालेख विश्वासार्ह ठरत, कारण त्यात बदल करणे शक्य नसते. 'दगडावरची रेघ' हे उद्गार याचीच साक्ष देतात. कारण लोकसाहित्य किंवा ग्रंथातील भाषा, ही कालौघात बदलू शकते, त्यामुळेच त्या पुराव्यांची विश्वासार्हता कमी होते. ताम्रपटसुद्धा खाजगी असल्यामुळे त्याचीही भाषा बनावट असू शकते. पण शिलालेख मात्र सार्वजनिक असल्यामुळे त्यातील सत्य अखेरपर्यंत कायम असते. म्हणूनच अशा प्राचीन शिलालेखांचा आणि ताम्रपटांचा अभ्यास करून त्यांच्या आधारे भाषा संदर्भात योग्य निष्कर्ष काढता येतात. त्यामुळे मराठी भाषेचा कालखंड निश्चित करताना अशाच काही महत्त्वाच्या शिलालेख-ताम्रपटांचा अभ्यास करून 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाला प्रमाण मानून त्याच्या पूर्वीच्या काळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यानुसार शिलालेखांचा खालीलप्रमाणे क्रम लावून मराठीचा जन्मकाळ निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. **उनकेश्वराचा शिलालेख :** ज्ञानेश्वरीपूर्वी एक वर्ष म्हणजे इ.स. १२८९ या कालखंडातील हा शिलालेख असून यावर रामचंद्र यादव, हेमाडपंत यांची नावे असून १८ ओळी आहेत. यावरील मराठीचे स्वरूप संस्कृतमिश्रित असून काही भाषिकरूपे खास मराठीची आहेत.

२. **पंढरपूरचा चौऱ्यांशीचा शिलालेख :** इ.स. १२७३ म्हणजे ज्ञानेश्वरीपूर्वी १७वर्षे असलेला हा शिलालेख भाविकांचे श्रद्धास्थान आहे. विठ्ठलमंदिर बांधण्यासाठी वर्गणी देणाऱ्यांची नावे यावर कोरलेली आहेत.

३. **नेवासेचा शिलालेख :** इ.स. १२३९ म्हणजे ज्ञानेश्वरीच्या ५१ वर्षे पूर्वीचा असून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी कथन करताना ज्या खांबाला टेकून बसले होते, त्याच खांबाजवळील जुनाट अशा हेमाडपंती देवळाच्या दगडावरील हा लेख आहे.

४. **पाटण शिलालेख** : ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ८४ वर्षे म्हणजे इ.स. १२०६ मधील हा शिलालेख देवगिरीच्या सिंघण यादवांचा आहे. यातील शेवटच्या चार ओळीतून मराठी भाषेच्या पूर्वरूपाची कल्पना येते.

५. **परळचा शिलालेख :** ज्ञानेश्वरीच्या १०३ वर्षे पूर्वीच्या ह्या शिलालेखातील मजकूर प्रारंभी संस्कृत असला तरी शेवटी दिलेली शपथ मात्र मराठीतून आहे. या शपथेचे स्वरूप शापासारखे असल्यामुळे सर्वांनाच तो कळावा हा हेतू त्यामागे असावा.

६. **पळसदेवचा शिलालेख :** याचा काळ ज्ञानेश्वरी पूर्व १३३ वर्षे म्हणजे इ.स. ११५७ आहे. यावरील भाषेवरून राष्ट्रकूटांच्या राजवटीतील मराठी भाषेचे प्रचलित स्वरूप स्पष्ट होते.

७. **श्रवणबेळगोळचा शिलालेख :** मराठीतील हा शिलालेख ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ३०७ वर्षांचा असल्यामुळे याला आद्य शिलालेख मानले जात असे. परंतु हुल्टझने या मताला विरोध केल्यामुळे तो आद्य ठरत नाही. मात्र यात विविध देशभाषातून चामुण्डराय नावाच्या प्रधानाने हा भव्य असा गोमटेश्वराचा पुतळा उभारल्याची माहिती दिलेली आहे.

ताम्रपटांचे पुरावे

१. **दिवेआगरचा ताम्रपट :** ज्ञानेश्वरीच्या २३० वर्षे आधी इ. स. १०६० मधील हा ताम्रपट मराठीतील आद्यलेख असून यात दिलेली मराठीची शब्दरूपे, अनुनासिक, शब्द, शब्दयोगी अव्यये, सर्वनामे, विभक्तीरूपे इत्यादी उल्लेखनीय ठरतात. शिलालेख आणि ताम्रपटात आलेले मराठीचे उल्लेख तिचे प्राचीनत्व स्पष्ट करतात. शिवाय प्राकृत भाषेतील जैन धर्मीय साहित्यातूनही प्राकृत भाषांचा अस्त होऊन देशीभाषा प्रारंभ झाल्याचा दाखला मिळतो.

२. नारदस्मृतीच्या काळात म्हणजे इ. स. ७०० मध्ये बाणभट्टाच्या हर्षचरित्रातूनही 'देशीभाषा' असा उल्लेख येतो. त्यावरून मराठीचा उत्पत्तीकाळ इ.स. ५०० पर्यंत मागे जातो, हा कृ. पां. कुलकर्णी यांचा तर्क संभवनीयच वाटतो.

३. याशिवाय इ. स. १२९० मध्ये तामीळनाडू येथे मराठीच्या अध्यापनाची सोय केल्याचा उल्लेख मैलंगीच्या शिलालेखात आढळत असून ज्ञानेश्वरीच्याच काळात अन्य प्रांतातही मराठी शिकविण्याची व्यवस्था होण्याइतपत ती प्रतिष्ठा पावली होती हे उघड होते. यावरून मराठीचा जन्म ज्ञानेश्वरी पूर्वी ४-५ शतके आधी निश्चितच झाला असावा.

वरील सर्व उल्लेख मराठीच्या पूर्वस्थितीची कल्पना देणारे ठरतात आणि मराठीचा जन्म इ. स. च्या आठव्या शतकात झाला असावा आणि तदनंतर ज्ञानेश्वरीतून त्या भाषेचे भाषावैभव आणि शब्दलावण्य प्रगट झाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. (भाषाविज्ञान संकल्पना आणि स्वरूप : डॉ. आरती कुलकर्णी, पृष्ठ क्रमांक १८२,१८३)

१.२.४ मराठीची अभिजात परंपरा व संस्कृती

मराठी भाषेची समृद्ध अशी ऐतिहासिक वाटचाल अभ्यासताना तिची अभिजात परंपरा व संस्कृती आपल्यासमोर येते. मराठीच्या जनकभाषेचा आणि जननकाळाचा शोध घेताना आपण पूर्वी झालेल्या अभ्यासाचा आढावा घेतला. या अभ्यासाचा बारकाईने विचार केल्यास त्या कालखंडानुसार हा अभ्यास काही मर्यादेमध्ये सीमित झालेला आहे असे आपल्या लक्षात येते. परंतु आज मात्र माहिती तंत्रज्ञानामुळे अभ्यासाच्या कक्षा विस्तारलेल्या आहेत. त्यामुळे संशोधनाने भाषेच्या इतिहासामध्येदेखील नवीन माहितीची भर पडत जाते. असेच मराठी भाषेच्या प्राचीनतेविषयी काही नवे संदर्भ पुढे आले आहेत. ते सर्व अभिजात मराठी भाषेच्या अहवालामध्ये आपणास पहावयास मिळतात. तत्पूर्वी आपण अभिजात भाषा म्हणजे काय हे जाणून घेऊया.

अभिजात भाषा म्हणजे ज्या भाषेला दोन हजार वर्षांचा इतिहास आहे व उत्तम वाङ्मय निर्मितीची परंपरा आहे. भाषेच्या या मौलिकतेबरोबरच अखंडपणे तिचा प्रवास सुरू राहिलेला आहे. अशा भाषांना भारत सरकार 'अभिजात भाषे'चा दर्जा देते. केंद्र सरकारने आत्तापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम, ओडिया आणि प्राकृत या सात भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. ३ ऑक्टोंबर, २०२४

साली तो मराठी भाषेलाही मिळाला. या दर्जामुळे त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळते. भाषेची प्रतिष्ठा वाढते. भाषेच्या श्रेष्ठतेवर राजमान्यतेची मोहोर उमटते. भाषेच्या विकास कार्यास अधिक चालना मिळते. त्यामुळे रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने मराठी भाषेच्या प्राचीनतेविषयी नव्याने संशोधन करून पुढील पुरावे सादर केले आहेत त्याचा थोडक्यात उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल. या समितीने मराठी जन्मकाळ दुसऱ्या शतकातील मानलेला आहे.

गाथासप्तशती : मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ 'गाथासप्तशती' हा सुमारे २००० वर्षे जुना आहे. महाराष्ट्र या देशनामापेक्षा महाराष्ट्री भाषा जुनी आहे, अश्मक, कुंतल, अपरान्त, विदर्भ या प्रदेशात प्राकृत महाराष्ट्री प्रचारात होती. इतकेच नाही तर सातवाहनांच्या राजवटीत (इ. स. पूर्व २ रे शतक ते इ. स. २ रे शतक) त्यांचा राज्यविस्तार कुरुक्षेत्र, पेशावर इथपर्यंत झाल्यामुळे ती भारताच्या बऱ्याच मोठ्या भूभागात प्रचलित होती. म्हणूनच 'गाहासत्तसई' उर्फ 'गाथासप्तशती' या हालसातवाहन राजाने संकलित केलेल्या गाथांच्या प्रतींची हस्तलिखिते देशभर अनेक ठिकाणी सापडलेली आहेत. प्राचीन महाराष्ट्रीचा व जुन्या मराठीचा परिचय असलेल्या कोणाही मराठी वाचकास 'गाथासप्तशती' ग्रंथ समजायला विशेष कठीण जाणार नाही.

कालखंड : महाराष्ट्री भाषेतल्या सप्तशती या हालसातवाहन राजाच्या ग्रंथाचा काळ विन्सेन्ट स्मिथच्या मतानुसार इ. स. ४६८ आहे. याकोबीच्या मतानुसार हालाचा काळ इ. स. ४६७ तर मॅक्डोनेलच्या मतानुसार इ.स १००० आणि वेबरच्या मतानुसार तिसरे शतक ते सातवे शतक असा आहे. म्हणजेच, आपण ढोबळ मानाने हालाचा काळ दुसरे शतक असेल असे म्हणू शकतो.

शिलालेख : मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षांपूर्वीचा आहे. तो ब्राह्मी लिपीतील असून तो पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळच्या नाणेघाटातील आहे. या शिलालेखात 'महारठिनो' असा स्पष्ट उल्लेख आहे.

महाराष्ट्र : इ. स.च्या ६ व्या शतकात होऊन गेलेला 'दण्डी' कवी म्हणतो, 'महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः।' (काव्यादर्श १.३४) यात अपेक्षित असलेला 'महाराष्ट्र' म्हणजे आजचा भौगोलिक महाराष्ट्र नसून, त्यात महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश व गुजरात या प्रदेशांमधले काही भाग समाविष्ट होते. एकंदरीत, महाराष्ट्री भाषा भारतातल्या मोठ्यात मोठ्या प्रदेशातील जास्तीत जास्त लोकांना समजत होती.

डॉ. ए. एम. घाटगे : जैन लेखक हरीभद्राच्या जैन महाराष्ट्रीस 'अभिजात' असे संबोधतात. आठव्या शतकात जर महाराष्ट्री भाषेने अभिजात हा दर्जा मिळवला असेल तर त्याच महाराष्ट्रीतून बनलेल्या मराठीचे अभिजातत्त्व वस्तुतः जन्मसिद्धच म्हणावे लागेल. महाराष्ट्री भाषा अपभ्रंश अवस्थांतून गेल्यावर ज्या रूपात अवतरली ती आधुनिक मराठी होय.

महाराष्ट्री, अपभ्रंश आणि मऱ्हाठी भिन्न नसून काल आणि व्यवहार यांच्या योगाने पालटत जाणाऱ्या एकाच भाषेची ही तीन रूपे आहेत किंवा तीनही मिळून एकच भाषा आहे. जिला पूर्वी महाराष्ट्री म्हणत

तिलाच दहाव्या, अकराव्या शतकात मऱ्हाटी म्हणू लागले. म्हणजेच महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि मराठी या तीन वेगवेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची तीन रूपे आहेत. त्यामुळे प्राचीन महारट्टी, मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा असा मराठीचा प्रवास आहे. हे अभिजात भाषा समिती अहवालाने पुराव्यानिशी सादर केले आहे. प्रा. अमृत माधव घाटगे (१९१३ ते २००३) भारतविद्याशास्त्रज्ञ होते.

१.३ समारोप

मराठी भाषेच्या उत्पत्तीचा अभ्यास करताना आपण मराठी भाषा ज्या प्रदेशात बोलली जाते तेथील भौगोलिक रचना व प्राचीन महाराष्ट्राच्या वसाहतकालाचा परिचय करून घेतला. तसेच मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक असणारी पारंपरिक मते सविस्तरपणे अभ्यासली. मराठीचा उगमकाळ सांगणारे शिलालेख आणि ताम्रपट यांचाही आढावा घेतला. तसेच अभिजात मराठी भाषा समितीच्या अहवालातील मराठी भाषेच्या प्राचीनतेविषयीची माहिती देणारे सिद्धांत अभ्यासले. यावरून आपल्या हे लक्षात येते की भाषेचा प्रवास अखंडपणे चालू असतो. प्रत्येक कालखंडामध्ये तिचे रूप बदलते व ती वेगळ्या नावाने ओळखली जाते. भाषेच्या या ऐतिहासिक अभ्यासामध्ये अगदी कमी तोकड्या पुराव्यांवरून आपल्याला निष्कर्ष काढावे लागतात. परंतु सतत सुरू असणाऱ्या संशोधनाने भाषेचा इतिहासदेखील बदलतो व काही नवे पुरावे, नवी माहिती आपल्या हाती लागते.

१.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

भाषाकुल संकल्पना (Language Family) **:** एकाच मूळ स्रोतातून किंवा पूर्वज भाषेपासून (Ancestor language) उत्क्रांती पावलेल्या भाषांचा समूह होय. या संकल्पनेनुसार, समान शब्दावली, व्याकरण आणि रचनेच्या आधारे भाषांचे गट पाडले जातात. हे भाषांचे 'कुलनिष्ठ' वर्गीकरण असून, त्यातून भाषेचा वंशवृक्ष (Family tree) तयार केला जातो.

तत्सम शब्द : संस्कृत भाषेतील शब्द मराठीत जसेच्या तसे वापरले जाणे.

पिजिन भाषा (Pidgin) **:** ही दोन किंवा अधिक भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये, तात्पुरत्या गरजेपोटी (उदा. व्यापार, वसाहत) विकसित झालेली एक संकरित आणि सरलीकृत संदेशन भाषा आहे. ही कोणाचीही मातृभाषा नसते, तर ती समजून घेण्यासाठी दोन वेगळ्या भाषिक गटांमधील दुवा म्हणून काम करते.

क्रिऑल भाषा (Creole) **:** भाषा म्हणजे दोन किंवा अधिक भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली एक नवीन, स्वतंत्र आणि पूर्ण विकसित भाषा होय. जेव्हा वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक (उदा. वसाहतवादी, व्यापारी किंवा गुलाम) दीर्घकाळ एकत्र राहतात, तेव्हा संवादासाठी त्यांची एक मिश्र बोली तयार होते, जिचे कालांतराने स्थिर भाषेत रूपांतर होते.

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

योग्य पर्याय निवडा.

१. भाषेच्या उत्पत्तीविषयीचा अभ्यास भाषाविज्ञानातील कोणत्या अभ्यास पद्धतीद्वारे केला जातो?

अ) वर्णनात्मक ब) ऐतिहासिक

क) संरचनात्मक क) व्यावहारिक

२. भाषेचा वंशवृक्ष दाखवणाऱ्या भाषाकुलामध्ये एकूण किती भाषाकुलांचा समावेश होतो?

अ) १८ ब) १५

क) २२ ड) २४

३. मराठी ही भाषा कोणत्या भाषा कुलातील आहे?

अ) द्राविड ब) इंडोयुरोपियन

क) सिनोतिबेटियन ड) युरोपीयन

४. 'महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र' अशी महाराष्ट्राची उत्पत्ती कोणी सांगितली?

अ) विल्सन ब) रा.गो. भांडारकर

क) शं. बा.जोशी ड) साऊथवर्थ

५. 'मराठी भाषा उद्गम व विकास' या ग्रंथाचे लेखक कोण?

अ) रा. भि. जोशी ब) कृ. पां. कुलकर्णी

क) शं. गो. तुळपुळे ड) मिलिंद मालशे

६. 'मराठी ही क्रिओलाईज्ड प्राकृत भाषा आहे.' असे मत कोणी मांडले?

अ) स्टेन कौनो ब) साऊथवर्थ

क) इ्यूल ब्लोक क) वि. का. राजवाडे

७. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केव्हा मिळाला?

अ) ३ ऑक्टोबर, २०२४ ब) २७ फेब्रुवारी, २०२३

क) १ मे, २०१३ ड) १ मे, १९६०

८. मराठी अभिजात भाषा समितीच्या अहवालानुसार मराठीचा जन्मकाळ इसवी सनाचे कितवे शतक मानण्यात आला आहे?

अ) आठवे शतक — ब) दुसरे शतक

क) पाचवे शतक — ड) सातवे शतक

९. जुन्नर जवळील नाणेघाटातील शिलालेख कोणत्या लिपीमध्ये आहे?

अ) ब्राह्मी — ब) देवनागरी

क) सकळा — ड) मोडी

१०. मुकुंदराज यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

अ) लीळाचरित्र — ब) विवेकसिंधू

क) रुक्मिणीस्वयंवर — ड) धवळे

उत्तरे : १. ऐतिहासिक २. १८ ३. इंडोयुरोपियन ४. विल्सन ५. कृ. पां. कुलकर्णी ६. साऊथवर्थ ७. ३ ऑक्टोबर, २०२४ ८. दुसरे शतक ९. ब्राह्मी १०. लीळाचरित्र

१.६ सरावासाठी प्रश्न

अ) लघुत्तरी प्रश्न

१. मराठीतील प्राचीन ग्रंथ म्हणून 'गाथासप्तशती' या ग्रंथाविषयी माहिती लिहा.

२. होर्न्ले यांनी मांडलेला अंतर्वर्तूळ – बहिर्वर्तूळ सिद्धांत स्पष्ट करा.

३. मराठीतील वैद्य-गुणे वादाचा चिकित्सक आढावा घ्या.

४. मराठी भाषेचा भूगोल वर्णन करा.

५. प्राकृत भाषा कोणत्या ते सांगून त्याचे विशेष लिहा.

आ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. मराठी भाषेच्या उगमकाळाविषयी असणाऱ्या विविध मतांचा सविस्तर परामर्श घ्या.

२. मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक मतांचा सविस्तर आढावा घ्या.

३. अभिजात भाषा म्हणजे काय ते सांगून मराठी भाषेची अभिजात परंपरा सविस्तर लिहा.

४. मराठी भाषेतील शिलालेखांचा परिचय द्या.

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. कुलकर्णी, आरती (२००९): भाषाविज्ञान संकल्पना आणि स्वरूप, विजय प्रकाशन, नागपूर

२. गवळी, अनिल (२०१८) : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर

३. जोगळेकर गं. ना. (२०२५) : मराठी भाषेचा इतिहास, श्री विद्या प्रकाशन, पुणे

४. व्हटकर अशोक (२०२१) : संस्कृत प्राकृत (मराठी) भाषाविज्ञान, खंड पहिला, मधुराज पब्लिकेशन प्रा. लि. पुणे

५. अभिजात मराठी भाषा समिती अहवाल, २०१३

❑❑❑

घटक २

भाषिक परिवर्तन प्रक्रिया

२.० उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो, भाषिक परिवर्तन हा भाषेच्या अभ्यासातील महत्त्वाचा घटक असून त्याच्या अभ्यासातून तुम्हाला पुढील उद्दिष्ट्ये प्राप्त होतील;

- भाषिक परिवर्तन प्रक्रियेचे आकलन होईल.
- स्वन परिवर्तन आणि त्याच्या प्रकारांचे ज्ञान होईल.
- स्वन परिवर्तनाची कारणे समजतील.
- अर्थप्रक्रिया आणि अर्थ परिवर्तन प्रकारांचे ज्ञान होईल.
- अर्थपरिवर्तनामागील कारणे ज्ञात होतील.

२.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, भाषेच्या शिस्तशीर अभ्यासासाठी भाषाविज्ञानाचा आधार घेणे आवश्यक आहे. भाषाविज्ञानात या अभ्यासपत्रिकेच्या तयारीसाठी यापूर्वी पाचव्या सत्रात आपण भाषेचे स्वरूप, भाषाविषयक दृष्टिकोन, वर्णनात्मक भाषाविज्ञान आणि भाषाविज्ञान व इतर अभ्यासक्षेत्रे यांतील सहसंबंध या घटकांचा अभ्यास केला आहे. या सत्रात मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करावयाचा आहे. या अगोदरच्या प्रकरणात त्या दृष्टीने मराठीच्या उत्पत्ती संदर्भातील माहिती आपण जाणून घेतली आहे. प्रस्तुत प्रकरणात ध्वनी आणि अर्थ पातळीवरील कार्य, परिवर्तन, परिवर्तनाचे प्रकार आणि परिवर्तनामागील कारणांचा अभ्यास करावयाचा आहे.

माणूस हा समाजशील प्राणी असून त्याच्या समूहस्वरूपाला भाषेमुळे सामाजिक अधिष्ठान लाभले आहे. भाषा हे इतर प्राण्यांहून असलेले मानवाचे वेगळेपण आहे. समाजाच्या प्रवाहानुसार भाषा बदलत राहते. ती जिवंत संस्था असल्याने सजीवाप्रमाणेच वाढ आणि बदल हे तिचे गुणविशेष आहेत. भाषेचे ध्वनी, शब्द, रूप, अर्थ, वाक्य या प्रत्येक पातळीवर सामाजिक घटकांनुसार निश्चित कार्य सुरू असते. समाजाच्या बदलाबरोबर भाषेतही बदल होतात. ती प्रवाही राहिली तरच समाजाच्या गतीबरोबर जुळवून घेईल; अन्यथा ती निरुपयोगी ठरून मृतवत होईल. भाषेच्या प्रवाहीपणामुळे उपरोक्त घटकांमध्ये अंशतः किंवा पूर्णतः बदल होतात. भाषिक घटकांतील बदलांना भाषिक परिवर्तन असे म्हटले जाते.

जगभरातील सर्व भाषांमध्ये सातत्याने, दीर्घकाळ परंतु मंदगतीने परिवर्तन होत असते. ध्वनी ते अर्थ अशा सर्वच पातळ्यांवर ते सर्वकाळ सुरू असते. मराठी भाषेतही अशा प्रकारचे परिवर्तन झाल्याचे आढळते. अभ्यासाच्या सोयीसाठी मराठी भाषेचे यादवपूर्व काल, यादवकाल, शिवकाल, पेशवेकाल, इंग्रजी राजवट, स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ अशी विभागणी केली जाते. या विभागणीनुसार यादवपूर्व

काळातील भाषिक रूपे मध्ययुगीन शिवकाल अथवा पेशवेकाळात सापडत नाहीत. यादवकालीन ज्ञानेश्वरीतील रूपे इंग्रजी राजवटीतील मराठी साहित्यात बदललेली दिसून येतात. पेशवेकाळातील संस्कृतचा प्रभाव स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी साहित्यात आढळत नाही. अगदी स्वातंत्र्यादरम्यानची मराठीत प्रचलित भाषिक रूपे वर्तमान मराठीत प्राचीन स्वरूपाची भासतात.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठी भाषेतील ध्वनी पातळीवरील स्वन परिवर्तन प्रक्रिया, तिचे प्रकार व त्यामागील कारणे यांचा पहिल्या भागात अभ्यास करावयाचा आहे. दुसऱ्या भागात अर्थ प्रक्रियेचे स्वरूप, अर्थ परिवर्तन प्रकार व त्यामागील कारणांचा वेध घ्यावयाचा आहे. मराठी भाषेत सुरुवातीपासून ध्वनी ते वाक्यविचार या सर्व पातळ्यांवर परिवर्तने झालेली आहेत. त्यातील ध्वनी परिवर्तन (भाषावैज्ञानिक दृष्टीने स्वन परिवर्तन) आणि अर्थ परिवर्तन या प्रक्रियांचा अभ्यास आपल्याला या प्रकरणात सविस्तर करावयाचा आहे.

२.२ विषय विवेचन

मानवी भाषेची रचना ध्वनी आणि अर्थ अशी द्विस्तरीय स्वरूपाची असते. मानवी मुखावाटे शेकडो ध्वनी उच्चारले जाऊ शकतात. मात्र विशिष्ट भाषिक समुदायाकडून त्यांतील काही मोजकेच ध्वनी भाषेत वापरले जातात. जे ध्वनी त्या भाषेतील बहुसंख्य लोकांकडून वारंवार वापरले जातात, अशा ध्वनींना त्या भाषेचे मूलध्वनी किंवा वर्ण मानले जातात. ते संख्येने मोजके व निश्चित असतात. या मूलध्वनींना स्वतःचा अर्थ नसतो. ध्वनी ही भाषेची पहिली पातळी असून स्वतःचा अर्थ नसलेल्या मूलध्वनींच्या एकत्रीकरणातून अर्थपूर्ण रचना तयार केली जाते. सामान्य भाषेत अशा अर्थपूर्ण रचनेला शब्द, तर भाषाविज्ञानामध्ये रूप किंवा रुपिका असे म्हटले जाते. अर्थपूर्ण संवादासाठी भाषेच्या दृश्य पातळीवर शब्द किंवा रुपिका कार्यरत असतात. भाषेच्या सुरुवातीपासून ते विकसित अवस्थेपर्यंत या दोन्ही घटकांमध्ये सातत्याने परिवर्तने होत असतात. या दोन्ही पातळ्यांवरील परिवर्तन प्रक्रिया, प्रकार व कारणांचा आपणास स्वतंत्रपणे अभ्यास करावयाचा आहे. भाषेच्या ध्वनी पातळीवरील स्वन परिवर्तन प्रक्रियेपासून आपण त्याची सुरुवात करू.

२.२.१ स्वन परिवर्तन/ध्वनिपरिवर्तन

मानवी समूहाचे समाजात रूपांतर करणारे भाषा हे त्यांच्यातील संवादाचे माध्यम आहे, तर त्या भाषेचे ध्वनी हे माध्यमाचे साधन असते. इतर कोणत्याही सजीवांपेक्षा मानव मुखावाटे अधिक ध्वनींची निर्मिती करतो, तसेच त्यांचा विविधतेने वापरही करू शकतो. मानवेतर प्राण्यांना या दोन्ही बाबतीत मर्यादा आहेत. याबाबतचा सविस्तर विचार आपण 'भाषेचे स्वरूप' या प्रकरणात केला आहे. मानव अनेक ध्वनींचे उच्चारण करू शकत असला, तरी त्यापैकी काही मोजक्या ध्वनींचाच त्या भाषेतील बहुसंख्य लोकांकडून वारंवार वापर होत असतो. अशा मोजक्या ध्वनींना भाषेत मूलध्वनीचे स्थान लाभलेले असते. भाषावैज्ञानिक दृष्टीने त्यांना स्वन असे संबोधले जाते, हे यापूर्वी आपण पाहिले आहे. प्रत्येक भाषेच्या प्रवृत्तीनुसार त्यांच्या उच्चाराची विशिष्ट पद्धती असते. भाषावैज्ञानिक दृष्टीने या प्रक्रियेस उच्चारप्रक्रिया असे म्हटले जाते, तर तिच्यातील बदलांच्या प्रक्रियेस उच्चार परिवर्तन असे संबोधले जाते. उच्चार परिवर्तन, ध्वनी परिवर्तन आणि स्वन परिवर्तन हे पर्यायी संबोध एकाच अर्थाने वापरले जातात.

भाषेत योजला जाणारा मूलध्वनी किंवा वर्ण हा स्वतंत्र ध्वनी असतो. भाषेत वापरताना तो मोडतोड करणे, जोडणे अशा विविध भाषिक क्रियांद्वारे शब्दनिर्मितीत योजला जातो. त्याला स्वतःचा अर्थ नसला, तरी विविध भाषिक क्रियांमुळे तो शब्दाला अर्थप्राप्ती करून देतो किंवा शब्दाच्या अर्थात बदल करतो. अशा ध्वनीला त्या भाषेचा मूलध्वनी किंवा वर्ण मानला जातो. आधुनिक भाषाविज्ञानात त्याला स्वन असे म्हटले जाते. स्वन हा भाषावैज्ञानिकदृष्ट्या सर्वात लहान भाषिक घटक आहे. तो त्या भाषेपुरता स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण असतो. प्रत्येक भाषेतील स्वनाचा वापर त्या भाषेच्या घटनेनुसार होत असतो. विशिष्ट भाषेतील एकच स्वन कालानुरूप बदलत असतो. अनेक कारणांमुळे त्याच्या उच्चारात किंवा कार्यात फरक पडतो. या भाषिक प्रक्रियेस उच्चार परिवर्तन, ध्वनी परिवर्तन किंवा स्वन परिवर्तन असे म्हणतात. 'एका विशिष्ट काळी, एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या भाषेतील ध्वनी कालांतराने बदलतात, यालाच ध्वनी परिवर्तन असे म्हणतात', असे या अनुषंगाने ना. गो. कालेलकरांनी म्हटले आहे.

स्वन परिवर्तनाची प्रक्रिया अमर्याद, दीर्घकालीन आणि निरपवाद स्वरूपाची असते. उपलब्ध पुराव्यावरून त्याच्या भूतकालीन आणि वर्तमानकालीन रूपाचा शोध घेतला, तरी भविष्यकालीन रूपाविषयी निश्चित अंदाज बांधता येत नाही. स्वन परिवर्तनाचे काही विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. स्वन परिवर्तन निरपवाद असते

स्वन परिवर्तनाचा हा पहिला टप्पा असतो. परिवर्तन हे भाषेतील सर्व घटकांच्या पातळीवर होत असते. ते सर्व काळात होत असते. एका विशिष्ट परिस्थितीत असलेला वर्ण एका भाषेत विशिष्ट देशकालमर्यादेत विशिष्ट प्रकारानेच बदलतो; त्याच्यासारख्याच परिस्थितीतील इतर स्वनही त्याच्याप्रमाणेच बदलतात. असे परिवर्तन निरपवाद मानले जाते. उदाहरणार्थ; कर्ण → कण्ण → कान, पर्ण → पण्ण → पान

२. स्वन परिवर्तन अमर्याद असते

स्वन परिवर्तन सातत्याने सुरू असते. शब्दातील कोणताही घटक चिरस्थायी नसतो. सर्व भाषांमध्ये उच्चाराच्या पातळीवर अखंड परिवर्तन सुरू असल्यामुळे भाषा नित्यनूतन राहते.

३. स्वन परिवर्तन नियमित असते

प्रत्येक भाषेची वर्णमाला निश्चित ध्वनींनी बनलेली असते. तसेच तिची व्यवस्था सुसंवादी असते. स्वन परिवर्तनानंतर तिच्यात जरी बदल झाले, तरी ते विशिष्ट नियमांनीच होत असतात. परिवर्तन स्वतंत्र असले, तरी ते स्वैर स्वरूपाचे नसते. असे परिवर्तन भाषेच्या प्रवृत्तीनुसार विशिष्ट नियमांना धरून असल्यामुळे ते नियमित स्वरूपाचे असते, असे मानले जाते.

४. स्वन परिवर्तन अज्ञेय असते

भाषिक परिवर्तन ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. भाषिक परिवर्तनातील भूतकालीन ध्वनिरूप आणि वर्तमानरूप यांचा अभ्यास करून आपल्याला परिवर्तनाचा शोध घेता येतो; मात्र भविष्यकालीन परिवर्तनाविषयी अंदाज बांधता येत नाही. म्हणूनच त्याला अज्ञेय असे म्हटले जाते.

५. स्वन परिवर्तन नकळत घडून येते

भाषेतील ध्वनी अथवा स्वनांचे उच्चारबदल सूक्ष्म स्वरूपात व मंद गतीने सुरू असतात. ते तात्काळ लक्षात येत नाहीत. परिवर्तन खूप काळानंतर जाणवते. उच्चारात परिवर्तन निश्चितपणे होते; पण त्याचा कालावधी मोठा असल्याने ते त्या भाषिक लोकांकडूनच घडत असले, तरी त्यांच्या नकळत घडते, असे दिसून येते.

६. स्वन परिवर्तन आकलन क्षमतेच्या मर्यादेत होते

स्वन परिवर्तन सूक्ष्म व मंद गतीने होत असते. स्वनांच्या उच्चारात बदल घडला, तरी एकंदरीत शब्दाचा अर्थ कायम राहत असल्याने आशयाच्या अभिव्यक्तीवर फारसा फरक पडत नाही. स्वनाच्या उच्चारातील सूक्ष्म फरकाने भाषिक व्यवहार फारसा बदलत नाही. त्यामुळे उच्चार बदलला, तरी अर्थव्यवहार आकलनक्षम असतो. यामुळेच हे परिवर्तन आकलन क्षमतेच्या मर्यादेत होते.

७. स्वन परिवर्तन प्रवाही असते

स्वन परिवर्तन ही नियमित प्रक्रिया आहे. तिच्यातील बदलांचा कालावधी निश्चित स्वरूपाचा नसला, तरी गती मात्र सतत सुरू असते. प्रत्येक काळात कमी-अधिक प्रमाणात उच्चारात परिवर्तन सुरू असते. काळ बदलतो, समाजाचे राहणीमान, परिस्थिती, धारणा आणि वातावरण बदलते तसे उच्चारातही बदल होत जातात. ही प्रक्रिया निरंतर सुरू असते. यामुळेच स्वन परिवर्तन प्रवाही स्वरूपाचे असते, असे म्हणतात.

स्वन परिवर्तनाची कारणे

भाषिक परिवर्तन हे सर्वच भाषांचे महत्त्वाचे लक्षण आहे. भाषिक घटकांतील परिवर्तनामागे अनेक कारणे असतात. इ. स. १८२१ मध्ये जे. एच. ब्रेड्सडोर्फ या डॅनिश भाषावैज्ञानिकाने परिवर्तनाच्या मुळाशी असलेल्या पुढील कारणांचा निर्देश केला आहे :

१. श्रवण आणि आकलन यामध्ये घडणारी चूक

२. विस्मृती

३. वागिंद्रियातील दोष

४. आळस

५. सादृश्यतेकडील प्रवृत्ती

६. वेगळेपणा दर्शविण्याची इच्छा

७. नवीन कल्पना व्यक्त करण्याची आवश्यकता

८. परभाषा अथवा परकियांचा प्रभाव

या कारणांबरोबरच इतर महत्त्वाच्या कारणांचा सविस्तर आढावा घेऊ.

१. आळस

आळस हा मानवी स्वभावातील दुर्गुण मानला जाणारा विशेष आहे. शक्य तितक्या कमी श्रमात जास्तीत जास्त कार्य साधण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. बोलण्याच्या सहज प्रक्रियेतही माणसाची ही प्रवृत्ती दिसून येते. आळसामुळे उच्चार करण्यासाठी वापरली जाणारी इंद्रिये आणि श्वास यांच्या वापरात ढिलाई निर्माण होते. यामुळे ध्वनींच्या उच्चारात भ्रष्ट रूपे निर्माण होतात. यामुळे कधी शब्दांची लहान रूपे तयार होतात.

उदाहरणार्थ; भक्त → भगत, कृष्ण → किशन

तर कधी उच्चारणसुलभ, सोपी रूपे तयार होतात.

उदाहरणार्थ; टेलिफोन → फोन, राजेंद्र → राजू

स्वन परिवर्तन प्रक्रियेत आळस हा मानवी स्वभावातील विशेष वाईट अर्थाने न घेता, उच्चारणातील श्रम व वेळेची बचत, ध्वनींची उच्चारणसुलभता आणि सर्वांसाठी सोपी शब्दरूपे तयार करणे त्याच्यामुळे शक्य होते, असे मानण्यास हरकत नाही.

२. अनुकरण अपूर्णता

मानवी भाषा शिकण्यात अनुकरण ही महत्त्वाची पद्धती आहे. भाषा अवगत झाल्यानंतरही ही पद्धती पुढे सतत सुरू असते. प्रत्येक व्यक्तीच्या प्रवृत्तीनुसार उच्चारांचे स्वरूप भिन्न असते. समाज आणि व्यक्तींच्या अनुकरणातून माणूस भाषा शिकत आणि वापरत असतो. जेव्हा अनुकरण तंतोतंत बरोबर असते, तेव्हा उच्चार प्रक्रिया आहे तशीच होते. मात्र अनुकरणात अपूर्णता आल्यास स्वनांच्या रूपातही बदल होतो. जेव्हा तो व्यक्तीपातळीवरून व्यापक समाजपातळीवर होतो, तेव्हा स्वन परिवर्तन अटळ असते. विशेषतः परकीय भाषा शिकताना असे उच्चारांतील फरक व्यापक प्रमाणावर प्रसारित होतात आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर स्वन परिवर्तन होते. उदाहरणार्थ; बडोदा → बरोडा, पणजी → पंजीम्

३. आघात

शब्दांच्या रचनेनुसार त्यातील ध्वनींच्या उच्चारांची निश्चित पद्धती आणि त्यावरील आघात त्या भाषिकांच्या प्रवृत्तीनुसार निश्चित असतात. शब्दांच्या संरचनेच्या पातळीवर विशिष्ट ठिकाणी आघात अपेक्षित असतो; मात्र तो सोयीनुसार बदलला जातो. त्यामुळे स्वनाचे रूप बदलते.

उदाहरणार्थ; इचलकरंजी → इच्चलकरंजी, निपाणी → निप्पाणी / लिप्पाणी

४. हवामान आणि देशपरिस्थिती

मानवी भाषेच्या उच्चारावर हवामान आणि देशपरिस्थितीचा परिणाम होत असतो. सपाट मैदानी प्रदेश, डोंगराळ प्रदेश, समुद्रकिनारी प्रदेश, अतिथंड हवामानाचा प्रदेश अशा विविध ठिकाणी भाषेतील ध्वनींचा वापर आणि उच्चारांची पद्धती यामध्ये फरक असल्याचे दिसून येते. एकाच भाषिक प्रदेशात भौगोलिकता आणि हवामान यामध्ये बदल असल्यास ध्वनीवापराचे प्रमाण आणि पद्धती यामध्ये फारच अंतर असते. ऑस्टॉफ या भाषाशास्त्रज्ञाने हवामान आणि देशस्थितीचा उच्चारावर परिणाम होतो, असे प्रतिपादन केले आहे.

महाराष्ट्रातील पुणे परिसरातील भाषेतील मृदू व्यंजने, सोलापूर-कोल्हापूर परिसरात वापरली जाणारी कठोर व्यंजने आणि कोकण किनारपट्टीवर होणारे नासिक्य उच्चार याकडे पाहिल्यास हवामानाचा आणि देशपरिस्थितीचा स्वनांच्या उच्चारावर परिणाम होतो, हे स्पष्ट होते. एकाच मराठी भाषेतील स्वनांच्या उच्चारांतील हे एकाच काळातील वेगळेपण प्रत्ययास येते.

दुर्गम परिसरातील लोकांचे उच्चार स्पष्ट व कर्कश असतात, समशीतोष्ण प्रदेशात राहणाऱ्या लोकांचे उच्चार नरम व मृदू असतात, तर अतिथंड प्रदेशातील लोकांचे उच्चार अस्पष्ट असतात. यामुळे समान भाषिक लोकांचे उच्चार हवामान आणि देशपरिस्थितीनुसार वेगळे होत असतात.

५. आनुवंशिक गुण

भाषेच्या उच्चारणात मानवी शरीराची रचना महत्त्वाची भूमिका बजावत असते. ध्वनी उच्चारासाठी मानवी शरीरातील ज्या इंद्रियांची आवश्यकता असते, त्यांची रचना मानवी समाजाच्या अनुवंशाप्रमाणे वेगवेगळी असते. त्यामुळेच त्यांच्या रचनेनुसार उच्चारांची पद्धतीही बदलते. ब्रिटिशांची इंग्रजी आणि भारतीयांच्या वापरातील इंग्रजी शब्द आणि व्याकरणदृष्ट्या समान असले, तरी उच्चारदृष्ट्या त्यांमध्ये जमीन-अस्मानचे अंतर आहे. ब्रिटिशांच्या इंग्रजीत अस्पष्ट उच्चारांचे प्रमाण अधिक आहे, तर भारतीयांच्या इंग्रजीत कठोर वर्ण आणि स्पष्ट उच्चारांचे प्राबल्य आहे.

उदाहरणार्थ; Colonel → कर्नल

६. वागिंद्रियातील दोष

उच्चारासाठी मानवी शरीरातील जी इंद्रिये वापरली जातात, त्यांना वागिंद्रिये असे म्हटले जाते. ओठ, दात, जीभ, घसा, फुफ्फुसे यांच्या सामान्य रचनेत बदल झाला की उच्चारात बदल होतो. अर्थात हे बदल व्यक्तीपातळीवर असले, तर ठराविक व्यक्तींच्या स्वनउच्चारात बदल होतो; मात्र ते विशिष्ट समुदायाच्या चालीरीती अथवा व्यापक घडामोडींमुळे बदलल्यास स्वन परिवर्तन घडून येते.

उदाहरणार्थ, प्रभाकर फ पबाकर हे व्यक्तिगत पातळीवरील स्वन परिवर्तन आहे; तर याओ जातीत स्त्रियांच्या ओठांआड लाकडाचा जाड तुकडा ठेवण्याच्या प्रथेमुळे त्या भाषेत /फ/ या स्वनाचा लोप झाला आहे. हे व्यापक समाज पातळीवरचे स्वन परिवर्तन आहे.

७. उच्चारशीघ्रता

ध्वनींच्या उच्चाराचा अवधी निश्चित असतो. तो अर्थदृष्ट्या निर्णायकही असतो; मात्र काही प्रसंगी व्यक्ती वैयक्तिक अथवा सामुदायिकदृष्ट्या अनेक कारणांनी तो अवधी कमी करतात. अशावेळी शब्दांतील स्वर अथवा मृदू व्यंजने लोप पावतात. त्यामुळे शब्दांची लघुरूपे तयार होतात.

उदाहरणार्थ, महाराज → म्हाराज

समाजातील अधःस्तरातील लोक, छोटे व्यावसायिक, गर्दीच्या ठिकाणी वावरणारे समुदाय हे अनेक वेळा शीघ्रतेने उच्चार करतात. त्यामुळे शब्दांची लघुरूपे तयार होतात. या पाठीमागे उच्चारशीघ्रता हे कारण असते.

८. जित-जेते संबंध

सत्तासंघर्षात भिन्न भाषिक लोकांचा जित-जेते संबंधाने एकमेकांशी संपर्क येतो, तेव्हा दोघांच्याही भाषेत आदान-प्रदान होते. जेते सत्ता टिकवण्यासाठी पराभूतांची भाषा आत्मसात करू पाहतात, तर पराभूत उच्चस्तर प्रभावाने जेत्यांचे अनुकरण करतात. शासनकर्त्या जेत्यांची भाषा राज्यकारभार आणि समाजव्यवहारात प्रभावी ठरते. त्यामुळे पराभूतांच्या भाषेवर तिचा परिणाम जाणवतो. साहजिकच उच्चार अथवा लेखनातही त्याचे प्रतिबिंब दिसून येते.

उदाहरणार्थ, वेरूळ → एलोरा, बुद्ध → बुद्धा, बेळगाव → बेलगाम्,

धर्मेंद्र →धर्मेंद्रा (इंग्रजी), धरमिंदर (पंजाबी)

९. अज्ञान

भाषेतील बहुतांश घटकांचे नियमन सर्व समाजपातळीवर होत असले, तरी काही संकेतांची निर्मिती अभिजनांकडून होत असते. समाजात अभिजनांची संख्या कमी असते, तर बहुजन हा मोठ्या संख्येचा समुदाय असतो. काही संकेतांचे त्याला भाषिक ज्ञान नसल्याने तो अज्ञानाने त्यांचे चुकीचे अनुकरण करतो. त्यामुळे त्या शब्दातील काही उच्चारांचे, अर्थातच स्वनांचे परिवर्तन होते.

उदाहरणार्थ, धर्म → धम्म

यातील मूळ 'धर्म' हा शब्द 'धारयती इति धर्मः' म्हणजेच जो धारण केला जातो तो धर्म, अशी त्याची फोड आहे. पण यातील 'र'चा लोप करून 'धम्म' हा त्याच अर्थाचा वेगळा संबोध तयार केला गेला आहे.

१०. लोकभ्रम

समाजाच्या काही धारणा भाषिक उच्चारणात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. भाषा-संकरातून काही नवे शब्द येतात; पण त्यातील विशिष्ट ध्वनिरचना काही सामाजिक कल्पना स्वीकारत नाहीत. अशावेळी विशिष्ट स्वनांमध्ये बदल करून नवीन शब्द तयार केला जातो.

उदाहरणार्थ, गोभी → गोबी → कोबी

हिंदी भाषेतील 'गोभी' मराठीत 'गोबी' असा येणे आवश्यक असताना, त्यातील 'गो' हा स्वन 'गायदर्शक' असल्याने आहारातील पदार्थाला ते नाव टाळले आहे.

११. सादृश्यता

शब्दांचा उच्चार करताना उच्चारसाधर्म्य असलेल्या शब्दानुसार एखाद्या शब्दात बदल होऊन त्या शब्दात मुळातच नसलेला एखादा स्वन येतो किंवा लोप पावतो व मूळ शब्दाहून उच्चारदृष्ट्या वेगळा शब्द तयार होतो; त्यामागे सादृश्यता हे कारण असते.

उदाहरणार्थ, ऑक्टोबर – ऑक्टोंबर

मूळ इंग्रजी उच्चारामध्ये अनुस्वार नाही; मात्र त्याच्या अगोदरच्या September आणि नंतरच्या November मध्ये 'ं' हा स्वन असल्याने, त्यांच्यामधील 'ऑक्टोबर'मध्येही तो साधर्म्याने येऊन 'ऑक्टोंबर' असे त्याचे उच्चारस्वरूप झाले आहे.

१२. भावुकता

दैनंदिन भाषेतील सामान्य शब्द भावुकतेची जोड दिल्याने उच्चारदृष्ट्या वेगळे होतात. लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि खाजगी नात्यांमध्ये अशा प्रकारचे शब्द जाणीवपूर्वक उच्चारले जातात. ग्रंथनिर्मितीत रसनिर्मिती, श्रद्धाभाव अशा कारणांनीही शब्दांची भावुक रूपे घडवली जातात. ज्ञानेश्वरीतील उकारांत रूपे हे त्याचे अत्यंत चांगले उदाहरण म्हणता येईल. दैनंदिन जीवनात लबाड – लब्बाड, सोन्या – सोनुल्या, शोनुल्या असे अनेक लडिवाळ शब्द प्रत्ययास येतात.

१३. उच्चारसौकर्य

भाषा ही परिवर्तनशील असते, तर भाषिक हा सुलभीकरणाचे तत्त्व पाळतो. तो भाषेकडे साधन म्हणून पाहत असल्यामुळे कमीत कमी श्रम व वेळ वापरून सोपे उच्चार करण्याचा प्रयत्न करत असतो. सामान्य भाषिक भाषेच्या नियमापेक्षा तिच्या सुलभ वापराकडे लक्ष देत असल्यामुळे कठीण उच्चारापेक्षा सोप्या शब्दरूपाकडे त्याचा अधिक कल असतो. यामुळेच अनेक सुलभ शब्दरचना तयार झाल्या आहेत.

उदाहरणार्थ, भ्रातृ – भाऊ,   स्त्री – अस्तुरी

भाषेत होणाऱ्या स्वनांच्या उच्चारातील परिवर्तनामध्ये वरील कारणे कारणीभूत असतात. त्यांच्या बरोबरीने आहार, बदलती समाजव्यवस्था, भिन्न संस्कृतींचे मिश्रण, सामाजिक चालीरीती अशी विविध कारणेही कार्यरत असतात. यामुळे शब्दातील विशिष्ट ध्वनी किंवा स्वन परावर्तित होऊन नव्या उच्चाराचा शब्द तयार होतो. या कारणांमुळे स्वनांचे परिवर्तन होते, हे आपण आतापर्यंत पाहिले आहे. आता त्यांचे प्रकार पाहू.

स्वनपरिवर्तन : प्रकार

भाषिक परिवर्तन ही कायम चालणारी प्रक्रिया असून ध्वनींच्या उच्चारात उपरोक्त कारणांनी विविध पद्धतींनी परिवर्तन होते. त्यातील प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे :

१. गुण

शब्दातील मूळ स्वन इ, उ, ऋ, यांच्या ऐवजी ए, ओ, अर्, अल् असा बदल होतो, तेव्हा अशा स्वनपरिवर्तनाच्या प्रकारास गुण असे म्हणतात. उदाहरणार्थ, सिंदूर - शेंदूर, शुण्ड - सोंड, तुण्ड - तोंड

२. वृद्धी

जेव्हा अ, इ, उ, ऋ, यांच्याऐवजी आ, ऐ, औ, आर्, आल् असे स्वनपरिवर्तन होते, तेव्हा त्यास वृद्धी असे म्हणतात. उदाहरणार्थ, बलिवर्द - बैल, महिषी - म्हैस

३. संप्रसारण

य्, व्, र्, ल् यांच्या ऐवजी जेव्हा इ, उ, ऋ असे स्वनपरिवर्तन होते, तेव्हा त्यास संप्रसारण असे म्हणतात. उदाहरणार्थ, व्यंजन - विंझण, द्विप्रहर - दुपार

४. लोप

मराठीतील अन्य अनुस्वारांचे किंवा स्वरांचे उच्चारण पूर्वी केले जात असे; मात्र कालांतराने दुर्लक्ष किंवा वारंवार वापर न झाल्याने हे शेवटचे स्वर, अनुनासिक किंवा अंत्यव्यंजन अनेक कारणांनी लोप पावले. या स्वनांच्या उच्चारपरिवर्तनाचा 'लोप' हा प्रकार मानला जातो. त्यांच्या ठिकाणावरून अंत्यलोप, आदिलोप असे प्रकार पडतात.

अ) अंत्यलोप : शेवटच्या स्वर किंवा व्यंजनाचा लोप

उदाहरणार्थ, मानस - मन, जगत् - जग, मूलक - मूल

ब) मध्यस्वर किंवा व्यंजनलोप : मधील स्वर किंवा व्यंजनाचा लोप

उदाहरणार्थ, दुग्ध - दूध, श्रेष्ठ - शेठ, ज्येष्ठ - जेठ

क) आदिलोप : सुरुवातीच्या स्वर किंवा व्यंजनाचा लोप

उदाहरणार्थ, स्थाली - थाळी, स्थान - ठाण

५. स्वरागम

उच्चारदृष्ट्या कठीण शब्दातील संयुक्त वर्णाचा उच्चार सुलभ व्हावा म्हणून एखादा अधिकचा स्वर मिसळला जातो आणि तो शब्दाच्या आधी येतो, तेव्हा स्वरागम हा स्वनपरिवर्तनाचा प्रकार होतो.

उदाहरणार्थ, स्क्रू – इस्क्रू, स्त्री – अस्तुरी, स्टो – इस्टो

ज्यावेळी उच्चार सोपा करण्यासाठी शब्दाच्या मध्ये स्वर येतो, त्याला मध्यस्वरागम असे म्हणतात.

उदाहरणार्थ, भक्त – भगत, रक्त – रगत, स्वर्ण – सुवर्ण

उच्चार सुलभीकरणासाठी शब्दाच्या शेवटी अधिकचे स्वर येऊन उच्चार लांबवला जातो, तेव्हा अंत्यस्वरागम होतो.

उदाहरणार्थ, कमल – कमले, बाळ – बाळा

६. समानवर्ण लोप

एखाद्या शब्दात एकच वर्ण पुन्हा पुनरावृत्त झाला, तर सुलभीकरणाच्या नैसर्गिक वृत्तीनुसार दोन वर्णांचा एकच वर्ण करून सोपा उच्चार तयार केला जातो. त्याला समानवर्ण परिहार किंवा समानवर्ण लोप असे म्हटले जाते.

उदाहरणार्थ, नाक + कटा – नकटा, नव + वर – नवरा, गुरे + राखी – गुराखी

७. सान्निध्य परिणाम

शब्दातील वर्ण उच्चारताना त्यावर शेजारील वर्णांच्या उच्चारांचा परिणाम होऊन एकत्रिकरणाने अगोदरचा किंवा नंतरचा वर्ण द्वित्त होतो, तेव्हा त्याला सान्निध्य परिणाम असे म्हटले जाते.

अ. पहिला वर्ण द्वित्त – पक्व – पक्का

ब. दुसरा वर्ण द्वित्त – सप्त – सत्त – सात

८. वर्णविपर्यय / वर्णव्यत्यास

शब्दांचे उच्चारण करताना शब्दातील मूळ वर्णांच्या जागांची अदलाबदल होऊन उच्चार बदलतो; मात्र मूळ शब्दाचा अर्थ तसाच राहतो. त्यावेळी वर्णविपर्यय किंवा वर्णव्यत्यास हा प्रकार होतो.

उदाहरणार्थ, चिकटणे – चिटकणे, डोकसे – डोसके, कवडसा – कडवसा

९. मात्राभेद

शब्दातील स्वरांचे उच्चार करताना त्यातील ऱ्हस्व स्वरांचा दीर्घ उच्चार किंवा दीर्घ स्वरांचा ऱ्हस्व उच्चार करण्याच्या प्रकाराला मात्राभेद असे म्हणतात.

उदाहरणार्थ, अ. ऱ्हस्व स्वरांचा दीर्घ उच्चार – लज्जा – लाज, कंटक – काटा

ब. दीर्घ स्वरांचा ऱ्हस्व उच्चार – नारंगी – नवरंगी, आभीर – आहिर

१०. घोषीकरण

या प्रकारात अघोष ध्वनींचे उच्चारण घोष ध्वनींसारखे होते.

उदाहरणार्थ, सकल - सगळे, शती - सदी, मकर - मगर

११. अघोषीकरण

उच्चारणाचा हा प्रकार घोषीकरणाच्या बरोबर उलट असून येथे घोष ध्वनी अघोष प्रकारात उच्चारले जातात.

उदाहरणार्थ, आदद - आदत, मदद - मदत, मेघ - मेख

१२. महाप्राणीकरण

शब्द उच्चारताना जेव्हा अल्पप्राण ध्वनींच्या जागी महाप्राण ध्वनी उच्चारले जातात, तेव्हा महाप्राणीकरण ही प्रक्रिया होते.

उदाहरणार्थ, बाष्प - वाफ, गृह - घर

१३. अल्पप्राणीकरण

या प्रकारात शब्दातील महाप्राण ध्वनींचे अल्पप्राण ध्वनींप्रमाणे उच्चारण होते.

उदाहरणार्थ, सिंधू - हिंदू, स्वादिष्ठ - स्वादिष्ट

१४. अतिशुद्धी

आपण इतरांपेक्षा वेगळे व श्रेष्ठ आहोत हे दाखवण्यासाठी काही शब्दांतील वर्ण जाणीवपूर्वक वेगळे उच्चारण्याची शैली अतिशुद्धी या प्रकारात येते.

उदाहरणार्थ, ऑफिस - हॉफिस,   खाट - कॉट

१५. दुष्प्रयोग

शब्दातील ध्वनींचे उच्चारण अजाणतेपणे केल्यामुळे शब्दांचा विपरीत उलट अर्थ प्रतीत होतो; त्यास दुष्प्रयोग असे म्हटले जाते.

उदाहरणार्थ, ब्राह्मण - बामण, इलेक्शन - विलेक्शन

अशा रीतीने आपण उच्चारप्रक्रिया, स्वनपरिवर्तनाची कारणे आणि प्रकार याविषयी माहिती घेतली. भाषाअंतर्गत आणि बाह्य कारणांनी स्वनांचे उच्चारण नेहमीच बदलत असते. त्यामुळे शब्दांचा अर्थ तोच राहिला, तरी रूपदृष्ट्या शब्द वेगळा दिसतो, हे यावरून आपल्या लक्षात आले असेल.

स्वनपरिवर्तनाचा भाषेवरील परिणाम

भाषेची घटना व स्वरूप समाजाभिमुख असल्याने ती समाजाप्रमाणेच परिवर्तनशील असते. भाषेतील ध्वनींचे उच्चारणही त्यामुळे परिवर्तनशील राहते. भाषा समाजसापेक्ष राहण्यासाठी तिच्यात बदल होणे अपरिहार्य असते. अर्थात हे परिवर्तन सूक्ष्म स्वरूपात, नकळतपणे आणि मंद गतीने घडत राहते; त्यामुळे ते आकलनक्षमतेच्या मर्यादेत असते.

स्वनपरिवर्तनामुळे शब्दरूपात बदल घडत असला, तरी अर्थ आणि व्याकरणरचनेस फारसा धक्का लागत नाही. बहुसंख्य जनसामान्यांच्या वापरातून भाषेतील कठीण वर्ण वगळले जाऊन शब्दांची उच्चारसुलभ रूपे स्वनपरिवर्तनातून तयार होतात. शब्दाची नवी रूपे, साम्यरूपे, नवे वाक्प्रयोग या परिवर्तनामुळे आकारास येतात. यामुळे भाषा-व्यवहार सुलभ होतो. भाषा नित्यनूतन व कालसुसंगत राहते.

२.२.२ अर्थपरिवर्तन

विद्यार्थी मित्रहो, या प्रकरणातील मागील भागात आपण भाषेच्या ध्वनी / वर्ण / स्वन या पहिल्या पातळीवरील परिवर्तन आणि त्यामागील कारणे या अनुषंगाने आढावा घेतला आहे. या भागात आपल्याला भाषेच्या पुढील टप्प्याचा, म्हणजेच ध्वनींच्या एकत्रीकरणातून अर्थनिर्मितीच्या पातळीवरच्या शब्दप्रक्रियेतील परिवर्तन आणि त्यामागील कारणांचा आढावा घ्यावयाचा आहे. अर्थाच्या पातळीवर शब्द हा महत्त्वाचा घटक असून शब्द आणि त्याचा अर्थ यामध्ये सामाजिक संकेत कारणीभूत असतात. शब्द आणि अर्थ यांतील संबंध थोडक्यात जाणून घेऊ.

अर्थप्रक्रिया

भाषा ही ध्वनींची बनलेली असते. ध्वनींचे अर्थपूर्ण समूह शब्द म्हणून ओळखले जातात. अर्थाच्या पातळीवर शब्द हा सर्वात लहान घटक असून भाषा-वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्याला पद किंवा रूप असे म्हटले जाते. कोणताही उपसर्ग अथवा प्रत्यय न लागता अर्थदृष्ट्या लहानात लहान भाषिक रचनेस पद, रूप किंवा शब्द असे म्हणतात.

शब्द आणि त्याचा अर्थ यामध्ये सामाजिक संकेत कार्यरत असतात. या संकेत-निर्मितीच्या कार्यात अगोदर वस्तू किंवा भाव उपस्थित असतात आणि नंतर त्यांचे शब्दाद्वारे संकेतीकरण केले जाते. अर्थाची एकच अशी व्याख्या करता येत नसली, तरी त्यामध्ये निर्देश, प्रतिमा, संकल्पना, विचार, भावना, कल्पना आदी घटक समाविष्ट असतात. शब्द आणि शब्दांचे अर्थ सामाजिक मान्यतेने रूढ होतात आणि ते समाजाद्वारेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. सामाजिक एकमत हेच शब्दार्थाचे अधिष्ठान होय.

भाषा ही संप्रेषणाची मुख्य शक्ती असून ते प्रभावी व्हावे म्हणून वक्ता आणि श्रोता दोन्ही सातत्याने कार्यरत असतात. अपेक्षित अर्थ व्यक्त करण्यासाठी प्रभावी शब्दयोजना व्हावी म्हणून वक्ता धडपडत असतो, तर समोर आलेल्या शब्दरचनेतून अर्थवाही, सौंदर्यपूर्ण आकलनासाठी श्रोता तत्परतेने प्रतिसाद देत असतो.

जगाच्या पाठीवरील सर्वच भाषांमध्ये या भाषिक धडपडीतून सातत्याने परिवर्तनशील अर्थप्रक्रिया घडत आली आहे. यातूनच नवी शब्दनिर्मिती आणि शब्दरचनेतील परिवर्तन सातत्याने घडून आले आहे. अर्थप्रक्रिया स्थलकालसापेक्ष असते. प्रस्तुत भागात अर्थपरिवर्तनाचे प्रकार आणि त्यामागील कारणांचा शोध घ्यावयाचा आहे.

अर्थपरिवर्तन : प्रकार

अर्थपरिवर्तन ही स्थलकालसापेक्ष प्रक्रिया असून तिचे सर्व प्रकार सार्वकालीन स्वरूपाचे आहेत. अर्थपरिवर्तनाचे उपप्रकार सविस्तर पाहू.

१. अर्थविस्तार

मूलतः मर्यादित अर्थाने वापरला जाणारा शब्द जेव्हा व्यापक पातळीवर सामान्यपणे अनेक संदर्भांत वापरला जातो, तेव्हा त्याचा अर्थविस्तार होतो. शब्दाच्या या परिवर्तनामध्ये त्याचे विशिष्टत्व जाऊन अर्थाचे सामान्यीकरण होते. शब्दाच्या अर्थकक्षा रुंदावतात. या प्रकारच्या भाषिक परिवर्तनात विशिष्ट शब्दाचे विशेषत्व बाजूला जाऊन त्यातील मूळ भाव इतर सर्वांचे विशेषत्व दर्शवितो. विशिष्ट अर्थाने वापरला जाणारा शब्द अनेक संदर्भांत वापरला जातो.

उदाहरणार्थ, 'गंगा' हे एका नदीचे विशेषनाम असून तिच्या पावित्र्यावरून जवळजवळ सर्वच नद्यांना 'गंगा' हे उपनाम जोडले गेले. 'कादंबरी' हा बाणभट्टाचा प्राचीन ग्रंथ; अलीकडे मराठीत स्वतंत्र कथात्मक गद्य वाङ्मयप्रकार या नावाने ओळखला जातो. व्यासपीठ, गोठा, निष्णात, प्रवीण हे विशिष्ट क्षेत्रातील शब्द अर्थविस्तार पावले आहेत.

२. अर्थसंकोच

जेव्हा मूळ शब्दाचा विस्तृत स्वरूपातील अर्थ संकुचित केला जातो, म्हणजेच व्यापक स्तरावर अनेक संदर्भांत वापरला जाणारा शब्द विशिष्ट मर्यादित अर्थाने वापरला जातो, तेव्हा त्या शब्दाचा अर्थसंकोच होतो.

उदाहरणार्थ, 'श्राद्ध' म्हणजे श्रद्धायुक्त अंतःकरणाने केलेली कोणतीही गोष्ट; पण सध्या हा शब्द फक्त मृत पितरांच्या तृप्तीसाठी केलेला विधी या मर्यादित अर्थाने येतो. 'पंकज' म्हणजे जे जे चिखलात जन्मलेले आहे ते सर्व, असा व्यापक अर्थ असताना 'पंकज' म्हणजे कमळ एवढाच त्याचा संकुचित अर्थ सध्या प्रचलित आहे. ज्या ज्या पर्वतावर हिम म्हणजेच बर्फ पडतो, त्या सर्वांना आपण हिमालय म्हणत नाही; तर भारताच्या उत्तरेस असलेला विशिष्ट पर्वतच हिमालय या नावाने ओळखला जातो. व्यापक अर्थाचा शब्द विशिष्ट अर्थाने एकाच संदर्भात येतो, तेव्हा त्या शब्दाचे परिवर्तन होऊन अर्थसंकोच झाला असे म्हटले जाते.

३. अर्थभ्रंश

अर्थप्रक्रियेच्या या प्रकारात शब्दाचा मूळ अर्थ बाजूला पडून त्याला वेगळ्या छटेचा विरुद्ध अर्थ प्राप्त होतो. शब्दांचा अनाठायी किंवा कमी वापर, समाजातील बदलते संकेत, अतिशयोक्ती अशा कारणांनी अर्थ भ्रंशित होतो.

उदाहरणार्थ, मराठीतील 'अवजड' हा शब्द जड किंवा अतिजड या अर्थाने प्रचलित आहे. यातील 'अव'चा अर्थ 'नाही' असा आहे. हा उपसर्ग 'जड' शब्दाला लागल्याने वास्तविक अर्थ 'जड नाही', म्हणजे 'हलका' असा होण्याऐवजी मराठीत तो 'अतिशय जड' या अर्थाने भ्रंशित होऊन रूढ झाला आहे. 'अपरोक्ष'मधील 'परोक्ष' म्हणजे समोर. त्याला लागलेल्या 'अ' उपसर्गामुळे वास्तविक 'माघारी' किंवा 'उपस्थित नसताना' असा 'अपरोक्ष'चा अर्थ व्हायला हवा होता; मात्र तो तसाच राहिला. येथे अर्थभ्रंश ही परिवर्तनप्रक्रिया झाली आहे. 'डोक्यावर बसणे', 'फैलावर घेणे', 'नाकी नऊ येणे' अशा वाक्प्रचारांतही ही प्रक्रिया झालेली दिसून येते.

४. अर्थापकर्ष

भाषेतील काही शब्दांना असलेला चांगला अर्थ जाऊन काळाच्या ओघात अज्ञान किंवा इतर कारणांनी वाईट स्तरावरील अर्थ प्राप्त होतो, तेव्हा अर्थापकर्ष हा भाषिक अर्थपरिवर्तनाचा प्रकार होतो.

उदाहरणार्थ, 'दारू' म्हणजे औषध हा मूळचा अर्थ जाऊन 'दारू' म्हणजे घाणेरडे, वर्ज्य पेय असा हीन अर्थ प्राप्त झाला आहे. अशाच प्रकारे कलावती - कलावंतीण, अवतार - गबाळा, भद्रीकरण - भादरणे या शब्दांचा मूळ अर्थ जाऊन त्याच्यापेक्षा हीन पातळीवरील वाईट अर्थ प्राप्त झाला आहे.

५. अर्थप्रशस्ती

अर्थपरिवर्तनाच्या या प्रकारात शब्दाच्या मूळ अर्थापेक्षा अधिक चांगला अर्थ प्राप्त होतो. अर्थात हा अर्थविस्तार नव्हे. येथे फक्त मूळ अर्थापेक्षा अधिक चांगला, गुणवत्तादर्शक अर्थ प्राप्त होतो. अर्थाची प्रशस्ती होऊन त्याचा उत्कर्ष होतो; म्हणून या प्रकाराला अर्थोत्कर्ष असेही संबोधले जाते.

उदाहरणार्थ, 'असामी' हा 'माणूस' या अर्थी असलेला फारसी शब्द मराठीत मात्र 'बडा माणूस' या अर्थाने रूढ आहे. 'चीज' हा फारसी शब्द 'वस्तू' या अर्थाने येतो; मात्र मराठीत 'उत्कृष्ट वस्तू' असा त्याचा अर्थ होतो. मराठीत 'मुग्ध', 'अल्लड' आदी शब्दांनाही अशीच अर्थप्रशस्ती लाभली आहे.

६. अर्थच्युती

भाषेतील मूळ प्रशस्त अर्थाचा शब्द अवनत अर्थपातळीवर येतो, तेव्हा अर्थच्युती हे भाषिक परिवर्तन होते. शब्दात मुळातच नसलेली हीन अर्थाची छटा अधिक तीव्र होते, तेव्हा अर्थच्युती संभवते. ग्राम्यता टाळणे, कल्पनासाहचर्य, बदलती परिस्थिती किंवा कधी कधी लक्षणेमुळेही अर्थच्युती होते.

उदाहरणार्थ, 'चंडिका' म्हणजे उग्ररूप धारण करणारी देवता; पण सध्या 'भांडकुदळ', 'रागावणारी स्त्री' असा अर्थ रूढ झाला आहे. भवानी, टवळी या शब्दांच्या अर्थाबाबतही अर्थच्युती हे भाषिक परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

७. अर्थादेश

जेव्हा शब्दाचा मूळ अर्थ पूर्णतः बदलून वेगळाच अर्थ स्वीकारला जातो तेव्हा अर्थादेश हे परिवर्तन होते. विशेषतः परभाषेतून आलेला शब्द वेगळ्याच अर्थाने स्वीकारला जातो तेव्हा ही प्रक्रिया होते. उदाहरणार्थ, हिंदीतून आलेला गँवार हा शब्द गावात राहणारा या अर्थाचा आहे. त्यावरून मराठीत रूढ झालेला गावठी हा शब्द मात्र गावात राहणारा, ग्रामीण ऐवजी अडाणी या अर्थाने सर्रास वापरला जातो.

८. अर्थांतर

अर्थांतर ही शब्दाचा अर्थ पूर्णतः वेगळा बनवणारी भाषिक प्रक्रिया आहे. शब्दाच्या मूळ अर्थापेक्षा वेगळा अर्थ या प्रक्रियेत निर्देशित केला जातो. शब्दाच्या अर्थाबाबत असलेले जुने संदर्भ पूर्णतः नष्ट होऊन शब्दाला नवा भाषिक संदर्भ या प्रक्रियेत प्राप्त होतो. अर्थादेशात जुने संदर्भ कायम असतात. उदाहरणार्थ, मृग म्हणजे प्राणी असा व्यापक अर्थाचा शब्द हरीण या अर्थाने रूढ झाला. घृणा म्हणजे दया, पण हा मूळ अर्थ बाजूला राहून किळस हा वेगळाच अर्थ मराठीत रूढ झाला आहे.

९. अर्थभेद

प्रत्येक भाषेत हा अर्थपरिवर्तनाचा प्रकार असून वरवर समानार्थी भासणाऱ्या शब्दांतील वेगळेपणा अर्थभेदातून स्पष्ट होतो. उदाहरणार्थ, लीला हा भगवंताची किंवा कृष्णाची कृती, तर लीळा हा शब्द चक्रधर स्वामींच्या संदर्भात योजला जातो. मराठीत निर्वाण, मोक्ष, स्वर्ग या शब्दांतून एकच अर्थ प्राप्त होत असला तरी ते वेगवेगळ्या संदर्भात योजले जातात. झोपाळा-हिंदोळा, खानावळ-हॉटेल, वैद्य-डॉक्टर, घर-बंगला या शब्दांतून निर्देशित होणाऱ्या संकल्पना अर्थभेदाने वेगवेगळ्या आहेत.

१०. अर्थसार

काही शब्दसमूह किंवा शब्द आपल्या मूळ अर्थाहून व्यापक अर्थ व्यक्त करतात तेव्हा अर्थसार ही भाषिक परिवर्तनाची प्रक्रिया घडते. शब्दसमूहातील घटक शब्द स्वतंत्रपणे व्यक्त होणाऱ्या अर्थाहून अधिकचा अर्थ या प्रक्रियेत व्यक्त करतात. विस्तृत अर्थासाठी अशा मोजक्या शब्दांची रचना साररूपाने अर्थ व्यक्त करण्याचे कार्य करते.

उदाहरणार्थ, अठरा विश्वे दारिद्र्य, ज्ञानबाची मेख, नरो वा कुंजरो वा! या शब्दांतून व्यापक अर्थ जसा प्राप्त होतो, तसाच उजाडणे, मावळणे यातून सूर्याची स्थिती, काळ प्रतीत होतो. वारीसारख्या नामातून महाराष्ट्रातील प्राचीन परंपरा निर्देशित होते.

उपरोक्त विवेचनावरून आपणास विविध कारणांनी होणाऱ्या अर्थपरिवर्तनाच्या विविध प्रकारांचा बोध झाला असेल. शब्दाची अर्थछटा ज्या प्रकारे बदलते, त्यांच्या विशेषांवरून वरील अर्थपरिवर्तनाचे प्रकार निश्चित केलेले आहेत. प्रकरणाच्या पुढील भागात अर्थपरिवर्तनामागील कारणांचा आपण शोध घेऊ.

अर्थपरिवर्तनाची कारणे

भाषेच्या अर्थप्रक्रियेतील अर्थपरिवर्तन हा महत्त्वाचा भाग आहे. शब्दाचे समाजमान्यतेने रूढ असलेले अर्थ अंशतः किंवा पूर्णतः बदलतात. शब्दांच्या अर्थपरिवर्तनामागे भाषिक, सामाजिक आणि मानसिक कारणे कारणीभूत असतात. त्यांतील काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे :

१. साहचर्य

साहचर्यामुळे मानवी भवतालातील अनेक बाबींमध्ये बदल घडतो ही नैसर्गिक बाब आहे. अर्थप्रक्रियेच्या बाबतीत वस्तू, विचार, कल्पना यांच्या साहचर्याने शब्दांचे अर्थ मोठ्या प्रमाणात बदलताना दिसतात. साहचर्यतत्त्वाचे तीन प्रकार आहेत.

अ. कल्पनाजन्य साहचर्य : दोन परस्पर भिन्न कल्पनांमधील साम्यामुळे शब्दांचे अर्थपरिवर्तन होते, तेव्हा त्याला कल्पनाजन्य साहचर्य असे म्हणतात. उदाहरणार्थ, खूप गोंगाट असणाऱ्या ठिकाणाला बाजार म्हटले जाते. उशिरा येणाऱ्या दाढेला अक्कलदाढ असे म्हणतात.

ब. निकटत्वजन्य साहचर्य : भिन्न गुणधर्मांच्या दोन बाबी परस्परांच्या निकट येतात आणि त्यातून वेगळ्या अर्थाची शब्दनिर्मिती होते. एका गोष्टीचा गुणधर्म दुसऱ्या वस्तूला लावला जातो, तेव्हा निकटत्वजन्य साहचर्य हे भाषिक परिवर्तन होते. उदाहरणार्थ, गोडगळा.

क. सादृश्यजन्य साहचर्य : दोन परस्पर भिन्न बाबींतील साम्य एखाद्या शब्दातून प्रतीत होत असेल, तर सादृश्यजन्य साहचर्य ही अर्थप्रक्रिया होते. उदाहरणार्थ, मंदिराच्या गाभाऱ्यातील पाणी मंदिराबाहेर सोडणाऱ्या पन्हाळीस गोमुख असे म्हटले जाते. एखाद्या क्रूर माणसास खाटीक, कसाई असे संबोधले जाते. एखाद्या वस्तूच्या दिसण्यात किंवा गुणांतील सादृश्यामुळे दुसऱ्या बाबीवर त्याचा आरोप होऊन ही अर्थप्रक्रिया होत असते.

२. साम्यतत्त्व

दोन वस्तूंच्या सारखेपणाच्या भावनेतून शब्दांचे अर्थ बदलतात. शब्दांच्या अर्थात परस्पर साम्यामुळे काही बदल होत जातात; त्यामुळे साम्यतत्त्व हेच अर्थपरिवर्तनाचे कारण ठरते.

उदाहरणार्थ, खुर्चीचा हात, टेबलाचा पाय, कपाचा कान इ. कुंभकर्ण, वामनमूर्ती, हरिश्चंद्र ही पौराणिक संदर्भातील काही उदाहरणे, तर भगीरथ प्रयत्न, अटकेपार झेंडे रोवणे हे वाक्प्रचार साम्यतत्त्वातूनच आले आहेत.

३. रूपक

शब्दाच्या अर्थात बदल घडवून आणणारी रूपक ही भाषेची शक्ती आहे. रूपकांचा वापर आपण व्यवहारात वारंवार करत असतो; मात्र अतिपरिचयामुळे आपल्याला त्याची जाणीव होत नाही. शब्दांचा नवा अर्थ आणि त्यांच्या जुळणीतून वाक्प्रचार निर्माण करणारे रूपक अर्थपरिवर्तनास कारणीभूत ठरत असते.

पौराणिक, ऐतिहासिक, मध्ययुगीन काळापासून ते सर्वसामान्य दैनंदिन जीवनापर्यंत कोणत्याही कालखंडातील कोणताही विषय रूपकाला वर्ज्य नाही.

उदाहरणार्थ, त्रिशंकू, कंस, कैकयी, शकुनी ही विशेषनामे रूपकात परावर्तित झाली आहेत. पांढरा हत्ती, काटेरी मुकुट ही मूळ इंग्रजीतून आलेली रूपके आहेत. गनिमी कावा, पानिपत होणे या रूपकांना ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सोंगटी, दांडी गुल होणे ही खेळातून आलेली रूपके आहेत.

४. लक्षणा

शब्दाचा मूळ अर्थ अथवा वाच्यार्थाऐवजी शब्दातून सूचित होणारा लक्षणेचा अर्थ स्वीकारला जातो, त्यावेळी लक्षणाजन्य अर्थपरिवर्तन होते. या अर्थपरिवर्तनात मुख्यार्थास बाधा येणे महत्त्वाचे असते.

उदाहरणार्थ, मी तुकाराम वाचला याचा अर्थ तुकारामांची अभंगगाथा वाचली असा अभिप्रेत असतो. वाक्प्रचार, म्हणी यांचा अर्थ लक्षणेमुळेच बदललेला दिसतो. त्यामुळे लक्षणा ही महत्त्वाची अर्थपरिवर्तन प्रक्रिया आहे.

५. बदलते समाजजीवन

समाजाच्या बदलत्या जीवनपद्धतीनुसार नव्या परिस्थितीसाठी नवे शब्द तयार करण्यापेक्षा रूढ असलेल्या शब्दांत अर्थपरिवर्तन होते. उदाहरणार्थ, रामदासांनी शारीरिक हालचाल या मर्यादित अर्थाने वापरलेला 'चळवळ' हा शब्द आता व्यापक अर्थाने पुढे आला आहे. भक्तांसाठी त्यांनी वापरलेला 'कार्यकर्ता' हा शब्द सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात रूढ झाला आहे. याप्रमाणेच लाल झेंडा, गांधी टोपी, गुरु शर्ट, नेहरू शर्ट, मोदी जॅकेट, साथी, भाई या शब्दांना नवे अर्थ प्राप्त झाले आहेत.

६. अशुभता परिहार

प्रत्येक मानवी समाजात काही शुभ-अशुभ संकेत परंपरेने रूढ असतात. मृत्यू, दुर्धर आजार, विषारी-घातक प्राणी यांचा उल्लेख थेटपणे न करता आडमार्गाने करण्याची समाजाची पद्धत असते. अशुभसूचक बाबींचा उल्लेख टाळून संवाद साधण्याची पद्धत अशुभता परिहार या अर्थपरिवर्तनाने साधली जाते.

उदाहरणार्थ, मृत्यूसूचक : देहावसान, देवाज्ञा, कालवश, कैलासवासी, वैकुंठवासी हे शब्द थेट मृत्यूचा उल्लेख टाळतात.

वैधव्यसूचक : बांगडी वाढवणे, बांगडी फुटणे, कुंकू वाढविणे, मंगळसूत्र वाढविणे हे शब्द अशुभता परिहारानेच मराठीत रूढ झाले आहेत.

७. ग्राम्यतापरिहार / भाषाबंदी

समाजात वावरताना मानवी जीवनातील काही बाबी उघडपणे बोलल्या जात नाहीत; यालाच भाषाबंदी असेही म्हटले जाते. ग्रामीण परिसरातही एकमेकांशी बोलताना शिष्टसंमत शब्दांत सभ्य आणि सुज्ञतेने अशिष्ट बाबींचा उल्लेख केला जातो; यालाच ग्राम्यतापरिहार असे म्हणतात.

उदाहरणार्थ, मुलगी वयात येण्याच्या मासिक धर्माला शहाणी होणे, पदर येणे, कावळा शिवणे आदी शब्दांनी उल्लेखले जाते. विधवा स्त्रीसाठी गंगा-भागीरथी असा शब्दप्रयोग केला जातो. ग्राम्यता परिहारामध्ये शब्दातील मूळ वाच्यार्थ बाजूला जाऊन लक्षणा किंवा व्यंजनाने अर्थ स्पष्ट केला जातो.

८. अतिशयोक्ती

प्रतिपादित विषयातील विचार, कल्पना, भावना प्रभावीपणे मांडण्यासाठी अतिशयोक्तीचा आधार घेतला जातो. अशावेळी शब्दांतील अत्युक्ती मूलार्थाला बाजूला करून अतिशयोक्त स्वरूपाचे चित्र उभे करते.

उदाहरणार्थ, आकंठ भोजन, गगनचुंबी इमारत, मरणप्राय दुःख, मुसळधार पाऊस हे वास्तवात शक्य नसले तरी अतिशयोक्तीने अपेक्षित आशय पोहोचवण्यासाठी अर्थपरिवर्तन साधले जाते.

९. शब्दसिद्धी

नवी परिस्थिती अथवा अर्थप्रकटीकरणासाठी जेव्हा नव्या शब्दांची गरज असते, तेव्हा ते तयार करण्यापेक्षा उपलब्ध शब्दांनाच प्रत्यय, उपसर्ग जोडून नवे शब्द तयार केले जातात. यालाच शब्दसिद्धी असे म्हटले जाते. त्यामुळे मूळ अर्थापेक्षा अपेक्षित वेगळी अर्थनिर्मिती केली जाते.

उदाहरणार्थ, गैरमर्जी, घरकोंबडा, नीलकंठ इत्यादी.

१०. अतिपरिचयातून सभ्यता

भाषेतील काही शब्द ग्राम्यता व अश्लीलतेचे सूचक असतात; मात्र त्यांचा वारंवार वापर होत असल्यामुळे त्यांतील अश्लीलता त्या भाषिक लोकांना जाणवत नाही. असे शब्द त्या भाषिकांच्या सर्व स्तरांतील लोकांत सहजतेने वापरले जातात.

उदाहरणार्थ, अंगवस्त्र, गेला उडत, कडूबेणं या शब्दांतील वाईट छटा त्यांच्या नेहमीच्या वापरामुळे लोकांना जाणवत नाहीत.

११. अत्यादरदर्शन

समाजातील आदरणीय व्यक्तींचा उल्लेख करताना त्यांच्या वकुबापेक्षा मोठी गौरवयुक्त विशेषणे योजली जातात, तेव्हा अत्यादरदर्शन हे अर्थपरिवर्तनाचे कारण असते. प्राचीन काळी गुरु अथवा पतीचे नाव उच्चारले जात नसे; त्यासाठी 'हे', 'ते', 'इकडून', 'इकडची स्वारी' अशी संबोधने वापरली जात. शिवकालीन बखरीत शिवाजी महाराजांच्या नावाच्या जागी मोकळी जागा सोडलेली आढळते. माननीय व्यक्तींच्या नावापुढे गौरवयुक्त विशेषणे जोडण्याची पद्धत अत्यादरदर्शनातूनच आली आहे.

उदाहरणार्थ, कर्मवीर, महर्षी, महात्मा इत्यादी.

१२. प्रादेशिकता

शब्दांच्या अर्थामध्ये प्रदेशानुसार परिवर्तन होत असते. समाजाच्या अनेक स्तरांतील प्रथा, परंपरा, नवी व्यवस्था यांमुळे शब्दांच्या अर्थात अशा प्रकारचा बदल झालेला दिसून येतो.

उदाहरणार्थ, दक्षिणेतील 'महाराज' हा शब्द राजासाठी वापरला जातो, तर उत्तरेत तो आचारी या अर्थाने येतो. 'कॉर्न' हा शब्द इंग्लंडमध्ये गहू, स्कॉटलंडमध्ये बाजरी, तर अमेरिकेत मका या अर्थाने प्रसिद्ध आहे.

१३. परभाषा प्रभाव

भाषिक आदानप्रदानात परभाषेतून अनेक शब्द येत असतात; मात्र एका भाषेतून आलेल्या शब्दावर दुसऱ्या भाषेच्या संकल्पनेचा प्रभाव पडून त्याचा वेगळाच अर्थ ग्राहक भाषेत तयार होतो, यालाच परभाषा प्रभाव असे म्हणतात.

उदाहरणार्थ, 'समारोह' हा मूळ संस्कृत शब्द सहमत होणे किंवा चढणे या अर्थाचा आहे; मात्र हिंदी भाषेच्या प्रभावाने आजच्या आधुनिक भाषेतच नव्हे, तर आताच्या संस्कृतमध्येही हा शब्द 'समारंभ' या अर्थाने योजला जातो.

१४. सांस्कृतिक आदान

दोन भिन्न भाषांमध्ये शब्दपातळीवर देवाणघेवाण होत असते; मात्र यातील जो समुदाय प्रगत असेल त्याच्यातील शब्द संकल्पनेसहित दुसऱ्या भाषेत स्वीकारले जातात. समाजातील नातेसंबंध, सामाजिक, राजकीय, साहित्यिक संकल्पनांतील अनेक शब्द आदान करणाऱ्या भाषेत सहजतेने स्वीकारले जातात. लेनर्ड ब्लूमफील्ड याने आदानप्रदान प्रक्रिया ही अर्थपरिवर्तनाचे कारण असल्याचे स्पष्ट केले आहे.

उदाहरणार्थ, दूरध्वनी, धावचित, मधुचंद्र या संकल्पना आपण इंग्रजीतून घेतल्या आहेत. तर टाइमशीर, पॉवरबाज, मोटारगाडी हे इंग्रजी-मराठी संकरातून तयार झाले आहेत. पंक्चरणे, पॉलिशणे असे शब्द बा. सी. मर्ढेकरांनी प्रभावी अर्थप्रकटीकरणासाठी घडवले आहेत.

अर्थपरिवर्तनाच्या वरील कारणांनी अर्थपरिवर्तनाची प्रक्रिया अधिक स्पष्ट झाली असेल. यानंतर आपण अर्थपरिवर्तनाचा भाषेवरील परिणाम काय आहे ते थोडक्यात पाहू.

अर्थपरिवर्तनाचा भाषेवरील परिणाम

जगाच्या पाठीवरील सर्वच भाषा समाजाभिमुख असल्याने त्या नेहमी परिवर्तनशील असतात. समाजाच्या गरजेनुसार भाषा शब्द, अर्थ, संकल्पना आणि ललित व ललितेतर साहित्यनिर्मिती करत असते. भाषाव्यवहार सुकर होण्यासाठी शब्दांची पदोपदी आवश्यकता भासते. मात्र कधी कधी नव्या शब्दनिर्मितीपेक्षा उपलब्ध शब्दाचा अर्थ बदलणे किंवा त्या शब्दाला उपसर्ग-प्रत्यय इत्यादी जोडून नवा अथवा व्यापक अर्थ तयार करणे या प्रक्रिया सतत सुरू असतात; यालाच अर्थपरिवर्तन असे म्हणतात.

अर्थपरिवर्तनाने भाषेच्या शब्दभांडारात नवी भर पडते. नव्या अर्थाच्या रचना तयार होतात. मूळ भाषेत अस्तित्वात नसलेल्या अनेक संकल्पना भाषेत सहजतेने रुजतात. भाषेच्या अर्थाची कक्षा रुंदावते; त्यामुळे ती अधिक प्रगल्भ होते. त्या भाषेची अर्थवत्ता, ज्ञाननिर्मिती क्षमता, सौंदर्यशक्ती यामध्ये वाढ होते. शब्दनिर्मितीच्या पातळीवर भाषेला मर्यादा असल्यामुळे अर्थपरिवर्तनातून वरील अनेक भाषिक कार्ये सहजतेने साधली जातात.

२.३ समरोप

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. मानवी समाज आणि भाषेच्या बाबतीतही तो लागू पडतो. जगाच्या पाठीवरील सर्व भाषांमध्ये ध्वनिउच्चार ते साहित्यनिर्मितीपर्यंत परिवर्तन अटळपणे होत असते. परिवर्तन हे नियमित, निरपवाद, नकळतपणे घडून येत असले तरी ते आकलनक्षमतेच्या मर्यादेत होत असते. त्याचे स्वरूप अमर्याद असते. भाषेतील सर्वात लहान घटक ध्वनी हा असतो. विशिष्ट भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींना मूलध्वनी, वर्ण अथवा भाषावैज्ञानिक दृष्टीने स्वन असे म्हणतात. प्रस्तुत प्रकरणात स्वनपरिवर्तनाचे प्रकार, कारणे आणि त्याचे भाषेवरील परिणाम अभ्यासले आहेत. भाषेचे नियमन अभिजनवर्ग करत असला तरी तिचा वापर बहुसंख्येने असलेले सामान्य लोक करत असतात. परिणामतः भाषेत उच्चारल्या जाणाऱ्या काही शब्दांमध्ये कठीणता असते. अशावेळी बहुसंख्य लोक त्याचे सुलभ उच्चारण करतात. उच्चारसौकर्याच्या दृष्टीने शब्दात सोपेपणा आणताना काही ध्वनी वगळले जातात, काही बदलले जातात, तर काहींमध्ये अधिकचे ध्वनी मिसळले जातात. यामुळे मूळ शब्दातील स्वनउच्चारात बदल होतो. अर्थात हा बदल दृश्यरूपात असला तरी त्यामुळे ध्वनींचे आणि शब्दांचे आकलनक्षम रूप अबाधित राहते. स्वनांतील परिवर्तनाच्या स्वरूपावरून त्यांचे प्रकार केले जातात. स्वनपरिवर्तनामागे निश्चित स्वरूपाची भाषिक कारणे असतात. त्यांचा सविस्तर आढावा आपण या प्रकरणाच्या पहिल्या भागात घेतला आहे.

याच प्रकरणाच्या दुसऱ्या भागात भाषेच्या अर्थपातळीवरील परिवर्तनाचा वेध घेतला आहे. शब्द हा भाषेच्या अर्थनिर्मितीतील महत्त्वाचा घटक आहे. भाषेच्या अर्थपातळीवरील सर्वात लघुत्तम घटक म्हणजे पद, रूप किंवा रुपिका असते. सामाजिक बदलाबरोबर जुळवून घेण्यासाठी भाषा विविध स्तरांवर स्वतःमध्ये बदल करत असते. कालागणिक समाजाच्या भाषिक गरजा बदलतात, तेव्हा अनेक नव्या शब्दांची गरज भासते. प्रत्येक वेळी नवीन शब्द निर्माण होईलच असे नसते. अशावेळी उपलब्ध शब्दातील काही भाग बदलून किंवा त्यामध्ये काही भाग जोडून नवा शब्द बनवला जातो. मानवी मनातील भावना, विचार, कल्पना यांच्या प्रकटीकरणासाठी अशा नव्या अर्थशक्तीचे शब्द आवश्यक असतात. याबरोबरच समाजातील काही संकेत शब्दांच्या बाह्यरूपामध्ये बदल करतात. अनेक कारणांनी शब्दांचे अर्थपरिवर्तन होत असते. त्यांच्यातील साम्य-भेदांवरून त्यांचे प्रकार केले जातात. अशा अर्थपरिवर्तनाच्या मोजक्या प्रकारांचा आणि त्यामागील कारणांचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेतला आहे. अर्थपरिवर्तनामुळे भाषेला नव्या अर्थक्षमतेच्या शब्दरचनेची प्राप्ती होते. भाषिकदृष्ट्या वापरात नसलेल्या शब्दांची पुनर्स्थापना होते. साहित्य आणि सौंदर्यनिर्मितीसाठी नवी शब्दसंपदा उपलब्ध होते. भाषेच्या समृद्धीच्या दृष्टीने तिच्यावरील अर्थपरिवर्तनाचा हा चांगला परिणाम आहे.

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

स्वन : भाषेत वापरला जाणारा मूलध्वनी.

स्वनिक परिसर : शब्दातील विशिष्ट स्वनाच्या अगोदर आणि नंतरच्या स्थानी येणाऱ्या स्वनांचा परिसर.

लक्षणा : जेव्हा एखाद्या शब्दाचा अर्थ वाच्यार्थाने प्राप्त होत नाही, तेव्हा तो विशिष्ट संदर्भाने किंवा लक्षणेने घ्यावा लागतो; अशा अर्थास लक्षणा असे म्हणतात.

व्यंजना : शब्दाची विशिष्ट संदर्भाने बदलणारी अनेकार्थवाचक शब्दशक्ती म्हणजे व्यंजना होय.

भ्रंश : भ्रष्ट.

२.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

योग्य पर्याय निवडा :

१. ध्वनिउच्चारासाठी वापरल्या जाणाऱ्या इंद्रियांना काय म्हणतात?

अ) पंचेंद्रिय ब) ज्ञानेन्द्रिय

क) वागिंद्रिय ड) अतिंद्रिय

२. उच्चारावर हवामान आणि देशस्थितीचा परिणाम होतो, असे कोणत्या भाषाशास्त्रज्ञाने सांगितले आहे?

अ) कात्यायन ब) ब्लूमफिल्ड

क) ऑस्टॉफ ड) सपीर

३. 'इस्क्रू' हे उदाहरण कोणत्या स्वनपरिवर्तनाचे आहे?

अ) स्वरागम ब) लोप

क) मात्राभेद ड) वर्णविपर्यय

४. कोणत्या स्वनपरिवर्तनात शब्दातील ह्रस्व-दीर्घांची अदलाबदल होते?

अ) वर्णलोप ब) मात्राभेद

क) घोषीकरण ड) सान्निध्य परिणाम

५. शब्दाची अर्थकक्षा वाढून सामान्यीकरण कोणत्या परिवर्तनात होते?

अ) अर्थसार ब) अर्थविस्तार

क) अर्थापकर्ष ड) अर्थांतर

६. उच्चारसाम्य असलेल्या शब्दांतून दोन भिन्न अर्थ निर्देशित करणारे पुढीलपैकी कोणते अर्थपरिवर्तन आहे?

अ) अर्थादेश ब) अर्थभ्रंश

क) अर्थच्युती ड) अर्थभेद

७. 'समारोह - समारंभ' हे अर्थपरिवर्तन कोणत्या कारणाने झाले आहे?

अ) शब्दसिद्धी ब) परभाषा प्रभाव

क) रूपक ड) लक्षणा

८. कोणत्या अर्थपरिवर्तनात सामाजिक संकेतामुळे विशिष्ट शब्दांचा उच्चार टाळला जातो?

अ) भाषाबंदी ब) परभाषा प्रभाव

क) साहचर्यतत्त्व ड) लक्षणा

उत्तरे

१. वागिंद्रिय २. ऑस्टॉफ ३. स्वरागम ४. मात्राभेद

५. अर्थविस्तार ६. अर्थभेद ७. परभाषा प्रभाव ८. भाषाबंदी

२.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. स्वनपरिवर्तनाची कारणे स्पष्ट करा.

२. अर्थपरिवर्तनाचे प्रकार सविस्तर विशद करा.

आ) लघुत्तरी प्रश्न

१. उच्चारप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.

२. स्वनपरिवर्तनाची वैशिष्ट्ये लिहा.

३. अर्थपरिवर्तनाचा भाषेवरील परिणाम स्पष्ट करा.

४. अर्थविस्तार व अर्थसंकोच यांविषयी थोडक्यात माहिती लिहा.

२.७ क्षेत्रीय कार्य

१. आपल्या परिसरात प्रमाणभाषेतील शब्दांसाठी बोलीभाषेत वापरले जाणारे विविध प्रतिशब्द अर्थासहित संकलित करा.

२. आपल्या परिसरातील वाक्प्रचार व म्हणी संकलित करा.

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. पोतदार अनुराधा, मराठीचा अर्थविचार, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, १९६९

२. कानडे मु. श्री., मराठीचा भाषिक अभ्यास, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७९

३. गवळी अनिल, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, मेहता प्रकाशन, कोल्हापूर, तृतीयावृत्ती, २०१८

४. गजेंद्रगडकर श्री. ना., भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७९

❑❑❑

घटक ३
मराठीवरील प्रभाव

३.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला,

- मराठीवरील इतर भाषांच्या प्रभावांची माहिती होईल.
- मराठीच्या शब्दसंग्रहाची माहिती होईल.
- भाषा शब्दकोशांची माहिती होईल.
- मराठी भाषेतील परिभाषेचा प्रयत्न समजून घेता येईल.

३.१ प्रास्ताविक

मानवी जीवनाला लाभलेले एक वरदान म्हणजे भाषा होय. भाषेचा वापर माणसाच्या जन्मापासूनच सुरू होतो. माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर जी प्रगती केली, त्यामध्ये बुद्धीबरोबर भाषेचेही तेवढेच योगदान आहे. जगात बोलल्या जाणाऱ्या सर्वच भाषांचा विचार करता प्रत्येक भाषेत अनेक प्रकारचे भेद असलेले दिसतात. एका देशात एकच भाषा बोलली जाते असे नाही. आपल्या भारत देशाचाच विचार करता भारतात मराठी, गुजराती, पंजाबी, सिंधी, हिंदी, ओरिया, बंगाली, आसामी, तेलगू, कन्नड, मल्याळम, तमीळ अशा प्रमुख भाषा व त्यांच्या अनेक पोटभाषा बोलल्या जातात. शब्दोच्चारण, व्याकरण आणि शब्दसंग्रह याबाबत एक भाषा दुसऱ्या भाषेपेक्षा खूपच वेगळी असल्याने, एक भाषा बोलणाऱ्या व्यक्तीला दुसरी भाषा सहज कळेल असे नाही. भाषा आकलनातील अडथळ्यांमुळे दोन भाषेत असणारे भिन्नत्व आपल्या पटकन लक्षात येते. कोणत्याही एकाच भाषेत अनेक प्रकारचे भेद असतात. मराठी भाषेचेच उदाहरण घेतल्यास महाराष्ट्रात बोलली जाणारी मराठी व महाराष्ट्राबाहेरच्या प्रदेशात बोलली जाणारी मराठी ही एकसारखी असल्याचे दिसत नाही. शिवाय महाराष्ट्रातच कोल्हापूर, सातारा, पुणे, विदर्भ, मराठवाडा, कोकण, सीमावर्ती भाग या भागातली मराठी भाषा वेगवेगळी असल्याचे दिसते.

अशा या वैविध्यपूर्ण असणाऱ्या मराठी भाषेने तिच्या संपर्कात येणाऱ्या अनेक भाषांमधून काही शब्द, लकबी व वैशिष्ट्ये आत्मसात केलेली दिसून येतात.

३.२ विषयविवेचन

एखाद्या भाषेच्या शब्दसंग्रहाचा आपण विचार करतो, तेव्हा असे लक्षात येते की, मुख्यतः एखादी भाषिक परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते, तेव्हा दुसरी पिढी पहिले भाषिक पूर्वसंचित जसेच्या तसे स्वीकारत नाही. पहिल्या परंपरेतील काही संकेत टाकून स्वतःची नवी भर घालून ते

स्वीकारत असते. ही भाषिक संक्रमणाची आणि तिच्यात नवीन भर घालण्याची प्रक्रिया पिढी दरपिढी चालत असते. त्यामुळे भाषिक परंपराही पूर्णतः पारंपरिक असत नाही. भाषिक परंपरेत एखादी नवीन भाषिक रचना निर्माण होते, तेव्हा तिला कोणा एकाची मान्यता असून चालत नाही. ती भाषा बोलणाऱ्या संबंध समाजाने त्या रचनेचा स्वीकार करून त्याला मान्यता दिली तरच तो शब्द किंवा रचना समाजात रूढ होते. म्हणजे कोणतेही भाषिक परिवर्तन समाजमान्यतेशिवाय शक्य होत नाही. आतापर्यंतच्या विवेचनाच्या आधारे मराठी भाषेच्या निर्मितीपासून ते वर्तमान मराठी भाषेमध्ये किंवा तिच्या शब्दसंग्रहात कोणता बदल झालेला आहे याचा स्थूल आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

३.२.१ मराठीचा शब्दसंग्रह

दिवसेंदिवस येणाऱ्या नव्या नव्या संकल्पनांमुळे भाषेमध्येही नवनव्या शब्दांची भर पडत आहे. नवनवीन लागणारे शोध, भौतिक प्रगती, दळणवळणाची सुलभ साधने यामुळे अशी मानवी समाजाला गतिमानता प्राप्त झालेली आहे, तशीच गतिमानता भाषेलाही प्राप्त झालेली आहे. व्यापार, राजकारण, वैद्यकशास्त्र, तंत्रज्ञान, धर्म, संस्कृती, कला, वाङ्मय, दळणवळण, दुष्काळ, भूकंप, युद्ध, सहकार, शिक्षण अशा विविध घटकांमुळे भाषेत सतत उलथापालथ होत असते. या सर्व उलथापालथीत भाषेतील जुने शब्द नवीन रूप धारण करतात. असे परिस्थितीनुरूप तयार झालेले शब्द पटकन भाषेत रुळतात. आकाशवाणी, दूरदर्शन, संगणक, विमानसेवा, उपग्रह अशा अनेक क्षेत्रात झालेल्या नेत्रदीपक प्रगतीमुळे जग खूपच जवळ आले. त्यामुळे गॅट, व्हेटो, युनो, कर्फ्यू, सॅटेलाईट, मोबाईल, बॉम्ब, रॉकेट, मिसाईल यासारखे संमिश्र शब्द भाषेत वाढताना दिसत आहेत.

मराठी भाषेच्या शब्दसंग्रहाचा विचार करताना एक प्रश्न पडतो की, मराठी भाषेत नेमके किती शब्द आहेत? या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपल्याला काही शब्दकोशांचा विचार करावा लागेल. मोल्सवर्थच्या (१८३१) मधील मराठी-इंग्रजी शब्दकोशात चाळीस हजार मराठी शब्द होते. याच शब्दकोशाच्या १८५७ साली प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीत ही संख्या साठ हजार इतकी नोंदवलेली दिसते. 'महाराष्ट्र शब्दकोश' (दाते व इतर) मराठी शब्दांची संख्या एक लाख बारा हजार एकोणतीस इतकी आहे. १९२८ सालच्या ऑक्सफर्ड शब्दकोशात इंग्रजी शब्दांची संख्या पाच लाखाच्या आसपास आहे. वर्तमानात मराठी भाषेचा विचार केल्यास मराठीतील शब्दसंख्या सतत वाढत चाललेली दिसते. मराठीतील शब्दसंख्या अतिशय वेगाने वाढते आहे असे मात्र नाही.

अभिधा, लक्षणा व व्यंजना या शब्दार्थ प्रकटीकरणाच्या तीन महत्त्वाच्या शक्ती आहेत. या शब्द शक्तींमुळेच शब्दांना वाच्यार्थ, संकेतार्थ व लक्ष्यार्थ प्राप्त होतात. शिक्षक जेव्हा एखाद्या विद्यार्थ्याला 'गाढव' म्हणतात, तेव्हा त्याचा 'मूर्ख' असा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो, पण आई जेव्हा आपल्या मुलाला 'गाढव' म्हणते तेव्हा व्यंग्यार्थ सूचित होतो, तोच इथे 'गाढव' हा शब्द वात्सल्य किंवा कौतुकपूर्ण होतो. भाषेच्या शब्दसंग्रह वाढीसाठी काही घटक कारण ठरत असतात. मराठी भाषेच्या शब्दसंग्रहाचे घटक आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील.

तत्सम शब्द

संस्कृत भाषेतून जसेच्या तसे अविकृत स्वरूपात मराठीत आलेल्या शब्दांना तत्सम शब्द म्हणतात. सर्वसाधारणपणे सामान्य वापरातील शब्द, भावभावनांत्मक शब्द, निसर्ग व भूगोलाशी निगडित शब्द, असे विपुल प्रमाणात मराठीत आढळतात. उदाहरणार्थ, देव, दर्शन, नृत्य, मंदिर, मेघ, पृथ्वी, आकाश, चंद्र, तारा, सूर्य, ब्राह्मण, पूजा, निर्माल्य, उपचार, जयकार, दीप, पुष्प, पत्र, गंध, अभिषेक, मंत्र, घंटा, कलश, मूर्ती, आसन, तीर्थ, प्रसाद, कथा, कीर्तन, आख्यान, पूर्वरंग, नमन, तिथी, श्राद्ध, होम, हवन, पिंड, गोत्र, पिता, तर्पण, भोजन, आहुती असे शेकडो तत्सम शब्द मराठीत आहेत. मराठीतील तत्सम शब्दांची टक्केवारी ४६.०८% इतकी आहे. संस्कृत भाषेचा विचार केल्यास आजही मराठीत सत्तर टक्के शब्द संस्कृत भाषेपासून आलेले आहेत.

तद्भव शब्द

संस्कृत भाषेतून अप्रत्यक्ष प्राकृत भाषांमधून विकृत होऊन मराठीत आलेल्या शब्दांना तद्भव शब्द असे म्हणतात. घर, हात, पाय, पान, माकड, कमळ, काकडी, छत्री, कान, पोथी, तोंड, ताक असे असंख्य शब्द संस्कृत शब्दांपासून निर्माण झालेले तद्भव शब्द आहेत. मराठीत तद्भव शब्दांची संख्या साधारणपणे ४९.२३% इतकी आहे.

देशी शब्द

आर्यपूर्व भिल्ल, नाग, कातकरी, गोंड आदिवासी यांच्या भाषेतून मराठीभाषेत आलेल्या किंवा मराठीने स्वीकारलेल्या शब्दांना देशी शब्द असे म्हणता येईल. देशी शब्द हे मराठी भाषेचा प्राचीन वारसा आहेत. संस्कृतला समांतर किंवा संस्कृतच्याही पूर्वीचा असा संस्कृतेतर प्राकृत भाषांचा जो प्रवाह शतकानुशतके चालत आलेला होता, त्यातील अनेक शब्द मराठी भाषेत आले. संस्कृत भाषेत न सापडणारे किंवा द्राविडी भाषांत नसणारे शब्द म्हणजे देशी शब्द होत असेही म्हणता येईल. हेमचंद्र याने आपल्या 'देशिनाममाला' या ग्रंथात देशी शब्दांचे एकत्रिकरण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. प्रा. वा. दा. गोखले यांनी मराठीतील देशी शब्दांची एक सूची प्रसिद्ध केली त्यात त्यांनी ४५० इतके देशी शब्द असल्याचे सांगितले. झुल ब्लोक' यांनी मराठी भाषेचा विकास' (अनुवादित) या आपल्या ग्रंथात दिलेल्या शब्दकोशात ३५० इतक्या देशी शब्दांची नोंद केलेली आहे. डॉ. पं. ल. वैद्य यांनी मराठीत २६० इतके देशी शब्द असल्याचे नमूद केले आहे. काही देशी शब्द पुढीलप्रमाणे : उतरंड, ओसरी, कचरा, खवाटा, चिखल, झाड, डोंगर, ढेकर, पेंढी, बुडणे, अंगारा, उंट, उंदीर, चिमणी, गोचीड.

कन्नड शब्द

कन्नड भाषा ही द्राविडी भाषाकुलातील एक भाषा आहे. 'मऱ्हाटी संस्कृती: काही समस्या' (१९५२) या ग्रंथात शं. बा. जोशी यांनी तर 'ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेवर कन्नडचा प्रभाव' (१९९४) या ग्रंथात रंगनाथ लोकापूर यांनी मराठी आणि कन्नड भाषेतील भाषिक आदान प्रदानाचा विचार केलेला आहे .

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या प्रदेशातील राजवटी प्राचीन काळापासून सारख्याच असल्याने द्राविडी भाषा आणि मराठी भाषेतील भाषिक आदान प्रदान झालेले दिसते. मराठी भाषेच्या जन्मापूर्वीच कानडी भाषा व त्यातील वाङ्मय यांचा बराच विकास झालेला होता. कानडी भाषा साधारणतः दुसऱ्या शतकापासून असावी. यादवराजे (देवगिरी), सातवाहन राजे (आंध्र), गांगराजे (म्हैसूर), होयसळ (हळेबीड) हे सर्व कन्नडप्रेमी होते. वारकरी संप्रदायाची आराध्य देवता हीच मुळात कानडी असल्याचे ज्ञानेश्वर व एकनाथ यांनी नमूद केलेले आहे. 'कानडा हा विठ्ठलु कर्नाटकू' असे संत ज्ञानेश्वरांनी तर, 'तीर्थ कानडे, देव कानडे, क्षेत्र कानडे पंढरीये' असे एकनाथांनी म्हटले आहे. शहाजीराजे भोसले, व्यंकोजी, राजाराम महाराज यांनी तंजावर, बंगलोर, जिंजी, म्हैसूर येथे जहागिरी किंवा राज्य केले होते, त्यामुळे कन्नड आणि मराठीचे आदानप्रदान झालेले दिसते. विश्वनाथ खैरे यांनी 'मराठी भाषेचे मूळ' या ग्रंथात याचे साधार विवेचन केलेले आहे. उळीग (सेवा), ओगर (जेवण), हडप, बरडी, गुंडी, पोकळ, बिढार, काडी, तूप, पहुडणे, कोंदण, मुद्दल, बाप, तूप, दाटी, कैवार, सोगा, पागोटे, कडबु, पछडी, उंडगा, चोळणा, वोवरी, भीड, अडकित्ता, कायरस, सूर, मुरकुंडी, केळवण, टका, बोणे, बरड, दगडगुंडा, भैरवगुंडा, गुढी, बोडी, लवलव, चीरकुट, अडदर (भय) आरोगण, आळ, उंडी असे अनेक शब्द कन्नडमधून मराठीत आले आहेत. जिजाऊ, विठोबा, बसवण्णा, अय्यप्पा, व्यंकोजी अशी विशेषनामे कन्नडमधूनच आलेली आहेत. अव्वा, अप्पा, अक्का, अण्णा, ताई, आत्ते, काका, मामा, आजा इत्यादी नातेदर्शक शब्द तर बोट, पोट, गाल, गळा, टाळू, बगल इत्यादी अवयवदर्शक शब्द कन्नडमधून आले आहेत. तसेच बंडी, धोती, लंगोटी, चोळणा, कांबळे, रजई, चिंधी, गादी हे वस्त्रदर्शक तर उडीद, मूग, मटकी, अननस, कलिंगड, कोहळा, पडवळ, गाजर, चिंच, कोथिंबीर, खोबरे इत्यादी धान्य प्रकार दर्शक, त्याचप्रमाणे ओगारळे, झारा, गाडगे, तांब्या, ताम्हण, पेला, हंडा इत्यादी भांड्यांची नावे असणारे शब्द त्याचप्रमाणे कणीक, भाकरी, शेवया, उपीट, चिमटा, तागडी, विळी, दाभण, पेटी, नथ, बांगडी, बाळी, खिडकी, गच्ची असे अनेक वस्तुरूप शब्द आजही मराठीत नित्य वापरले जातात. 'कवाड घालणे', 'गंगेत घोडे नहाणे', 'गाढवाचा नांगर फिरणे' असे काही वाक्प्रचार कन्नडमधूनच मराठीत आलेले आहेत. (संदर्भः भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी पृष्ठ क्रमांक ११९-१२०)

३.२.२ शब्दकोश

जगातील कोणत्याही भाषेचा इतिहास जाणून घ्यायचा असल्यास त्या- त्या भाषांतील शब्दकोशांची अतिशय मदत होते. शब्दकोश केवळ शब्दाची उत्पत्ती आणि अर्थ सांगत असतो. वास्तविक पाहता शब्दकोशांनी केवळ शब्दांचे अर्थ सांगण्यापेक्षा शब्दांच्या बाबतीतील वैज्ञानिक माहिती ती भाषा बोलणाऱ्या भाषकाला मिळावयास हवी. कोशरचना करताना आधुनिक भाषाविज्ञानातील तत्त्वांचा विचार करता येईल. पारंपरिक भाषाविज्ञानात व्याकरणाचे सामान्य नियम, सुट्या शब्दार्थांची अकारविल्हे मांडणी आणि म्हणी व वाक्प्रचार इत्यादींची माहिती असा त्रिस्तर शब्दकोशाच्या या संकल्पनेत येतो. मात्र अकारविल्हे रचना ही व्यावहारिक सोयीसाठी असते. वास्तविक पाहता प्रत्येक भाषकाचे शब्दज्ञान हे वर्ण क्रमानुसार असत नाही. कारण एकाच वर्णाने सुरू होणारे शब्द अर्थदृष्ट्या सुसंगत असतीलच असे नाही. तसेच समानार्थी किंवा

विरुद्धार्थी अर्थसंबंध शब्दकोशात दिले जात नाहीत. यामुळेच आजपर्यंत शब्दकोशात आधुनिक भाषाविज्ञानातील अर्थक्षेत्राची संकल्पना पूर्णतः दुर्लक्षित राहते.

जगातील सर्वात जुना शब्दकोश (Glossary) हा मेसोपोटेमियातील सुमेरियन संस्कृतीत आढळतो. हा मातीच्या विटांवर कोरलेला (Urra-hubullu) युआरए – हुबुलू नावाचा होता. या शब्दकोशाचा कालखंड साधारणपणे इ.स. पूर्व २३०० वर्ष इतका सांगितला जातो. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात चीनी भाषेत एक शब्दकोश तयार झाला होता. हा शब्दकोश शब्दांच्या अर्थाचे वर्गीकरण करणारा जगातला पहिला प्रयत्न मानला जातो. भारतीय शब्दकोशांची परंपरा प्राचीन आणि अतिशय समृद्ध अशी आहे. वेदांमधील कठीण शब्दांचा अर्थ सांगणारा 'निघंटु' नावाचा शब्दसंग्रह होता. यावरच आधारित असणारा 'निरुक्त' हा ग्रंथ यास्काचार्यांनी लिहिला ज्याला व्युत्पत्तिशास्त्राचा पाया मानले जाते. यानंतर साधारण इ. स. च्या चौथ्या शतकात अमरसिंह यांनी 'नामलिंगानुशासन' किंवा 'अमरकोश' तयार केला. संस्कृत भाषेतील सर्वात लोकप्रिय व प्रमाण शब्दकोश म्हणून या शब्दकोशास मानले जाते. हा शब्दकोश पद्य स्वरूपात आहे. हे या कोशाचे वेगळे वैशिष्ट्य सांगता येईल.

यानंतरच्या काळात साधारणतः १३ व्या शतकात महानुभाव पंथात काही संज्ञाकोश तयार झाल्याचे उल्लेख येतात. त्यानंतर फार्सी भाषेच्या आक्रमणाला थोपविण्यासाठी छ. शिवाजी महाराजांनी रघुनाथपंत हणमंते यांचेकडून 'राज्यव्यवहारकोश' तयार करून घेतला. राज्यव्यवहार भाषेत फार्सी शब्दांना पर्यायी संस्कृत/ मराठी शब्द देणे हा या कोशाचा उद्देश होता. यानंतर इ. स. १८३१ (मोल्सवर्थचा शब्दकोश) मोल्सवर्थ यांनी 'मराठी – इंग्रजी' शब्दकोश तयार केला. मराठी भाषेतील हा अत्यंत शास्त्रशुद्ध आणि महत्त्वाचा शब्दकोश मानला जातो. आधुनिक काळात लिहिलेला 'मराठी शब्दरत्नाकर' हा वि. ग. आपटे यांचा शब्दकोश महत्त्वाचा आहे.

आतापर्यंतच्या वरील विवेचनानुसार काही निवडक शब्दकोशांतील शब्दसंख्या किती हे पाहता येईल. आज उपलब्ध असणारे आणि प्रमाण मानले जाणाऱ्या शब्दकोशात 'ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी' मधील शब्दसंख्या साधारणपणे ६ (सहा) लाख आहे. महाराष्ट्र शब्दकोशः १,२०,००० ते १,५०,००० मुख्य शब्द आहेत. मोल्सवर्थच्या शब्दकोशात ही संख्या ६०,००० पेक्षा जास्त आहे. मानक हिंदी शब्दकोशात साधारणपणे १,५०,००० ते २,००,००० शब्द आहेत. संस्कृतप्रचुर व उर्दूच्या मिश्रणातून तयार झालेल्या शब्दांचा विचार केल्यास हिंदीच्या शब्दांचा आवाका मोठा आहे. संस्कृत भाषा ही सर्व भाषांची जननी मानली जाते. संस्कृतची शब्दसंख्या मोजणे शक्य नाही. उपलब्ध कोशानुसार ही संख्या ३० लाखा पेक्षा जास्त असू शकते. विज्ञानतंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र यातील संशोधन आणि प्रगतीमुळे प्रतिवर्षी हजारो नवीन शब्दांची भर भाषेत पडत असते. त्यामुळे शब्दकोश हे केवळ शब्दांचे अर्थ सांगत नाहीत, तर ते त्या त्या काळातील संस्कृती, समाज आणि भाषा यांच्या बदलाचा जिवंत इतिहास आहेत.

३.३.३ शब्दनिर्मिती आणि परिभाषा

कोणत्याही भाषेतला शब्द हा केवळ संज्ञा नसून तो त्या संस्कृतीचा वाहक असतो. जेव्हा आपण नवीन परिभाषा स्वीकारतो, तेव्हा आपण त्यासोबत येणारी नवीन विचारसरणीही स्वीकारत असतो. मराठी भाषेला समृद्ध ज्ञानभाषा बनवायची असेल तर सशक्त परिभाषेची निर्मिती व्हावी लागेल. याच अनुषंगाने ''डॉ. ना. गो. कालेलकर यांनी आपल्या भाषा आणि संस्कृती (१९६२) या ग्रंथातील 'शब्दनिर्मिती आणि परिभाषेचा प्रश्न' या प्रकरणात मराठीच्या शब्दसंग्रहाबाबत काही महत्त्वाचे आणि मूलभूत विचार मांडलेले आहेत. सरकारी भाषा, समाजाची उत्स्फूर्त भाषा आणि शास्त्रीय परिभाषा अशा तीन घटकांनुसार त्यांनी विवेचन केलेले आहे. १९६० च्या शेवटी महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ' आणि 'भाषा सल्लागार मंडळ' अशी दोन मंडळांची निर्मिती केली. मात्र या दोन्ही मंडळांच्या कार्यामुळे मराठीचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. राज्यकारभाराची भाषा मराठी असावी, सर्व लोकांना कळणारी असावी हा भाषा सल्लागार मंडळांचा हेतू होता, पण या मंडळाने एक नव मराठी भाषाच आपणास निर्माण करावयाची आहे, या थाटात कार्य केले. फार्सी, इंग्रजी हा शब्द मराठीचा कलंक आहे; सर्वसामान्यांची भाषा हीणकस आहे, अशा गंडांनी पछाडल्यामुळे आणि नवभाषा संस्कृतप्रचूर व्हावी अशावृत्तीने निर्माण झालेली ही सरकारी मराठी नागरिक, लोक प्रतिनिधी, मंत्री, अधिकारी वर्ग यांपैकी कोणालाच कळेना. इंग्रजीपेक्षाही कठीण अशी ही नवमराठी दुर्बोध बनली. ही भाषा बोजड आहे. ज्ञाप (मेमो), धनादेश (चेक), अंशकालिक (पार्टटाईम), सर्वेक्षक (सर्व्हेअर), प्रबंधक (रजिस्ट्रार), नगरसेना (होमगार्ड) इत्यादी शब्दांतील बोजडता स्पष्ट आहे. तदर्थ नेमणूक म्हणजे काय? पदभार, पदच्युती, पदोन्नती, दुबारप्रत, चक्रमुद्रित, छायांकित, अवसायान, समुपदेशन, संप्रेषक, संदेशन, सांख्यिकी, चले, गृहितके, पदविका, जलकुंभ अशा शब्दांपेक्षा आपणास इंग्रजी शब्दच जवळचे वाटतात, अशी भाषा सरकारी दप्तरात पडून आहे. या मंडळाने 'सरकार' हा शब्द काढून त्यासाठी 'शासन' हा शब्द वापरला, साहजिकच त्याला जोडून शासकीय, प्रशासन, प्रशासनिक असे शब्द आले. डुक्कर, कोंबडा, मासा असे (घाणेरडे) शब्द काढून तेथे वराह, कुक्कुट, मत्स्य असे शब्द वापरले. दूध, वीज, पाणी, माती ऐवजी दुग्ध, विद्युत, जल, मृदा असे संस्कृत शब्द आले. कारकून, नोकर असे शब्द जाऊन लिपिक, कर्मचारी असे गौरवपर शब्द आणले गेले. परंतु भाषाशुद्धीचा हा अट्टाहास चुकीचा व मूठभर लोकांच्या अभिमानापोटी आलेला आहे. आपण बोलतो लिहितो ते बरोबर की चूक अशी शंका मातृभाषेचा वापर करताना येणे, ही भयंकर गोष्ट आहे. म्हणूनच अशा राज्यभाषेचा, सरकारी भाषेचा वापर आजकाल थंडावला आहे.

अनेकदा समाज आपणहून स्वयंस्फूर्तपणे नवभाषा निर्माण करतो, अशी भाषा अथवा शब्द चटकन सरावाचे होतात. क्रिकेट हा मूळचा परदेशी खेळ आहे, पण भारतात हा खेळ लोकप्रिय होताच क्रीडापटूंनी, क्रिकेट प्रेमींनी, वार्ताहरांनी स्वयंस्फूर्तीने या खेळाची एक उप परिभाषा निर्माण केली, बॅट साठी 'बॅट' हाच शब्द आहे, त्यासाठी 'कुदकफलिका' असला शब्द कोणी वापरला नाही. चेंडू, फलंदाज, गोलंदाज, षटक, चौकार, षटकार, त्रिफळा, यष्टीरक्षक, क्षेत्ररक्षक, धावचीत, पायचीत, सीमा, संघ, संघनायक, कसोटी, एकदिवसीय सामना, टप्पा असे कितीतरी शब्द आज सहजपणे वापरले जातात. आकाशवाणी किंवा

दूरचित्रवाणी वरील धावती वर्णने यांची साक्ष आहे. लोकांना ही भाषा आवडते कारण त्यांच्या प्रतिभेला ही भाषा वाव देते. अत्यंत सुंदर शब्दांची क्रिकेटची मराठी सरकारी समित्यांचे अतिक्रमण कसे सहन करील? क्रिकेट प्रमाणेच इतर क्षेत्रे आहेत. तेथे लोकभाषाच महत्त्वाची असते. तमाशाला 'लोकनाट्य' म्हणणे योग्य नव्हे. कर्षिक (ट्रॅक्टर), बलीवर्दयंत्र (बुलडोझर), कृषि (शेती) हे शब्द कशासाठी?

रसायन, जीव, पदार्थ, खगोल, गणित, शिक्षण, संगणक इत्यादी क्षेत्रे विस्तारात चालली आहेत. ही शास्त्रे, ज्ञान समाज व भाषेशी निगडित आहेत. या शास्त्रांच्या ज्ञानाचे माध्यम म्हणजे परिभाषा होय. त्यातील शब्दांना पारिभाषिक संज्ञा म्हणतात. मात्र या परिभाषा संज्ञा आज अपुऱ्या पडत आहेत. अर्थात याचा वापर शास्त्र शिकविणारे अध्यापक, विद्यार्थी, संशोधन करणारे शास्त्रज्ञ अथवा जिज्ञासू व्यक्ती यांना होतो. इतरांना या परिभाषा आल्याच पाहिजेत असं नाही. ज्याची व्याख्या होऊ शकते असा विशिष्ट शास्त्रात वापरला जाणारा आशयघन शब्द म्हणजे पारिभाषिक संज्ञा होय. जसे; कार्बन, शुगर, सेल (पेशी), प्रोटॉन, इलेक्ट्रॉन, एनर्जी (ऊर्जा), सापेक्षतावाद इत्यादी. परिभाषा निर्माण करताना अपेक्षित अर्थ व संदर्भ व्यक्त करणारा व रूढ झालेला शब्द निवडणे महत्त्वाचे ठरेल. तेथे पुन्हा संस्कृत की परिभाषा, कठीण की सोपा असला गोंधळ घालू नये. भारतात शास्त्रीय शब्दांची आंतरभारतीय एकच परिभाषा निर्माण होणार नाही, हे ही लक्षात असू द्यावे लागेल. तेथे एकात्मतेपेक्षा गरज, लोकांची बौद्धिक पातळी, भाषेची घडण व कुवत यांचा विचार व्हावयास हवा.'' (संदर्भ : भाषाविज्ञान आणि मराठी भाषाः डॉ. अनिल गवळी, पृष्ठ क्रमांक १३५ ते १३७)

३.३.४ संस्कृत भाषेचा प्रभाव

महाभारतपूर्व प्राचीन काळात तत्कालीन भारताचे दोन भाग होते, नर्मदेच्या उत्तरेस आर्यावर्त आणि दक्षिणेस विंध्य पर्वताच्या पलीकडे दक्षिणापथ अथवा दंडकारण्य. भारतात आर्य आल्यानंतर प्रथम ते पंजाबच्या सुपीक प्रदेशात स्थायिक झाले. पुढे हळूहळू त्यांच्या टोळ्या विंध्य पर्वताच्या पलीकडे पसरत गेल्या. आर्यांनी वस्ती केलेल्या भागाला आर्यावर्त म्हणत असत. ते स्वतःची भाषा बोलत. याच आर्योत्पन्न भाषेतून संस्कृत भाषा निर्माण झाली. त्यामुळेच संस्कृत आणि मराठी भाषा यांचा प्राचीन काळापासून अतुट संबंध आहे. ''आजही मराठी भाषेतील धर्म आणि तत्त्वज्ञान चिंतनासाठी वेद, उपनिषदे, गीता, भागवत, रामायण, महाभारत या संस्कृत ग्रंथांचाच आधार घेतला जातो. ज्ञान, तत्त्वज्ञान, धर्म आणि संस्कृती यांची भाषा म्हणजे संस्कृत भाषा, हे समीकरण आजही मराठी माणसांच्या मनात खोलवर रुजलेले आहे.''

कुमारिलभट्ट, शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य अशा आचार्यांनी संस्कृत वैदिक धर्म आणि संस्कृतीचा प्रचार प्रसार संस्कृत भाषेतूनच केला. कवी कालिदास, भारवी, माघ, श्रीहर्ष, बाण, बिल्हण, भर्तृहरी इत्यादी कवी नाटककारांनी संस्कृत काव्य व नाटक समृद्ध केले. दंडी, राजशेखर, भास्कराचार्य, महेश्वर, हेमाडपंडित, लक्ष्मीधर, त्रिविक्रम यांसारख्या कवी आणि ग्रंथकारांनी आपल्या समर्थ लेखनीने संस्कृत वाङ्मय समृद्ध केले. छ. शिवाजी महाराज ते पेशवे काळात लेखन करणारे वामन, नागेश, रघुनाथ, विठ्ठल, मोरोपंत या पंडित कवींच्या रचनेवर संस्कृतचा मोठा प्रभाव दिसतो. पंडित कवींची रचना ही संस्कृतप्रचुरच होती.

आजही मराठीतील संस्कृत शब्दसंख्या सांगावयाची झाल्यास शेकडा सत्तर टक्के शब्द हे संस्कृत परंपरेतीलच आहेत. देव, धर्म, संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, साहित्य, आचार-विचार, व्रते या न बदलणाऱ्या गोष्टींच्या बाबतीत मराठी भाषा ही संस्कृतनिष्ठ आहे. देव, दर्शन, नृत्य, मंदिर, मेघ, पृथ्वी, आकाश, चंद्र, तारा, सूर्य, ब्राह्मण, पूजा, निर्माल्य, उपचार, उपकार, दीप, पुष्प, पत्र, गंध, अभिषेक, मंत्र, घंटा, कलश, मूर्ती, आसन, तीर्थ, प्रसाद, कथा, कीर्तन, आख्यान, पूर्वरंग, नमन, तिथी, श्राद्ध, होम, हवन, पिंड, पिता, तर्पण, भोजन, बळी, आहुती असे शेकडो तत्सम शब्द मराठीत आहेत. मराठीत तत्सम शब्दांची टक्केवारी ४६.०८% इतकी आहे, त्याचप्रमाणे घर, हात, तण, पान, माकड, कातड, कमळ, कळशी, छत्री, कान, पोथी, तोंड, पाय, ताक असे संस्कृत शब्दांपासून निर्माण झालेल्या तद्भव शब्दांची टक्केवारी ही ४९.२३% इतकी आहे. 'अजापुत्र बलिं द्यात', 'अतिपरिचयाअवज्ञा', 'अति सर्वत्र वर्जयेत्', 'अव्यापारेषु व्यापार, भवतिनभवति', 'येनकेन प्रकारेण', 'पुनश्चहरिॐ', 'शुभस्य शीघ्रम', 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' यांसारखे शेकडो वाक्प्रचार तसेच रामचंद्र, कृष्ण, यशोदा, सुभद्रा, भीम, अरविंद, पद्मावती, रवींद्र, लक्ष्मण, भरत, वासुदेव, नारायण, शकुंतला अशी कितीतरी विशेषनामे संस्कृत आहेत. स्वर- व्यंजनांची मांडणी व वर्गवारी, संधी, समास, उपसर्ग, प्रत्यय, ङ्, ञ् ही अनुनासिके, तृतीयान्त एकवचनी भावे प्रयोग या सर्व गोष्टी संस्कृतमधूनच मराठीत आलेल्या आहेत.'' (संदर्भ : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी, पृष्ठ क्रमांक ११९)

मराठीचा उगम जरी संस्कृत भाषेपासून सांगता येत नसला तरी मराठी भाषेतील सर्वच घटकांवर संस्कृत भाषेचा प्रभाव हा ठळकपणे दिसून येतो. संस्कृत व मराठी भाषेचा अतुट संबंध आहे. याचे कारण असे की, महाराष्ट्रात यादव कालखंडानंतर मराठीत जे वैभवशाली वाङ्मय निर्माण झाले त्यास संस्कृतची मोठी पार्श्वभूमी असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या प्राचीन परंपरेतील ताम्रपट आणि शिलालेख यांची भाषा संस्कृतप्रचुर असल्याचे दिसते. त्यामुळे संस्कृतची एक मोठी परंपरा देशात होती.

३.३.५ फार्सी भाषेचा प्रभाव

''इ.स. १३१८ मध्ये महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांचा पाडाव झाला आणि मुस्लिम राज्य, धर्म आणि भाषा यांचा शिरकाव महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात झाला. बहामनी काळापासून सुरू झालेल्या नंतरच्या सर्वच मुस्लिम शाह्यांच्या काळात फार्सी-अरबी भाषांचा प्रभाव महाराष्ट्रात वाढला. अरबी, फार्सी, तुर्की या भाषांना 'यवनी भाषा' अशीही संज्ञा आहे. राज्यकारभारात आलेली फार्सी ही भाषा मराठा सरदारांकडून सामान्य लोक या क्रमाने समाजात पसरत गेली. चौदाव्या शतकातील संत सेना न्हावी यांच्या कवितेत हजामत, आयना असे फार्सी शब्द आढळतात. बहामनी काळापासून ते अव्वल इंग्रजी कालखंडापर्यंत फार्सी भाषेचा हा प्रभाव राहिलेला दिसतो.

इसवी सनाच्या पाचव्या शतकापासूनच व्यापाराच्या निमित्ताने भारतीयांचा इराणी लोकांशी संबंध आलेला दिसतो. १२ व्या शतकात निर्माण झालेल्या ज्ञानेश्वरीतही जहरी, सुलतान, निसाण, पोतडी असे शब्द येतात. वि. ल. भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथात चौदाव्या शतकातील मराठीवरील फार्सीच्या

प्रभावाचे वर्णन पुढील प्रमाणे केलेले आहे. 'अर्जदाराच्या फिर्यादी, काजीपुढे जाऊन त्याचा फैसला किंवा इन्साफ होऊ लागला. पत्र गेले व कागद आले, अधिकाऱ्याचे मोकदम झाले, आणि त्यांना मिळणा-या वार्षिक वेतनाऐवजी सालिना मुशाहिरा मिळण्याचा सिलसिला पडला.' या विवेचनात येणाऱ्या वाक्यांतील फार्सी शब्दांवरून फार्सीचा प्रभाव किती होता हे लक्षात घ्यावे, एकनाथांचे 'अर्जदस्त' प्रकरण फार्सी मिश्रित आहे. मोरोपंतांसारख्या संस्कृतप्रचुर भाषा वापरणाऱ्या कवीच्या लेखनातही फार्सी-अरबी शब्द आढळतात हे विशेष आहे.

यादवकाळात आढळणारा फार्सीचा प्रभाव शिवकाळातील काही वर्षे सोडली तर पेशवाईच्या अखेरपर्यंत होता. वि. का. राजवाडे यांनी मराठीतील ऐतिहासिक पत्रांची भाषिक छाननी करून मराठीतील फार्सीचे प्रमाण दाखवून दिलेले आहे ते इ. स. १६२८-१४%, १६७७-६२%, १७२७-९३% असे होते. फार्सीचा वाढता प्रभाव लक्षात घेऊनच अमात्य रघुनाथ हणमंते यांच्याकडून शिवरायांनी 'राज्यव्यवहारकोश' तयार करून घेतला. फार्सी शब्दांच्या ठिकाणी संस्कृत व मराठी शब्द यावेत हा शिवरायांचा यामागे स्पष्ट हेतू होता. या 'राज्यव्यवहारकोशात' सुमारे १३८० शब्दांचे पर्याय दिले आहेत. उदाहरणादाखल पुढील प्रमाणे काही शब्द सांगता येतील. मराठी - यावनी शब्द, राजपुत्र - शाहजादा, पंडित - काजी, भट - मुल्ला, अग्निचूर्ण - दारू, दुर्ग - किल्ला इत्यादी. मात्र हा प्रयत्न फारसा फलद्रूप न होता मराठीतील फार्सीचे प्रमाण वाढतच राहिले. अर्वाचीन काळात माधव ज्युलियन आणि वि. दा. सावरकरांनी भाषाशुद्धीचे प्रयत्न केले. पण त्यांनाही फारसे यश आले नाही. कारण भाषा ही एक सामाजिक संस्था असते, ती कोणा एका व्यक्तीच्या आदेशाने किंवा प्रयत्नाने बदलू शकत नाही.

शब्दसिद्धीतून फार्सी शब्द मराठीत आलेले दिसतात. ई, गिरी, बाद, नामा, शीर, दान, दाणी, स्तान, की, वान, गी, बंदी, वंत असे विविध प्रत्यय मराठीत येऊन त्यापासून अनुक्रमे शीतलाई, शिपाईगिरी, हैदराबाद, तहनामा, जनानखाना, कायदेशीर, दीपदान, फुलदाणी, हिंदुस्तान, जामिनकी, दयावान, पोटगी, जमावबंदी, गरजवंत असे विविध शब्द सिद्ध झाले. फार्सी शब्दांच्या अर्थ व्यवस्थेसाठी मराठी शब्द जोडण्याची लकब निर्माण झाली. उदाहरणार्थ; कागदपत्र, दंगामस्ती, मेवामिठाई, शेतजमीन, अक्कलबुद्धी इत्यादि. मराठीतील सामासिक शब्दांत फार्सी शब्दांचा वापर सुरू झाला, जसे, फार्सी + फार्सी - अर्जदस्त, जनानखाना, पाकिस्तान; फार्सी + मराठी - कागदपत्र, अक्कलसबुद्धी; फार्सी+ संस्कृत - बंदीजन, वस्तादगुरू. जानराव, सुलतान, बाजीराव शहाजी अशी विशेषनामे तर, सौदागर, सराफ, फडणीस अशी आडनावे फार्सीमुळे मराठीत रूढ झाली. संपूर्ण नाव लिहिण्याची प्रथा फार्सीतूनच मराठीत आली. तसेच विशेषनामाच्या शेवटी बहुमानदर्शक 'जी' हा प्रत्यय फार्सीतूनच मराठीत आला. जसे, कृष्णाजी बिन (म्हणजे बाप), अंबाजी घोरपडे इत्यादी.

मराठी भाषेत शेकडो शब्द फार्सीतून आले आहेत. आजही त्यांचे मराठीतील प्रमाण २.९६ % इतके आहे. बाब, मिळकत, दानत, सरकार, इनाम, तारीख, खबर, वजीर, पेशा, मुशाहिरा, रास, जमीन, तसबीर, फौज, बारगीर, शिलेदार, पागा, लष्कर, स्वार, गोलंदाज, जीन, समशेर, तंबू, लगाम, जंजीरा, खंदक, बुरूज, चौथरा, किल्ला, जीना, दिवाणखाना, गच्ची, झगा, झबले, विजार, तुमान, पगडी, मखमल, चादर,

रजई, खुर्ची, मेज, पलंग, पानदान, अगरबत्ती, अंगूर, खसखस, पिस्ता, बदाम, अफू, डफ, ढोल, तबला, दिलरुबा, नगारा, नौबत, शहनाई, जलसा, मैफल, दौत, शाई, कलम, लखोटा असे विपुल शब्द फार्सीतून मराठीत आले आहेत. बहामनी काळातील मराठीवर फार्सीचा प्रभाव पाहता वि. का. राजवाडे यांनी 'भ्रष्टपणाची कमाल झाली' असे म्हटले आहे. मात्र मराठीने हे आक्रमण यशस्वीरित्या पचविले आहे. काही शब्द व कत्तलची रात्र, मोगलाई, अल्लाघरची गाय, दर्या मे खसखस, बापसे बेटा सवाई, बुड्ढी घोडी लाल लगाम, मिय्या मुठभर दाढी हातभर, बचेंगे तो और भी लढेंगे, मुर्गी मारी बच्चे दानादान अशा अनेक म्हणी आज फार्सीतून मराठीत रूढ झालेल्या दिसतात. जिल्हा, तालुका, कसबा, पेठ, मौजे, शहर, सुभा ही प्रदेश विभागांची नावे फार्सी आहेत. तसेच मराठीमध्ये खावंद (स्वामी), आर्जव (हेतू), खुशामत (मुद्दाम केलेली स्तुती), जबरदस्त (वर आहे हात ज्याचा असा), दिलगीर (असंतुष्ट), सुमार (गणना) हरामखोर (निषिद्ध खाणारा) असेही काही फार्सी शब्द मराठीत दिसतात.'' (संदर्भ : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी, मेहता प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्रमांक १२२ ते १२५)

३.३.६ इंग्रजी भाषेचा प्रभाव

''इंडो-युरोपियन भाषाकुलात इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, डच, ग्रीक, रशियन, फ्रिजिअन, लॅटिन, ग्रीक, पोर्तुगीज, संस्कृत, मराठी अशा अनेक भाषा समाविष्ट होतात. या भाषांपैकी आपण येथे इंग्रजी भाषेचा मराठीवरील प्रभाव पाहणार आहोत. इ.स. १६०८ मध्ये पहिला इंग्रज कप्तान हॉकिन्स भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरला. प्रथम व्यापार नंतर मिशनरी कार्य, नंतर राज्यकर्ते अशा क्रमाने १८१८ मध्ये पेशवाई बुडवून इंग्रजांनी स्वतःचे राज्य सुरू केले. तेव्हापासून आजअखेर गेली चारशे वर्षे इंग्रजीचा मराठी भाषेशी संपर्क आहे. आज तर इंग्रजी भाषा ही विश्वभाषा झालेली आहे. इंग्रज आणि भारतीय यांच्यातील जेते - जित संबंध, इंग्रजी शिक्षणाची सोय, ज्ञानप्रसार, दळणवळणाच्या सोयी, नव नवे वैज्ञानिक व औद्योगिक शोध, मुद्रणकलेची क्रांती या साऱ्यांमुळे इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढतच गेला. आज इंग्रजी ही जागतिक भाषा बनलेली असल्याने संगणक - आंतरजालासारख्या आजच्या आधुनिक युगात इंग्रजीशिवाय चालत नाही. मराठीमध्ये इंग्रजी शब्दांची संख्या १.७३% असावी.

एल्फिन्स्टनच्या सहकार्याने १८२१ साली स्थापन झालेल्या पुणे-पाठशाळेत संस्कृत, मराठी, इंग्रजी भाषा शिकवल्या जाऊ लागल्या. त्यामुळे मेजर थॉमस् कँडी आणि मंडळींनी मराठीतील कोकणी, फार्सी रूपे, प्रघात टाळून मराठीला प्रमाणरूप देण्यास सुरुवात केली. हे रूप अर्थातच खास पुणेरी होते. मेजर कँडीने मराठीला दिलेल्या प्रमाण रूपाची काही उदाहरणे अशी; करित्ये, जात्ये, येत्ये (करिती, जाती, येती), गेल्ये, बसल्ये, न्हाल्ये (गेले, बसले, न्हाले), बादशहाने तिला राणी केली (केले), तुम्ही पोथी वाचलीस (वाचली), ऐकोन, म्हणोन (ऐकून, म्हणून), इने, इजला, इला, याणे, याचा (हिने, हिजला, हिला, यांना, याला). दुसरे दिवशी (दुसऱ्या दिवशी) ही सर्व व्याकरणिक रूपे कँडीने बदलली. कंसातील रूपे शुद्ध आहेत.

या काळात प्रकाशित होणाऱ्या दर्पण, प्रभाकर, निबंधमाला इत्यादी नियतकालिकांतून तत्कालीन मराठी भाषेचे रूप प्रत्ययास येते. एकंदरीत या काळात 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' अशी मराठी भाषेची अवस्था

झाली. या काळातील मराठी भाषेचा अभ्यास 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' (प्रा. द. वा. पोतदार), 'मराठी गद्याची पूर्वपीठिका' (प्रा. गं. बा. सरदार), 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती' (कृ. भि. कुलकर्णी) या लेखकांच्या ग्रंथांतून प्रत्ययास येऊ शकेल. इंग्रजीच्या संपर्कामुळे मराठीच्या वर्णमालेत ॲ, ऑ या दोन स्वरांची भर पडली. त्यांच्या डोक्यावरील अर्धचंद्राची खूण स्वरचिन्ह म्हणून स्वीकृत झाली. उदाहरणार्थ; बॅट, कॉट, कॉलेज, जॉनसन, जॉर्ज, रॉय, कॅप्टन इत्यादी.

संयुक्त व मिश्र वाक्यरचना, अप्रत्यक्ष निवेदनाची पद्धती, नवीन शब्दरूपे इत्यादी गोष्टी इंग्रजीतून मराठीत आल्या. त्याचप्रमाणे आभार व शिष्टाचार दर्शक शब्द मराठीत आले. उदाहरणार्थ; Good night (शुभ रजनी), Good morning (शुभ प्रभात), Thank you (आभारी आहे) She says that she is still young यासारखी अप्रत्यक्ष निवेदनाची (Indirect Speech) वाक्ये मराठीत आली. इंग्रजीच्या परिणामामुळे साधलेली काही वाक्ये वा वाक्यांश पुढीलप्रमाणे; त्यांहून मी फार अधिक आहे. (I am better than them), तो तुला कान देईल (to give ear to); तुम्हांस व्हावी अशी वस्तू त्याजपाशी असती तर (If he had thing you should have), रे माझ्या लाडक्या मुला... (O, my dear boy), माझे चांगले ताई (My Dear Sister). काहीवेळा अनुकरण, चुकीचे भाषांतर, रूपांतर यामुळे मराठीत इंग्रजी वाक्यरचनेची सरमिसळ होते, अथवा तसा प्रभाव दिसतो. मराठी वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शनवरील मराठी बातम्यांमध्ये हा प्रकार आढळतो. उदाहरणार्थ; अल्पभेट (Short visit), उत्सुक असणे (is eager to), समाजवादामध्ये माझा विश्वास नाही. (believe in) चे अनुकरण होते. खरे तर मराठीत 'समाजवादावर' असा प्रयोग हवा. प्रमुख व इतर यामध्ये (in between), अपघाताने तो मला भेटला. (accidentally), खुली चर्चा (Open discussion), दुष्टचक्र (Viscous circle). नेहमीचे काही संवादही इंग्रजीमुळे प्रभावी बनले आहेत. उदाहरणार्थ; मी आपणासाठी काय करू शकतो? (What can I do for you?), माफ करा हं (Excuse me please.), जरा एक मिनिट (one minute please) माझ्या परीने उत्तम पातळीवर प्रयत्न करीन (I will try at my best level), आपण जाऊ शकता (you can go), तुम्हाला त्रास होत नसल्यास (If you don't mind), प्रश्न असा आहे... (the question is), क्षमा करा (sorry) चालता हो (get out), विनंती करतो (I beg), मार्गावर (on line), फोन करा (call me).

इंग्रजी शब्दांचे मराठी रूपांतर अथवा भाषांतरही मजेशीर आहे, असे दिसते. उदाहरणार्थ; लालफित (रेड टेपिझम), तांबडा कंदील (रेड सिग्नल), काळा बाजार (ब्लॅक मार्केट), नगरसेना (होमगार्ड), तारतंत्री (वायरमन), बलीवर्दयंत्र (बुलडोझर), प्रसविका (मिडवाइफ), पाणक्या (वॉटर बॉय), ज्ञाप (मेमो), निविदा (टेंडर), अनुज्ञप्ती (लायसेन्स), बाष्पक (बॉयलर) इत्यादी अनेक शब्द मराठीचे वळण बिघडवतात. भाषांतर करताना कित्येकदा चुका होतात. इंग्रजी संख्या मापनाची पद्धत हजार, लक्ष, दशलक्ष, अब्ज अशी आहे, तर भारतीय पद्धत हजार, लक्ष, कोटी, अब्ज अशी आहे. त्यामुळे Million चे दशलक्ष हे भाषांतर चुकीचे आहे. कारण ten million चे दहा दशलक्ष असे होईल. इंग्रजी शाळेत जाणारा मुलगा मी आँटीकडे गेलो

होतो, असे म्हणतो. इंग्रजीत आईची किंवा बापाची बहीण तसेच आई किंवा बाप यांच्या भावाची बायको यांना समान दर्जा दर्शक 'Aunt' असा शब्द येतो. त्यामुळे तो मुलगा नेमका कोणाकडे गेला होता हे कळत नाही. त्यापेक्षा I had gone to my Mavshi असे म्हटले तरी बिघडणार नाही. तसेच रिपोर्ट करणे, थँक्स देणे, गुडबाय करणे, इंजेक्शन टोचणे, ब्रेक लावणे, बेस्ट असणे, गायडन्स घेणे, रिझल्ट लावणे, व्हल्गर असणे, नॉशिया येणे अशी संयुक्त क्रियापदे (मराठी+इंग्रजी) मराठी भाषेतील श्रेष्ठता दाखवितात.'' (संदर्भः भाषाविज्ञान आणि मराठी भाषाः डॉ. अनिल गवळी, पृष्ठ क्रमांक १२५ ते १२९)

३.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

तत्सम शब्द : संस्कृत भाषेतून अविकृत स्वरूपात अथवा जसेच्या तसे मराठीत आलेले शब्द.

तद्भव शब्द : संस्कृत भाषेतून विकृत होऊन मराठीत आलेले शब्द.

देशी शब्द : आर्यपूर्व (नाग, गोड, आदिवासी) भाषेतील शब्द.

द्राविडी शब्द : तमिळ, तेलगू, कन्नड आदी भाषेतील शब्द.

भाषाकुल : अनेक भाषांच्या वर्गीकरणानुसार समान वैशिष्ट्य असणाऱ्या भाषांचा गट.

भाषिक कालखंड : मराठी भाषेच्या अभ्यासासाठी यादव काळ, बहामनी काळ, शिव काळ, पेशवे काळ, इंग्रजी काळ, आधुनिक काळ असे कालखंड कल्पिले जातात.

३.५ समारोप

विद्यार्थी मित्रांनो आपण 'मराठीवरील इतर भाषांचा प्रभाव' या घटकात आपण एक भाषा जेव्हा दीर्घकाळ दुसऱ्या भाषेच्या संपर्कात येते तेव्हा त्या एका भाषेतून दुसऱ्या भाषेत शब्दांची आदान-प्रदान कशी होते, त्यामुळे शब्दांची मूळ रूपे कशी बदलत जातात, त्यातून भाषा कशी समृद्ध होते याचा आढावा घेतला. तसेच भाषिक आदानप्रदानाच्या स्वरूपाची कारणे तपासाली. मराठी भाषेला एक हजार वर्षांची परंपरा आहे. गेल्या हजार वर्षांत मराठी भाषेत अनेक परिवर्तने आणि संक्रमणे झालेली आहेत. मराठी भाषेने यादव, बहामनी, मुघल, मराठेशाही, पेशवेकाळ, इंग्रज अशा अनेक राजवटी पाहिलेल्या आहेत. या राजवटीत युद्धे, वेगवेगळ्या समाजपरंपरा, जात व धर्म रीतिरिवाज व कर्मकांड या सर्व गोष्टी पचविलेल्या आहेत. मराठी भाषेतील या संक्रमणामुळे आज मराठी भाषा समृद्ध झालेली आहे. मुळात मराठीचा स्वभाव हा लवचिक असल्याने ती ज्या भाषांच्या सानिध्यात आली किंवा तिचा ज्या भाषेशी संबंध आला त्या-त्या भाषेतून अनेक शब्द स्वतःमध्ये सामावून घेतले व आपलेसे केले. मराठीवर अशा अनेक भाषांचा प्रभाव व ऋणही आहे. आजमितीला मराठीवर सर्वाधिक प्रमाणात प्रभाव इंग्रजी भाषेचा जाणवतो. याचा अर्थ इतर भाषांचा प्रभाव नाही असे नाही. इतर भाषांचे शब्दऋण आहेच. गतिमान जीवनामुळे आता जग एकत्र येत आहे त्यामुळे अगोदरच बहुभाषिक व सांस्कृतिक असलेल्या भारतासारख्या देशातील लोकांना एकापेक्षा अनेक

भाषांचा परिचय होत आहे. भारतीय लोकांना एक राज्य भाषा, एक राष्ट्रभाषा आणि शेजारी इतर भाषा यांचा परिचय असल्याने भारतीय लोकांचे भाषिक आदानप्रदान मोठ्या प्रमाणावर होत असते.

३.६ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

योग्य पर्याय निवडा.

१. मराठी भाषेत शेकडा किती टक्के संस्कृत शब्द आढळतात?

अ) पन्नास ब) साठ

क) सत्तर ड) ऐंशी

२. इसवी सनाच्या कितव्या शतकापासून इराणी लोकांचा भारताशी संबंध आला?

अ) दुसऱ्या ब) चौथ्या

क) पाचव्या ड) सातव्या

३. मराठीतील इंग्रजी शब्दांची संख्या किती टक्के सांगितली जाते?

अ) १.७३% ब) २.२५ %

क) ७.०८ % ड) ९.०० %

४. कन्नड ही भाषा कोणत्या भाषाकुलातील आहे?

अ) आर्यभारतीय ब) तिबेटी

क) पाश्चात्य ड) द्राविडी

५. 'व्यंकोजी' हे विशेषनाम कोणत्या भाषेतून मराठीत आले?

अ) कन्नड ब) फारसी

क) तेलगू ड) तामिळ

उत्तरे: १. सत्तर २. पाचव्या ३. १.७३% ४. द्राविडी ५. कन्नड

३.७ सरावासाठी प्रश्न

अ) लघुत्तरी प्रश्न

१. मराठी भाषेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव सोदाहरण लिहा.

२. मराठी आणि कन्नड भाषांचा अनुबंध स्पष्ट करा.

३. कोशवाङ्मय म्हणजे काय ते सांगा.

४. मराठीचा शब्दसंग्रह थोडक्यात लिहा.

आ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. मराठी भाषेवरील फार्सी भाषेचा प्रभाव सोदाहरण स्पष्ट करा.

२. मराठी भाषेवरील इंग्रजी भाषेचा प्रभाव सोदाहरण लिहा.

३. मराठीच्या शब्दसंग्रहाचा विस्तारित आढावा घ्या.

३.८ क्षेत्रीय कार्य

वर्तमानपत्रे व समाजमाध्यमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या भाषेतील बदललेल्या शब्दांचा संग्रह करा.

३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. मराठी संस्कृती: काही समस्या : डॉ. शं. बा. जोशी

२. मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप : डॉ. यु. म. पठाण

३. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार : द. वा. पोतदार

४. भाषाविज्ञान आणि मराठी भाषा : डॉ. अनिल गवळी

५. मराठी भाषा आणि भाषाविज्ञान : डॉ. चंद्रकांत कदम

❑❑❑

घटक ४

मराठीची विविध रूपे

४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे वाचन केल्यानंतर तुम्हाला,

- मराठीच्या विविध बोली रूपांचा परिचय होईल.
- बोलींचे स्वरूप लक्षात येईल.
- बोलींचे विशेष समजतील.
- बोलींच्या निर्मितीची कारणे आणि बोलीबद्दलचे गैरसमज समजतील.
- मराठीच्या बोलींची माहिती होईल.

४.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, यापूर्वीच्या घटकात आपण मराठी भाषेची उत्पत्ती कशी झाली, मराठी भाषेची परिवर्तन प्रक्रिया कशी घडते आणि मराठीवर इतर भाषांचा प्रभाव कसा पडतो. याविषयाचा परिचय करून घेतला. या घटकात आपण मराठीच्या विविध रूपांचा म्हणजेच बोलींचा अभ्यास करणार आहोत. भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. जगातील प्रत्येक देशामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. त्यांची संख्या विपुल आहे. जगातील एकूण देशांच्या संख्येत भाषांची संख्या अधिक आहे. कारण एका देशात एकच भाषा बोलली जात नसून त्याचे प्रांतिक भाषाभेद मोठ्या प्रमाणात आढळून येतात. आपल्या एकट्या भारत देशात मराठी, गुजराती, तेलगू, कन्नड, मल्याळम, तमिळ, पंजाबी, सिंधी, हिंदी, कोरिया, बंगाली, असामी यासारख्या अनेक भाषा बोलल्या जातात. यातील प्रत्येक भाषा एकमेकींपासून वेगवेगळ्या आहेत. पण मराठी भाषेचे जरी एक उदाहरण घेतले, तरी परिस्थिती आणखी वेगळी दिसेल. मराठी भाषा सर्वत्र एकाच प्रकाराने एकाच स्वरूपाची बोलली जाते का? तर नाही. कारण खानदेश, वऱ्हाड, कोकण, कोल्हापूर, पुणे, ग्वाल्हेर, बडोदा, इंदूर, विजापूर, हैदराबाद, बेळगाव अशा ठिकठिकाणी मराठी भाषा वेगवेगळ्या स्वरूपात बोलली जाते. साहजिकच असे भाषाभेद आपणास प्रत्येक भाषेत आढळतात. एखाद्या मर्यादित प्रदेशात राहणारे लोकही एकसारखी भाषा बोलत नाहीत. वर्ण, जात, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा, लिंग या भेदाने युक्त गट, विशेष उद्देशाने एकत्र आलेले गट (कॉलेजचे विद्यार्थी, कारखान्यातील कामगार, इ.) या सर्वांची भाषा एकसारखी असत नाही. जगात सहा हजार भाषा बोलल्या जातात. त्यातील ९०% भाषा अशा आहेत की, त्या बोलणाऱ्या लोकांची संख्या एक लाखाच्या आत आहे. तर ४५ भाषा अशा आहेत की, ती भाषा फक्त एकच व्यक्ती बोलते. त्यांचीही संख्या आता कमी होऊन ती भाषा मृतभाषा

झाली असावी. भारतात १६५० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत. यावरून बोलीची विपुलता आणि विविधता आपल्या लक्षात येते.

प्रत्येक भाषेतील उच्चारण, व्याकरण व शब्दसंग्रह यात भिन्नत्व असते. या भिन्नत्वामुळे आणि आकलनातील अडथळ्यामुळे दोन भाषेतील भिन्नता सहज लक्षात येते. सामाजिक आणि भौगोलिक अंतरामुळे एकाच भाषेची भिन्नभिन्न रूपे तयार होतात. परंतु या भाषाभिन्नतेत वावरणाऱ्यांच्या मनात मात्र आपण सर्व एकसंध समाजाचे घटक आहोत, अशी एकत्वाची भावना रुजलेली असते. अशा पद्धतीची भाषेची अंतर्बाह्य प्रक्रिया घडत असते. याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. बोलीचे स्वरूप व विशेष अभ्यासणार आहोत. बोली कशाने निर्माण होतात, बोलींचे महत्त्व काय, मराठीच्या कोणकोणत्या बोली आहेत, त्यातील निवडक बोलींच्या स्वरूप व विशेषांचा आढावा आपण घेणार आहोत.

४.२ विषयविवेचन

महाराष्ट्रात एकाच प्रकारची 'मराठी' ही भाषा सर्वत्र बोलली जात असली तरी वेगवेगळ्या भागातील लोक निरनिराळ्या भाषा बोलतात. वेगवेगळ्या समाजातील लोकांच्या भाषेत फरक दिसून येतो. त्यालाच आपण बोली म्हणतो. अशा अनेक बोलींना समाविष्ट करून घेणारी प्रमाणभाषा असते. परंतु बोली ही प्रमाणभाषेपेक्षा कितीतरी अधिक परिवर्तनशील असते. त्यामुळे समाजातील बदल ती नैसर्गिकपणे स्वीकारताना दिसते. महाराष्ट्रभर मराठीच्या साठहून अधिक बोली आहेत. यापैकी काही बोलींचा अभ्यास झाला आहे, तर काही बोली अद्याप प्रकाशातही आलेल्या नाहीत. परंतु, अलीकडच्या काही वर्षांमध्ये खेडापाडी वास्तव्य असलेल्या अनेक जाती, धर्मातील, विविध धंदा-व्यवसाय करणाऱ्या लेखकांकडून आणि काही जमातीमधील सुशिक्षित लोकांच्याकडून साहित्यनिर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. वेगवेगळ्या स्तरातून लिहित्या झालेल्या लेखकांकडून या अप्रकाशित बोली सर्वांसमोर येत आहेत. मराठी भाषेचे स्वरूप समजून घेण्यासाठी तिच्या सर्व बोलींचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक, सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच आपल्या परंपरा, श्रद्धा, रितीरिवाज, पुढील पिढीकडे संक्रमित होतात. जागतिकीकरणानंतर समाजातील वेगवान बदल विचारात घेतले तर अनेक बोलींचे अस्तित्व धोक्यात असल्याचे दिसते. त्यामुळे आज बोली अभ्यासाला विशेष महत्त्व दिले गेले पाहिजे. महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता, चालीरिती, जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादीच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होईल. पर्यायाने मराठी भाषेच्या विकासाला चालना मिळेल या सर्व गोष्टींचा विचार करता प्रमाण मराठी भाषेचे स्वरूप लक्षात घेऊन बोली अभ्यासाचे महत्त्व जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

४.२.१ भाषा व बोली भेद

विविध बोलीमध्ये उच्चार, शब्दसंग्रह, वाक्यरचना, अर्थ इत्यादी भेद असतात. पण अनेकदा 'भाषा' आणि 'बोली' हे शब्द पर्यायी शब्द म्हणून वापरले जातात. 'बारा कोसावर भाषा बदलते' या उक्तीनुसार बारा कोसावर भाषा बदलत असेल असा अर्थ होतो. परंतु बारा कोसावर भाषा बदलत नसून त्यातील वैशिष्ट्ये

बदलतात. ही वेगवेगळी वैशिष्ट्ये विविध बोलींशी संबंधित असतात. म्हणजे सदर विधानाचा महाराष्ट्रांतर्गत विचार करता बारा कोसावर 'भाषा' बदलत नसून 'बोली' बदलतात. याचा अर्थ असा होतो की, दैनंदिन जीवनामध्ये 'भाषा' आणि 'बोली' या शब्दांचा वापर करताना या दोन संज्ञांमधील फरक गांभीर्याने घेतला जात नाही. यासाठी 'भाषा' आणि 'बोली' या शब्दांचा निश्चित अर्थ जाणून घेणे गरजेचे आहे.

'भाषा' आणि 'बोली' या शब्दांच्या वापरामध्ये बरीच संदिग्धता आहे. सामान्य लोकांना हे दोन्ही शब्द सुपरिचित असून ते वैज्ञानिकदृष्ट्या एकमेकांपासून वेगळे आहेत आणि त्यानुसार वापरले जातात असे वाटते. खरेतर भाषा, बोली यांच्यातील फरक हे अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे आहेत अशा पद्धतीचे गोंधळ टाळण्यासाठी वा दोन शब्दांचे निश्चित अर्थ माहिती करून घेणे गरजेचे आहे. याबाबत डॉ. औदुंबर सरवदे म्हणतात की, सामान्यपणे 'बोली' म्हणजे अप्रमाणित, दुय्यम आणि साधारणतः खेडवळ लोकभाषा असा अर्थ घेतला जातो. अशा बोली शेतकरी, मजूरवर्ग किंवा तत्सम अनेकांच्या दृष्टीने कमी महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या लोकसमूहाशी संबंधित असल्याची धारणा असते. काही वेळा लिखित स्वरूप प्राप्त न झालेल्या भाषेला उद्देशून देखील बोली हा शब्द वापरलेला दिसतो. तसेच एखादा समाज स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि वेगळेपण सिद्ध करण्यासाठी जी भाषा वापरतो, तिलादेखील 'बोली' असे संबोधले जाते. त्याचबरोबर 'बोली' म्हणजे प्रमाण भाषेपासूनचे वेगळे आणि चुकीचे स्वरूप या अर्थानेही हा शब्द रूढ आहे. परंतु वरील सर्व व्याख्या या गृहितकांवर आधारित आहेत. त्यांना कोणताही भाषावैज्ञानिक आधार नाही. त्यामुळे त्या मान्य करता येत नाहीत.

पुढे ते म्हणतात, 'भाषा' आणि 'बोली' या शब्दांच्या अर्थाबाबतची अनिश्चितता, पर्यायाने होणारा गोंधळ हा या शब्दांची इंग्रजी भाषेमध्ये झालेली उसनवार आहे, असे मत ह्युजेन हा भाषावैज्ञानिक मांडतो. इंग्रजी भाषेमध्ये भाषा आणि बोली हे दोन्ही शब्द फ्रेंच भाषेमधून स्वीकारण्यात आले आहेत. परंतु यातील 'भाषा' हा शब्द प्राचीन असून मध्ययुगीन काळात प्रचलित असलेल्या 'tongue' (वाचा) आणि 'speech' (बोली) या शब्दाऐवजी वापरला जात असे. ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोशामध्ये 'भाषा' (Language) या शब्दाचा सर्वप्रथम वापर इ. स. १२९० ला पाहायला मिळतो. तर फ्रेंच भाषेमध्ये 'भाषा'या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील 'Lingua' या शब्दापासून झालेली आहे. याऊलट 'बोली' (dialect) हा शब्द पुनर्जीवनाच्या काळात ग्रीक भाषेतून स्वीकारला आहे यावरून 'बोली' आणि 'भाषा' हे दोन्ही शब्द ग्रीक भाषेतून घेण्यात आलेले आहेत. त्यांच्या अर्थामध्ये त्या शब्दांचा फ्रान्समध्ये झालेला वापर महत्त्वाचा आहे, हे लक्षात येते. (बोलीविज्ञान, औदुंबर सरवदे पृष्ठ क्रमांक १९, २०)

भाषा व इतरत्र बोलली जाणारी विविध रूपे म्हणजे बोली. भाषा आणि बोली उत्पत्तीनुसार समानार्थी शब्द असले तरी त्यांना वेगळी अर्थछटा आहे. भाषा ही अधिक व्यापक तर बोली थोड्या लहान परिघात सामावलेल्या असतात. तसे पाहिले तर भाषा व बोली यांना एकत्र अर्थ आहे. जी बोलली जाते ती भाषा किंवा बोली. अर्थाच्या दृष्टिकोनातून त्यात फरक नाही. सर्वच भाषा प्रथम बोली असतात. भाषा ही भाषाच असते. ती शुद्ध अशुद्ध असू शकत नाही. वेगवेगळ्या प्रदेशातील भाषिक छटांकडे भाषेचे सौंदर्य म्हणून पाहिले पाहिजे. मात्र व्यवहार व भाषा आणि बोली यात फरक केला जातो. भाषेतील सर्व बोलींची मध्यवर्ती

बोली असते. तिला प्रमाणभाषेचा दर्जा प्राप्त होतो. प्रमाणभाषा सर्व बोलींना आणि सर्व बोली प्रमाणभाषेला आकलनक्षम असतात. बोलींना लेखनाच्या नियमात बांधणे कठीण असते. प्रमाणभाषा शुद्धलेखनाच्या नियमांनी बद्ध असते.

अनेक बोली समजून घेण्यासाठी प्रमाणभाषेचा उपयोग होतो. बोली बोलणाऱ्या लोकांना प्रमाणभाषा कळते. प्रमाणभाषेच्या तुलनेत बोली अधिक जिवंत आणि रसरशीत असतात. तिला वेग व विविध हेल असतात. बोलींचे प्रभावक्षेत्र प्रमाणभाषेच्या तुलनेत खूपच लहान असते. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशात विविध बोली बोलल्या जातात. तरीही त्या सगळ्या बोलींना मराठी भाषा सामावून घेते. बोली म्हणजे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील व्यक्तींच्या व्यवहारात सामायिकपणे वापरली जाणारी भाषाच असते. भाषा ही लिखित स्वरूपात असते तर बोली मुख्यत: मौखिक असतात. भाषा आणि बोली यांच्यातील काही भेद मान्य करूनही त्यांच्यातील सहसंबंध हे तितकेच महत्त्वाचे आहेत. बोली ह्या भाषेला पूरकच ठरतात. बोलींच्या सामर्थ्यावरच प्रमाणभाषा समृद्ध होतात. बहुतांशी बोलीमधून उचललेले शब्द प्रमाणभाषेत असतात. जी भाषा शुद्धतेच्या नावाखाली बोली नाकारते; त्या भाषा लवकर मृत होतात. याचे प्रमुख उदाहरण म्हणजे संस्कृत भाषा. आजची प्रमाणभाषा ही काही वेगळी नसून सर्वांना सलोख्याने एकत्र आणण्यासाठी निर्माण केलेले एक माध्यम आहे. प्रमाणभाषा समाजातील बहुविध संस्कृतीला एकत्र आणणारा दुवा आहे. त्यामुळे बोली आणि भाषा यामध्ये उच्चनिचता मानणे अवैज्ञानिक आहे.

४.२.२ बोलीचे स्वरूप

इंग्रजी भाषेमधील 'Dialect' या इंग्रजी शब्दाला मराठीत 'बोली' हा प्रतिशब्द वापरला जातो. 'Language' या इंग्रजी शब्दाला मराठीत 'भाषा' हा शब्द वापरला जातो. खरे तर 'बोली' व 'भाषा' हे समानार्थी शब्द आहेत. 'बोली' हा शब्द ग्रीक भाषेमध्ये सर्वप्रथम वापरला गेला. ग्रीक भाषेमधून हा शब्द युरोपिअन भाषांमध्ये रूढ झाला. वास्तविक प्रत्येक भाषा ही अगोदर बोलीच असते, त्या बोलीला ग्रंथरूप प्राप्त झाले की, ती प्रमाणभाषेचे रूप धारण करते. आज महाराष्ट्राची 'मराठी' ही प्रमाणभाषा असली तरी पूर्वी कधी काळी मराठी ही बोली होती. समाजातील वेगवेगळ्या समाजगटांकडून बोलत जाणारे आणि तेथील प्रमाणभाषेशी साधर्म्य दाखवणारे जे भाषाभेद असतात किंवा भाषारूपे असतात त्यांनाच 'बोलीभाषा' असे म्हटले जाते.

'बोलली जाणे' ही कोणत्याही भाषेची पहिली आणि प्रधान अट असते. मुळातच 'भाष' म्हणजे बोलणे यावरून 'भाषा' ही संज्ञा रूढ झाली आहे. मानवी व्यवहाराच्या विनिमयाचे प्रधान माध्यम भाषा असते. भाषिक विनिमय 'संवादाच्या' पातळीवरचा असतो. यामुळे भाषा आणि बोली यात तात्त्विक अंतर राहात नाही. जी भाषा बोलली जाते तेव्हा ती कोणती तरी 'बोली' असते. ती व्यक्तिगत बोली, जातिबोली, कुटुंबबोली, प्रांतबोली, गटबोली, प्रमाणबोली किंवा आणखी कोणत्यातरी निकषावर घेतलेल्या भाषिकाची अंगभूत बोली असते. परंतु यातून 'बोली' या संज्ञेची व्यापकता येथे प्रस्तुत नाही, जर ही व्यापकता गृहीत

धरली तर भाषा आणि बोली हे भेदच निरूपयोगी ठरतात. येथे फक्त ‘एखाद्या व्यापक भाषिक परिसरातील प्रादेशिक भाषा या अर्थाने ‘बोली’ ही संज्ञा वापरली आहे.’

बोलीसाठी पोटभाषा हा शब्द वापरला जातो. वास्तव पण अमूर्त संरचना म्हणजे भाषा. समाजव्यवहारासाठी वापरली जाणारी पण लिपी नसणारी भाषा म्हणजे बोली, अशी बोलीची व्याख्या केली तर; सर्व पोटभाषा ह्या बोली असतात पण सर्व बोलींना पोटभाषा म्हणता येणार नाही, असे म्हणावे लागेल. कोकणी ही पोटभाषा आहे, एवढेच म्हणून चालत नाही. ती मराठीची पोटभाषा आहे, असे म्हणावे लागते. पण काही बोली अशा आहेत की, त्यांचा अंतर्भाव कोणत्याच प्रमाणभाषेत करता येत नाही. त्यामुळे बोली (Dialect) ही संज्ञा योग्य आहे. 'पोटभाषा' या शब्दातील 'भाषा' हे पद लिखित रूपाचा बोध देते. व्यक्तिभाषा, गटभाषा, उद्योगभाषा, खाजगीभाषा, व्यवहारभाषा, अनौपचारिक भाषा हे भेद अधिक सजग होतील. (भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, डॉ. अनिल गवळी, पृष्ठक्रमांक १४०) यावरून बोली या संज्ञेची व्यापकता लक्षात येते.

बोलीच्या व्याख्या

मराठी विश्वकोशातील व विविध भाषा अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे;

- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : विश्वकोश खंड ११ ‘ज्या व्यक्तिसमूहाला आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक रूप वापरतो असे वाटते, त्याची भाषा म्हणजे बोली’ येथे व्यक्तिसमूह व त्यांची भाषा याला गृहीत धरून व्याख्या केल्याचे दिसते.
- ना. गो. कालेलकर : ‘बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्कारांचा प्रश्न आहे.’
  सदर व्याख्येत ना. गो. कालेलकरांनी मौखिक परंपरा, बोलीतील जिवंतपणा, साधेपणा, परिणामकारकता, स्वाभाविकता इत्यादी वैशिष्ट्ये सांगितली आहेत.
- सु. बा. कुलकर्णी : ‘सामान्यतः ज्या भाषाभेदाला लेखन परंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वात केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात अशा भाषाभेदांना बोली (Dialect) अशी संज्ञा आहे.’

अशाप्रकारे भाषा अभ्यासकांनी आपापल्या परीने बोलीच्या विविध व्याख्या केल्याचे दिसते. काहींनी समाजातील एखादा गट आणि विशिष्ट भूप्रदेश यांना महत्त्व दिले. तर काही अभ्यासकांनी मौखिक परंपरेला

महत्त्व दिले. तर काहींनी व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या भाषिक रूपाला महत्त्व दिले आहे. एकंदरीत या सर्व व्याख्यावरून बोलीचे स्वरूप लक्षात येते.

४.२.३ बोलीचे विशेष

एकाच प्रदेशातील मूळ बोली कालांतराने बदलतात. वेगवेगळ्या प्रदेशात ती नवीन रूपासह बोलली जाते. त्या भिन्न बोलीत ध्वनी, वाक्य, शब्द यात भेद असले तरी भाषिकांच्या व्यवहारात अडथळा येत नाही. अशा तऱ्हेने नवीन बोली निर्माण होतात. दोन भिन्न भाषिक एकत्र आल्याने जित-जेते यांच्यातील आक्रमण किंवा संक्रमणामुळे बोलीची निर्मिती होते. काही वेळा एक भाषिक प्रदेश कितीही सलग असला तरी भौगोलिक व सांस्कृतिक भेदांनी त्यात अनेक बोली निर्माण होतात. या बोलींचे काही महत्त्वाचे विशेष आपणास पुढील प्रमाणे पाहता येतील.

१. बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. एखाद्या विशिष्ट लोकसमुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी बोली पडलेली असते, आणि तेच त्यांच्या अभिव्यक्तीचे साधन आहे.

२. शेकडो वर्षापासून ती मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारची लवचिकता, साधेपणा व जिवंतपणा असतो. त्यामुळे तिची स्वाभाविकता हेच तिचे एक वैशिष्ट्य होय.

३. बोलीमुळे परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीचे जतन होते. विशिष्ट लोकसमूहाची संस्कृती काही प्रथा-परंपरा बोलीतून व्यक्त होत असल्याने ती त्या लोकसमूहाला प्रिय असते.

४. स्थळ, काळपरत्वे बोलीत बदल झालेले दिसून येतात. अलीकडे बोलीला लिपीचिन्ह प्राप्त झाल्यामुळे ती लेखन व्यवहारातही दिसू लागली आहे.

५. व्यवसायपरत्वे, लिंगभेदपरत्वे, वयोगटपरत्वे आणि प्रसंगपरत्वे माणसाच्या बोलीमध्ये वेगळेपण दिसून येते. विविधता आणि वैचित्र्य ही बोलीची प्रकृती असते.

६. बोलीभाषा विशिष्ट समाजाच्या विशिष्ट प्रांतातील लोकसमूहाच्या स्वतंत्र अस्तित्वाची खूण असते. लिंगभेद, जातीव्यवस्था, संस्कृतीपरत्वे बोलीभाषेचे स्वरूप वेगवेगळे असते.

७. मानवी संप्रेषणाची व्याप्ती वाढली की बोलीला स्वतंत्र भाषेचा दर्जा प्राप्त होताना दिसतो तिच्यामध्ये वाङ्मय, तत्त्वज्ञान, कला, विज्ञान अशा विषयांतर्गत ग्रंथनिर्मिती होऊ लागली की तिला स्वतंत्र भाषा म्हणावे लागते.

८. बोली प्रमाणभाषेला मारक नसून पूरक असतात. नवे शब्द, वाक्यप्रयोग, म्हणी यांची नवनवीन भर प्रमाणभाषेत घालण्याचे कार्य बोली करीत असतात त्यामुळे प्रमाणभाषा समृद्ध होते.

९. प्रमाणभाषेचे क्षेत्र अथवा वर्तुळ व्यापक, विस्तारित असते. बोलींची क्षेत्रे अथवा वर्तुळे लहान, सीमित असून अशा बोली प्रमाणभाषेच्या मोठ्या वर्तुळात समाविष्ट असतात.

बोलीचे विशेष पाहिल्यानंतर बोली निर्मितीची कारणे जाणून घेणे गरजेचे वाटते.

४.२.४ बोली निर्मितीची कारणे

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. गतिशीलता हा समाजसंस्थेचा एक विशेष आहे. त्याप्रमाणे परिवर्तनशीलता हा भाषेचा स्वभाव आहे. समाजामध्ये भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक कारणांनी स्थित्यंतरे घडून येतात. त्याचे परिणाम बोलीवरही होतात. भाषेची परिवर्तनप्रक्रिया अखंडपणे सुरू असते. भाषेच्या अंतर्गत आणि बाह्य स्वरूपात स्थित्यंतरे घडून येत असतात. बोली कोणत्या एका कारणांनी निर्माण होत नाहीत. बोलींच्या निर्मितीस भौगोलिक दळणवळण, शासनसंस्थांचा प्रभाव, मागासलेपण, भाषिकाची विशिष्टता, भिन्नभाषा संपर्क, मानवी स्थलांतर अशी परिस्थितीजन्य अनेक कारणे कारणीभूत ठरतात. त्यातून भाषेची नवी रूपे उदयास येतात. नंतर ती स्वतंत्र बोली म्हणून अस्तित्वात येते. बोलींच्या निर्मितीच्या कारणांचा पुढीलप्रमाणे आढावा घेऊ.

१. एका भौगोलिक प्रदेशामध्ये बोलली जाणारी बोली कालांतराने त्या-त्या प्रदेशातील वेगवेगळ्या भागात, स्वतंत्र अशा भिन्न बोली तयार होतात. ह्या बोली कालांतराने त्या-त्या प्रदेशातील वा भागातील नावावरून लोकप्रिय होतात.

२. एखाद्या प्रदेशातील समाजाच्या रचनेमधून आणि सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून समाजातच वेगवेगळे गट निर्माण होतात. या प्रत्येक गटाची स्वतंत्र व वेगळी अशी बोली असते. कालांतराने त्या प्रत्येक बोलीची आणखी उपबोली तयार होते.

३. एखादा भाषिक समाज दुसऱ्या प्रदेशावर आक्रमण करून तेथे तो स्थायिक होतो. काही वेळा प्रचंड रोगराई, भीषण दुष्काळ, भूकंप यामुळेही एखादा भाषिक समाज दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहतो. दोन्ही समाज संप्रेषण साधण्यासाठी एकमेकांची भाषा अवगत करतात. त्यातून एक वेगळी बोली निर्माण होते.

४. राजकीच वर्चस्व, परभाषेचा स्वीकार, काही व्यावहारिक कारणे, अस्तित्वाचा प्रश्न अशा एखाद्या कारणाने समाज आपल्या स्वतःच्या भाषेचा त्याग करतो आणि दुसरी भाषा स्वीकारतो. परंतु असा परभाषेचा स्वीकार केल्यावरही स्वभाषेतील काही सवयी, काही लकबी, काही उच्चारविशेष, व्याकरणविशेष तसेच टिकून राहतात. त्यामुळे स्वभाषा आणि परभाषेच्या संक्रमणाने बोलीचे नवे रूप तयार होते. म्हणजेच त्या परभाषेची एक नवी बोली तयार होते.

५. बोलींचे स्वरूप सांगता आले तरी बोलींच्या सीमारेषा निश्चित करता येत नाहीत. त्यामुळे सीमावर्ती भागात दोनही भागांकडील बोलींचा प्रभाव त्या लोकांच्या बोलीवर पडत असतो. त्यातून त्यांच्या बोलीचे नवीनच रूप तयार होते, त्यालाच 'सीमावर्ती बोली' असे म्हणतात.

६. भारतात धर्मसंस्था आणि जातीव्यवस्था पूर्वीपासून चालत आलेली आहे. विविध जातीनुसार वेगवेगळे समाजगट पडलेले आहेत. त्या-त्या समाजगटांच्या वेगवेगळ्या बोली आहेत. त्यांनाच

'जात बोली' म्हणतात. व्यवसाय भिन्नतेमुळेही बोलींची निर्मिती होते. सम व्यावसायिक गरजेमुळे त्यांच्यापुरती त्यांची एक भाषा बनते. त्यातून बोलीची निर्मिती होते.

७. समाजामध्ये काही प्रभावक्षेत्रे असतात. प्रभाव गट आणि दुर्बल गट अशी समाजाची विभागणी होते. दोन्ही गटांच्या स्वतंत्र बोली निर्माण होतात.

८. लिंगभेदामुळे भाषाभेद निर्माण होतात. स्त्री आणि पुरुष यांची अनुभवक्षेत्रे निराळी असतात. त्यातून स्वतंत्र बोली अस्तित्वात येते.

९. बालक, युवावर्ग आणि वृद्ध यांच्या वयाच्या अवस्थांमुळे, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक प्रक्रियेमुळे बोली निर्माण होतात.

४.२.५. बोलीबद्दलचे गैरसमज

''समाजात बोलीबाबत काही गैरसमज आहेत. बोली म्हणजे गावंढळांची किंवा अप्रतिष्ठांची, अशिक्षितांची भाषा आणि अशुद्ध वा चुकीची भाषा आहे, असा बोलीबद्दल एक गैरसमज आहे. समाजात एक गट प्रभावी असतो; तो इतरांना कमी लेखतो. हा गट सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टीने प्रगत असतो. शिक्षण, शासन, वाङ्मय या क्षेत्रात प्रमाणभाषा वापरली जाते. त्यामुळे बोली हलक्या दर्जाची मानली जाते. भाषाविज्ञानाच्या दृष्टिकोनातून कोणतीही बोली श्रेष्ठ कनिष्ठ असत नाही. प्रत्येक बोलीचे विशेष ठरलेले असतात. विशेषतः उच्चार अथवा शब्दरूपांच्या आधारे बोलीला अशुद्ध ठरविले जाते. उदा होय- व्हय, मुलगा-पोरगा, आणायला-हाणायला, पोट-प्वॉट, बोट-ब्वॉट, पाणी-पानी. बोलीतील या शुद्ध-अशुद्धच्या कल्पना भाषाविज्ञान स्वीकारत नाही. बोलींना स्वतःची व्याकरणिक व उच्चारण व्यवस्था असते. बोलींचा लेखनासाठी वापर करायचा नाही, असाही एक समज आहे. मात्र आज सर्वत्र आपापल्या बोलीत आपले अनुभव सांगण्याचा प्रयत्न लोक करीत आहेत. मराठी वाङ्मयात दलित, ग्रामीण, आदिवासी अशा साहित्य प्रवाहात अनेक बोलींचा वापर होत आहे. त्यामुळे बोलींना व्याकरण नसते. भाषिक संरचना नसते. यासारख्या गैरसमजुती भाषेच्या स्वरूपाची व कार्याची नीट ओळख नसल्यामुळे निर्माण होतात. बोली नष्ट होत नाहीत, तर त्यांना स्वाभाविक परिवर्तनाचे रूप प्राप्त होते.

१९५० मध्ये बडोद्याच्या वाङ्मय परिषदेत डॉ. ना. गो. कालेलकर यांनी 'पायाशुद्ध मराठी' हा निबंध वाचला. हा निबंध पुढे 'भाषा आणि संस्कृती' (१९६२) या ग्रंथात समाविष्ट झाला. व्हता हा गावंढळ वाटणारा शब्द /न/मागे लागून नव्हता असा होताच शुद्ध बामणिया होतो. रानी, पानी या मराठी अशुद्ध रूपांना हिंदी (राष्ट्र) भाषेत स्थान मिळते.... रामभाऊंकडे श्रीखंडपुरी व शामभटकडे बुंदीचे लाडू असे वर्णन पाठ्यपुस्तकात येते. मात्र रामजी पाटलाकडे झिंग्याचा रस्सा किंवा म्हादबा मोऱ्याकडे मुर्गीपुलाव असे वर्णन नसते..... त्यामुळे ज्या शिक्षणसंस्थात सर्व थरातील मुले येतात तेथे उच्चनीच, शुद्धाशुद्धतेच्या अपमानकारक व खुळसट कल्पना जाऊन समाजाचे बहुविध दर्शन घडणारी भाषा आली तरच ते भाषेचे शिक्षण पायाशुद्ध मानता येईल. क्रमिक पुस्तकातून मराठीचा हा पायाशुद्धपणा कमी होत आहे. त्यामुळे परक्या माणसाने आपल्याकडील क्रमिक पुस्तकावरून मराठी भाषा शिकून बोलण्याचा प्रयत्न केला तर त्याचे हसे होते. या

शब्दांत डॉ. कालेलकर यांनी आपली निरीक्षणे व मते नोंदविली आहेत. भाषा आणि संस्कृती या ग्रंथात त्यांनी 'भाषा, बोली आणि समाज', ' मराठीच्या बोली' आणि 'कोकणी' असे आणखी तीन लेख लिहिले आहेत. त्यातून प्रमाणभाषा आणि बोली यांच्याबद्दलच्या गैरसमजांचे त्यांनी तात्त्विक विवचेन केले आहे. 'भाषा: इतिहास आणि भूगोल' (१९६४) या ग्रंथात डॉ. ना. गो. कालेलकर यांनी 'पोटभाषांची निर्मिती' या लेखांत प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील नाते ध्वनी, शब्द, वाक्य अशा पातळ्यांवर तपासले आहे. त्यांनी यासाठी प्रमाण मराठी व खानदेशी बोलीचे उदाहरण घेतले आहे. प्रमाण मराठीतील /ळ, य/,/स, श/, /न,ण/ यासाठी खानदेशी बोलीत अनुक्रमे /य/,/स/,/न/येतो. त्यामुळे तेथे पाणी (पानी), शाळा (साया), विमान (इमान), घड्याळ (घड्याय), डोळा (डोया) असा उच्चारभेद आहे. मुलगा (अंडोर), सतरंजी (झोऱ्या), दार (कवाड), भाजी (साक), रताळं (साकरू), कोनाडा (बोखलं), झोपाळा (बंगई), मुलगी (अंडेर) अशा उदाहरणांमध्ये शब्दस्तरावर भेद आहेत. 'शेवया पाटावर वळतात' हे वाक्य खानदेशी बोलीत 'सिया पाटलावर वैतस' असे बनते. अर्थात उच्चार, व्याकरण, शब्दसंग्रह यांच्यातील भेद आणि नवीन अर्थाचे शब्द असूनही डॉ. कालेलकर यांनी खानदेशी बोली ही मराठीची बोली मानली आहे. कारण शब्द, उच्चार यात भेद असला तरी आपण खानदेशी बोली समजू शकतो. न समजण्याइतकी ती अपरिचित नाही. अलिकडे 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा', 'बनगरवाडी', 'माणूस', 'तणकट' या सारख्या कादंबऱ्यांत तसेच राजन गवस, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोलेंच्या कथांत व बहिणाबाईंच्या गाण्यांत बोलींचा वापर आढळून येतो. या साहित्यकृतीतील सर्व बोलींना आपण प्रमाण मराठीत समाविष्ट करतो. त्या मराठीच्या बोली मानतो.'' (भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, डॉ. अनिल गवळी, पृष्ठ क्रमांक १४२ व १४३)

४.२.६ महाराष्ट्राच्या बोलीचा अभ्यास

महाराष्ट्राच्या विस्तृत भूमीवर मराठीची अनेक बोलीरूपे अस्तित्वात आहेत. मराठीच्या कोकणी, अहिराणी, व-हाडी, डांगी, हळवी, नागपुरी अशा निवडक बोली सर्वपरिचित आहेत. या बोलीव्यतिरिक्त अस्तित्वात असलेल्या कितीतरी बोलींची अद्याप स्वतंत्र दखल घेतली गेलेली नाही. मराठीच्या विविध बोलींना अभ्यासकांनी अभ्यासाच्या सोयीसाठी प्रदेश, जाती, धर्म, व्यवसाय, स्थळानुसार नावे दिलेली दिसतात. कोणतीही प्रमाणभाषा ही कधी काळी बोलीच असते. मराठी भाषेची 'कोकणी' ही बोली आज साहित्य अकादमीने स्वतंत्र भाषा म्हणून मान्य केली आहे. खानदेशी (अहिराणी) भाषा आता गुगल की बोर्डवर आलेली आहे. कोकणी, अहिराणी, वऱ्हाडीसारख्या मराठीच्या प्रमुख बोलींच्याही अनेक उपबोली आहेत. बोली परिवर्तनशील असतात. समाजातील बदल ती नैसर्गिकपणे स्वीकारते. मराठीच्या सर्व बोलींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण-महाराष्ट्र' या प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील बोलींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये आपल्याला माहिती असलेल्या बोलींबरोबरच अनेक नव्याने उजेडात आलेल्या बोली पुढीलप्रमाणे;

बोली : अहिराणी, आगरी, कोहळी, खानदेशी, लेवा, चंदगडी, झाडी, तावडी, पोवारी, मालवणी, वाडवळी, वऱ्हाडी, सामदेवी, संगमेश्वरी

आदिवासी : कातकरी, कोकणा, कोरकू, कोलामी, गोंडी, गोंडी-थाट्या, गोंडी-माडिया, ठाकरी, ठाकूर 'क', ठाकूर 'म', ढोरकोळी, निमाडी, निहाली, परधानी, पावरी, भिल्ली/भिलोरी, मघवाडी, मल्हार कोळी, मावची, मांगेली, राठ्या (बारेला), वारली.

भटक्या-विमुक्तांच्या भाषा : कुंचकोरवी, कैकाडी, कोल्हाटी, गुप्त व सांकेतिक भाषा, गोरमाटी, गोल्ला, गोसावी, घिसाडी, चितोडिया, छप्परबंद, डोंबारी, नाथपंथी, डवरी, नंदीवाले, पारोशी, पारधी, बेलदार, पारुषी, मांग, गारूडी, वडारी, वैदू

या सर्व बोली महाराष्ट्रात विविध प्रदेशात बोलल्या जातात. बोलींचा अभ्यास प्रमाण मराठीच्या विकासाला साहाय्यभूत होण्यासाठी बोलीतील शब्दसंग्रहाची चिकित्सा बोलीविज्ञानाच्या आणि समाजभाषा विज्ञानाच्या अंगाने होणे गरजेचे आहे. त्यामुळे शब्दांचे सामर्थ्य अर्थदृष्टीने लक्षात येईल. वरील बोलीपैकी अहिराणी, वऱ्हाडी, चंदगडी बोलींचे स्वरूप व विशेष पाहू या. या चार बोलींच्या किमान परिचयातून बोली अभ्यासाचे सामर्थ्य लक्षात घेता येईल.

४.२.७ कोल्हापुरी बोलीचा परिचय

कोल्हापुरी बोलीच्या भाषिक प्रदेशाचा विचार करताना कोल्हापुरी बोली ज्या क्षेत्रमर्यादेपर्यंत बोलली जाते त्या तालुक्यांचा, गावांचा विचार करावा लागेल. 'कोल्हापुरी बोली' हे नाव कोल्हापूर जिल्ह्याच्या नावावरून पडले आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा क्षेत्रमर्यादा गृहीत धरावी लागते. कोल्हापूर शहर तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, भूदरगड, राधानगरी, शिरोळ, शाहुवाडी, हातकणंगले, पन्हाळा, गगनबावडा या तालुक्यात बोलली जाणारी बोली ही कोल्हापुरी बोली म्हणून ओळखली जाते. हा कोल्हापुरी बोलीचा क्षेत्रविस्तार आहे.

कोल्हापूर शहरातील शहरी वळणाची कोल्हापुरी बोली ही शहरात राहणाऱ्या लोकांच्या बोलण्यातून जाणवते. कोल्हापूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून नोकरी, व्यवसाय, शिक्षणानिमित्त येणाऱ्या लोकांच्यावरही शहरी वळणाच्या कोल्हापुरी बोलीचा प्रभाव पडलेला आढळतो. तरीही प्रत्येक तालुक्यात कोल्हापुरी बोली बोलली जात असताना काही शब्द त्या तालुक्याची, त्या परिसराची वेगळी ओळख दाखविणारेही असतात.

कोल्हापुरी बोलीला कन्नड आणि कोकणी प्रदेशाच्या सीमा लाभल्यामुळे कानडी आणि कोकणी भाषेचा हेल कोल्हापुरी बोलीत जाणवतो. 'ते आलं', 'ते जेवलं' असे कानडी प्रभावित शब्द आढळतात. एकूणच भौगोलिक विविधतेमुळे कोल्हापुरी बोलीमध्ये वैविध्यता आढळते. स्त्रियांच्या भाषेत 'येतो', 'जातो', 'करतो', 'आलो' अशा क्रियापदांचा वापर आढळतो. त्यातून कोल्हापुरी बोलीचे व्याकरण ध्यानात येते.

सुलभीकरणाची रूपेही काही शब्दातून आढळतात. उदाहरणार्थ, शामादा, वसुदा, फव्वं, 'वडाप' असा नवा शब्द कोल्हापुर परिसरातल्या रिक्षा, टेंपो संस्कृतीने घडविला. वडा, डांबा आणि पळवा अशा तीन

शब्दांतून तो बनला आहे. वडाप करणाऱ्या वाहनांसाठी डुगडुग, टमटम असे शब्दही वापरले जातात. शिराळा तालुक्याचा पश्चिम भाग तसेच शाहूवाडीच्या उत्तर भागात 'हिकुडं', 'तिकुडं' असे शब्द ऐकायला मिळतात.

'कोल्हापुरी बोली: तत्त्व आणि व्यवहार' या ग्रंथात डॉ. एकनाथ आळवेकर यांनी कोल्हापुरी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास सविस्तरपणे केला आहे. त्यांनी कोल्हापुरी बोलीचे कृष्णात खोत यांच्या कादंबरीतील काही नमुने सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे

- **कोल्हापुरी बोलीचे नमुने**

१. 'वातीत गावलाय पावूस, रोज जरा तरी लागायचाच आता दसरा सपस्तवर' ('गावठाण' पृष्ठ: २५) पाऊस 'वातीत गावणे' म्हणजे पाऊस वातीत सापडणे, वात म्हणजे दिव्याची वात. दसऱ्यात नवरात्रीमध्ये तेलाची वात जळत राहते. दसरा सणाच्या पहिल्या दिवशी थोडा जरी पाऊस पडला तरी पाऊस वातीत सापडला अशी समजूत आहे. पुढे मग दसरा संपेपर्यंत दररोज थोडा तरी पाऊस पडतो.

२. 'त्या पाटा आता आणायच्या. दोन-तीन येतानं अर्थलीनं दिल्याल्या' ('गावठाण',पृष्ठ : १००) या वाक्यात 'पाटा', 'येतानं' आणि 'अर्धलीनं' असे तीन शब्द आहेत. 'पाटा' हे 'पाट'चे अनेकवचन आहे. 'पाट' म्हणजे शेळीपासून जन्मलेले मादी जातीचं पिलू, 'येतानं' मधील मूळ शब्द 'वेत' गाय, म्हैस, शेळी यांच्या विण्याचा काळ म्हणजे 'वेत'. वेतानं या शब्दाचा अपभ्रंश 'येतानं' असा झाला आहे. वरील वाक्यातील तिसरा शब्द 'अर्धलीनं' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आणि पहिल्या दोन शब्दांचा संदर्भ स्पष्ट करणारा आहे. 'अर्धलीनं देणे' हा शेतकरी वर्गातील दुभत्या जनावरांच्या बाबतचा एक व्यवहार आहे.

३. 'गुमान' हा शब्द बोलीत अनेकवेळा येतो. 'गुमान' हा शब्द दोन वेगवेगळ्या संदर्भात वापरला जातो. उदा 'गुमान पैसं दे' या वाक्यातील 'गुमान' या शब्दावर जर जोर दिला तर त्या शब्दातून जबरदस्तीचा भाव व्यक्त होतो. पण 'गुमान' या शब्दावर जोर न देता हे वाक्य बोलले तर 'गुमान' या शब्दाचा 'गुपचूप', कुणाला न समजता असा अर्थ व्यक्त होतो.

वरील उदाहरणातून आपल्या लक्षात येते की, कोल्हापुरी बोलीत त्या वाक्यातील विशिष्ट शब्द संदर्भाने घ्यावा लागतो.

- **निवडक शब्दसंग्रह**

यवजून : ठरवून	झट्याझोंब्या : त्रास
मिरीमिट्टी : प्रंचड गर्दी	आडमोडा : विसंगत
सुतडगुतड : एकमेकांत गुंतलेले	येडबडली : अडखळली
हुंदे : होऊन जाऊ दे	अक्षी : बरोबर

आप्रुवाई : नवलाई अगदी : बरोबर

४.२.८ खानदेशी बोलीचा परिचय

अहिर-अहिराणी : खानदेश हा मुळचा अहिर यांचा प्रदेश. अहिराणी भाषा म्हणजे अभीर लोकांची भाषा असे समजले जाते. अभीरचा अपभ्रंश अहिराणी झाला. अहिराणी बोली खानदेशात बोलली जाते. या भागाला 'अहिराण पट्टी' असेही म्हटले जाते. अभीर लोक प्राचीन काळापासून खानदेशात राहत होते असा उल्लेख शिलालेखातून, प्राचीन ग्रंथातून सापडतो. रामायण, महाभारतासारख्या ग्रंथातून अभीर लोकांचे उल्लेख आलेले आहेत. या अभीर लोकांवर आर्य लोकांच्या जीवनपद्धतीचा प्रभाव पडलेला आहे. खानदेशात आजही अहिर शिंपी, अहिर ब्राह्मण, अहिर सोनार अशा जाती आढळून येतात. अहिरराव, अहिरे अशी आडनावे विपुल प्रमाणात दिसून येतात. प्राचीन काळी हे सर्वजण अभीर होते.

खानदेशात अभिरांचे वास्तव्य होते. कालांतराने अभीर लोकांचे नाव अहिर झाले. या अभीर लोकांची बोली भाषा अहिराणी होय. म्हणजेच अहिराणी बोलीभाषा ही विशिष्ट जाती-जमातीची बोलीभाषा नसून खानदेशात वास्तव्य करणाऱ्या सर्वसामान्य लोकांची लोकभाषा आहे. अहिराणी ही एक स्वतंत्र बोलीभाषा आहे. भरताच्या नाट्यशास्त्रात अहिराणी बोलीभाषा असल्याचा उल्लेख आहे. तर वररूचिऱ्या व्याकरणात अहिराणी भाषा अपभ्रंश म्हणून उल्लेख केलेला आहे. या प्राचीन ग्रंथाच्या आधारावरून अहिराणी भाषा इसवी सनाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या शतकातील जुनी आहे. मराठीपेक्षाही जुनी परंपरा अहिराणी बोलीभाषेला आहे.

धुळे, जळगांव, नंदुरबार व नाशिक या जिल्ह्यात अहिराणी बोलीभाषा बोलली जात असली तरी तिच्या बोलीचे स्वरूप सर्वत्र सारखेच नाही. धुळे जिल्हा अहिराणी भाषेचा केंद्रप्रदेश आहे. तर नाशिक जिल्ह्यातील अहिराणी भाषेवर मराठीचा जास्त पगडा दिसून येतो. गुजरात सीमेला लागून असलेल्या धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अहिराणी भाषेवर इतर जाती-जमातींच्या पोटभाषांचाही प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे अहिराणी बोलीभाषा सर्वसमावेशक झालेली आहे. अहिराणी भाषेत भिल्ली, पावरी, नेमाडी, गुजरी, बडगुजरी, लाडशिक्की, घाटोई, महाराऊ, तडवी, काटोनी, परदेशी, घाटकोकणी, डांगकोकणी, ठाकरी, वारली, लेवा, लाडशिक्की, घाटोई, महाराऊ, तडवी, काटोनी, परदेशी, घाटकोकणी, डांगकोकणी, ठाकरी, वारली, लेवा, पाटीदारी, बोली, मुसलमानी बोली, भावसारी, रंगारी बोली अशा जातीनिहाय अहिराणीच्या पोटभाषा दिसून येतात. अहिराणी बोलीभाषेचा खानदेशातील भिल्ल, मावची, कोकणा, पावरा, ठाकर यांच्या बोलीभाषेवर ठळकपणे प्रभाव पडलेला आहे. अहिराणी बोली भाषेची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे;

- **खानदेशी (अहिराणी) बोलीभाषेची ठळक वैशिष्ट्ये**

१. जळगाव जिल्ह्यातील अहिराणी भाषेत 'ळ' बद्दल 'य' वापरला जातो तर नाशिक जिल्ह्यातील अहिराणी भाषेत 'ळ' वापरतात. उदा. जळगांव-जयगाव, केळ-केय, मिळते-मियते, पिवळा-पिवया.

२. अहिराणी 'स' या अक्षराऐवजी 'छ' वापरतात. उदा. सोड-छोड, सावली-छावली.

३. प्रमाण मराठीतील 'ण' बद्दल अहिराणीत 'न' वापरला जातो. उदा. पण-पन, निमंत्रण-निवतन, जाणे-जाने

४. मराठीतील 'आहे' व गुजराथीतील 'छे' या शब्दाला अहिराणीत 'शे' हा शब्द वापरतात.

५. मराठीतल्या षष्ठीत चा, ची, चे वापरतात. अहिराणीतील षष्ठीत न्ह, न्हीन, न, नी वापरतात.

६. अहिराणी भाषेत गुजराथी शब्दांचे प्रमाण ठळकपणे जाणवते. उदा. आंडोर, डिक्रा, बे, ना, नी, ने, छे, चा, शे.

७. अहिराणी भाषेत जोडशब्दांचे प्रमाण जास्त आढळते. उदा. तुन्हा, मन्हा, त्यास्न, आम्ना, तुम्हना, धल्ल, धल्ली, ग्यात, सम्द, बहानी, बठ्ठ, व्हऊ, आदी.

- **अहिराणी भाषेतील एक उतारा**

मन्ही ठमीनं लगीन, वऱ्हाडी कोन कोन
मामा म्हने मी मामा, लगनात बिनकामा
मामी म्हने मी मामी, लगनात बिनकामी
मन्ही ठमीनं लगीन, वऱ्हाडी कोन कोन
चुलता म्हने मी चुलता, लगनात पडे उलथा पालथा
चुलती म्हने मी चुलती, लगनात पडे उलथी पालथी
मन्ही ठमीनं लगीन, वऱ्हाडी कोन कोन
आई म्हने मी आई, लगनात करे घाई
बाप म्हने मी बाप, लगनात लागे धाप
मन्ही ठमीनं लगीन, वऱ्हाडी कोन कोन
(मौखिक परंपरेतून)

- **मराठीकरण**

माझ्या ठमीचे आज लग्न आहे. या लग्नाला वऱ्हाडी कोण कोण आहेत? मामा-मामी वऱ्हाडी आहेत. पण ते लग्नाच्या धावपळीसाठी काहीही कामाचे नाहीत. चुलता-चुलती आहेत. ते करून करून किती करतील? ते उलथे पालथे पडूनही लग्नाचे काम उरकत नाही. आईला वाटतं सर्व नीटनेटके आणि वेळेवर व्हावे. म्हणून ती प्रत्येक कामात घाई करते आहे. बाप हा तर बापच. सर्व धावपळीत आणि कामाच्या

घाईगर्दीत त्याला धाप लागली आहे. (भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, मुख्य संपादक गणेश देवी, पृष्ठ क्रमांक ७४ वरून उद्धृत)

- **निवडक शब्दसंग्रह**

त्याले : त्याला, आंडोर : मुलगा, धैडा : बाप, मुराई : पाव्हणा,

पानकाला : पावसाळा, आयशी : ऐंशी, वशीट : मांसाहार

पावशी : विळी, आवते : दोर, आगजा : बोभाटा, भितू : घाबरणे

गधडाले गुळनी चव : गाढवाला गुळाची चव काय कळणार?

४.२.९ चंदगडी बोलीचा परिचय

चंदगड हा महाराष्ट्रातील एक दुर्गम आणि डोंगराळ तालुका म्हणून सर्वपरिचित आहे. अति-पावसाळी, विस्तृत वनक्षेत्र, कोकण-गोव्याशी संलग्न असलेला तालुका आहे. कोल्हापूर या जिल्ह्याच्या ठिकाणापासून १५० कि.मी. दूर, दोन भिन्न भाषा-बोलींचा शेजार आणि नित्यसंपर्क महाराष्ट्राच्या भाषावार प्रांतरचनेपासून बेळगाव महालापासून अलग होण्यापर्यंतचा राजकीय अंमल, त्यातून झालेला भाषासंपर्क अशा अनेक गोष्टींच्या पार्श्वभूमीवर येथील बोली स्वतःची वेगळी वैशिष्ट्ये घेऊन तयार झालेली आहे.

चंदगड तालुक्याला जवळपास शहाण्णव लाख हेक्टर्स एवढे विस्तृत क्षेत्रफळ लाभले आहे. या विस्तृत क्षेत्रफळावर सर्वत्र एकसारखी भौगोलिक परिस्थिती आढळत नाही. तालुक्याची पश्चिम आणि पूर्व अशा दोन विभागामध्ये सरळ-सरळ विभागणी करता येते. यापैकी पश्चिम भाग अतिपावसाळी, डोंगराळ आणि वनक्षेत्र असलेला आहे. तर पूर्वेला तुलनेत कमी पाऊस आणि सुपीक जमीन लाभली आहे. पश्चिम भाग कोकणी भाषिक प्रदेशाशी तर पूर्व भाग कानडी (बेळगाव जिल्हा) भाषिक प्रदेशाशी संलग्न आहे. त्यामुळे दोन्ही विभागांत काही प्रमाणात सांस्कृतिक भिन्नताही दिसून येते. याचे एक उदाहरण म्हणजे तालुक्याच्या पूर्वेला कर्नाटकी बेंदूर आणि पश्चिमेला महाराष्ट्रीय बेंदूर हा सण साजरा केला जातो. भिन्न संस्कृती, भिन्न भौगोलिक परिस्थिती, दूरत्व, संपर्कक्षेत्रांची भिन्नता, भिन्न शेजार-भाषा इत्यादी कारणांमुळे चंदगडी बोलीची चंदगड तालुक्यात दोन भिन्न रूपे दिसून येतात. तालुक्याच्या पूर्वेकडून पश्चिमेला प्रवास करीत असताना, कन्नड भाषेचा प्रभाव असलेल्या बोली रूपाकडून कोकणीचा प्रभाव असलेल्या बोलीरूपाकडे सरकत जात असल्याचा अनुभव येतो. शब्दसंग्रह, उच्चाराचा विशिष्ट हेल, व्याकरणिक विशेष या सर्वच बाबतीत हे वेगळेपण दिसून येते. कोणत्याही विस्तृत प्रदेशात भाषा-बोली एकसारख्या आढळत नाहीत. त्याप्रमाणेच चंदगड तालुक्यामध्येही आढळणारे बोलीरूप सर्वत्र एकसारखे दिसत नाही. तथापि या सर्व विस्तृत प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीला मात्र 'चंदगडी बोली' अशा एकाच नावाने ओळखले जाते. (नंदकुमार मोरे, 'चंदगडी बोली' : भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र)

चंदगडी बोलीचा अभ्यास मराठीची बोली म्हणूनच करावा लागतो. चंदगडी ही बोली स्वतंत्रपणे अभ्यासताना लिखित, मुद्रित, पुराव्यांची वानवा जाणवते. या परिसरावर मौर्य, सातवाहन, शिलाहार, कदम्ब, राष्ट्रकूट आणि यादव अशा घराण्यांनी राज्य केल्याचे दाखले मिळतात. चंदगड परिसरातील राजकीय स्थित्यंतराचा आढावा घेताना कोकण, गोवा, कारवार, बेळगांव, म्हैसूर, बंगळूर, विजापूर यापर्यंतच्या राजवटींचा अंमल या भूभागावर होता. या राजवटी भिन्न-भिन्न भाषिकांच्या आहेत. गोवा आणि कोकणातील मालवाहतूक या तालुक्यातून होत होती. पोर्तुगीज आणि ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा वावर येथे होता. हा परिसर एके काळी द्रविडी वंशाच्या लोकांचा असल्याचे पुरावे सापडतात. या परिसरातील देव-देवता द्रविडी आहेत. अभ्यासकांच्या मते, म्हसोबा, चाळोबा, चव्हाटा, मरगूबाई, पवनाई, थळ, महास्थळ, माऊली, सीमदेव अशा देवता म्हणजे द्रविडी सरदार होत. हे सर्व सरदार गावचे रक्षणकर्ते होते. आजही या परिसरात या देवतांकडे गावरक्षणाचे गाऱ्हाणे घालतात. हा तालुका काही काळ कुरुंदवाड (सिनिअर) संस्थानात होता, तर १९६० पर्यंत बेळगाव (महाल) जिल्ह्यात होता. त्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यात समाविष्ट झाला आहे. या तालुक्याचा संपर्क कन्नड भाषिक प्रदेशाशी राहिल्याने तालुक्याचा पूर्व भाग कन्नड भाषेच्या प्रभावाखाली आहे, तर तर पश्चिम भाग कोकणशी संलग्न आहे. अशा अनेक गोष्टींमुळे होत राहिलेला भाषासंपर्क, संस्कृतीसंपर्क या बोलीच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.

चंदगडी बोलीतील शब्दांचे उच्चार, हेल, बलाघात प्रमाणभाषेपेक्षा खूप वेगळे आहेत. या बोलीमध्ये स्त्रिया 'मिय्या जेवलो', 'मिय्या बाजारास गेल्लो' असे बोलतात. या वाक्यातील क्रियापदे पुल्लिंगी आहेत. परंतु असे बोलणे या बोलीत रूढ होऊन गेले आहे. चंदगडी बोलीचा शब्दसंग्रह विपुल आहे. या शब्दसंग्रहाचे सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक संदर्भ शोधल्यास प्रमाण मराठीपेक्षा वेगळे अर्थ निघतात. उदा. 'म्हेर' हा शब्द या परिसरात बांध या अर्थी न येता 'रताळी' या पिकासाठी भरीव सरी या अर्थाने आला आहे. तर या परिसरातील धर्मांतरामुळे 'बाटका' हा शिवीसदृश्य शब्द तयार झाला आहे. तर 'वसूला' हा शब्द वसुली या शब्दाशी निगडित नसून 'वशिला' या अर्थाने चंदगडी बोलीत वापरला जातो. चंदगडी उच्चारण हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ही बोली एका विशिष्ट उच्चाराने, हेल काढून बोलली जाते. 'जाऊलेसाय....' हा एक शब्द वाटत असला तरी, हा शब्दप्रयोग 'तू जात आहेस?' या अर्थाने वापरला जातो. या शब्दातील 'ऊ', 'सा' आणि शेवटी 'य' या तीन ध्वनींचा उच्चार सुरावटीत केला जातो. अशा प्रकारे या बोलीलाच एक सुरावट प्राप्त होते. 'तिया यल्लीस' हे वाक्य प्रश्नार्थक आहे. परंतु ही प्रश्नार्थकता या बोलीच्या सुरावटीतून निर्माण होते. 'तू आली होतीस का?' हे प्रश्नार्थक वाक्य वरील केवळ दोन शब्दातून विशिष्ट सुरावटीमुळे बोलता येते. 'तिय्या जाऊललीसाय' या वाक्यामध्ये 'तू' हे सर्वनाम 'तिय्या' असे होते. शिवाय 'तिय्या'चा उचार पुन्हा खास सुरावटीमध्ये होतो. हे उच्चारविशेष कोकणीच्या जवळचे आहेत. अशी बोली तालुक्याच्या पश्चिम विभागात बोलली जाते.

पूर्व विभागात बोलीची सुरावट कन्नडच्या प्रभावाने तयार झालेली आहे. कव्वा (केव्हा), कास (कशाला), खट्टे (कोठे), तण्ण (तेव्हा), चकोट (चांगले), बळ्यान (खोटे), माज (मला), मिय्या (मी) असे शब्द पूर्वविभागात दिसतात. 'कासनी ते', 'खट्टे गेल्ल्यास', 'कन्नच्यान सोदलोय, मसोटीत गेल्ल्यास

काय?' अशी वाक्ये प्रत्यक्ष ऐकणे हा एक चांगला अनुभव आहे. या विभागात तुजं, माजं, त्यास, तिण्ण, मिण्ण, त्यण्णाणी, ह्यणाणी अशी सर्वनामे वापरली जातात. कन्नड सुरावटीत शेवटच्या अक्षरात टोकदारपणाचा उच्चार येतो.

- **पश्चिम विभागातील बोलीचा नमुना**

(एका गावातील पारावर बसलेल्या दोन वयस्क व्यक्तीमधील संवाद)

किस्णा – अगा ये धोंडूदा, ये की गा बोलोया घटकाभर !

धोंडिबा – तुझं काय बाबा ... कामं लई पडल्यात घे.

किस्णा – जाईस म्हणी घे.

धोंडिबा – हुं. मसयास्नं गवात घालू पाजेत. आरडोल्यात असेल. एका सक्कळी घरातनं भाईर पडलोय घे.

किस्णा – खल्या गावास गेल्लेस ?

धोंडिबा – तिकडी दूर कानड्या मुलखास गेल्लो घे. आऊच्या पोरास एक पोरगी बघूचं म्हणून गेल्लो.

किस्णा – मग गावली काय गा ?

धोंडिबा – न्हाय गा, लग्नास पोरयाच गावेनात झाल्यात. कोकण्या मुलखापासनं कर्यादीतनं कानड्या भागापतर सगळीकडे भोवोन यल्लो.

किस्णा – असं कश्यान झालं म्हणतलं गा हे.

धोंडिबा – पोरांनपक्षा पोरया लई कमी हाईत म्हणी.

किस्णा – एको नव्हे ते एकोचं ... आणि बगू नव्हे ते बगूचं ... यलं की गा हे !

धोंडिबा – तर काय ? आणि हाईत त्या पोरया सरकारी नोकरीवाला नवरा पाजे म्हणत्यात. खासगी नोकरी करणाऱ्यान आन् शेतकऱ्यांच्या पोरान काय करतलं बघ आत्तं.

किस्णा – पोरानीबी चकोट शिकोस पायजे गा. उठसुट मोबाईलात डोकं घालून बसत्यात. आब्यास करतलं बी ध्यान न्हाई. कधी कालेजात जातली बी दिसनं न्हाईत. चकोट शिकोण कायतरी कामधंदा करूस पाजे. चक्कोचक्कोटल्या नोकऱ्या-पिकऱ्या धरूस पाजे गा.

धोंडिबा – तेचेच भोग भोगतलं यलय घेवा हे. जातो. लई वकत झाला.

किस्णा – जा बाबा जा. मिय्या काय रिक्यामीच हाय !

(शब्दार्थ : बोलोया- बोलू या, जाईसम्हणी- जाशील की, मसयास्नं- म्हैशींना, आरडोल्यात- ओरडतात, भाईर- बाहेर, खल्या- कोणत्या, गेल्लेस- गेला होतास, कानड्या मुलूख- कर्नाटक प्रदेश, आऊच्या-

बहिणीच्या, भोवोन- फिरून, यलं- आलं, चकोट- चांगलं, शिकोण- शिक्षण घेऊन, मिय्या- मी, चक्कोचक्कोटल्या- चांगल्या चांगल्या)

काही शब्द : किरमं- सर्दी, हाऊळ : दंगा, हाळदुळा : पिवळा, धबला : जाडा, क्यास - केस, म्हाई-जत्रा, आरगाड-मोठा, पॉर-मुलगा

- **पूर्व विभागातील बोलीचा नमुना**

लक्ष्मी - व्हगे आऊ, खट्टे जाऊलीस गे.

पार्वती - मिय्या आणि खल्लेटे जाऊलाव? हिथे बदीसच शेतात जाऊलाव नी.

लक्ष्मी - जाईस म्हणी ये गे आऊ निंबराचं! भुत्तुर ये.

पार्वती - (आत येत) आळाची दोन माणसं बलिवलाव.

लक्ष्मी - आळास माणसं गावोल्यात गे?

पार्वती - न्हाय घेवाई आक्का. खटली माणसं. लग्नाव्हराडतनं आणि ह्या लक्षीम्यातनं माणसं गाव्वन्हात घेवा.

लक्ष्मी - व्हय घे.

पार्वती - आणि बायकास्नं सरकारतनं पैसे गावोल्यात की. पैसे यल्यात काय बघूस चार-आठ दिसास जात्यातुतच की बँकेत. तनं पासोन वट्टात माणसं गावेनात घे.

लक्ष्मी - व्हय घे. आमची ऊसातली भांगलण बी पडलेय.

पार्वती - आणि सुन्ना खट्टे गेल्यात गे.

लक्ष्मी - सुन्नांचं काय सांगो नको घे. हान्नुरी म्हायेराची लक्ष्मी हाय म्हणून म्हैना झालाय गेलेय. तिचं बळाग लई हाय म्हणी आणि धाकटी भावाच्या लग्नास जाऊन पंधरा दिस सरले. अश्यानं ह्वेंचा सौंसार व्हताय ! त्यण्णाणी कळोचं का न्हाय !

पार्वती - तरकारी काय केल्याशिताय ?

लक्ष्मी - पोरगे आपापल्या कामाधंद्यास्नं, आणि सुन्ना असल्या न्हाल्यावर तरकारी काय करशील ? माझा म्हातारा हाय म्हणून पोटास तरी खात्यात. न्हायतर पोटास बिब्बे घालून बसतली येळ यईल !

पार्वती - सगळ्यांचं तसंच घे. जातो बाई, न्हायतर आमचा हो यऊन यवदरनी करील.

लक्ष्मी - जा बाई जा. तुझ्याइदमं कामाचा खुळांबा नको.

(शब्दार्थ : व्हगे - होय गं, खट्टे जाऊलीस - कोठे जात आहेस, मिय्या - मी, जाऊलाव - जात आहे, बदीस - जवळच, निंबराचं - उन्ह, भुत्तुर- आत, आळास- मजुरीने, लक्षीम्यातनं - लक्ष्मी जत्रा, बळाग-

नातलग, गाव्वन्हात – सापडत नाहीत, तनं पासोन – तेव्हा पासून, हान्नुरी – हंदिगनुर या गावची, त्यण्णाणी – त्यांना, तरकारी – भाजीपाली, आमचा हो- नवरा, यवदरनी – भांडण, तुझ्याइदमं – तुझ्यामुळे)

काही शब्द : वांगडं- भाजी/ सोबत, करबेव-कडीपत्ता, बडगी-सुतार, कसार-कणकण, इस्टन-मालमत्ता.

४.३ समारोप

सदर घटकांमध्ये आपण बोली, बोलीचे स्वरूप व विशेष पाहिले. बोलींच्या निर्मितीची कारणे आणि बोलीविषयी गैरसमज सुद्धा अभ्यासले. भाषा आणि बोली परस्परांना पूरक आणि तारक आहेत. भाषा आणि बोली यांचा विचार करताना आर्थिक वर्ग, जाती, वर्ण, स्त्री-पुरुष असे भेद तपासणे गरजेचे आहे. भाषिक व्यवहाराचा सामाजिक संदर्भ अत्यंत गतिमान आणि व्यामिश्र असतो. भाषावैज्ञानिकांच्या मते भाषेत शुद्धअशुद्ध असे काही नसते. त्यांच्या मते बोलणे महत्त्वाचे असते. तरीही बोलीबाबतचे गैरसमज अनेक आहेत. पण ते चुकीचे आहेत. विविध बोली वाङ्मय, लेखन-भाषण, शिक्षण, ज्ञानार्जन, सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य करते. बोली प्रमाणभाषेला समृद्ध करते. बोलींचे महत्त्व वाढत चालले आहे. बोलींमुळे सांस्कृतिक संचित जतन होत आहे. बोलींच्या वापरामुळे आणि अभ्यासामुळे प्रमाणभाषेच्या शब्दसंग्रहात वाढ होत आहे. त्यामुळे बोलींचे जतन, संवर्धन, संशोधन करणे काळाची गरज ठरणार आहे. बोलींच्या अभ्यासासाठी आपण खानदेशी बोली, कोल्हापुरी बोली आणि चंदगडी बोलीच्या माध्यमातून काही बोलींचे नमुने अभ्यासले. भविष्यात आपण बोलींकडे संशोधकीय दृष्टीने पाहून बोलींचे जतन आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

४.४ शब्दार्थ व टीपा

इनार ह्युजेन (Hugen, Einar) **१९०६-१९९४ :** ह्युजेन यांचा अमेरिकेच्या इओवा या ठिकाणी जन्म झाला. बालपणाचा काही काळ यांनी नॉर्वेमध्ये घालवला. इंग्रजी आणि स्कॅन्डीनाव्हीयन भाषांच्या अध्ययनावर १९३१ मध्ये इलीनॉस विद्यापीठाची पीएच.डी. मिळाली. १९३१ ते १९६२ पर्यंत विस्कॉनसीन विद्यापीठात नोकरी केली. लिंग्विस्टक सोसायटी ऑफ अमेरिका, अमेरिकन डायलेक्ट सोसायटी आणि सोसायटी फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्कॅन्डीनाव्हीयन स्टडीज यांचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. स्कॅडीनाव्हीयन भाषा आणि संस्कृती तसेच द्विभाषिकता आणि त्याचे सामाजिक संदर्भ या बाबींचा त्यांनी महत्त्वपूर्ण अभ्यास केला. ह्युजेनसाठी भाषाविज्ञान म्हणजे एक अमूर्त सैद्धान्तिक क्षेत्र नसून संकलित माहितीवर आधारित अभ्यासशाखा आहे.

२. **संप्रेषण** : दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये विचार, भावना, माहिती, कल्पना किंवा संदेशांची योग्य माध्यमांद्वारे देवाणघेवाण (आदान-प्रदान) करण्याची प्रक्रिया होय.

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

योग्य पर्याय निवडा.

१. कोणत्या भाषेत 'ळ' बद्दल 'य' वापरला जातो ?

अ) अहिराणी ब) चंदगडी

क) कोल्हापुरी ड) झाडी

२. एक भाषा दुसऱ्या भाषेपेक्षा कशा प्रकारची असते?

अ) सारखी ब) वेगळी

क) एकरेषीय ड) समतोल

३. एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोलीभेदांना व स्थानिक भेदांना समाविष्ट करून घेणारी कोणती भाषा असते?

अ) बोलीभाषा ब) प्रमाणभाषा

क) पोटबोली ड) प्रमाणबोली

४. 'जाऊलेसाय' हा शब्दप्रयोग 'तू जात आहेस का?' या अर्थाने कोणत्या बोलीत वापरला जातो?

अ) अहिराणी ब) मालवणी

क) कोल्हापुरी ड) चंदगडी

५. प्रमाणभाषेला कोणत्या नावाने संबोधले जाते?

अ) ग्रांथिक भाषा ब) बोलीभाषा

क) पोटभाषा ड) बालभाषा

६. खानदेशात कोणती बोली बोलली जाते?

अ) वऱ्हाडी ब) चंदगडी

क) अहिराणी ड) कोकणी

७. लेखन परंपरा नसणे आणि मौखिक परंपरा असणे ही बोलीची वैशिष्ट्ये कोणत्या अभ्यासकांनी सांगितली आहेत?

अ) सु. बा. कुलकर्णी ब) ना. गो. कालेकर

क) विजया चिटणीस ड) लक्ष्मणशास्त्री जोशी

८. समाजाचे सांस्कृतिक संचित कशामुळे धोक्यात येते?

अ) राजकारणामुळे ब) कलावंतामुळे

क) समूहाच्या वितुष्टामुळे ड) बोली संतुष्टात आल्यामुळे

९. माळवं या कोल्हापुरी शब्दाचा अर्थ सांगा?

अ) माळ ब) मावळणे

क) भाजीपाला ड) कडधान्य

उत्तरे : १ -अ) अहिराणी , २-ब) वेगळी , ३-ब) प्रमाणभाषा , ४- ड) चंदगडी, ५-अ) ग्रांथिक भाषा, ६-क) अहिराणी, ७-अ) सु. बा. कुलकर्णी, ८-ड) बोली संतुष्टात आल्यामुळे ९- क) भाजीपाला

४.६ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. बोलीच्या व्याख्या सांगून, बोलीचे स्वरूप व विशेष लिहा.

२. भाषा व बोली यातील भेद सांगून बोली निर्मितीची कारणे सांगा.

आ) लघुत्तरी प्रश्न

१. अहिराणी बोलीचे विशेष लिहा.

२. चंदगडी बोलीतील विविध शब्दांचा परिचय द्या.

३. कोल्हापुरी बोलीचा परिचय करून द्या.

४. बोली म्हणजे काय? तिचे विशेष सांगा.

४.७ क्षेत्रीय कार्य

१. आपल्या परिसरातील किंवा तालुक्यातील बोलीचे नमुने जमा करून त्याचे विश्लेषण करा.

२. विविध व्यवसायानुसार त्यांच्या गटातील शब्द संग्रहित करा.

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. संपादक देवी गणेश, भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण (२०१७) महाराष्ट्र, पुणे, पद्मगंधा प्रकाशन

२. सरवदे औदुंबर, बोलीविज्ञान (२०२०) कोल्हापूर, भाषाविकास संशोधन संस्था

३. भाषा : इतिहास आणि भूगोल (१९६४) ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, गृह

४. भाषा आणि संस्कृती (१९६२) ना. गो. कालेलकर, मुंबई, मौज प्रकाशनगृह

५. गवळी अनिल, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा (२०१८), कोल्हापूर, मेहता बुक सेलर्स

६. संपादक डॉ. सोनाळकर शिवकुमार, शिविम संशोधन पत्रिका (बोली विशेषांक) (२०२३) कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ

❑❑❑